


***अवर्णनीय प्रिती पवित्र शास्त्रीय अभ्यास मार्गदर्शिका***


कायदेशीर अधिकृत हक्क (C) २०१७ रेवेलेशन प्रकाशन गृह.

जागतिक स्तरावर सर्व हक्क अधिकृत.


## *वितरणाच्या परवानगीसाठीच्या अटी*

आम्हाला ह्या गोष्टीची जाणीव आहे कि जर तुम्ही हे साहित्य इतरांच्या पर्यंत पोहचवले नाही तर प्रभूसमोर तुम्ही जवाबदार ठरणार, म्हणूनच आम्ही तुम्हाला हे साहित्य इतरांना देण्याचे उत्तेजन देतो आणि ते देखील कोणत्याही प्रकारे ग्रंथाचे शुल्क अथवा मानधन न आकारता पण तसे वितरण तुम्ही

पुढील सूचनांचे अवलंबन करून करू शकता. ही अभ्यास मार्गदर्शिका तुम्ही एका पीडीएफ स्वरुपात जतन करून त्याची झेरॉक्स काढून इतरांना ते देऊ शकता. ह्याची विक्री करता येणार नाही, किंवा त्यात कोणत्याही प्रकारे फेरबदल करता येणार नाही आणि ही कायद्याची अधिकृत सूचना प्रत्येक प्रतीमध्ये असणे आवश्यक आहे.

**www.RevelationPublications.com**
**PublisherForGod@gmail.com**

प्रश्न आणि संकलन मर्लिन बियरमन द्वारे
उदाहरणे- कायदेशीर अधिकृत हक्क (C)
लार्स जस्तीनेन
शब्दकोश हा ई. जी. व्हाइट ह्यांच्या महान वादविवाद ह्यातील अध्यायांमधून संक्षिप्त स्वरुपात तयार करण्यात आला आहे.
वरील उदाहरणे -
(C) बिगस्टोक फोटो.कॉम
आतील उदाहरणे - मर्लिन बियरमान
ISBN 978-1-934924-14-3

*प्रश्नांची उत्तरे ही बायबल सोसायटीची आर.वी. आवृत्ती ® शास्त्रवचनातून घेण्यात आली आहेत.*



# धडा १

# प्रेम काय आहे?

**(१) प्रेमाची एकमेव खरी आणि विश्वसनीय व्याख्या काय आहे आणि जी त्याच्या पुत्राच्या वरदानाने सगळ्यांच्या समोर प्रदर्शित झाली?**

***देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे. देव प्रीती आहे; जो प्रीतीमध्ये राहतो तो देवामध्ये राहतो व देव त्याच्यामध्ये राहतो. (१ योहान ४:१६)***

देवाचे पवित्र शास्त्रीय भाषांतर काय आहे? “देव प्रिती आहे.” ख्रिस्ताला आपल्या ह्या जगासाठी देण्यापूर्वी, देवाने संपूर्ण मानवजातीवरील त्याचे प्रेम व्यक्त

केले. “देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.” होय, “सार्वकालिक जीवन.” हेच ते प्रेम आहे जे नियमशास्त्राला परिपूर्ण करते.केवळ ज्याच्या हृदयात पतन पावलेल्या माणसाच्या बद्‌दलचे प्रेम आणि कळवळा आहे, जो एका हेतूसाठी प्रेम करतो, जो त्याचे आचरण ख्रिस्ताच्या प्रमाणे कृती करून प्रेम दर्शवतो, तोच जो अदृश्य आहे त्याला पाहण्यास टिकाव धरून राहू शकतो. जो कोणी आपल्या सहबंधुजनांवर हेतुनिहाय प्रेम करतो तोच देवाला ओळखू शकतो. ज्या पित्याने इतके केले आहे त्यांच्यावर ज्याचे प्रेम असते ते देवाला ओळखत नाहीत. हेच ते कारण आहे की आपल्याला मंडळीत इतक्या कमी प्रमाणवर खरे जीवंतपण दिसते. धर्मशास्त्र हे अर्थहीन आहे जर त्याच्यात ख्रिस्ताची प्रिती ही ठासून भरलेली नसेल.

**(२) देव आणि त्याचे परिपूर्ण प्रेम जेव्हा आपल्याला समजते, त्याच्याबद्‌दल आपल्या मनातील कोणती गोष्ट निघून जाते?**

***प्रीतीच्या ठायी भीती नसते; इतकेच नव्हे तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते; भीतीमध्ये शासन आहे आणि भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही. (१ योहान ४:१८)***

देव प्रिती आहे हे एक प्रगटीकरण आहे, कारण लोकांना हि वास्तविकता स्वतःहून कधीच कळली नसती. मनुष्याच्या हितासाठी हे प्रगटीकरण अत्यंत महत्वाचे व अत्युच्च आहे. देव आत्मा आहे(योहान ४:२४) हे महत्वाचे आहे, पण अशा व्यक्तीच्या सोबत आनंदी नाते उपभोगण्याच्या बद्दल ह्या मधून काहीच समजत नाही. “देव प्रकाश आहे” (१ योहान १:५) हे बौद्धिक रीतीने तृप्त करते, पण सर्वोतम शुद्ध, सर्वकाही पाहणाऱ्या देवाचा विचार हा सांत्वन नाही तर भय उत्पन्न करू शकतो, ज्याच्या आधारे आपण सर्व आहोत, हा देव आपल्यामध्ये असे काय चांगले बघू शकतो? पण जेव्हा आपण शिकलो की देव प्रिती आहे, भयाची जागा भरवस्याने घेतली, आणि आपल्या स्वर्गीय पित्याच्या हाती आत्मविश्वासाने स्वतःला सोपवून घेऊ शकतो, हे जाणून की तो आपली काळजी घेतो (१ पेत्र ५:७).

**(३) देवाची अढळ आणि दृढनिश्चयी प्रिती आणि दया आपल्यासाठी किती काळ टिकून राहील?**

***परमेश्वराने दुरून येऊन मला दर्शन दिले; तो म्हणाला, मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो म्हणून मी तुला वात्सल्याने जवळ केले आहे. (यिर्मया ३१:३)***

देव प्रिती आहे ह्याचा अर्थ असा काही वेगळा किंवा विशिष्ट वेळ नाही जिकडे तो नाही किंवा तो ती प्रिती असणार नाही. त्याचा स्वभाव कदापि बदलत नाही; भूतकाळात देखील प्रेम हे त्याचे गुणविशेष होते आणि भविष्यात देखील ते असणार. आपण ते स्वतःसाठी सिद्ध करून दाखवू शकतो, कारण जसे चार्ल्स वेस्ली त्यांच्या देवासोबतच्या नात्याबद्दल म्हणतात, “संपूर्ण सार्वकालिकतेत तुझा स्वभाव आणि तुझे नाव हे सिद्ध करण्यासाठी हे प्रेम आहे.”

**(४) प्रेमामध्ये, देवाने आपल्याला त्याच्या प्रतीरुपाचा बनवले, सर्व बुद्धीच्या पलीकडे आणि निवड करण्याच्या स्वातंत्र्याने. ह्यामुळे तो आपल्याला त्याच्या बरोबर काय एकत्र करण्यास सांगतो?**

***“परमेश्वर म्हणतो, चला, या, आपण बुद्धिवाद करू; तुमची पातके लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी पांढरी होतील; ती किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरीसारखी निघतील. (यशया १:१८)***

देव प्रिती आहे हे विधान समजून घेण्यात अमर्याद मूल्य आहे कारण त्यातच आपल्याला तारणाची योजना हि अवगत होते. केवळ प्रेम तिच्या सजीवांना हे स्वातंत्र्य आणि स्वेच्छा देते आणि देव व त्याचे दूत आणि पतन पावलेल्या लोकांच्या प्रती हे काही पाप केले आहे त्याचे दुखसहन करण्याचा धोका टाळण्यास मदत करते. ज्या लोकांना स्वतःच्या मार्गाने जायचे होते त्यांची हसमुख आणि आनंदी स्वरुपाची स्वेच्छा पूर्वक सेवा मिळवून घेण्यास प्रेम कार्यरत असते. आणि जेव्हा पाप आले, केवळ प्रेमाकडे तो संयम होता आणि ती इच्छा होती जेणेकरून एक योजना आखण्यात आली ज्यामुळे वाईट आणि चांगले ह्या महान वादातील मुलभूत कल्पना आणि वास्तविकता समजून घेण्याची शक्ती मिळाली, आणि स्वतःला उंच करण्याची प्रवृत्ती आणि द्वेष ह्याबद्दल काहीच

मुद्दे उपस्थित होऊ नये ह्याची खात्री घेतली गेली.
पापच्या विरोधात युद्धात, देव, जो खरी प्रिती आहे, आणि सैतान तर धूर्त लबाडी आणि त्याचा क्रूर जोम ह्यांचा वापर करतो. केवळ प्रेम त्या योजनेला प्रेरित करू शकत होते ज्यामुळे पुत्राने त्याचे पृथ्वीवरील जीवन, मृत्यू आणि पुनरुत्थान हे मानवजातीला पापाच्या दोषापासून आणि सत्तेपासून मुक्त करण्यास व उद्धार करण्यास उपयुक्त केले, आणि एका नवीन आणि पापरहित जमावाचा तो प्रमुख बनला (व.९ पहा). त्याच्या मूळ स्वभावाने देव ही योजना आखू शकला आणि त्याची अंमलबजावणी करू शकला (योहान ३:१६).

**(५) देव प्रिती आहे म्हणून, आपल्या ख्रिस्ती अनुभवाचा सर्वोच्च आणि सर्वात मुलभूत घटक काय आहे?**

***सारांश, विश्वास, आशा, प्रीती ही तिन्ही टिकणारी आहेत; परंतु त्यांत प्रीती श्रेष्ठ आहे. (१ करिंथकरास पत्र १३:१३)***

जेव्हा हे समजते की चारित्र्याच्या सर्व गुणांपैकी, प्रेम एकमेव आहे ज्याची प्रेरणा आपल्याला देवाच्या मूळ

स्वभावाचे वर्णन करण्यास सहायक ठरते, प्रेषित जेव्हा म्हणतो की आत्म्याच्या सर्व दानाच्या पेक्षा हे सर्वश्रेष्ठ आहे असे तो का म्हणतो(१ योहान ४:७,८, १६ पहा). जीवनाची एक पद्धत म्हणून, प्रेम हे अधिक कार्यशाली आहे, अधिक विजयशाली आहे, अधिक तृप्त करणारे, आत्म्याच्या वर्दानांमधील इतर दानाच्या पेक्षा जेव्हा ते वापरले जाते ज्याचा उल्लेख अध्या. १२ मध्ये आहे (१ कर १२:३१ पहा). देवाप्रती आणि आपल्या सहकारी लोकांच्या प्रती असणारे प्रेम हे देवाच्या सोबत सुस्थितीत राहण्यासाठी सर्वोच्च प्रदर्शन आहे (मत्तय २२:३७-४० ; ८ टी १३९ पहा). विश्वास्नार्याच्या जीवनात जे प्रेम दिसते ते एखाद्याच्या ख्रिस्तीत्वाच्या प्रामाणिकपणाची सर्वात मोठी परीक्षा आहे.

एक ख्रिस्ती बनणे म्हणजे ख्रिस्ताच्या सारखे असणे, जो "चांगले करत होता" (प्रेषित १०:३८). ख्रिस्ती लोक, मग असे लोक आहेत, येशूच्या आत्म्यात, चांगले करत फिरतात आणि सर्व गरजू लोकांची मदत करतात. ते कोणत्याही प्रकारे स्वार्थ वृतीने करत नाहीत, पण देवाची जी प्रिती त्यांच्या मनात आहे ती त्यांना इतर काहीही करण्यास शक्य करत नाही.

प्रेम हा अत्युच्च उत्कृष्ट मार्ग आहे, कारण त्याचे व्यावहारिक प्रदर्शन म्हणजे एक परीक्षा आहे ती म्हणजे सर्व लोकांचे सनातन भवितव्य हे निश्चित करणे. ज्या लोकांसाठी धर्म म्हणजे बाह्यस्वरूप केवळ एक दिखावा म्हणून आहे त्यानं समजते की असे स्वरूप देवाला काही मान्य नाही.

आत्म-त्याग करणारे प्रेम, विश्वास्नार्यांच्या मध्ये जे ऐक्य निर्माण करते, ते जगाला खात्री देते की देवाने त्याच्या पुत्राला जगात संपूर्ण मानवजातीला तारावयास पाठवले आहे. ही देवाची त्याच्या लोकांसाठी निवडलेली पद्धत आहे शुभवर्तमानाच्या सत्याच्या प्रती ते साक्ष देतात (योहान १७:२१, २३ पहा). असे प्रेम, ज्यामध्ये उंचावण्यासाठी, समर्थन करण्यासाठी किंवा स्वतःला संतोषविण्यासाठी काहीच इच्छा अन्ही, पण गरजू लोकांसाठी निस्वार्थी सेवा करण्यास समर्पित आहे, एक वाद आहे जो परिवर्तन न झालेल्या लोकांना केवळ बोलून दाखवता येत नाही. ते लोक त्यात त्यांच्या जीवनाच्या तत्वज्ञानासाठी काहीतरी ग्रहण शक्तीच्या पलीकडे असे बघतात. त्यांची हृदये ढवळली जातात, आणि त्यांची बुद्धी हि दैवात्वाच्या

शक्तीच्या प्रती प्रतिसाद देते जी परिवर्तीत लोकांच्या जीवनात दिसून येते. म्हणूनच प्रेम म्हणजे शुभवर्तमान गाजवण्याचा आणि देवाचे राज्य पुढे नेण्याचा हा सर्वोच्च मार्ग आहे. {६ख्रि.पू ७८५-७८६}

**(६) हे वचन प्रेमाचे प्राधान्य आणि महत्व ह्यांचे वर्णन कसे करते?**
***पूर्णता करणारे बंधन अशी जी प्रीती ती ह्या सर्वांवर धारण करा. (कलस्सेकरास पत्र ३:१४)***

देवाच्या प्रती आणि आपल्या शेजार्याच्या प्रती प्रेम हे मनुष्याचे संपूर्ण कर्तव्य आहे. बंधुप्रेम आणि दया असल्याशिवाय आपण देव किंवा आपले सहकारी बंधुजन ह्यांच्या प्रती ते प्रेम दाखवण्यासाठी ती कृपा व्यक्त करू शकत नाही.

ख्रिस्त अशी प्रिती देऊ करतो जी बुद्धी सामर्थ्याच्या पलीकडे आहे. हे प्रेम आपल्या जीवनापासून दूर ठेवलेले असे नाही, पण ते आपल्या संपूर्ण जीवाचा ताबा घेते. ज्या स्वर्गाकडे ख्रिस्ती व्यक्ती चढून जात आहे ते केवळ ज्यांच्याकडे ही उल्लेखनीय कृपा आहे त्यांनाच मिळू शकते. हाच तो नवीन जिव्हाळा आहे जो

प्रत्येक जीवात्म्यात शिरतो. जुने ते मागे ठेवण्यात येते. प्रेम हीच ती मोठी नियंत्रण ठेवणारी शक्ती आहे. जेव्हा प्रिती चालवते, त्यात मन आणि आत्मा ह्यांच्या प्रत्येक भागांचा उल्लेख केला आजतो. देव आणि मनुष्यांच्या प्रती प्रेम हे स्वर्गासाठी स्पष्ट शीर्षक देईल.

**(७) जरी भविष्यवाणी, वाचा, आणि सुज्ञान हे संपतील, आपण कशाचा आधार घेऊ शकतो जे कधीच अपयशी ठरणार नाही?**

***प्रीती कधी अंतर देत नाही; संदेश असले तरी ते संपतील. भाषा असल्या तरी त्या समाप्त होतील; आणि विद्‌या असली तरी ती संपेल. (१ करिंथकरास पत्र १३:८)***

खरे प्रेम हे एका पानासारखे किंवा फुलासारखे क्षय पावत नाही (याकोब १:११; १ पेत्र १:२४ पहा). जेव्हा एका फुलाने सूर्यप्रकाशाच्या वेळी आपले सौंदर्य आणि सुवास हे दिले असतात, त्याचा हेतू सिद्‌ध आणि पूर्ण होतो, आणि थंड वारे आणि बर्फ हे त्याला वाळवतात आणि झाडापासून मग त्याची गळती होते. तसे प्रेमाचे नाही. तणाव आणि संघर्षाच्या दिवसात, आणि जेव्हा सर्वकाही चांगले आणि उत्तम असते, प्रेम

हे तसेच राहते, विश्वास आणि आशा ह्यांचा सुवास सगळीकडे दरवळतो. हे तर तसे असायला पाहिजे, कारण प्रेम हे नियमशास्त्राचा आधार आहे, आणि देवाचे नियमशास्त्र हे सार्वकालिक आहे (स्तोत्र. ११९:१६०; मत्त. ५:१७, १८; लूक १६:१७ पहा).

प्रत्येक विश्वास्नार्याला आत्म्याचे हे फळ स्वतःमध्ये विकसित करण्याचे आमंत्रण आहे, आणि प्रत्येक विश्वास्नार्याला ह्याचे आश्वासन पाहिजे की जीवनाचा असा कोणताच अनुभव नाही ज्यात प्रेमाची तरतूद नाही; सर्व प्रसंगी कोणत्याही समस्या सोडवण्यासाठी प्रेमावर अवलंबून राहता येते.

**(८) देवाचे चारित्र्य हे प्रेम आहे म्हणून, त्याचा शासनाचे इतर चार गुणधर्म किंवा वैशिष्ट्ये काय आहेत?**

***नीती व न्याय ही तुझ्या राजासनाचा पाया आहेत; दया व सत्य तुझे सेवक आहेत. (स्तोत्रसहिता ८९:१४)***

देवाचे प्रेम हे त्याच्या दयेत जसे व्यक्त होते तसे काही किंचित कमी त्याच्या न्यायात होत नाही. त्याच्या सिंहासनाचा

पाया हा न्याय आहे, आणि तेच त्याच्या प्रेमाचे फळ देखील आहे. दयेला सत्य आणि न्याय ह्यांच्यापासून वेगळे करून घटस्फोट घेण्याची योजना सैतानाची होती. त्याला हे सिद्ध करायचे होते की देवाच्या नियमशास्त्राचे धार्मिक्तव शांतीचा शत्रू आहे. पण ख्रिस्त दाखवतो की देवाच्या योजनेत ते न विभिक्त करण्यासारखे एकत्र जोडले गेले आहेत; एक दुसर्याच्या शिवाय अस्तित्वात राहू शकत नाही. "दया व सत्य ही एकत्र झाली आहेत; नीती व शांती ह्यांनी एकमेकींचे चुंबन घेतले आहे" (स्तोत्रसहिता ८५:१०).

त्याचे जीवन आणि मृत्यूने, ख्रिस्ताने हे सिद्ध केले की देवाचा न्याय हा त्याच्या ह्या दयेला नष्ट करू शकत नाही, पण पापाची क्षमा होऊ शकते, आणि नियमशास्त्र हे नीतिमान आहे, आणि त्याचेह अत्यंत परिपूर्ण रीतीने आज्ञापालन करणे जरुरीचे आहे. सैतानाचे सर्व आरोप हे धुडकावून लावण्यात आले. [एनपी] ख्रिस्ताची कृपा आणि देवाचे नियमशास्त्र ह्यांना विभक्त करता येत नाही. येशुमध्ये दया आणि सत्य हे एकमेकांना भेटले आहेत. {एजी ७४}

**(९) देव प्रिती आहे म्हणून आणि त्याचे शासन हे प्रीतीवर आधारित असल्याने, हा शास्त्रभाग त्याचे प्रेम आणि नियमशास्त्र ह्यांना कसे एकत्र करतात?**

***प्रीती शेजाऱ्याचे काही वाईट करत नाही म्हणून प्रीती हे नियमशास्त्राचे पूर्णपणे पालन होय. (रोमकरास पत्र १३:१०)***

देवाचे नियमशास्त्र, त्याच्या मूळ स्वभावाने, हे न बदलणारे आहे. ते त्याच्या निर्मात्याच्या इच्छा आणि चारित्र्य ह्यांचे प्रगटीकरण आहे. देव प्रिती आहे, आणि त्याचे नियमशास्त्र प्रिती आहे. त्याचे दोन महान तत्वे म्हणजे देव आणि मानवाच्या प्रती असणारे प्रेम. “प्रीती हे नियमशास्त्राचे पूर्णपणे पालन होय.” रोमकरास पत्र १३:१० देवाचे चारित्र्य हे नितीमत्ता आणि सत्य आहे; असा त्याच्या नियमशास्त्राचा स्वभाव आहे. स्तोत्रकर्ता म्हणतो: “तुझे नियमशास्त्र हे सत्य आहे:” “तुझ्या सर्व आज्ञा ह्या धार्मिकता आहेत.” स्तोत्रसहिता ११९:१४२, १७२. आणि प्रेषित पौल ह्याची घोषणा करतो: “तरीपण नियमशास्त्र पवित्र आहे, आणि आज्ञा पवित्र, यथान्याय व उत्तम आहे.” रोमकरास पत्र ७:१२. असे नियमशास्त्र,

देवाचे मन आणि त्याची इच्छा ह्यांचे एक प्रदर्शन, ते त्याच्या उत्पादकाच्या प्रमाणे तितकेच अढळ असले पाहिजे. {जीसी ४६७}

**(१०) वधस्तंभावर ख्रिस्ताने जी त्याची भव्य प्रिती आपल्यासाठी देऊ केली त्या अद्भुत प्रेमाचे वर्णन हे वचन कसे करते?**

***आपल्या मित्रांकरता आपला प्राण द्यावा ह्यापेक्षा कोणाची प्रीती मोठी नाही. (योहान १५:१३)***

प्रिती. ग्रीकमध्ये. अगापो, ज्याचा सुदृढ असा अर्थ इंग्रजी शब्द “प्रिती ” हा अपुरा असे स्पष्ट करतो. आपला शब्द “प्रिती” त्याचा कितीतरी वेगळा अर्थ आहे, आणि कितीतरी विभिन्न कल्पना त्यातून व्यक्त होतात, की अगापे ह्याचा खरा अर्थ ह्याच भाषांतराने जरा पुसत होतो. ग्रीक लोकांकडे ह्या कल्पना व्यक्त करण्यासाठी तीन शब्द होते जे आपण ह्या एका शब्दाने “प्रेम ” ह्याने करतो: अगापन, फिलेईन, आणि एरन.

फिलेईन सामान्यतः प्रेमळ, जिव्हाळा असणारे भावनिक प्रेमाचे दर्शक आहे जे

भावना आणि संवेदना ह्यांच्यावर आधारित आहे. जसे ते भावनांवर आधारित असते जशा भावना बदलतात ते देखील बदलते. एरन म्हणजे निकटचे, शारीरिक असे "प्रेम," जे शारीरिक रूपाने व्यक्त होते. आकर्षणाचे काही स्वरूप ह्या "प्रेमाच्या" दृष्टीने मांडले जातात. एरन ह्याचा वापर नवीन करारात होत नाही (नवीन करार). नवीन करारात अगापन, फिलेईन च्या विरुद्ध, प्रेमाचे वर्णन सन्मान आणि आदर ह्या रूपाने करते. ते तत्वाला अशा रीतीने मांडते जसे त्या भावना नियंत्रित करतात. मन आणि बुद्धी ह्यांच्या सर्वोच्च शक्ती त्याद्वारे व्यक्त होतात. फिलेईन आपल्याला जे लोक आपल्यावर "प्रेम " करतात त्यांच्यावर केवळ "प्रेम "करण्यास भाग पाडतात, अगापन हे जे आपल्यावर प्रेम करत नाहीत त्यांच्यावर देखील प्रेम करण्यास सांगतात. अगापन हे निस्वार्थी आहे, एरन हे स्वार्थी आहे, आणि फिलेईन देखील काही वेळा अशा प्रकारे स्वार्थाने झाकले जाऊ शकते. त्याचे नाम स्वरूप, अगापे, हे जवळ जवळ केवळ पवित्र शास्त्राच्या पर्यंत मर्यादित आहे. नवीन करारातील अगापे हे सर्वोच्च रीतीचे आणि खरे प्रेम आहे, असे प्रेम ज्यापेक्षा दुसरे काही थोर असे

प्रेम नाही- असे प्रेम जे लोकांना इतरांसाठी त्याग करण्यास भाग पाडते (योहान १५:१३). त्यामध्ये देवासाठी सन्मान आणि सहकारी लोकांसाठी आदर असते. विचार आणि कृती ह्यांचे ते दैवी तत्व आहे जे चारित्र्याला बदलते, येणाऱ्या भावनांवर नियंत्रण ठेवते, आणि वात्सल्याला उदात्त करते.

**(११) देवाच्या उद्धार देणाऱ्या प्रितीचे रहस्य आणि ख्रिस्ताचे स्वयं-त्यागमय प्रेम शुभवर्तमानाच्या द्वारे प्रगट होते, कोणाचे हित त्यामुळे जागृत होते?**

***त्यांना असे प्रकट करण्यात आले होते की, स्वर्गातून पाठवलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे तुम्हांला सुवार्ता सांगणाऱ्यांनी त्या गोष्टी तुम्हांला आता सांगितल्या आहेत. त्या गोष्टी कळवण्याची सेवा ते स्वत:साठी नव्हे, तर तुमच्यासाठी करत होते; त्या गोष्टी न्याहाळून पाहण्याची उत्कंठा देवदूतांना आहे. (१ पेत्र १:१२)***

आपल्याबरोबर वस्ती करण्यास येऊन, येशूने मनुष्यांना आणि देवदूतांना देव प्रगट करायचा होता. तो देवाचे वचन होता,--देवाचा विचार जो कानाने ऐकू

आला. त्याच्या शिष्यांसाठी केलेल्या प्रार्थनेत तो म्हणतो, “त्यांना मी तुझे नाव घोषित केले आहे,”--”कनवाळू आणि दयाळू, मंदक्रोध आणि चांगुलपणाने सत्यसंपन्न,”--” की जेणेकरून ज्या प्रेमाने तू माझ्यावर प्रेम केले ते त्यांच्यात असावे, आणि मी त्यांच्यात वस्ती करावी.”

पण हे प्रगटीकरण केवळ त्याच्या पृथ्वीवर जन्मलेल्या लेकरांना केवळ देण्यात आले नाही. आपले लहान विश्व हे विश्वाचे धडा घेणारे पुस्तक आहे. देवाचा कृपेचा अद्भुत हेतू, त्याच्या उद्धार देणाऱ्या प्रेमाचे रहस्य, हेच ते गमक आहे ज्यामध्ये “देवदूत बघण्याची इच्छा बाळगतात,” आणि संपूर्ण युगांमध्ये अशा प्रकारे तो त्यांचा अभ्यास असेल. उद्धार पावलेले लोक आणि पतन न झालेले हे ख्रिस्ताच्या वधस्तंभात त्यांचे विज्ञान आणि गीत बघतील. येशूच्या चेहऱ्यावर चमकणारे गौरव हे त्याच्या स्वयं-त्यागाच्या गौरवाचे प्रतिक आहे. काल्वरीच्या कृसावरून येणारा प्रकाश असे दिसेल की स्वतःला त्यागून देणाऱ्या प्रेमाचे नियमशास्त्र हे स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांच्यातील जीवनाच्या नियमशास्त्र

आहे; की जे प्रेम “स्वतःसाठी काहीच शोधत नाही” देवाच्या हृदयात त्याचा उगम आहे; आणि त्या विनम्र आणि दीन अशा व्यक्तीमत्वात त्या प्रकाशात वस्ती करणार्याचे चारित्र्य आहे ज्याला कोणीही पोहचू शकत नाही.

**(१२) आपण एकदा ख्रिस्तातून प्राशन केल्यावर, जो “जिवंत पाणी आहे” आणि त्याच्या प्रेमाचा अनुभव घेतल्यावर, कोणत्या दोन गोष्टी घडतील?**

***परंतु मी देईन ते पाणी जो कोणी पिईल त्याला कधीही तहान लागणार नाही; जे पाणी मी त्याला देईन ते त्याच्यामध्ये सार्वकालिक जीवनासाठी उपळत्या पाण्याचा झरा होईल.” (योहान ४:१४)***

“द्या, म्हणजे तुम्हास दिले जाईल” (लूक ६: ३८); कारण देवाचे वचन हे “बागेतले कारंजे, जिवंत झऱ्याचा कूप, लबानोनाहून वाहून येणारे जलप्रवाह आहे.” (गीतरत्न ४:१५). ज्या हृदयाने एकेकाळी ख्रिस्ताच्या प्रेमाची चव घेतली, ते सतत अशा रीतीने खोलवर त्यात झोकून देण्याची आरोळी मारतात, आणि तुम्ही ते देता तसे तुम्हाला अधिक खोलवर आणि विपुल रीतीने ते मिळते. प्रत्येक

जीवात्म्यासाठी मिळणारे देवाचे प्रगटीकरण हे जाणून घेण्यास आणि प्रेम करण्यास क्षमता वाढवते हृदयाची सातत्याची ओरड म्हणजे , “तुझ्यापासून अधिक,” आणि ह्यासाठी आत्म्याचे उत्तर म्हणजे, “अधिक जास्त.” रोमकरास पत्र ५:९,१०. कारण आपला देव “आपल्या मागण्या किंवा कल्पना ह्यांपलीकडे आपल्यामध्ये कार्य करणाऱ्या शक्तीप्रमाणे आधिक्याने कार्य करण्यास जो समर्थ आहे.” इफिसकरास पत्र ३:२०.

येशुसाठी, ज्याने पतन पावलेल्या मनुष्यजातीसाठी स्वतःला रिक्त केले, पवित्र आत्मा हा कोणत्याही मोजमापनाच्या शिवाय देण्यात आला. म्हणून तसेच ख्रिस्ताच्या प्रत्येक अनुयायासाठी तो देण्यात येईल जेव्हा संपूर्ण हृदयाने त्याच्या ह्या वस्ती करून घेण्यासाठी समर्पण केले जाते. आपल्या प्रभुने स्वतः ही आज्ञा दिली आहे, , “आत्म्याने भरून जा” (इफिसकरास पत्र ५:१८), आणि हि आज्ञा देखील त्या अभिवचनाची पूर्तता आहे. पित्याचा हा चांगला संतोष होता की ख्रिस्तामध्ये “सर्व संपूर्णत्वाने वस्ती करावी,” आणि “त्याच्यामध्ये तुम्ही परिपूर्ण होता.”

**(१३) ख्रिस्ताने पित्याला आपल्यामध्ये काय ठेवण्यास सांगितले जेणेकरून पित्याच्या प्रेमाच्या सर्व पैलूंचा आपण अनुभव घेऊ आणि त्याद्वारे जे चारित्र्याचे परिवर्तन घडवले जाते?**

***मी तुझे नाव त्यांना कळवले आहे आणि कळवीन; ह्यासाठी की, जी प्रीती तू माझ्यावर केलीस ती त्यांच्यामध्ये असावी आणि मी त्यांच्यामध्ये असावे.” (योहान १७:२६)***

काय सुंदर हे अभिवचन आहे, की देवाचे प्रेम सर्वांच्या हृदयात वस्ती करेल जे त्याच्यावर विश्वास ठेवतात! काय तारण त्याद्वारे दिले जाते; कारण त्याच्याद्वारे जे कोणी त्याच्याकडे येतात त्या प्रत्येकाचे तारण करण्यास तो कार्यक्षम आहे. आपण आश्चर्याने हे व्यक्त करतो, ह्या गोष्टी कशा अशा असू शकतात? पण येशू ह्यापेक्षा किंचित कमी अशा कोणत्याच गोष्टीने तृप्त किंवा समाधानी होणार नाही.

जे लोक ह्या ठिकाणी त्याच्यासोबत त्याच्या दुखसहनात सहभागी होतात, त्याचा अपमान, त्याच्या नावासाठी सर्वकाही सहन करून, त्यांनी देवाचे प्रेम

त्यांच्यावर स्वीकारून घ्यावे जसे त्याच्या पुत्रावर ते दिसते. ज्याला ठाऊक होते, तो म्हणतो, “पित्याचे स्वतः तुमच्यावर प्रेम आहे.” ज्या कोणाला त्या प्रेमाच्या उंचीचा, खोलीचा, रुंदीचा अनुभवाने ज्ञान प्राप्त आहे, त्यांनी हि अद्‌भुत वास्तविकता आम्हाला घोषित केली आहे.

देवाच्या पुत्रावरील विश्वासाने हे प्रेम आपले आहे, म्हणूनच ख्रिस्ताच्या सोबत असणारा हा संबंध आपल्यासाठी सर्वकाही आहे. आपण त्याच्यासोबत एक आहोत जसा तो पित्याच्या सोबत एक आहोत, आणि मग अमर्याद देवाच्या द्वारे आपण देखील त्या प्रेमात ख्रिस्ताचे शरीर म्हणून, त्या जिवंत वेलीचे फाटे आहोत. आपण त्या मूळ पालकांच्या खोडशी जडून राहायला पाहिजे, आणि त्या वेलीतून मिळणारे पोषण घेतले पाहिजे. ख्रिस्त आपला गौरवी प्रमुख आणि मस्तक आहे, आणि देवाच्या ह्रदयातून येणारे ते दैवी प्रेम आहे, जे ख्रिस्तात वस्ती करते, आणि जे त्याच्याशी जोडले जातात त्यांना ते व्यक्त केले जातात. जे दैवी प्रेम आपल्या जीवात्म्यात येते त्याद्वारे कृतज्ञता प्रेरित होते, अध्यात्मिक दुर्बलतेपासून ते मुक्त होते, गर्व, व्यर्थता, स्वार्थीपणा, आणि जे सर्व

ख्रिस्ती चारित्र्याला विस्कळीत करून टाकतात.

**(१४) देवाचे प्रेम हृदयामध्ये स्वीकारून इतरांच्या सोबत कसे दिले जाते?**

***आणि 'आशा लाजवत नाही;' कारण आपल्याला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे. (रोमकरास पत्र ५:५)***

जीवात्मा हा शुद्ध प्रेमाच्या झऱ्यांनी तृप्त होतो जे ख्रिस्ताच्या हृदयातून वाहतात, जो झरा कधीही आटत नाही.हे हृदय कसे जागृत होते, त्याचे हेतू ह्या सहभागीतेने कसे उदात्त होतात! पवित्र आत्म्याच्या शिक्षणाने आणि शिस्तीने, देवाची लेकरे एकमेकांवर प्रेम करतात, खऱ्या अर्थाने, प्रामाणिकपणे, परिणामी रीतीने—"कोणत्याही प्रकारे पक्षपात न करता, ढोंगीपण न दर्शवता." आणि हे येशुवरील प्रेमामुळे होते म्हणून ते हृदय त्याने परिपूर्ण असते. आपला एकमेकांच्या प्रती असणारा जिव्हाळा देवाशी असणाऱ्या आपल्या नात्यामुळे निष्पन्न होतो.

आपल्या स्वर्गीय देवाचे प्रेम जे त्याने त्याच्या एकुलत्या एका पुत्राला जगात वरदान म्हणून दिले, ते प्रत्येक जीवात्म्याला प्रेरित करण्यासाठी पुरेसे आहे, प्रत्येक कठोर, प्रेमरहित हृदयाला वितळण्यासाठी पुरेसे आहे, प्रेमरहित हृदयाला ते पश्चाताप आणि मृदू असे बनवते; आणि तरीही स्वर्गीय बुद्धिमत्ता ही ख्रिस्त कोणासाठी मरण पावला हे बघते, त्याच्या प्रेमाच्या प्रती असणारी असंवेद्ना, मनाचा कठोरपणा, आणि सर्व उत्तम गोष्टींचा जो दाता आहे त्याच्या प्रती कृतज्ञता आणि आपुलकी ह्याने प्रतिसाद देत नाही? कमी महत्वाच्या बाबी ह्या संपूर्ण जीवाच्या सामर्थ्याला शोषून घेतील का, आणि देवाचे प्रेम परत आपली भेट घेणार नाही का? नितीमत्वाचा सूर्योदय अर्थहीन रीतीने उगवेल का? देवाने जे एकही केले त्याच्या दृष्टीने, त्याचे मत तुमच्यावर कमी प्रमाणात असतील का? आपल्याकडे स्पर्श करता येणारे हृद्य आहे का,जे ह्या दैवी प्रेमाने प्रभावी ठरू शकते?आपण निवडलेले पात्र म्हणून बनण्यास तयार आहोत का? देवाची नजर आपल्यावर नाही का, आणि त्याच्या प्रकाशाचा संदेश त्याने सर्वांना देण्यास आपल्यावर ती कामगिरी बजावली नाही का?

आपल्याला विश्वासात वाढ होण्याची गरज आहे. आपण वाट बघितली पाहिजे,आपण प्रार्थना केली पाहिजे, कार्य केले पाहिजे, अशी विनवणी करत की पवित्र आत्म्याचा वर्षाव आपल्यावर विपुलतेने झाली पाहिजे, जेणेकरून आपण जगात प्रकाश होऊ शकतो.

***मला आता समजते की प्रेमाची एकमेव खरी व्याख्या आणि स्रोत हा देव आणि त्याचे प्रेम जे सार्वकालिक आहे.***

***गोल करा : होय अनिश्चित***

***मी आश्चर्यचकित होऊन आभारी आहे की देवाचे माझ्यावर प्रेम आहे की त्याने मला निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले आणि माझी निवड ही परत त्याच्यावर माझ्या संपूर्ण ह्रदयाने प्रेम करणे आहे!***

***गोल करा : होय अनिश्चित***

***मला समजते की ख्रिस्ती होणे देवाचे प्रेम माझ्यामध्ये येऊ न देण्यास व इतरांच्या मध्ये जाऊ न देण्यास ते***

अशक्य आहे. मी स्वतःला त्याच्या अधीन सोपवतो की त्याने माझ्याकडे जगावे आणि माझ्याद्वारे इतरांच्या आयुष्याला स्पर्श करावे.

गोल करा : होय अनिश्चित

देव आणि त्याचे नियमशास्त्र हे प्रेम आहे ही वास्तविकता मी स्वीकारतो. माझ्या संपूर्ण हृदयाने त्याच्यावर प्रेम करण्याची निवड करून आणि स्वतःपेक्षा इतरांवर माझ्यामध्ये वस्ती करणाऱ्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने प्रेम करतो.

गोल करा : होय अनिश्चित

मला आता समजते की देवाचे शासन हे नितीमत्व, न्याय, दया आणि सत्य ह्यांच्यावर आधारित आहे. सर्व देवदूतांच्या बरोबर, मी त्या दिवसाची वाट पाहत आहे जेव्हा सर्व पृथ्वीवरील भ्रष्ट सत्ता ह्या संपुष्टात येतील आणि संपूर्ण सृष्टीभर देवाचे शासन हे अत्युच व वरचढ होईल.

गोल करा : होय अनिश्चित

मी आभारी आहे की ख्रिस्ताने पित्याला आपल्यात त्याचे प्रेम घालण्यास सांगितले. माझी प्रामाणिक प्रार्थना आहे की मी माझ्या हृदयात पित्याच्या प्रेमाविषयी सर्व पैलू स्वीकारेन आणि त्याद्वारे चारित्र्याचा बदल जो होतो.

गोल करा : होय अनिश्चित

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________



# धडा २

# देवाचे प्रेम जे त्याच्या तरतुदींनी प्रगट होते

**(१) आपण अनुभव घेत असणारा प्रत्येक आशीर्वाद कोणाकडून येतो, त्यात सर्वोत्तम वरदान—येशू ख्रिस्त ह्याचा देखील समावेश आहे?**

***प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे; ज्याला विकार नाही व जो फिरण्याने छायेत जात नाही अशा ज्योतिमंडळाच्या पित्यापासून ते उतरते. (याकोब १:१७)***

निर्मितीच्या सामर्थ्याचे प्रत्येक प्रदर्शन हे अमर्याद प्रेमाचे प्रदर्शन आहे. सर्व सृष्ट

निर्मितीसाठी आशीर्वादाची पूर्णता ह्यात देवाचा सार्वभौमत्व समाविष्ट असते.

ख्रिस्ताच्या वरदानाने आपल्याला प्रत्येक आशीर्वाद मिळतो. त्याच वरदानाने आपल्याकडे रोज यहोवाचे न संपणारे चांगुलपण पोहोचते. प्रत्येक फुल, त्याची छबी आणि सुवास, ही त्या एका वरदानाने आपल्याला उपभोगण्यासाठी देण्यात आले आहेत. सूर्य आणि चंद्र हे त्याने बनवले. त्याने न बनवलेला असा एक देखील तारा नाही जो स्वर्गात चमकत नाही. पडणार्या पाऊसाचा प्रत्येक थेंब, आपल्या कृतघ्न जगावर पडणारा प्रत्येक आशेचा किरण, ख्रिस्तामधील देवाच्या प्रीतीची साक्ष देतात. आपल्याला त्याच एका अवर्णनीय वर्दानाच्या ,देवाच्या एकुलत्या एका पुत्राच्या द्वारे, सर्वकाही पुरवले जाते. वधस्तंभावर त्याला खिळण्यात आले जेणेकरून देवाच्या ह्याच हस्तकृतीला ह्या सर्व गोष्टी विपुलतेने मिळू शकतील.

**(२) देव त्याच्या आपल्यावरील महान प्रेमाच्यामुळे काय विपुल रीतीने देतो किंवा वर्षाव करतो?**

***तरी देव दयासंपन्न आहे म्हणून आपण आपल्या अपराधांमुळे मृत झालेले***

***असताही त्याने आपल्यावरील स्वतःच्या अपरंपार प्रेमामुळे, (इफिसकरास पत्र २:४)***

देव केवळ दयाळू आहे इतकेच नाही; जे कोणी त्याचा धावा करतात त्यांच्यावर तो विपुल रीतीने दया करतो, ते त्यासाठी पात्र आहेत म्हणून नाही, पण दया करणे ह्यात देवाला संतोष आहे म्हणून (तीताला पत्र ३:५; १ पेत्र १:३).

करुणेच्या पेक्षा अधिक देवाचे प्रेम आहे; ते कृतीमध्ये परिवर्तीत होते आणि अटळ आहे कधीही न बदलणारे. देवाने आपल्यावर “तो पापी असताना देखील प्रेम केले” (रोम. ५:८ पहा), आणि आपल्यावर प्रेम करण्याचे तो कधीही थांबवणार नाही. ह्याच प्रेमाने त्याच्या तारणाच्या कार्याला प्रेरणा दिली (योहान ३:१६). त्याच्या चारित्र्यातील मुख्य गुणधर्म म्हणजे प्रेम आहे (१ योहान ४:८), त्याचे सर्वोच्च प्रदर्शन ख्रिस्तामध्ये दिसते. आपण पापी आहोत म्हणून देव आपल्यावर दया करतो, आणि आपण त्याची निर्मिती आहोत म्हणून तो आपल्यावर प्रेम करतो. मनुष्यासाठी असणारे त्याचे महान कार्य केवळ औदार्य किंवा भलेपणा अथवा विनम्रतेचे कार्य नव्हते; ती तर आपुलकीची, प्रेमाची कृती होती.

**(३) गौरव, परिपूर्ण कार्ये, आणि आपल्या निर्माणकर्त्याची प्रेमळ काळजी आणि आपुलकी जो महान स्वामी कलाकार आहे हे पहायचे असेल तर कुठे पाहावे?**

*आकाश देवाचा महिमा वर्णिते; अंतरिक्ष त्याची हस्तकृती दर्शवते. (स्तोत्रसहिता १९:१)*

किती सुंदर रीतीने, अत्यंत अद्भुत अशा सौंदर्याने, निसर्गात प्रत्येक वस्तू रचली गेली आहे. सर्वत्र आपल्याला हा महान स्वामी- कारागीर ह्याचे परिपूर्ण कार्ये दिसतात. स्वर्ग त्याचे गौरव घोषित करते; आणि पृथ्वी, जी मनुष्याच्या आनंदासाठी निर्माण करण्यात आली, हे त्याच्या अतुलनीय नावाबद्दल सांगतात. त्याचा वरील भाग हा काही सपाट एकसारखा नाही; पण मोठे पर्वत उंच होऊन तो पठार तयार होतो. त्याच ठिकाणी चमकणारे झरे आणि सुपीक खोरे आहेत, सुंदर तलाव, विस्तारित नद्या आणि अमर्याद असा समुद्र आहे. तहानलेल्या पृथ्वीला ताजेतवाने करण्यासाठी पुन्हा देव ते दहिवर आणि तो पाऊस पाठवतो. ते थंड वारे, जे हवेला थंड व शुद्ध करून आरोग्यासाठी लाभदायी असतात, ते त्याच्याच

सुज्ञानाने नियंत्रित असतात. त्याने स्वर्गात सूर्य ठेवला आहे जो चमकतो आणि दिवस व रात्र असे स्पष्ट होतात, आणि त्याच्या तेजस्वी किरणांनी तो पृथ्वीला प्रकाश आणि उष्णता देतो, आणि सर्व झाडे व फुले ह्यांना फुलवतो.

देवाच्या विपुल हातामधून येणाऱ्या ह्या सर्व आशीर्वादांकडे तुमचे लक्ष जावे म्हणून मी ते वेधून घेत आहे. प्रत्तेक नवीन सकाळचे ताजेतवाने असणारे गौरव तुमच्या हृदयात त्याच्या प्रेमळ कृपेची काळजी व आपुलकी हि निर्माण करो. पण आपल्या दयाळू स्वर्गीय पित्याने आपल्यामध्ये तो आनंद द्‌विगुणीत करण्यासाठी इतक्या गोष्टी दिल्याने, त्याने आपल्याला दडलेल्या अशा अवस्थेतील देखील आशीर्वाद दिलेले आहेत.  पतन पावलेल्या मनुष्याच्या गरजा त्याला माहित आहेत; आणि एकीकडे त्याने आपल्याला इतके फायदे दिले असताना, दुसरीकडे पाहिले तर गैरसोयी आहेत ज्या आपल्याला ज्या त्याने दिलेल्या क्षमता आपण उपयोगात आणाव्या म्हणून देण्यात आल्या आहेत. ह्या सर्व संयमाचे भांडार, चिकाटी आणि धाडस हे उत्पन्न करतात.

**(४) ते कोणते पाच फायदे आहेत ज्याचे विस्मरण आपल्याला होऊ नये, जे देवाने त्याच्या प्रेमात, आपल्याला मुक्तहस्ते दिलेले आहेत?**

***हे माझ्या जिवा, परमेश्वराचा धन्यवाद कर, त्याचे सर्व उपकार विसरू नकोस;तो तुझ्या सर्व दुष्कर्मांची क्षमा करतो; तो तुझे सर्व रोग बरे करतो;तो तुझा जीव विनाशगर्तेतून उद्धरतो; तो तुला दया व करुणा ह्यांचा मुकुट घालतो;तो तुझे आयुष्य उत्तम पदार्थांनी तृप्त करतो; म्हणून तुझे तारुण्य गरुडासारखे नवे होते. (स्तोत्रसहिता १०३:२-५)***

देवाचे सामर्थ्य हृदयाच्या ठोक्यात दिसते, फुफ्फुसाच्या कार्यात दिसते, आणि शरीरातील हजारो प्रवाहांच्या मधून जो जिवंत प्रवाह वाहतो. आपल्या अस्तित्वाच्या प्रत्येक क्षणासाठी आपण त्याचे ऋणी आहोत, आणि जे काही त्याने जीवनात आपल्याला आरामदायी परिस्थिती देऊ केली आहे. खालच्या निर्मितीच्या वर ज्या सत्ता आणि क्षमता मनुष्याला उंचावतात, त्या निर्मात्याने आपल्यासाठी वरदान आणि बक्षीस म्हणून दिले आहेत.

आपण जे अन्न खातो, जे पाणी पितो, जे कपडे घालतो, आणि जी हवा आपण उपभोगतो, जो श्वास घेतो त्यासाठी ऋणी आहोत. त्याच्या ह्या विशेष पुरवठ्याच्या शिवाय, हवेमध्ये महामारी आणि विष हे पसरले असते. तो एक विपुल हितकर्ता आणि राखणारा जतन करणारा आहे. जो सूर्य पृथ्वीवर चकाकतो, आणि संपूर्ण सृष्टीला गौरवतो, सूर्याचे विचित्र पण सार्वभौम तेजस्वीपण, अंतराळाचे वैभव, ज्यात अनेक असंख्य सुंदर तारे आहेत, जे पर्जन्य पृथ्वीवर पडते, ज्यामुळे वनस्पती फुलते, निसर्गाच्या अनमोल अशा गोष्टी त्यांच्या सर्व विभिन्न स्वरूपाच्या वैपुल्यात, बलाढ्य झाडे, झुडुपे आणि वनस्पती, झुलणारे धान्य, निळे आभाळ, हिरवीगार पृथ्वी, दिवस व रात्रीचे बदल, पुनरुज्जीवित करणारे ऋतू, हे सर्व मनुष्यासाठी त्याच्या निर्माणकर्त्याचा शब्द वदवून दाखवतात.

स्वर्ग आणि पृथ्वी ह्या ठिकाणी दिसणाऱ्या ह्या प्रत्येक गोष्टींच्या द्वारे त्याने आपल्याला त्याच्याशी जोडले आहे. तो आपल्यावर अधिक कृपा व अनुग्रहाने नजर ठेवतो आणि हे जशी आई आपल्या त्रासलेल्या बालकासाठी करते त्यापेक्षा

अधिक असते. “बाप जसा आपल्या मुलांवर ममता करतो, तसा परमेश्वर त्याचे भय धरणाऱ्या सर्वांवर ममता करतो.”

**(५) त्याच्या आपल्यावरील प्रेमामुळे, देवाने येशूला कोणत्या पाच विशेष कामगिरीसाठी अथवा अभिषिक्त करून पाठवले?**

***“परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे, कारण दीनांस सुवार्ता सांगण्यास, [भग्नहृदयी जनांस बरे करण्यास] त्याने मला अभिषेक केला; त्याने मला पाठवले आहे, ते अशासाठी की, धरून नेलेल्यांची सुटका व आंधळ्यांना पुन्हा दृष्टीचा लाभ ह्यांची घोषणा करावी, ठेचले जात आहेत त्यांना सोडवून पाठवावे; (लूक ४:१८)***

हे त्याचे कार्य होते. तो चांगले करत फिरला आणि सैतानाने ज्यांचा छळ मांडला होता त्यांना बरे केले. काही ठिकाणी संपूर्ण गावे होती जिथे कोणत्याही घरात आजाराचा लवलेश नव्हता, जो त्याने पार करून बारा केला नव्हता. त्याच्या कार्याने त्याच्या दैवी अभिषेकचा पुरावा दिला. प्रेम, दया, आणि कळवळा हे त्याच्या जीवनातील

प्रत्येक कृतीतून प्रगट झाले; त्याचे हृदय हे मनुष्याच्या पुत्रासाठी कळवळेने भरून गेले. त्याने माणसाचा स्वभाव धारण केला, जेणेकरून मनुष्याची जी इच्छा आहे तिथवर तो पोहचू शकेल. सर्वात दरिद्री आणि विनम्र लोक त्याच्याकडे धाव घेण्यासाठी घाबरत नव्हते. लहान मुले देखील त्याच्याकडे आकर्षित होत होती. त्यांना त्याच्या गूढघ्यांवर चढायला आवडत होते, त्याचे मुख न्याहाळून, तीच निष्पाप प्रिती सर्वांना दाखवायची होती. देवाचा पुत्र ह्या जगात सर्वकाही पुनर्स्थापित करण्यासाठी आला. तोच मार्ग, सत्य आणि जीवन होता. प्रत्तेक त्याने उच्चारलेला शब्द हा आत्मा आणि जीवन होता. तो अधिकाराने बोलला, मनुष्यजातीला आशीर्वाद देण्याविषयी तो जागरूक होता, सैतानाने ज्यांना बंदिवासात अडकवले होते त्यांची सुटका करण्यास, ह्याची जाणीव देखील ठेऊन की त्याच्या सान्निध्याने तो संपूर्ण जगात पूर्णानंद देईल. मानवी कुटुंबातील प्रत्येक छळ सहन केलेल्या आणि त्रास सहन करणाऱ्या सदस्याला मदत करायची त्याची इच्छा होती, आणि त्याद्वारे त्याला दाखवायचे होते की त्याच्या अधिकारात तो आशीर्वाद देतो, दोष लावत नाही.

**(६) देवाची लेकरे कशाची अपेक्षा करू शकतात, आणि कशावर अवलंबून राहू शकतात, देवाच्या हातून काय मागू शकतात आणि काय त्याच्या प्रेमाची साक्ष देईल?**

***सर्वांचे डोळे तुझ्याकडे लागतात; आणि तू त्यांना त्यांचे अन्न यथाकाळी देतोस. तू आपली मूठ उघडून सर्व प्राणिमात्रांची इच्छा पुरी करतोस. (स्तोत्रसहिता १४५:१५-१६)***

“देव प्रिती आहे” हे प्रत्येक खुलणाऱ्या कळीवर लिहिलेले असते, प्रत्येक उगवणाऱ्या गवतावर लिहिलेले असते. सुंदर असे पक्षी त्यांच्या सुमधुर वाणीने गीताने हवेत ते सूर मिसळवतात, नाजुकशी फुले त्यांच्या परिपूर्ण वातावरणात हवेत तो सुगंध दरवळू देतात, वनातील मोठी झाडे त्यांच्या हिरव्यागार पानांच्या आच्छादनाने-----हे सर्व आपल्या देवाचा पित्याच्या काळजीची साक्ष देतात आणि त्याच्या लेकरांना आनंदी करण्याची त्याची जी इच्छा असते त्याविषयी देखील दुजोरा देतात.

तारणाचे आशीर्वाद, तात्पुरते तसेच अध्यात्मिक, हे सर्व मानवजातीसाठी आहेत. अनेक लोक देवाकडे ही तक्रार करतात कारण जग हे कमतरता आणि

दुखसहन ह्यांनी भरलेले आहे; पण देवाची हि कदापि इच्छा नव्हती की ह्या भयंकर अशा दैन्यावस्था अस्तित्वात यावी. त्याचा कधीच असा अर्थ नव्हता की एका मनुष्याने जीवनाचे सर्व आराम व चैनी ह्यांचा उपभोग घ्यावा, आणि त्याच समयी दुसर्यांच्या लेकरांनी भाकरीसाठी रडत बसावे. आपला देव हा हितकर्ता देव आहे. सर्वांच्या गरजांसाठी त्याने भरपूर पुरवठा केलेला आहे, आणि त्याच्या प्रतिनिधींच्या द्वारे, ज्यांच्यावर त्याने सर्व धन, मालमत्ता ह्या सोपवल्या, त्याची अशी रचना आहे की सर्व सृष्टीच्या गरजा ह्या पुरवल्या गेल्या पाहिजे.

**(७) सुरक्षा देण्यास व पुरवठा करण्याच्या त्याच्या अभिवचनांनी आणि प्रेमामुळे, आपल्या भविष्याच्या संबंधी देवाने आपल्याला कोणत्या दोन गोष्टी करण्यास सांगितले आहे?**

*तर तुम्ही पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील.ह्यास्तव उद्याची चिंता करू नका, कारण उद्याची चिंता उद्याला; ज्या दिवसाचे दुःख त्या दिवसाला पुरे. (मत्तय ६:३३-३४)*

भविष्यात पाहण्याची आपली क्षमता नाही, ज्यामुळे आपण हताश आणि निराश व नाखूष होतो. पण देवाच्या प्रेमळ आणि दयाळू स्वभावाचा जो सर्वोच्च पुरावा आपल्याकडे आहे तो म्हणजे उद्या होणार्या घटना ह्या तो लपवून ठेवतो. उद्याच्या बद्दल अधिक अज्ञानता आपल्याला अधिक चतुर आणि प्रामाणिक व आग्रही बनवते. आपल्यासमोर जे काही आहे ते आपण बघू शकत नाही. आपल्याला जे उत्तम योजना आहेत असे वाटते ते मूर्ख आणि दोषी असे आढळू लागतात. आपण विचार करतो, “जर केवळ आपल्याला भविष्य काय आहे हे ठाऊक असते तर!” पण देवाची इच्छा होती की त्याच्या लेकरांनी त्याच्यावर भरवसा ठेवावा आणि तो त्यांना जिकडे मार्गदर्शन म्हणून नेईल तिकडे जाण्याची त्यांची तयारी असावी.

स्वर्गातील कोणत्या विशिष्ट समयी आपला प्रभू स्वर्गातून प्रगट होईल हे आपल्याला माहित नाही, पण त्याने आपल्याला सांगितले आहे की आपली एकमेव सुरक्षा ही तयारी दर्शवण्याने होईल- सतत आपण त्याची वाट पाहायला पाहिजे. आपल्यासमोर मग एक वर्ष, किंवा पाच किंवा दहा असोत,

आपण आपल्या भरवस्याशी आज विश्वासू असणे गरजेचे आहे.रोजच्या दैनंदिन जवाबदार्या आपण इतक्या विश्वासुपणाने कराव्यात जणूकाही तो आपला शेवटचा जगण्याचा दिवस आहे.

**(८) रोज सकाळी त्याच्या चारित्र्याचे कोणते गुणधर्म देव विश्वासुपणाने पुनरुजीवीत करतो ज्यांच्यामुळे आपला नाश जो आहे तो टाळता येतो?**

***आम्ही भस्म झालो नाही ही परमेश्वराची दया होय, कारण त्याच्या करुणेस खंड पडत नाही. ती रोज सकाळी नवी होते; तुझी सत्यता थोर आहे. (विलापगीत ३:२२-२३)***

आपल्यापैकी किती लोकांनी कधीतरी विचार केला की किती गोष्टींसाठी आपण आभारी असायला पाहिजे? आपल्याला हे लक्षात आहे का की प्रभूची दया ही रोज सकाळी नवीन होते, आणि त्याचे विश्वासूपण हे कधीच कमी होत नाही? आपण त्याच्यावर अवलंबून असल्याचे कधीतरी कबूल करतो का, आणि त्याच्या सर्व उपकारांसाठी कृतज्ञता व्यक्त करतो का? त्याच्या विरुद्ध, आपण बरेचदा हे खूप लवकर विसरतो की “प्रत्तेक चांगले

आणि परिपूर्ण दान हे वरून येते, आणि प्रकाशाचा जो पिता आहे त्याच्याकडून आपल्याकडे खाली उतरते.”

किती काल जे लोक उत्तम स्वास्थ्यात असतात ते विसरतात की दिवसेंदिवस, वर्षामागे वर्ष पाहता अशाच त्याच्या अद्‌भुत दया ह्या आपल्यावर सतत उतरतात. त्या देवाला त्याच्या सर्व उपकारांसाठी कोणत्याही प्रकारे स्तुती किंवा गौरव करत नाहीत. पण जेव्हा आजार येतो, देवाची आठवण येते. बरे होण्याची तीव्र इच्छा त्यांना व्याकूळ ह्पून प्रार्थना करण्यास भाग पाडते; आणि हे योग्य आहे. आजारात आणि आरोग्यात देव हा आपला आश्रयस्थान आहे. पण बरेच लोक ह्या बाबी त्याच्या हातात सोपवत नाहीत; ते स्वतः विचार करून अशा प्रकारे दुर्बलता आणि आजार ह्यांना आमंत्रण देतात. जर त्यांनी त्यावर पुन्हा विचार करणे थांबवले आणि ह्या निराशा आणि हताश परिस्थितीतून वर आले तर ते अधिक लवकर बरे होऊ शकतात.त्यांनी कृतज्ञ वृत्तीने लक्षात ठेवावे किती काळ त्यांनी आरोग्य व स्वास्थ्य हे उपभोगले; आणि हा विशिष्ट आशीर्वाद जर त्यांना परत दिला तर, त्यांनी विसरता कामा नये की त्यांच्या

निर्माणकर्त्याच्या पुनरुजीवीत उपकारांच्या खाली ते आहेत.

जेव्हा दहा कुष्ठरोगी बरे झाले, त्यातील केवळ एक परत आला आणि त्याने देवाला गौरव दिले. अविचार करणाऱ्या त्या नऊ प्रमाणे आपण होऊ नये, ज्यांच्या हृदयात देवाची ती दया नव्हती. {बेको, जाने १, १८८८}

**(९) पौलाच्या त्या सर्व समाविष्ट करून घेणाऱ्या यादीत कोणत्या दहा गोष्टी आहेत ज्या देवाच्या प्रेमापासून आपल्याला विभक्त करू शकत नाहीत?**

***कारण माझी खातरी आहे की, मरण, जीवन, देवदूत, अधिपती, वर्तमानकाळच्या गोष्टी, भविष्यकाळच्या गोष्टी, बले, उंची, खोली, किंवा दुसरी कोणतीही सृष्ट वस्तू, ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करायला समर्थ होणार नाही. (रोमकरास पत्र ८:३८-३९)***

जिवंत ख्रिस्ताच्या संपर्कात राहा, आणि तो तुम्हाला अशा भक्कम हाताने उचलून धरेल जो तो कधीही सोडणार नाही.

देवाचे आपल्यावर जे प्रेम आहे ते जाणून घ्या व त्याच्यावर विश्वास ठेवा, आणि त्यामुळे तुम्ही सुरक्षित आहात; की प्रेम म्हणजे एक दुर्ग आहे जो सैतानाचे सर्व भ्रम आणि हल्ले ह्यांना आत शिरू देत नाही. “परमेश्वराचे नाम बळकट दुर्ग आहे, त्यात नीतिमान धावत जाऊन निर्भय राहतो.” नीतीसुत्रे १८:१०.

देवाच्या प्रेमापासून आपल्याला विभक्त न करू शकणार्या दहा गोष्टींची यादी पौल करतो. दहावी ही विस्तारित व अखंड आहे आणि जे काही त्यातून वगळले जाते त्याचा समावेश करून घेण्यास ती व्याप्त आहे. ही सर्व पदे त्यांच्या सामान्य अर्थाने घेतलीच पाहिजे. त्यांचे सर्व अनिश्चितपण पौलाच्या त्या मुद्द्यावर भर देतात की ह्या सर्व निर्मित अशा विश्वात असे काहीही नाही जे एका ख्रिस्ती व्यक्तीमध्ये आणि त्याच्या तारणार्यामध्ये फुट पाडू शकतात. {६ ख्रि. पू. ५८०}

**(१०) पुत्राच्या अत्युच्च आणि अंतिम वर्दानाच्या सोबत, आत्मविश्वासाने आपण कोणते अभिवचन सिद्ध करू शकतो की जे आपण देवाच्या इच्छेप्रमाणे मागितले तर आपल्याला निश्चित मिळेल?**

***ज्याने आपल्या स्वतःच्या पुत्रास राखून न ठेवता त्याला आपल्या सर्वांकरता समर्पण केले, तो त्याच्याबरोबर आपल्याला सर्वकाही कसे देणार नाही? (रोमकरास पत्र ८:३२)***

ख्रिस्ताच्या सर्व फायदे आणि लाभांच्या द्वारे त्या अमर्यादित शक्तीच्या सिंहासनाकडे आपण पोहचू शकतो... "ज्याने आपल्या स्वतःच्या पुत्रास राखून न ठेवता त्याला आपल्या सर्वांकरता समर्पण केले, तो त्याच्याबरोबर आपल्याला सर्वकाही कसे देणार नाही." रोमकरास पत्र ८:३२. पित्याने त्याचा आत्मा कोणत्याही प्रकारे मोजमापन न करता त्याच्या पुत्राला दिला, आणि आपण देखील त्याच्या ह्या परिपूर्णतेतून सहभागी होऊ शकतो. येशू म्हणतो, "तुम्ही वाईट असताही तुम्हांला आपल्या मुलांना चांगल्या देणग्या देण्याचे कळते, तर मग स्वर्गीय पित्याजवळ जे मागतात त्यांना तो किती विशेषेकरून पवित्र आत्मा देईल?" लूक ११:१३. "तुम्ही माझ्या नावाने माझ्याजवळ काही मागाल तर मी ते करीन." "मागा म्हणजे तुम्हांला मिळेल, ह्यासाठी की तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा." योहान १४:१४, १६:२४.

**(११) ह्या वचनात कोणत्या आश्चर्यकारक सौभाग्याचा उल्लेख आहे जो देवाने जे त्याला ओळखतील आणि स्वीकारतील ह्यांच्यावर देऊ करण्याचे निश्चित केले आहे?**

***आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच. ह्यामुळे जग आपल्याला ओळखत नाही, कारण त्याने त्याला ओळखले नाही. (१ योहान ३:१)***

आपल्या उद्धारासाठी जी किमत मोजण्यात आली, आपल्या स्वर्गीय पित्याचे अमर्याद अर्पण ज्याने आपला पुत्र आपणासाठी मरण म्हणून देऊ केला, ख्रिस्ताच्या द्वारे आपण काय होऊ शकतो ह्याची ते उच्चतर कल्पना आपल्याला देऊ करतात. प्रेरित प्रेषित योहानाने जसे देवाच्या प्रेमाची उंची, खोली, लांबी हि पतन पावलेल्या मानवतेकडे येत असलेली पाहिली, तो प्रेम आणि सन्मान ह्यांनी भरून गेला; आणि ह्याच प्रेमाची थोरवी आणि कोमलता व्यक्त करण्यास योग्य भाषा न मिळाल्यामुळे, त्याने जगाला ती पाहण्यास सांगितले. “आपल्याला देवाची

मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच. ह्यामुळे जग आपल्याला ओळखत नाही, कारण त्याने त्याला ओळखले नाही. १ योहान.'' ३:१

मनुष्यावर ह्याचे मोल किती अधिक आहे! अधर्मांच्या द्वारे मनुष्याची पुत्रे हि सैतानाचे विषय बनले आहेत. ख्रिस्ताच्या खंडणी भरून देणाऱ्या अर्पणाने आदामाचे पुत्र देखील देवाचे  पुत्र बनू शकतात. मानवी स्वभाव गृहीत धरून, ख्रिस्त मानवतेला उंच करतो. पतन पावलेले लोक, अशा ठिकाणी ठेवण्यात येतात, जिकडे, ख्रिस्ताशी त्यांचा संबंध आल्यावर, ते खरेच "देवाचे पुत्र" म्हणून ह्या नावाच्या पात्र ठरतात. अशा प्रेमाची कोणत्याच प्रकारे तोड नाही. स्वर्गीय पित्याची लेकरे ! अनमोल असे अभिवचन ! सर्वात ठळक आणि महत्वाच्या मननासाठी हे गमक ! देवाचे अतुलनीय प्रेम अशा जगासाठी ज्याने त्याच्यावर प्रेम केले नाही! ह्या विचाराचा जीवातम्यावर एक शरण आणणारे सामर्थ्य उतरवून आणतो आणि मनाला देवाच्या इछेच्या अधिन आणि स्वाधीन करतो.

वधस्तंभाच्या दृष्टीने जितका अधिक आपण दैवी चारित्र्याचा अभ्यास करतो, तितकी अधिक दया, कोमलता, आणि क्षमा आपल्याला दिसते जे समानता आणि न्याय ह्याने मिश्रित असतात, आणि जितक्या अधिक स्पष्टपणे आपण ह्या अमर्याद प्रेमाचे असंख्य पुरावे पाहतो आणि जशी एका आईच्या ह्रदयातून तिच्या भरकटलेल्या मुलासाठी दया व करून बाहेर पडते त्याच प्रकारे ती दया आपण ह्या प्रेमात पाहतो.

***मी देवाचे इतके आभार मानते त्या असंख्य आशीर्वादांसाठी जे सर्व त्याच्या हातून माझ्यावरील प्रेमाची एक महान साक्ष म्हणून येतात!***

***गोल करा :      होय        अनिश्चित***

***प्रथम त्याचे राज्य मिळवण्यासाठी मी विश्वास आणि सुज्ञान ह्यांच्यासाठी प्रार्थना करतो आणि मग माझ्या सर्व गरजा पुरवण्यासाठी त्याच्यावर अवलंबून राहतो.***

***गोल करा :      होय        अनिश्चित***

स्वर्ग आणि पृथ्वीवर देवाचे जे प्रेम प्रगट झाले त्याविषयी मला अधिक कौतुक आता आहे.

गोल करा : होय अनिश्चित

मी आभारी आहे की देव ह्या पृथ्वीवर आपणास बरे करण्यास आणि पापाच्या बंधनातून मुक्त करण्यास आणि त्याचे त्याच्या सर्व परिणामांना नष्ट करण्यास आला. मला ते पात्र बनायचे आहे ज्याचा वापर त्याने त्याच्या दिवसापर्यंत त्याचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी करून घ्यावा.

गोल करा : होय अनिश्चित

त्याच्या प्रेमाने मी भरून जातो जसे मला ती अद्‌भुत दया, करून आणि माझ्याप्रती असणारे देवाचे विश्वासूपण समजते जे रोज सकाळी नवीन होते आणि काहीही मला त्याच्या प्रेमापासून विभक्त करू शकत नाही.

गोल करा : होय अनिश्चित

देवाने त्याचे संतान म्हणून घेण्यात जशी त्याची महान प्रिती दाखवली ती मी पाहतो. त्याच्या आत्म्याने माझ्यामध्ये राहावे जेणेकरून त्याच्या नावार्थ मी गौरव देऊ शकतो.

गोल करा : होय अनिश्चित

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________



# धडा ३

# हरवलेल्या लोकांना शोधण्यात देवाची प्रिती

**(१) देवाचे महान प्रेम आणि दत्तकपणाच्या आतम्यामुळे, आपण त्याला अगदी जिव्हाळयाने काय बोलवू शकतो?**

***कारण पुन्हा भीती बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला नाही; तर ज्याच्या योगे आपण “अब्बा! बापा!” अशी हाक मारतो असा दत्तकपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला आहे. (रोमकरास पत्र ८:१५)***

अमर्याद देव, येशूने म्हंटले, पित्याचे नाव घेऊन त्याच्याकडे आपण जे जाऊ शकतो हे आपले सौभाग्य आहे असे बनवतो.

ह्यामध्ये ज्या सर्व गोष्टी दिसतात त्या समजून घ्या. कोणतेही पृथ्वीवरील आई वडील त्यांच्या चुकणार्या मुलासमोर इतक्या याचना करत नाहीत जसे ज्याने तुम्हाला बनवले तो अधर्म करणाऱ्या समोर याचना करतो. कोणताही मनुष्य, अथवा प्रेमळ स्वारस्य हे पश्चाताप न करणाऱ्या मनाकडे असे आमंत्रण घेऊन येताना दिसते.

प्रत्येक वस्तीस्थानात देव वस्ती करतो; बोलण्यात आलेलें प्रत्येक शब्द तो ऐकतो, प्रत्येक केलेल्या प्रार्थनेला तो ऐकतो, प्रत्येक जीवात्म्याचे दुख आणि निराशा तो पाहतो, पिता, आई, बहिण, आणि मित्र किंवा शेजारी ह्यांच्यासाठी केलेली प्रार्थना तो ऐकतो. तो आपल्या काळजी गरजांची काळजी वाहतो, आपली गरज पूर्ण करण्यासाठी त्याचे प्रेम दया आणि कृपा ह्या सदैव वाहत असतात.

पण जर देवाला तुम्ही तुमचा पिता म्हणता तर त्याचे संतान म्हणून स्वतः तशी कबुली देता, त्याच्या ज्ञानाने तुम्हाला दिशा दाखवण्यास आणि सर्व गोष्टीत आज्ञापालन करण्यास, हे जाणून की त्याचे प्रेम हे न बदलणारे आहे. तुमच्या जीवनासाठी जी त्याची योजना

आहे ती तुम्ही कबूल करता. देवाची लेकरे म्हणून, तुम्ही त्याचा सन्मान बाळगा, त्याचे चारित्र्य, त्याचे कुटुंब, त्याचे कार्य हे तुमच्यासाठी सर्वाधिक हिताचे असल्याचे लेखा. तुमच्या पित्याची व तुमच्या कुटुंबात असणाऱ्या प्रत्येकाशी असणारे नाते ओळखून त्याचा सन्मान करणे हा आनंद आहे. कितीही विनम्र असली, तरीही कोणतीही कृती करण्तास तुम्हाला आनंद होईल, ज्यामुईल त्याचे गौरव होईल आणि तुमच्या लोकांचे हित त्या द्वारे होईल.

**(२) जेव्हा एखादी पापी व्यक्ती त्याचा बंडखोर स्वभाव सोडून देवाच्या प्रेमाकडे वळते तेव्हा देव पिता आनंदाने काय करतो?**

***परमेश्वर तुझा देव, साहाय्य करणाऱ्या वीरासारखा तुझ्या ठायी आहे; तो तुझ्याविषयी आनंदोत्सव करील; त्याचे प्रेम स्थिर राहील, तुझ्याविषयी त्याला उल्लास वाटून तो गाईल." (सफन्या ३:१)***

मेंढपाळाने जो मोठा आनंद पतन पावलेल्या जीवात्म्यांना जिंकल्यावर दर्शवला तो ध्यानात ठेवला पाहिजे. तो त्याच्या शेजाऱ्यांना बोलावतो:

“माझ्यासोबत आनंद करा; माझी जी मेंढरे हरवली होती ती मला आता सापडली आहेत.’’ आणि सर्व स्वर्गात ह्या आनंदाचा नाद धुमसतो. पिता स्वतः सोडवण्यात आलेल्या लोकांसाठी गीत गाऊन आनंद व्यक्त करतो. ह्या दाखल्यात आनंदाचे अत्युच्च स्वरूप किती सुरेख रीतीने दर्शवण्यात आले आहे! ह्या आनंदात सहभागी होणे हे तुमचे सौभाग्य आहे.

**(३) जेव्हा एक बंडखोर पापी, भरकटलेल्या कोकर्यासारखा हरवतो, तेव्हा प्रेमाने त्याचा शोध कोण घेतो?**

***‘कारण प्रभू परमेश्वर म्हणतो, पाहा, मी स्वतः आपल्या कळपाचा शोध करीन; त्यांना मी हुडकीन. मी हरवलेल्यांना शोधीन, हाकून दिलेल्यांना परत आणीन, घायाळांना शोधीन, हाकून दिलेल्यांना परत आणीन, घायाळांना पट्टी बांधीन, रोग्यांना बळ देईन...” (यहज्केल ३४:११,१६)***

निराश जीवात्मा, धाडस बांध, जरी तू दुष्तेने वागला आहेस. असा विचार करू नकी की कदाचित देव तुझ्या अधर्माची क्षमा करेल आणि तुला त्याच्या

सान्निध्यात येण्याची परवानगी देईल. देवाने ते प्रथम पाऊल उचलले आहे. तू त्याच्या विरुद्ध ती बंडखोरी केली तेव्हा, त्याने पुढे जाऊन तुझा शोध घेतला. मेंढपाळाच्या कोमल हृदयाने त्याने ते नव्याण्णव मेंढरे सोडले आणि अरण्यात त्या एका हरवलेल्या मेंढराला शोधायला गेला. तो जीवात्मा, जखमी, घायाळ आणि नाश होण्यास तयार, त्याला त्याच्या मिठीत तो घेतो आणि प्रेमाने व आनंदाने सुरक्षेसाठी प्रभूसाठी त्यांना तयार करतो.

यहुदी लोकांची ही शिकवण होती की देवाचे प्रेम हे पापी व्यक्तीच्या पर्यंत येण्यापूर्वी, त्याने प्रथम पश्चाताप केला पाहिजे. त्यांच्या दृष्टीने, पश्चाताप हे कार्य आहे ज्यामुळे लोक स्वर्गाची कृपामर्जी संपादन करतात. आणि ह्याच विचाराने परुशी देखील आश्चर्याने आणि क्रोधाने व्यक्त झाले. “हा मनुष्य पापी लोकांचा स्वीकार करतो.” त्यांच्या कल्पनांच्या नुसार त्याने कोणालाही त्याच्या जवळ येऊ देऊ नये केवळ जे पश्चाताप करतात त्यानंच येऊ द्यावे. पण हरवलेल्या मेंढरांच्या दाखल्यात, ख्रिस्त शिकवतो की तारण हे आपण देवाचा शोध घेण्याने येत नाही तर देव

आपला शोध घेण्याच्या द्वारे येते. “समंजस कोणी नाही, देवाचा शोध झटून करणारा कोणी नाही; सर्व बहकले आहेत, ते सारे निरुपयोगी झाले आहेत.” रोम. ३:११,१२. देवाने आपल्यावर प्रेम करावे म्हणून आपण पश्चाताप करत नाही, पण आपण पश्चाताप करावा म्हणून तो त्याचे प्रेम आपल्याल प्रगट करतो.

जेव्हा भरकटणारे मेंढरे शेवटी घरी येतात, मेंढपाळ आनंदाने सुमधुर गीते गाऊन त्याची कृतज्ञता व्यक्त करतो. तो आपले मित्र आणि शेजारी ह्यांना स्वतःकडे बोलवतो व म्हणतो, “माझ्याबरोबर आनंद करा; कारण माझी हरवलेली मेंढरे मला मिळाली आहेत.” म्हणून जेव्हा एखादी भटकणारी व्यक्ती ही मेंढरांच्या मेंढपाळाच्या द्वारे शोधली जाते, स्वर्ग आणि पृथ्वी उपकारस्तुती करत आणि आनंदाने एकत्र येतात. “स्वर्गात नव्याण्णव न्यायी आणि धर्मी लोकांच्या पेक्षा ज्यांना पश्चातापाची गरज नाही, त्यांच्यापेक्षा जेव्हा एक पापी व्यक्ती जेव्हा पश्चाताप करते तेव्हा आनंद साजरा केला जातो.”

**(४) ह्या वचनातील कोणता शब्द आपल्या स्वर्गीय पित्याने पापी व्यक्तीला**

**परत घरी येण्याच्या आमंत्रणाची तीव्रता दर्शवतो?**

***धनी दासाला म्हणाला, ‘माझे घर भरून जावे म्हणून सडकांवर व कुंपणांकडे जाऊन लोकांना आग्रह करून घेऊन ये. (लूक १४:२३)***

आपण अशा समयात जगत आहोत जेव्हा दयेचा शेवटला संदेश, शेवटले निमंत्रण, लोकांच्या प्रत येत आहे. ती आज्ञा, “त्या रस्त्यांवर महामार्गांवर आणि कुंपणावर जा,” ही अंतिम टप्प्यात आहे. प्रत्येक जीवात्म्यासाठी ख्रिस्ताचे हे आमंत्रण देण्यात येईल. संदेशवाहक म्हणत आहेत, “या; कारण आता सर्व गोष्टी तयार आहेत.” स्वर्गीय दूत हे मानवी माध्यमांच्या सहकार्याने आधीच कार्य करत आहेत. पवित्र आत्मा तुम्हाला येण्यासाठी प्रत्येक रीतीने प्रवृत्त करत आहे. तुमच्या हृदयाचे द्वार खुले करण्यास त्यातील कड्या कपारे उघडून आत येण्याची चिन्हे ख्रिस्त पहात व शोधात आहे. स्वर्गदूत ह्या सुवार्ता चांगल्या बातम्या की पापी पतन पावलेली व्यक्ती आता सापडली हे सांगण्यास वाट पाहत आहे. स्वर्गातील लोकसमुदाय वाट पाहत आहे, त्यांच्या

कर्णा वाजवण्यास आणि सुवार्तेची मेजवानी उपभोगण्यास ते आमंत्रण आणखी एक व्यक्तीने स्वीकारले ह्यासाठी आनंदाने गीत गाण्यास तयार आहे.

**(५) उधळ्या पुत्राच्या दाखल्यात सांगितल्याप्रमाणे, स्वर्गातील पिता जो आपला देव आहे तो पृथ्वीवर भरकटलेल्या त्याच्या लेकरांना घरी कसे स्वागत करतो?**

***"मग तो उठून आपल्या बापाकडे गेला. तो दूर आहे तोच त्याच्या बापाने त्याला पाहिले. त्याला त्याचा कळवळा आला आणि धावत जाऊन त्याच्या गळ्यात गळा घालून त्याने त्याचे मुके घेतले . (लूक १५:२०)***

उधळ्या पुत्राचे वडील म्हणजे देवाचे प्रतिनिधी म्हणून ख्रिस्त निवड करतो. हे वडील जो मुलगा आपल्याला सोडून गेला त्याला पुन्हा एकदा बघण्याची इच्छा धरतात तशी वाट पाहतात. ते त्याची वाट पाहतात, त्याला पाहण्याची ओढ त्यांच्यात असते, अशी आशा धरतात की तो येईल. जेव्हा एका परक्या व्यक्तीला येताना ते पाहतात, गरीब आणि फटके

कपडे घालून , कदाचित आपला मुलगा आहे की काय असे त्यानं वाटते. आणि खरच त्यांचा मुलगा समजून ते त्याला अन्नपाणी देतात. तसे करण्याने त्यांचे प्रतिफळ तर आहेच, कारण त्यांचा मुलगा घरी येतो, त्याच्या ओठांवर ती काकुळतीने दिलेली कबुली असते, “मुलगा त्याला म्हणाला, ‘बाबा, मी स्वर्गाविरुद्‌ध व तुमच्याविरुद्‌ध पाप केले आहे; आता तुमचा मुलगा म्हणवून घेण्यास मी योग्य नाही.’ पण बापाने आपल्या दासांना सांगितले, ‘लवकर उत्तम झगा आणून ह्याला घाला, ह्याच्या हातात अंगठी व पायांत जोडे घाला,आणि पुष्ट वासरू आणून कापा; आपण खाऊ आणि आनंदोत्सव करू” (लूक १५:२१-२३).

ह्या ठिकाणी कोणत्याही प्रकारे टोचून बोलणे नाही, उधळ्या पुत्राने जो दुष्ट मार्ग निवडला त्याविषयी त्याला टाकून दिले नाही. पुत्राला वाटते की त्याचा भूतकाळ जो आहे त्याच्यापासून त्याला क्षमा मिळाली आहे आणि त्याचा विसर पडला आहे, आणि सर्वकाळसाठी त्याला काढून टाकण्यात आले आहे.  आणि म्हणून देव पापी व्यक्तीला म्हणतो, “तुझे अपराध धुक्याप्रमाणे, तुझी पातके अभ्राप्रमाणे मी नाहीतशी केली आहेत;

माझ्याकडे फीर, कारण मी तुला उद्धरले आहे” (यश. ४४:२२). “मी त्यांच्या अधर्माची क्षमा करीन, त्यांचे पाप मी ह्यापुढे स्मरणार नाही” (यिर. ३१:३४). स्वर्ग अशा प्रकारे उधळ्या पुत्रांच्या प्रतीची वाट आतुरतेने पाहत आहेत जे ह्या जगात हरवले आहे. जे अनेक लोक ह्या जगात भरकटून गेले ते देवाच्या लेकरांच्या प्रेमळ  सेवेने कदाचित पुन्हा घेऊन येण्यात येतील.

पिता स्वतः ते दुख सहन करण्याची कल्पना करा, त्याच्या स्वतःच्या पुत्राला न राखून ठेवता, पण मुक्तपणे त्याने त्याला आपल्यासाठी देऊ केले..... आपल्याला ह्याच त्याच्या प्रेमाची जर अधिक चांगली समज असती तर!

**(६) आपल्याला म्हणजेच त्याच्या “उधळ्या” पुत्रांना घरी येण्याचे आमंत्रण देण्यामध्ये पित्याची प्रेरणा काय आहे?**

***“मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो म्हणून मी तुला वात्सल्याने जवळ केले आहे. (यिर्मया ३१:३)***

हा अविचारी तरुण, पित्याच्या घराच्या वेशीतून बाहेर पडल्यावर, किंचित त्याला

वडिलांच्या हृदयाची वेदना आणि दुख हे समजले असतील. त्याच्या जंगली मित्रांच्या सोबत त्याने मेजवानी करत असताना नाचताना, त्याच्या घरावर जे सावट पसरले होते ह्याची त्याला कदापि कल्पना नव्हती. आणि आता ते थकलेले आणि दुखदायक पाऊल उचलताना घरी परतण्याचा मार्ग ते निवडतात, त्याला माहित नाही की त्याच्या परतीची वाट कोणीतरी पाहत आहे. पण तो “दूरवर उभा होता तेव्हा” पिता त्याचे स्वरूप पाहून त्याला ओळखतात. प्रेम हे दूरदर्शी असते. पापाच्या नाशाची ढलती देखील पुत्राला पित्याच्या डोळ्यांपासून दूर लपवू शकत नाही. “त्याला कळवळा आला, आणि तो पळाला, आणि त्याच्या मानेवर पडला” आणि खूप वेळ आपल्या वडिलांना त्याने घट्ट, कडकडीत मिठी मारली.

पिता त्याच्या पुत्राच्या दैन्यावस्थेकडे पाहून कोणत्याही प्रकारे कोणाच्याही दोष न धिक्कारणाऱ्या नजरेला परवानगी देणार नाही. ते स्वतःच्या खांद्यावरून मोठा, श्रीमंत असलेला झगा घेतात, आणि मुलाच्या भोवती लपेटून टाकतात, आणि तो तरुण पश्चातापाने ओरड करतो, म्हणतो, “बापा, मी तुमच्या विरुद्ध आणि स्वर्गाच्या ठायी पाप केले

आहे, आणि तुमचा पुत्र म्हणवून घेण्याची माझी लायकी नाही.” पिता त्याला जवळ कवटाळून धरतात, आणि घरी घेऊन येतात. त्याला नोकराची जागा मागण्याची देखील संधी ते देत नाहीत. तो पुत्र आहे, ज्याला घरात जे उत्तम आहे त्याने सन्मानित करण्यात येईल, आणि वाट पाहणारे पुरुष आणि स्त्रिया त्याचा सन्मान करून त्याची सेवा करतील.

बापाने आपल्या दासांना सांगितले, ‘लवकर उत्तम झगा आणून ह्याला घाला, ह्याच्या हातात अंगठी व पायांत जोडे घाला,आणि पुष्ट वासरू आणून कापा; आपण खाऊ आणि आनंदोत्सव करू. कारण हा माझा मुलगा मेला होता, तो पुन्हा जिवंत झाला आहे; हरवला होता, तो सापडला आहे.’ मग ते आनंदोत्सव करू लागले.”

**(७) उधळ्या पुत्र जेव्हा घरी परत आला तेव्हा स्वर्गाने ती बातमी ऐकून कसा प्रतिसाद दिला?**

***त्याप्रमाणे, पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी माणसाबद्दल देवाच्या दूतांसमोर आनंद होतो, हे मी तुम्हांला सांगतो..” (लूक १५:१०)***

त्याच्या बापाने त्याला पाहिले. येशू व्यक्त करतो की पिता त्याच्या पुत्राच्या परतीची वाट बघतो, तशी अपेक्षा करतो. पित्याला आपल्या पुत्राचे चारित्र्य कसे होते ह्याची जाणीव होती–अगदी आपल्या मालमत्तेचा हिस्सा देऊन जेव्हा त्याने त्यांना सोडून दिले तेव्हा देखील–की त्याच्यात ते चरित्रगुण मान्व्हते जे त्याच्या ह्या कार्यासाठी त्याला यशसंपादन करण्यास मदत करू शकतील. कदाचित त्यांनी देखील हे पक्के केले की कधी न कधी तो पुत्र घरी येईल. त्यांना आपला पुत्र ठाऊक होता, त्याच्या फाटक्या कपड्यात देखील दूरवरून त्यांनी त्याला ओळखले.

व. २०-२४ मध्ये येशू त्यांना पित्याच्या चारित्र्याचे हे पैलू स्पष्ट करून सांगतो, अगदी व. ११-१९ मध्ये देखील धाकट्या मुलाच्या चारित्र्यावर तो मनन करतो. तो मुलगा होता त्या ठिकाणाहून परत तिकडे येण्याची ते वाट बघत होते. त्या ऐवजी, त्याच्या स्वतःच्या हृदयाची उत्सुकता आणि आनंद हे त्याने उघडकीस आणले आणि त्याला परत जाऊन भेटला. त्याच्या मानेवर तो पडला. ते म्हणजे, त्याने त्यांना आलिंगन दिले. पुत्र अजून काही बोलला नाही, पण त्याची परतफेड

म्हणून त्याने असे उत्स्फूर्त रीतीने मनात होते ते शब्द बोलून दाखवले. पित्याने त्याच्या पुत्राला काय म्हंटले ह्याची देखील काहीच निंद नाही, पण त्याच्या सेवकांना त्याने फर्मान दिले, त्याच्या पित्याच्या प्रेमळ प्रदर्शनाने, शब्दांच्या पेक्षा जास्त बोलवून दाखवले.

**(८) ह्या शास्त्रवचनात कोणते चिन्ह वापरण्यात आले आहेत जे आपली पापे काढून टाकून देव त्याच्या धार्मिकतेने त्याची जागा घेईल?**

***त्याच्यासमोर जे उभे होते त्यांना तो उत्तरादाखल म्हणाला, “त्याच्यावरची मलीन वस्त्रे काढा.” तो त्याला म्हणाला, “पाहा, मी तुझा अधर्म तुझ्यापासून दूर केला आहे, मी तुला उंची पोशाख घालत आहे..” (जखऱ्या ३:४)***

तुमचा स्वर्गीय पिता तुमच्याकडून जे पापाने भरलेले तुमचे कपडे आहेत ते काढून घेईल. जखर्याच्या सामर्थ्यशाली भविष्यवाणीत, मुख्य याजक यहोशवा, देवाच्या स्वर्गदूताच्या समोर घाणेरड्या कपड्यात उभे राहून, ह्याच पापी व्यक्तीचे प्रदर्शन करतो. आणि हा शब्द प्रभू बोलून दाखवतो, “त्याच्यासमोर जे

उभे होते त्यांना तो उत्तरादाखल म्हणाला, “त्याच्यावरची मलीन वस्त्रे काढा.” तो त्याला म्हणाला, “पाहा, मी तुझा अधर्म तुझ्यापासून दूर केला आहे, मी तुला उंची पोशाख घालत आहे.” मी म्हणालो, “त्याच्या डोक्याला त्यांनी स्वच्छ मंदील घालावा.” तेव्हा त्यांनी त्याला स्वच्छ मंदील व पोशाख घातला; आणि परमेश्वराचा दिव्यदूत जवळ उभा होता.” जख. ३:४,५.

ह्या नात्याने देव देखील तुम्हाला “तारणाच्या वस्त्रांनी परिधान करेल,” आणि तुम्हाला “नितीमत्वाच्या झग्याने” आच्छादून टाकेल. यश. ६१:१०. “तुम्ही मेंढवाड्यामध्ये पडून राहता काय? ज्याचे पंख रुप्याने व पिसे पिवळ्या सोन्याने मंडित आहेत, अशा कबुतरासारखे तुम्ही आहात ना?” स्तोत्र. ६८:१३.

त्याने मला आपल्या पानगृहात आणले; त्याने माझ्यावर प्रेमध्वजा फडकावली. (गीतरत्न २:४) “तू माझ्या मार्गांमध्ये जर चालला तर,” तो घोषणा करतो, “सेनाधीश परमेश्वर म्हणतो, तू माझ्या मार्गाने चालून तुला मी सोपवलेले सर्व सांभाळले तर तू माझ्या मंदिरात न्याय करशील व माझ्या अंगणाचे रक्षण

करशील व तेथे उभे असणाऱ्यांत तुझे जाणेयेणे होईल असे मी करीन. (जख. ३:७)

**(९) पिता त्याच्या चारित्र्याच्या कोणत्या तीन वैशिष्ट्यांनी आपल्याला परत घरी बोलवण्यास तयार आहे?**

***किंवा देवाची ममता तुला पश्चात्तापाकडे नेणारी आहे हे न समजून तू त्याची ममता, क्षमा व सहनशीलता ह्यांच्या विपुलतेचा अनादर करतोस काय? (रोमकरास पत्र २:४)***

देवाचे प्रेम हे ज्या लोकांनी त्याच्यापासून वेगळे होण्याची निवड केली त्यांच्यासाठी देखील अजूनही याचना करते, आणि तो पुन्हा पित्याच्या घरी अशांना घेऊन येण्याची कामगिरी सुरु करतो. उधळा पुत्र त्याच्या दुष्टतेत “स्वतः जागा होतो.” सैतानाने जी त्याच्यावर फसवणूक करून असे लुभावणारे सामर्थ्य भुरळ म्हणून घातले होते ते मोडण्यात आले. त्याने बघितले की त्याचे दुखसहन त्याच्या स्वतःच्या चुकांचे प्रतिफळ होते, आणि तो म्हणाला, “माझ्या वडिलांच्या कितीतरी चक्रांना खाण्यास भरपूर अन्न

आहे आणि मी येथे भुकेने मारत आहे! मी उठून माझ्या पित्याच्या घरी जातो.”

तो होता तशाच दैन्य अवस्थेत, उधळ्या पुत्राला त्याच्या वडिलांच्या प्रेमाची जाणीव झाली. तेच प्रेम त्याल घराकडे आकर्षित करत होते. म्हणूनच देवाच्या प्रेमाची तीच खात्री असते की पापी व्यक्ती पुन्हा देवाकडे वाळू शकते. “किंवा देवाची ममता तुला पश्चात्तापाकडे नेणारी आहे.” रोम. २:४. एक सोन्याची साखळी, दैवी प्रेमाची दया आणि कळवळा, हे प्रत्येक संकटात असणाऱ्या जीवात्म्यासाठी देण्यात येते.

**(१०) त्याच्या अद्‌भुत प्रेमामध्ये, देव जो पिता आपल्याला कोणत्या मोठ्या सौभाग्यासाठी पाचारण करतो?**

***आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच. ह्यामुळे जग आपल्याला ओळखत नाही, कारण त्याने त्याला ओळखले नाही. (१ योहान ३:१)***

स्वर्ग आणि पृथ्वीवरील सर्व बुद्‌धिमत्ता ह्यांना पित्याने आपल्यावर कोणत्या प्रकारचे प्रेम विदित केले हे पाहण्यासाठी

पाचारण केले आहे, जेणेकरून आपणास देवाची लेकरे म्हणवून घेण्याचे भाग्य लाभले आहे. प्रत्येक पापी व्यक्तीने ते पाहावे आणि तसे जगावे.

काल्वरीचा तो देखावा निष्काळजी आणि अविचारी वृत्तीने पाहू नका. असे होऊ शकते का की देवदूत आपल्याकडे पाहतील, देवाच्या प्रेमाला आपण जे ग्रहण करतो व स्वीकारतो, आणि आपल्याला असे शिथिल, बेपर्वा, अप्रभावी अशा अवस्थेत बघतील, जेव्हा स्वर्ग त्याच्या अद्‌भुत अवस्थेत उद्‌धाराचे हे बलाढ्य कार्य पतन पावलेल्या जगताच्या तारणासाठी करते, आणि मग काल्वरीच्या प्रेमाचे रहस्य आणि शोक ह्यांच्याकडे ते लक्ष वेधून घेते का? देवदूत देखील ह्याच आश्चर्याने आणि थक्क होऊन त्या लोकांकडे पाहतात ज्यांच्यासाठी हे महान तारण देण्यात आले आहे, आणि आश्चर्य करतात की देवाचे प्रेम त्यांना जागृत करत नाही, आणि कृतज्ञता व जिव्हाळा ह्यांचे स्तुतीगीते गाण्यास मार्गदर्शन करतात.

पण स्वर्ग जो परिणाम पाहण्यास सर्वांना प्रेरित करतो तो ख्रिस्ताचे अनुयायी

म्हणवून घेणाऱ्या लोकांमध्ये दिसून येत नाही. आपण आपले मित्र आणि नातेवाईक ह्यांच्या प्रती किती लवकर प्रेमाने ते शब्द काढतो, आणि ज्याच्या प्रेमाची तुलना नाही त्याविषयी काहीच बोलत नाही, जे ख्रिस्तात आपल्याला जो वधस्तंभावर खिळला गेला त्याच्यात दिसते.

**(११) पित्याचे प्रेम, पवित्र आत्म्याच्या द्वारे जेव्हा आपल्याला घरी येण्याचे आग्रही आमंत्रण देते, तेव्हा काय न करण्याची काळजी आपण घेतली पाहिजे?**

***देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका; खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रित झाला आहात. (इफिसकरास पत्र ४:३०)***

पण “जो बोलत आहे त्याचा अवमान करू नये म्हणून जपा.” इब्री. १२:२५. येशूने म्हंटले, “ज्या कोणाला आमंत्रण देण्यात आले होते त्यापैकी कोणीही माझ्या भोजनातून खाणार नाही.” त्यांनी ते आमंत्रण नाकारले, आणि म्हणून पुन्हा त्यांना कोणालाच आमंत्रण देण्यात येणार नाही. ख्रिस्ताला नाकारण्यात,

यहुदी लोक त्यांची हृदये कठीण करत होते, आणि स्वतःला सैतानाच्या शक्तीच्या अधीन करून देत होते जेणेकरून त्याची कृपा स्वीकारणे हे अशक्य बनले. म्हणून आत्ता देखील तसेच आहे. देवाच्या प्रेमाचे जर कौतुक केले नाही आणि ते एक टिकणारे तत्व आपल्याला मृदू करण्यास आणि जीवात्म्याला शरण जाण्यास जर कारण ठरले नाही तर, आपण मग हरवून बसतो. प्रभू त्याच्या प्रेमाचे दुसरे कोणतेच प्रदर्शन देऊ शकत नाही त्याने दिले त्यापेक्षा अधिक. येशूचे प्रेम जर हृदयाला नमवत नाही, मग आपण ते गाठू शकण्याचा इतर कोणताच मार्ग नाही.

प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही दयेचा संदेश ऐकण्यास नकार देता, तुम्ही स्वतःला अशा प्रकारे अविश्वासात दृढ करता. ख्रिस्ताच्या प्रती प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही हृदयाचे दार उघडण्यास तयार नसता, तेव्हा जो बोलतो त्याची वाणी ऐकण्यास तुम्ही अधिक नकार देता तशी तयारी दर्शवत नाही. दयेचा जो शेवटला अर्जाव असतो त्या संधीला गमावण्यास तुम्ही तयार असता. तुमच्याविषयी असे लिहण्यात येऊ नये, जसे प्राचीन इस्राएल

बद्दल लिहण्यात आले, “एफ्राईम मूर्तीवर आसक्त झाला आहे, त्याचे नाव सोडून द्या.” होशेय ४:१७. जसा ख्रिस्त यरुशलेमच्या बाबतीत रडला तसे त्याने तुमच्याबद्दल करू नये, जेव्हा तो म्हणाला, जशी कोंबडी आपली पिले पंखांखाली एकत्र करते तसे तुझ्या मुलाबाळांना एकत्र करण्याची कितीदा माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती! पाहा, तुमचे घर तुमच्यासाठी ओसाड सोडले आहे.” लूक १३:३४, ३५.

**(१२) जेव्हा एक पापी व्यक्ती पश्चाताप करते तेव्हा स्वर्गात काय घडते?**

***त्याप्रमाणे ज्यांना पश्चात्तापाची गरज नाही अशा नव्याण्णव नीतिमानांबद्दल होणाऱ्या आनंदापेक्षा पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होईल, हे मी तुम्हांला सांगतो. (लूक १५:७)***

जे थकले आहेत, जे मोहात पडले व जे परीक्षेत सापडले त्यांच्या जवळ येणे हे देवदूताचे कार्य आहे. ख्रिस्त ज्यांच्यासाठी मरण पावला त्यांच्यासाठी ते न थकता कष्ट करत राहतात. जेव्हा पापी लोक स्वतःला तारणार्याच्या अधीन देतात,

देवदूत ती बातमी स्वर्गाकडे घेऊन जातात, आणि स्वर्गीय दूतांच्या मध्ये खूप आनंद आणि उत्साह असतो. “त्याप्रमाणे ज्यांना पश्चात्तापाची गरज नाही अशा नव्याण्णव नीतिमानांबद्दल होणाऱ्या आनंदापेक्षा पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होईल, हे मी तुम्हांला सांगतो.” लूक १५:७.

आपल्या वतीने अंधकार दूर करून ख्रिस्ताचे ज्ञान दूरदेशी देण्याच्या आपल्या प्रत्येक प्रयत्नाचा अहवाल स्वर्गाकडे पाठवण्यात येतो. ते कार्य पित्याच्या समोर खुले केल्यावर, संपूर्ण स्वर्गीय दूतांच्या सैन्येत आनंद भरून जातो.

**(१३) अग्रहणीय अशा प्रेमाने पित्याने आपली क्षमा केली आणि आपला उद्धार केला, त्याचे आमंत्रण काय आहे आणि आपण काय करावे?**

***तुझे अपराध धुक्याप्रमाणे, तुझी पातके अभ्राप्रमाणे मी नाहीतशी केली आहेत; माझ्याकडे फीर, कारण मी तुला उद्धरले आहे.” (यशया ४४: २२)***

तुम्ही, जे वाचक आहात, तुम्ही स्वतःचा मार्ग निवडता का? देवापासून तुम्ही दूर

गेला का? अधर्मांच्या फळावर मेजवानी करण्याची तुमची इच्छा आहे का, आणि परिणामी तुमच्या ओठांवर राख ओढवून घेण्याची तुमची तयारी आहे का?  आणि आता, तुमच्या जीवनाचे मार्ग आणि योजना ह्या विस्कटल्या आणि आशा ही मृत झाली, तुम्ही एकटे आणि निराश असे बसता का? तीच वाणी जी खूप समयापासून तुमच्या हृदयाशी बोलत होती, पण जी तुम्ही ऐकली नाही, तीच स्पष्ट आणि ठळकपणे तुमच्याकडे येते, “उठा, चालते व्हा, हे तुमचे विश्रांतिस्थान नव्हे; कारण अशुद्धतेने नाश, समूळ नाश होईल.” मीखा २:१०.

तुझ्या पित्याच्या घरी परत जा. तो तुला आमंत्रण देऊन म्हणतो, “माझ्याकडे फीर, कारण मी तुला उद्धरले आहे.” “कान द्या, माझ्याकडे या; ऐका, म्हणजे तुमचा जीव वाचेल; आणि मी तुमच्याबरोबर सर्वकाळचा करार करीन, म्हणजे दाविदाला देऊ केलेले अढळ प्रसाद तुम्हांला देईन.” यशया ४४:२२; ५५:३.

ख्रिस्ताच्या पासून लांब राहण्याच्या शत्रूच्या सूचनेकडे लक्ष देऊ नका जोपर्यंत तुम्ही स्वतःला जरा बरे केले नाही,

जोपर्यंत देवाकडे येण्यास तुम्ही तीत्कडे चांगले बनला नाहीत. जर तेव्हापर्यंत तुम्ही वाट बघितली तुम्ही कधीच येणार नाही. जेव्हा सैतान तुमच्या मलीन वस्त्रांकडे बोट दाखवतो, तारणार्याचे अभिवचन पुन्हा बोलून दाखवा, "जो माझ्याकडे येतो त्याला मी मुळीच घालवून देणार नाही." योहान ६:३७. शत्रूला सांगा की येशू ख्रिस्ताचे रक्त सर्व पापांपासून शुद्ध करते. दाविदाची प्रार्थना हि तुम्ही स्वतःची प्रार्थना बनवा: "एजोबाने माझा पापमल काढ म्हणजे मी निर्मळ होईन; मला धू म्हणजे मी बर्फाहून शुभ्र होईन." स्तोत्र ५१:७.

***अब्बा पित्याच्या नावाने निर्माणकर्त्या देवाकडे येण्याचे हे माझे सौभाग्य आहे आणि त्याद्वारे त्याची माझ्या जीवनासाठी योजना जी आहे त्याचा स्वीकार करणे.***

***गोल करा :      होय      अनिश्चित***

***माझ्या हृदयाला हे ऐकून स्पर्श होतो जसे मी उधळ्या पुत्राच्या बद्दल ऐकतो आणि पित्याचे दर्शक म्हणजे स्वर्गीय देव पिता***

आहे. पुत्र, अजूनही, बंडखोरी करत असताना देखील , पित्याने त्याचा शोध करण्याचे चालू ठेवले जसे तो तुमच्या आणि माझ्याबद्‌दल देखील करतो.

गोल करा : होय अनिश्चित

माझ्या बंडखोरीपासून वळण्याची मी निवड करतो आणि मी इतके आभार मानतो की कोणत्याही प्रकारे टोचून बोलणे अन्ही किंवा माझे दुष्ट मार्ग त्यागून देणे नाही. तो माझ्या अधर्मांची क्षमा करतो आणि शास्त्रवचनाच्या नुसार माझ्या पापांची पुन्हा कदापि आठवण ठेवत नाही.

गोल करा : होय अनिश्चित

हे खूप छान आहे की संपूर्ण स्वर्ग एका त्या पापी व्यक्तीसाठी आनंद करतो जो पित्याच्या प्रेमाकरिता घरी परततो. मी आश्चर्यचकित आहे की त्यांनी हे माझ्यासाठी केले!

गोल करा :        होय          अनिश्चित

मी सदैव आभारी आणि कृतज्ञ आहे की जेव्हा मी पापात पडतो पिता माझी आशा सोडून देत नाही पण त्या ऐवजी माझा शोध करती आणि पुन्हा त्याच्याकडे घेऊन येतो.

गोल करा :        होय          अनिश्चित

ही माझ्या मनाची प्रार्थना आहे की मी त्याच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नये आणि ज्याने माझ्यासाठी इतके काही केले त्याच्याकडे माझी पाठ वळवू नये. मला त्याच्या नावार्थ गौरव द्यायचे आहे म्हणून तसेच जीवन जगायचे आहे आणि त्याचे सनातन म्हणवून घ्यायचे आहे.

गोल करा :        होय          अनिश्चित

______________________________________

______________________________________

______________________________________



# धडा ४

# देवाचे प्रेम आपल्या चारित्र्याच्या शुद्धीकरणात प्रगट होते

**(१) देवाच्या चारित्र्याचे कोणते चार गुणधर्म आहेत जे तो आपल्याला देऊ करतो, आणि त्याच्या प्रेमाची ती अभिवचने आहेत जी आपण हस्तगत करू शकतो?**

*परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : "परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, (निर्गम ३४:६)*

एका विश्वासू निर्माणकर्त्याच्या प्रती जसा तुम्ही आपला जीव राखून ठेवता तसच वचन तुम्ही त्याला द्या. त्याच्या दया ह्या खात्रीपूर्वक आहेत, त्याचा करार हा सर्वकाळ टिकणारा आहे. ज्या मनुष्याची आशा त्याचा देव जो प्रभू ह्यावर आहे तो आनंदी असतो, आणि तो सदैव सत्य राखून ठेवतो. तुमच्या मनामध्ये ती अभिवचने साठवून ठेवा आणि त्याला अढळ चिकटून राहा. ह्या अनमोल अभिवचनांमध्ये जी खात्री आणि आश्वासन देण्यात आले आहे त्याचे जर तुम्हाला स्मरण होत नसेल, तर दुसऱ्याच्या तोंडून ते ऐका. काय ते पूर्णत्व, काय प्रेम आणि आश्वासन हे स्वतः देवाच्या मुखातून आणि त्याच्या ओठातून व्यक्त होते, जे त्याचे प्रेम, त्याची दया हे त्याच्या लेकरांसाठी त्यांच्या हितासाठी घोषित करते.

प्रभू दुख सहन करणाऱ्या लोकांच्या प्रती कनवाळू आहे दयामय आहे. अशी कोणती पापे आहेत की त्याच्या क्षमेसाठी खूप मोठी आहेत? तो दयामय आहे, आणि इतका की दोष लावण्यापेक्षा तो क्षमा करण्यास अधिक जास्त तयार आहे. तो कृपाळू आहे, आपल्यामध्ये काय चुकते हे तो पाहत नाही ; त्याला

आपले मन माहित आहे ; आपण केवळ माती आहोत हे तो आठवतो. त्याच्या अमर्याद दयेने आणि कनवाळूपणाने तो आपले सर्व पाप, पतन बरे करतो, आपण पापी असतानाही तो आपल्यावर मुक्तपणे प्रेम करतो, त्याचा प्रकाश काही काढून घेत नाही, पण ख्रिस्तासाठी तो प्रकाश आपल्यावर चमकू देतो.

**(२) पित्याकडे त्याने केलेल्या प्रार्थनेत, येशूने आपल्यासाठी असणाऱ्या देवाच्या प्रेमाचे वर्णन कसे केले?**

***म्हणजे मी त्यांच्यामध्ये व तू माझ्यामध्ये; ह्यासाठी की, त्यांनी एक होऊन पूर्ण व्हावे आणि त्यावरून जगाने समजून घ्यावे की, तू मला पाठवलेस आणि जशी तू माझ्यावर प्रीती केलीस तशी त्यांच्यावरही प्रीती केलीस. (योहान १७:२३)***

ह्याच ठिकाणी त्या अद्‌भुत सत्याची घोषणा होते, त्यात इतके उत्तेजन आणि सांत्वन असते, की देव आपल्यावर त्याच्या पुत्राच्या प्रमाणे प्रेम करतो. येशूने शिष्यांसाठी केलेल्या त्याच्या शेवटल्या प्रार्थनेत हेच म्हंटले आहे, “जशी तू माझ्यावर प्रीती केलीस तशी

त्यांच्यावरही प्रीती केलीस.” योहान १७:२३.

देवाकडे येण्यामध्ये पहिले पाऊल म्हणजे त्याचे आपल्यासाठी जे प्रेम आहे ते जाणून घेणे व त्याच्यावर विश्वास ठेवणे (१ योहान ४:१६); कारण त्याच्याच प्रेमाच्या आमंत्रणाने आपण त्याच्याकडे ओढले जातो.

ह्यावर विश्वास ठेवणे अत्यंत चांगले आहे की पिता मानवी कुटुंबातील प्रत्येक सदस्यावर त्याच्या पुत्राच्या प्रमाणेच प्रेम करतो. पण आपल्याला ती खात्री आहे की तो करतो, आणि ह्याच आश्वासनाने प्रत्येक हृदयात तो आनंद घेऊन यावा,सर्वात उच्च प्रतीचा आदर जागृत करावा आणि त्याद्वारे न बोलता येणारी कृतज्ञता व्यक्त करावी. देवाचे प्रेम हे अनिश्चित आणि आणि खोटे नाही, पण एक जिवंत वास्तविकता आहे.

**(३) जसा कोणताही चांगला पिता जो त्याच्या लेकरांवर प्रेम करतो, प्रभुणे काही वेळी आणि समयी आपले चारित्र्य परिपूर्ण आणि उदात्त करावे?**

***कारण ज्याच्यावर परमेश्वर प्रीती करतो,***

*त्याला तो शिक्षा करतो आणि ज्या पुत्रांना तो स्वीकारतो त्या प्रत्येकाला फटके मारतो. (इब्री १२:६)*

संयमी, चिकाटीची शिस्त हे चिंता व्यक्त करणाऱ्या जिव्हाळ्याचे प्रदर्शन आहे. चारित्र्याला उदात्त आणि परिपूर्ण करणारे अनुभव म्हणजे प्रभूचे आपल्यावर प्रेम आहे ह्याचाच सर्वोतम पुरावा आहे. एक लहान मूल, किंवा मग प्रौढ ख्रिस्ती व्यक्ती असो, चारित्र्यात शिस्त असणे आवश्यक असतेच.

चारित्र्य घडण्यासाठी जी काही शिस्त आवश्यक आहे ती देव देतो , किंवा ह्या उद्‌देशाला जे सिद्‌ध करतील त्याच अनुभवांना तो परवानगी देतो. तरीही, ह्या विधानावर अधिक शब्दशः अर्थाने जोर देणे गरजेचे नाही, जणूकाही देवाने व्यक्तीशः किंवा थेट रीतीने ते दुखसहन आणि वेदना ह्यांना फर्मान देतात की ज्यामुळे जीवनाचे शिस्तबद्‌ध अनुभव हे अनुभवले जातात.

**(४) देवाचे आपल्यावर प्रेम आहे म्हणून, आणि जेव्हा ते आपल्या हितासाठी कार्यरत असते, सैतान ज्याला शाप म्हणून इच्छितो त्यासोबत तो बरेचदा काय करतो?**

***तरी तुझा देव परमेश्वर हा बलामाचे ऐकायला तयार झाला नाही; उलट तुझा देव परमेश्वर ह्याने तुझ्याकरता त्या शापाचा आशीर्वादच केला, कारण तुझा देव परमेश्वर ह्याची तुझ्यावर प्रीती होती. (अनुवाद २३:५)***

जे आपल्यासाठी फसगत आणि पराजय असे दिसतात प्रभू त्याच्यातून देखील आपणास विजय देय शकतो. देवाला विसरण्याच्या धोक्यात आपण आहोत, ज्या गोष्टी दिसत नाहीत त्यांना विश्वासाच्या नेत्रांनी पाहण्यापेक्षा ज्या डोळ्यांना दिसतात त्यांच्याकडे बघतो. जेव्हा दुर्भाग्याने काहीतरी विपरीत घडते, आपण देवावर तो क्रूर आहे किंवा दुर्लक्ष करतो असे आरोप लावतो. जर तो काही रीतीने आपले उपयुक्तपण काढून टाकण्याच्या प्रयत्नात असतो, तेव्हा आपण शोक करत राहतो, आणि तो आपल्या हितासाठी हे करत आहे असा विचार करण्याचे आपण थांबवत नाही. त्याच्या महान योजनेचा भाग म्हणजे आपल्याला त्याने फटके मारणे हा आहे आणि यातनेच्या त्या छडीच्या अंतर्गत ख्रिस्ती व्यक्ती त्या समयी आपल्या प्रभूसाठी नेहमी करत असल्यापेक्षा अधिक सेवा करू शकते.

पौल ह्या ठिकाणी त्याच्या विचाराला कसे विस्तारित करून मांडले ह्याकडे बोट दाखवतो (इब्री. १२:५-११) जेव्हा आपल्या पृथ्वीवरील पित्यांनी आपणास शिस्त लावली तेव्हा त्यांचा सन्मान आपण केलाच. कदाचित लेकरे म्हणून ते आपल्या हितासाठी तसे करत आहेत ह्याची पुसट कल्पना आपल्याला असते. देवाच्या लेकरांनी विश्वास ठेवावा की सर्व गोष्टी एका स्वर्गीय पित्याच्या नियंत्रणाच्या खाली आहेत जो त्यांच्यात आनंद मानतो आणि जो त्यांच्या चांगल्यासाठी गोष्टी करेल जर ते आनंदाने त्याची शिस्त पाळतील आणि जे धडे त्यांना शिकवायचे होते त्यांचे देखील पालन करतील.

**(५) प्रभू कोणाला धिक्कारतो व कोणाचे शासन करतो?**

***जितक्यांवर मी प्रेम करतो तितक्यांचा निषेध करून त्यांना शिक्षा करतो;' म्हणून आस्था बाळग आणि पश्चात्ताप कर. (प्रगटीकरण ३:१९)***

येशूने म्हंटले: "पित्याने स्वतः तुमच्यावर प्रेम केले." जर देवावर आपला विश्वास आधारित असेल, ख्रिस्ताच्या द्वारे, तो

“जीवासाठी एक नांगर, अढळ आणि खात्रीशीर, आणि जो त्या पडद्याच्या आड प्रवेश करतो; ज्यासाठी आपल्यासाठी आधीच तो दूत गेला आणि प्रवेश केला.” हे खरे आहे की निराशा येतील; छळाची देखील अपेक्षा आपण केलीच पाहिजे; पण सर्वकाही लहान आणि मोठे आपण देवाच्या अधीन केले पाहिजे. आपल्या तक्रारींच्या बहुसंख्येमुळे अथवा आपल्या ओझ्यांच्या वजनाने त्याला काही त्रास होत नाही.

त्याची नजर ही प्रत्येक घराण्यावर आहे आणि प्रत्येक व्यक्तीच्या भोवती ती आवरण म्हणून दिसते; तो आपल्या व्यापार आणि दुख ह्यांच्याशी संबंधित आहे. तो प्रत्येक अश्रुची नोंद घेतो; आपल्या व्याधींच्या भावनेने त्याला स्पर्श होतो. जे त्रास आणि संकटे आपल्यासमोर येतात, प्रेमाचे हेतू आपल्यासाठी सिद्ध करण्यात, “जेणेकरून पण त्याच्या पावित्र्याच्या नुसार सहभागी होऊ शकतो” आणि म्हणूनच त्याच आनंदाच्या पूर्णत्वाने जे त्याच्या सान्निध्यात मिळते त्याचे सहभागी होऊ शकतो.

मोहात पडलेल्या आणि परीक्षेत पडलेल्या लोकांनी हे लक्षात ठेवावे की जेव्हा शासन येते, प्रभूच आहे जो त्यांची मृत्युपासून सुटका करेल. ज्या जीवात्म्यांसाठी सुधारणा येते, ते लक्षात ठेवतात की, “जितक्यांवर माझे प्रेम आहे, त्यांना मी सुधारतो आणि त्यांचे शासन करतो ” (प्रगटी. ३:१९).

**(६) जेव्हा प्रभू आपल्याला सुधारतो आणि शासन करतो तेव्हा आपली भूमिका काय असते?**

***जितक्यांवर मी प्रेम करतो तितक्यांचा निषेध करून त्यांना शिक्षा करतो;' म्हणून आस्था बाळग आणि पश्चात्ताप कर. (प्रगटीकरण ३:१९)***

प्रभू म्हणतो, “जितक्यांवर माझे प्रेम आहे, त्यांना मी सुधारतो आणि त्यांचे शासन करतो: म्हणून आवेशी व्हा, आणि पश्चाताप करा.” ... ख्रिस्त अशा प्रकारे भग्न व अनुतप्त हृदयाला उंचावतो आणि आक्रोश करणाऱ्या जीवात्म्याला शुद्‌ध करतो जोपर्यंत ते त्याचे वस्तीस्थान बनत नाही.

पण जेव्हा आपल्यावर नाश आणि छळ येतो, आपल्यापैकी किती लोक याकोबाच्या प्रमाणे होता! आपण शत्रूच्या हातात असल्याचा विचार करतो; आणि त्या अंधकारात आपली शक्ती संपते तोपर्यंत अंधळ्या वृत्तीने आपण झोंबी देत राहतो, आणि त्यात आपल्याला काहीच सांत्वन किंवा सुटका मिळत नाही. याकोबासाठी दिवसाच्या सुरुवातीला त्या दैवी हाताचा स्पर्श ह्याने त्याला प्रगट केले ज्याच्यासोबत तो झगडत होता– कराराचा तो दूत; आणि रडत व असहाय्य वृत्तीने, तो त्या अमर्याद प्रेमाच्या उराशी झुकला, त्या आशिर्वादाला प्राप्त करून घेण्यास ज्यासाठी त्याच्या जीवाला उत्कंठा लागली होती. आपण हे देखील शिकले पाहिजे की ह्या संकटातून कधीतरी फायदा होऊ शकतो, आणि प्रभूच्या शासनाचा आपण द्वेष करू नये किंवा तो जेव्हा आपल्याला सुधारतो तेव्हा पण गळून पडू नये.

सर्व उपाय योजक शिस्तीचे ध्येय म्हणजे जो चूक करणारा जीवात्मा आहे त्याला त्याची जाणीव करून देऊन एक नवीन प्रवाह मार्ग तयार करावा. शाषण करणे म्हणजे पेईडेऊओ, “लेकरांना प्रशिक्षण देणे,” “त्यांना शिक्षा देण्यास,” विशेषकरून

एक पालक जसे आपल्या लेकरांना बदलण्यास आणि प्रशिक्षण देण्यास शिक्षा करतात. शासन करणे हे ख्रिस्ती व्यक्तीचे काम आहे जेव्हा ख्रिस्ताच्या त्या धिक्काराला अवमानिले जाते. त्याचा धिक्कार अथवा त्याचे शासन हे त्याच्या क्रोधाचे चिन्ह अथवा प्रदर्शन नाही- जेव्हा एखादी व्यक्ती खूप संतापते - पण त्याच जोमाच्या प्रेमाने ज्याचा हेतू म्हणजे पापी लोकांना पश्चाताप करण्यास भाग पाडणे असा असतो.

**(७) त्याचा धिक्कार आणि शासन ह्यासोबत, देव त्याच्या लोकांना त्याच्या प्रेमळ दयेबद्द्ल काय अभिवचन देतो?**

***तरी त्याच्यावरील माझी दया मी दूर करणार नाही, मी आपल्या सत्यवचनाचा भंग करणार नाही. (स्तोत्रसहिता ८९:३३)***

त्याचा शब्द हा वचन म्हणून देण्यात येतो. पर्वत ढळून जातील, टेकड्या काढून टाकण्यात येतील, पण त्याची दया त्याच्या लोकांपासून काढून टाकण्यात येणार नाही, आणि त्याच्या शांतीचा करार देखील काढून टाकण्यात येणार नाही. त्याची वाणी ऐकू येते, “मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम

करीत आलो” (यिर. ३१:३). “तुझ्यावर दया करीन, तुझ्यावर मी सर्वकाळ प्रसन्न राहीन” (यश. ५४:८).

हे प्रेम किती अद्‌भुत आहे, मानवी भय आणि दुर्बलता ह्यामधून देव सर्व प्रकारची शंका आणि प्रश्न हे काढून टाकतो आणि जो थरकाप करत असणारा हस्त जो त्याकडे विश्वासाने पोहोचला ;आणि अनेक अर्थाने आश्वासने देऊन व सुरक्षेची खात्री देऊन त्यावर भरवसा करण्यात सहाय्य करतात. आपल्या आज्ञापालनाच्या अटीवर त्याने तो जबरदस्तीचा करार केला आहे, आणि जसे आपण गोष्टी स्वतःहून समजून घेतो त्याच वेळी तो आपली भेट घेतो.

आपल्याला वाटते की एखादे वचन किंवा शपथ जी आपले सहकारी घेतात, जर त्याची नोंद ठेवली, तरीही त्याला खात्री किंवा आश्वासन मिळण्याचे आवश्यक असते. येशूने हे सर्व विशिष्ट भय दूर केले, आणि त्याने त्याचे अभिवचन एक शपथ देऊन व्यक्त केली: “जिकडे देव, त्याच्या अभिवचनाच्या वतनदारांना त्याच्या मसलतीचा न बदलणारा स्वभाव हा स्वेच्छेने दाकःवतो, आणि तशी त्याने शपथ वाहून दुजोरा दिला आहे” प्रभू

त्याच्या अभिवचनावर आपण विश्वास ठेवावा ह्यासाठी अधिक काय करू शकतो?

तुमचे मन देवाच्या चांगुलपणावर केंद्रित करा, ज्या महान प्रेमाने त्याने आपल्यावर प्रेम केले, आणि त्याचा पुरावा म्हणून आपल्याला ते उद्धार कार्यात दिसते. जर त्याने आपल्यावर प्रेम नसते केले आणि आपल्याला ते मोल दिले नसते, मग हे महान अर्पण केले गेले नसते. तो दया आणि कृपा ह्यात संपन्न आहे. तुमचे मन आणि हृदय एका थकलेल्या बालकासारखे व्हावे जे आपल्या आईच्या मिठीत विसावते. त्याचे सनातन बाहू तुमच्याभोवती सदैव आहेत.

**(८) देव काही वेळा कोणत्या यातना आपल्यावर येऊ देण्याची परवानगी देतो, जे आपल्या हितासाठी कार्यरत असतात?**

*कारण आमच्यावर येणारे तात्कालिक व हलके संकट हे आमच्यासाठी अत्यंत मोठ्या प्रमाणात सार्वकालिक गौरवाचा भार उत्पन्न करते; आम्ही दृश्य गोष्टींकडे नाही तर अदृश्य गोष्टींकडे लक्ष लावतो; कारण दृश्य गोष्टी क्षणिक आहेत, पण अदृश्य गोष्टी सार्वकालिक आहेत. (२ करिंथकरास पत्र ४:१७-१८)*

पौल, जर प्रत्येक बाजूला त्रस्त, छळ शान केलेला, त्याच्या यातनांना सहज किंवा हलके जर म्हणू शकला, मग आज ख्रिस्ती व्यक्तीने कशाची तक्रार करावी? पौलाच्या ज्या घोर यातना होत्या त्याच्या तुलनेत मानवी यातना ह्या किती क्षुल्लक आहेत! जो ह्यातून विजयी होऊन बाहेर पडतो त्यासाठी जे गौरव देवाने ठेवलेले आहे त्याच्या सनातन वजनाशी त्याची तुलना होण्याची पात्रता नाही. ते तर देवाचे लोक आहेत, चारित्र्याच्या परिपूर्णतेसाठी त्यांची रचना आणि मांडणी झालेली आहे. ख्रिस्ती व्यक्ती किती काल देखील ह्यापासून वंचित राहिली आणि त्याने ते दुख सहन केले, तरतुदीचा मार्ग कितीही अंधकारमय आणि न तपासता येणारा असा दिला, त्याने प्रभूमध्ये आनंद करणे योग्य आहे, हे सर्वकाही त्याच्या भल्यासाठी होत आहे हे त्याने जाणून घेणे गरजेचे आहे. {एलएचयु २४८}

**(९) चारित्र्य उभारणीसाठी अत्यंत महत्वाचे, असे कोणते वरदान, प्रभू जे सर्व त्याचा स्वीकार करतात त्यांना देतो?**

***त्याने इस्राएलाला पश्चात्ताप व पापांची क्षमा ही देणगी द्यावी म्हणून देवाने***

***त्याला आपल्या उजव्या हाताशी अधिपती व तारणारा असे उच्चपद दिले. (प्रेषित ५:३१)***

पापी व्यक्तीला एक हरवलेले मेंढरू म्हणून व्यक्त केले जाते, आणि असे हरवलेले मेंढरू कधीही त्या मेंढवाड्यात स्वतःहून येत नाही जोपर्यंत मेंढपाळत्याला शोधायला जात नाही. कोणताही मनुष्य स्वतःहून पश्चाताप करू शकत नाही, आणि स्वतःला समर्थन करण्याच्या आशीर्वादाच्या योगे परिपूर्ण करू शकत नाही. प्रभू येशू पापी व्यक्तीच्या मनावर प्रभाव टाकण्याच्या सतत प्रयत्नात आहे आणि त्याने स्वतःकडे पाहावे ह्यासाठी त्याला आकर्षित करावे, तसेच देवाचा कोकरा ह्याकडे लक्ष द्यावे, जो जगाचे पापहरण करतो.  आपण अध्यात्मिक जीवनाकडे पाऊल उचलू शकत नाही जसे येशू समीप येऊन जीवात्म्याला बळकट करतो, आणि आपल्याला तो पश्चाताप अनुभवण्यास प्रेरित करतो ज्यामुळे पश्चाताप करणे आवश्यक नसते.

महायाजक आणि सदुकी लोकांच्या समोर असताना, पेत्राने स्पष्टपणे हे वास्तव व्यक्त केले की पश्चाताप हे देवाचे

वरदान आहे. ख्रिस्ताच्या बद्दल बोलत असताना तो म्हणाला, “त्याने इस्राएलाला पश्चात्ताप व पापांची क्षमा ही देणगी द्यावी म्हणून देवाने त्याला आपल्या उजव्या हाताशी अधिपती व तारणारा असे उच्चपद दिले.” (प्रेषित ५:३१). पश्चाताप हे देवाच्या वर्दानापेक्षा कमी नाही जितके क्षमा आणि न्यायी ठरणे हे आहेत, आणि आहे तसे जीवात्मा ख्रिस्ताच्या अधीन होतो त्याशिवाय ते देण्यात येत नाही. आपण जर ख्रिस्ताकडे गेलो तर, ते त्याचे सामर्थ्य आणि स्वभाव ह्याद्वारे जाऊ शकतो. पश्चाताप करण्याची कृपा ही त्याच्याकडून येते, आणि त्याच्या कडून आपण न्यायी ठरतो.

तुमच्यासमोर पवित्र शास्त्राचे भरपूर अभिवचने आहेत, तरीही तुम्ही मनात शंकेला थारा देऊ शकता का? तुम्ही ह्यावर विश्वास ठेऊ शकता का, की जेव्हा त्या दीन अशा पापी व्यक्तीला पुन्हा परतण्याची इच्छा असते, प्रभू त्याच्या चरणांशी त्याने पश्चाताप करून येण्यापासून कडक रीतीने थांबवण्याचा प्रयत्न करतो? असे विचार घालवून टाका! या कल्पनांच्या व्यतरिक्त दुसरे काहीही देवाचा अवमान करू शकत नाही.

तुमच्या जीवात्म्याला अजून काहीही अजून जखम पोहचवू शकत नाही जसे आपल्या स्वर्गीय पित्याच्या बद्दलचे हे विचार करतात. देवाच्या बद्दल असे विचार जर आपण करत राहिलो तर आपले आयुष्य हे आशाहीन होऊन बसेल. असे विचार देवाचा शोध घेणे किंवा त्याची सेवा करणे हे आपल्याद्वारे होऊ देत नाही. देव म्हणजे केवळ एक न्यायाधीश जो आपल्याविरुद्ध तो न्याय फर्मावण्यास तयार असतो असा केवळ त्याविषयी आपण विचार करत राहू नये. पापाचा तो द्वेष करतो; पण पापी लोकांच्या प्रती त्याने स्वतःला देऊन जे प्रेम व्यक्त केले, ख्रिस्ताच्या स्वरुपात, जेणेकरून ज्या सर्वांचे तारण होऊन गौरवाच्या राज्यात त्याला तो सनातन आशीर्वाद प्राप्त व्हावा.

**(१०) देव हा दयाळू, प्रेमळ, आणि दयाघन आहे म्हणून, त्याने प्रत्येक पश्चाताप करणाऱ्या विश्वासनार्यासाठी काय केले आहे?**

***परंतु जेव्हा आपला तारणारा देव ह्याची दया व मनुष्यांवरील प्रेम प्रकट झाले, तेव्हा आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र***

***आत्म्याने केलेले नवीकरण ह्यांच्या द्वारे त्याने आपल्या दयेनुसार आपल्याला तारले, (तीत ३:४-५)***

त्याच पद्धतीने प्रत्येक मनुष्य ख्रिस्ताकडे येऊ शकतो. “तेव्हा आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आत्म्याने केलेले नवीकरण ह्यांच्या द्वारे त्याने आपल्या दयेनुसार आपल्याला तारले.” तीताला पत्र ३:५. तुम्ही पापी आहात म्हणून देवाचे आशीर्वाद तुम्हाला मिळू शकत नाहीत असे तुम्हाला वाटते का? लक्षात ठेवा की ख्रिस्त जगात पापी लोकांचे तारण करावयास आला आहे. देवाच्या समोर आपली शिफारस व्हावी असे आपल्याठायी काहीच नाही; तीच विनवणी की आपण आता आणि सर्वकाळ विनंती करावी ती म्हणजे आपली सदैव असहाय्य अशा परिस्थिती, जे त्याच्या उद्धार देणाऱ्या सामर्थ्याला एक आवश्यकता बनवतात. सर्व प्रकारचे आत्म- निर्भरपण ह्याचा त्याग करून, आपण काल्वरीच्या क्रूसाकडे पाहत राहावे आणि म्हणावे: “माझ्या हातात कोणतीच किमत किंवा मोल मी आणत नाही; केवळ तुझ्या वधस्तंभाला मी चिकटून देतो.’’

मी आभारी आहे, की देव माझ्यावर इतके प्रेम करतो एक चांगला पिता म्हणून, माझ्या हितासाठी तो मला शासन करून तशी शिस्त लावू शकतो.

गोल करा : होय अनिश्चित

देवाची दया, मंद्क्रोध स्वभाव, आणि विपुल चांगुलपण ह्यासाठी मी त्याचे आभार मानतो आणि माझ्या चारित्र्यात हे जीवनदायी गुण तो देऊ करतो ही त्याची इच्छा आहे.

गोल करा : होय अनिश्चित

मला समजते की तो वाईट होऊ देत नाही पण मला आनंद आहे की हे सर्वकाही माझ्या भल्यासाठी तो होऊ देतो आणि पर्यायाने माझे चारित्र्य त्याद्वारे तो परिपूर्ण करतो.

गोल करा : होय अनिश्चित

मी पाहतो की जेव्हा देव मला शासन करतो मी त्याच्या पश्चातापाचे वरदान

स्वीकारून घ्यावे जे त्यासोबत येते जेणेकरून त्याने त्यात वस्ती करावी आणि मी त्याचे चारित्र्य इतरांना व्यक्त करत राहावे.

गोल करा : होय अनिश्चित

मी आभारी आहे की देवाची प्रेमळ दया कधीच कमी पडत नाही आणि त्याचे माझ्यावर इतके प्रेम आहे म्हणून तो अगदी सहज मुक्तपणे मला सर्व गोष्टी देईल ज्याद्वारे त्याच्या नावाला पूर्ण गौरव प्राप्त होईल.

गोल करा : होय अनिश्चित

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________



# धडा ५
# देवाची कृपा जी प्रेमाने प्रगट होते

**(१) देव जे महान प्रेम आपल्या दोषी आणि नष्ट झालेल्या जातीसाठी तारावयास जे दाखवत आहे ह्या अद्‌भुत सेवाकार्यासाठी प्रेषित काय नाव देतो त्याला कसे संबोधतो?**

***ही सगळी देवाची करणी आहे; त्याने स्वत:बरोबर आपला समेट येशू ख्रिस्ताच्या द्‌वारे केला आणि समेटाची सेवा आम्हांला दिली, (२ करिंथकरास पत्र ५:१८)***

प्रेषित म्हणतो: “देव ख्रिस्तात होता, आणि संपूर्ण जगाला त्याच्यामध्ये समेट

घडवून आणत होता.” उद्‌धाराच्या महान योजनेला जसे आपण समजून घेतो केवळ त्याच वेळी आपल्याला देवाच्या चारित्र्याचे न्यायीपणे कौतुक करता येते. निर्मितीचे कार्य हे तर केवळ त्याच्या प्र्‌माचे प्रदर्शन होते; पण देवाचे वरदान म्हणजे दोषी आणि नष्ट झालेल्या जातीचे तारण करणे हेच केवळ त्याच कोमलतेचे आणि कनवाळूपणाचे अमर्यादित खोली ह्या प्रगट करतात. “देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.” देवाचे नियमशास्त्र हे जसे राखले जाते, आणि त्याचा न्याय हा सत्य रूपाने व्यक्त होतो, पापी व्यक्तीला सोडून देता येऊ शकते. सर्वात मोठे वरदान जे स्वर्गाला देऊ करायचे होते ते म्हणजे “देव हा न्यायी आहे आणि जोकोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचे समर्थन करून त्याला न्यायी ठरवण्यास पात्र आहे.” त्याच वरदानाने लोक त्या नाशातून वर येतात आणि पापाच्या ढलतीतून वर उठून देवाची लेकरे बनू शकतात. पौल म्हणतो: “आपणास दत्तकपणाचा आत्मा मिळाला आहे,

जेणेकरून आपण अब्बा, पिता अशी हाक मारू शकतो.”

**(२) समजून न घेता येणाऱ्या प्रेमाच्या कृतीने, प्रत्येक विश्वासणार्याचे तारण व्हावे म्हणून कोणते महान वरदान देण्यात आले?**

***देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. (योहान ३:१६)***

हा संदेश जगासाठी आहे, कारण “जोकोणी” म्हणजे जे कोणी आणि सर्व जे ह्या परिस्थितीशी अनुरूप आहेत ते तो आशीर्वाद वाटून घेऊ शकतात. जे सर्व येशुकडे पाहतात, त्यांचा वयक्तिक तारणारा म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवतात, त्यांचा “नाश होणार नाही, तर त्यानं सार्वकालिक जीवन मिळेल.” प्रत्येक तरतूद करून ठेवण्यात आली आहे जेणेकरून आपल्याला ते सनातन प्रतिफळ मिळू शकते.

देवाच्या मनुष्यांसाठी प्रेमाचे प्रगटीकरण हे त्या क्रुसाच्या भोवती केंद्रित आहे.

त्याचे संपूर्ण महत्व ह्या जिभेने होऊ शकत नाही; कोणत्याही शाईने ते लिहता येऊ शकत नाही; मनुष्याचे मन ते समजू शकत नाही. काल्वरीच्या क्रूसाकडे पाहून पान केवळ इतकेच बोलू शकतो: “देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.” योहान ३:१६.

ख्रिस्त जो आपल्या पापांसाठी वधस्तंभी गेला, मेलेल्यातून उठवण्यात आलेला ख्रिस्त, जो वर स्वर्गात उंचावण्यात आला, हेच ते तारणाचे विज्ञान आहे जे आपण शिकून इतरांना शिकवायचे आहे.

**(३) त्याचे आपल्यावरील असलेल्या महान प्रेमामुळे, देवाने त्याच्या पुत्राला कोणत्या त्या विशिष्ट कारणासाठी त्याला पाठवले नाही?**

***देवाने आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे, तर त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले. (योहान ३:१७)***

देवाने त्याच्या पुत्राला ह्या जगात जगाला दोष लावण्यासाठी कदाचित पाठवले असेल. पण अद्भुत अशी ही कृपा! ख्रिस्त तारावयास आला, नाश करण्यासाठी नाही. तारणार्याच्या अतुलनीय प्रेमाच्या प्रेरणेला त्यांच्या हृदयात चमकण्याशिवाय प्रेषितांनी हे गमक कधीच हाताळले नाही.

देवाची इच्छा हे की सर्वांचे तारण व्हावे, आणि त्याच्या महान पुत्राच्या वरदानाने त्यांच्या तारणाची तरतूद झाली. पण देवाच्या इछेची खात्री हि प्रत्येक व्यक्तीच्या इच्छेने आश्वासित होणे गरजेचे आहे जेणेकरून त्याच्यासाठी ते अधिक परिणामकारक बनू शकते. तारण हे केवळ त्याच अलोकांसाठी असते जे ख्रिस्तावर विश्वास ठेवतात आणि त्याला ग्रहण करतात (योहान १:१२; ३:१६).

**(४) ज्या लोकांचे पतन झाले अथवा हरवले त्यांच्या दोष लावण्याचे कारण काय आहे?**

***निवाडा हाच आहे की, जगात प्रकाश आला आहे आणि मनुष्यांनी प्रकाशापेक्षा अंधाराची आवड धरली; कारण त्यांची कृत्ये दुष्ट होती. (योहान ३:१९)***

योहान घाईने हे स्पष्ट करतो की जे कोणी त्याच्या पुत्रावर विश्वास ठेवत नाही त्यांच्यावर “आधीच दोष लावण्यात आला आहे,” कारण विश्वास ठेवण्यास ते नकार देतात. देवाचा त्याच्या पुत्राला जगात पाठवण्याचा हेतू हा जगाचे तारण करणे असा आहे. जर, तारणार्याकडे येण्याने, काही लोकांवर हा दोष ओढ्वण्यात येतो, देवावर दोष लावता येत नाही. दोषारोप हे होतातच, खऱ्या प्रकाशाच्या येण्याने नाही, पण लोकांना अंधकार पसंत आहे म्हणून ते जाणूनबुजून ह्या प्रकाशापासून दूर पळतात.

**(५) देवाने त्याचे महान प्रेम आपल्याप्रती कसे व्यक्त केले आणि आपला पात्र असा नाश टाळला?**

***देवाने आपल्या एकुलत्या एक जन्मलेल्या पुत्राला जगात पाठवले आहे, ह्यासाठी की, त्याच्या द्वारे आपल्याला जीवन प्राप्त व्हावे; ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीती प्रकट झाली. (१ योहान ४:९)***

जेव्हा आदामाच्या पापाने जमातीला त्या आशाहीन दैन्यावस्थेत ओढले, देवाने

पतन पावलेल्या लोकांपासून स्वतःला वेगळे केले असेल. त्याने जशी त्यांची लायकी होती पापी म्हणून वागण्याची तसे त्यांना वागवले असते.त्याने देवदूतांना आपल्यावर क्रोधाचा आगार ओतण्याची देखील आज्ञा दिली असती.ह्या अंधाऱ्या बट्ट्याला त्याने जगातून काढून टाकले असते. पण त्याने तसे केले नाही.त्याच्या सान्निध्यातून दूर लोटण्याच्या ऐवजी, पतन पावलेल्या जमातीच्या तर तो अधिकच समीप आला. त्याने आपला पुत्र आपल्या हाडातील हाड आणि शरीरातील मांस बनण्यासाठी दिले.

देवाचे मनुष्यासाठी देण्यात आलेले वरदान हे सर्व ग्रहण शक्तीच्या पलीकडे आहे. काहीही मागे ठेवण्यात आले नाही. देवाने हे बोलण्याची परवानगी देखील दिली नाही की तो अधिक करू शकला असता किंवा मानवजातीसाठी त्याने अधिक प्रेमाचे प्रतिरूप म्हणून प्रगट केले असते. ख्रिस्ताच्या ह्या वरदानात त्याने सर्व स्वर्ग देऊन टाकला.

**(६) देवाची आपल्यावरील अधिक प्रिती आहे म्हणून, त्याने कोणत्या हेतुनिशी त्याच्या पुत्राला पृथ्वीवर पाठवले?**

***प्रीती म्हणावी तर हीच; आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुमच्याआमच्यावर प्रीती केली आणि तुमच्याआमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठवले. (१ योहान ४:१०)***

जेव्हा, अधर्माचा परिणाम म्हणून, आदाम आणि हवा ह्यांची सर्व आशा खुंटली, जेव्हा न्याय म्हणजे पापी व्यक्तीचा मृत्यू अशी मागणी करण्यात येई, तेव्हा ख्रिस्ताने स्वतःला एक अर्पण म्हणून वाहिले. “प्रीती म्हणावी तर हीच; आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुमच्याआमच्यावर प्रीती केली आणि तुमच्याआमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठवले.” “आम्ही सर्व मेंढरांप्रमाणे बहकून गेलो होतो; आम्ही प्रत्येकाने आपापला मार्ग धरला होता; अशा आम्हा सर्वांचे पाप परमेश्वराने त्याच्यावर लादले.” १ योहान ४:१०; यशया ५३:६.

लोकांचा एकाच वकील असतो, एकच मध्यस्थ, जो ह्या अधर्माची क्षमा करू शकतो. आपली हृदये त्याच्याप्रती कृतज्ञतेत फुगून येणार नाही का ज्याने येशूला आपल्या पापांसाठी प्रायश्चित

म्हणून दिले? पित्याने आपल्या वतीने जे प्रेम व्यक्त केले त्याविषयी अधिक खोलवर विचार करा, जे प्रेम ज्याने प्रदर्शित केले. त्याची काहीच मोजमापणी नाही. आपण तर केवळ काल्वरीकडे बोट दाखवू शकतो, जगाच्या स्थापनेपासून जो वधलेला कोकरा होता त्याकडे बघू शकतो. हे तर एक अमर्याद अर्पण आणि बलिदान आहे. अथांगपणा अथवा अमर्यादितपण आपण समजून मोजू शकतो का?

**(७) देवाने ख्रिस्ताला काय करण्यास पाठवले ज्याने त्यांच्या आपल्यावरील अतुलनीय प्रेमाचा अचूक असा पुरावा आपल्यासमोर प्रदर्शित झाला?**

***परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला. (रोमकरास पत्र ५:८)***

सुवार्तेचे हे गौरव आहे की ह्याची स्थापना पतन पावलेल्या जमातीला पुन्हा पुनर्स्थापित करण्याच्या तत्वावर आधारित आहे आणि हे अत्यंत उदार कार्याच्या प्रदर्शनाने होते. ह्या कामाची सुरुवात स्वर्गीय दरबारात झाली. तिकडे

देवाने मनुष्यांना न चुकता त्या प्रेमाचा पुरावा देण्यास सांगितला ज्यामुळे त्याने सर्वांना राखले. “देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.” योहान ३:१६.

त्रेक्य देवाला ह्या मानवजातीसाठी दया उत्पन्न झाली, आणि त्यांनी ह्या उद्धाराच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. ही योजना पूर्णतः अमलात आणण्यासाठी, असे निश्चित झाले की, ख्रिस्त देवाचा एकुलता एक पुत्र, ह्याने स्वतःला पापासाठी एक अर्पण म्हणून वाहून द्यायचे. कोणती ओळ ह्या प्रेमाच्या खोलीला मोजू शकते? देवाने मनुष्याने म्हणावे की त्याला अजून करता आले असते हे अशक्य बनवले असते. ख्रिस्ताच्या सोबत त्याने स्वगाचे सर्व स्रोत आणि साधने दिली, की मनुष्याला उंचावण्याच्या योजनेत इतर कशाची कमतरता भासू नये. ह्या ठिकाणी ते प्रेम आहे—ज्याच्या जाणीवेने आत्मा व्यापून गेला पाहिजे आणि त्याबरोबर तसे व्यक्त न करता येणारी कृतज्ञता देखील दिसली पाहिजे! ओह,

काय हे प्रेम, काय हे अतुलनीय प्रेम! ह्या प्रेमाची जाणीव जीवात्म्याला सर्व स्वार्थीपणापासून शुद्ध करेल. शिष्याला स्वतःचा त्याग करण्यास, वधस्तंभ उचलून, आपल्या उद्धारकर्त्याचे अनुसरण करण्यास ते लावेल. {सीएच २२२}

**(८) जरी, स्वेगात गेल्याशिवाय, आपल्याला ते पूर्णतः समजणार नाही, प्रभूचे आपल्याप्रती जे प्रेम आहे त्यासाठी आपली प्रार्थना काय असली पाहिजे?**

***तिची रुंदी, लांबी, उंची व खोली किती, हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घेण्यास व बुद्धीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती ओळखून घेण्यास शक्तिमान व्हावे; असे की तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे. (इफिसकरास पत्र ३:१८-१९)***

देवाच्या प्रेमाचे हे खोल चिंतन जे त्याच्या पुत्राच्या वरदानाने व्यक्त होते व पतन पावलेल्या लोकांच्या तारणासाठी देण्यात आले ते हृदय प्रज्वलित करून जीवात्म्याच्या आधाराला देखील जागृत करेल. उद्धाराचे कार्य हे अत्यंत अद्भुत आणि चांगले आहे;देवाच्या ह्या विश्वात

हे एक रहस्य आहे. पण अशा अतुलनीय कृपेची साधने ही किती वेगळे आहेत!

आपल्या संवेदना ह्या जर पापाने भ्रष्ट नसत्या आणि सैतान जो सातत्याने आपल्यापुढे अंधकारमय चित्रे प्रस्तुत करतो त्यावर खोल मंथन न करता, एक सातत्यपूर्ण आणि चिकाटीपूर्ण कृतज्ञतेची भावना ही आपल्या हृदयातून त्याच्याकडे जाईल जो आपल्याला रोज आणि रोज त्या आशीर्वादांनी भरतो ज्यासाठी आपण पात्र नाही. उद्धार पावलेल्या लोकांचे सनातन गीत हे त्याच्या प्रती असणाऱ्या स्तुतीसाठी असेल ज्याने आपल्यावर प्रेम केले आणि त्याच्या रक्ताने स्वतः धुवून काढले; आणि जर स्वर्गःच्या सिंहासनापुढे जर आपल्याला ते गायचे असेल तर ते आपण इकडे ते शिकले पाहिजे."

**(९) आपण जरी अधर्म आणि निराशा ह्यात खोलवर पडलो आणि जरी आपली अजिबात लायकी अथवा पात्रता नाही, आपला प्रेमाचा देव कोणती तीन अभिवचने आपणास देतो?**

***"मी त्यांना वाटेवर आणीन, त्यांच्यावर मोकळ्या मनाने प्रीती करीन, कारण***

*त्यांच्यावरचा माझा राग गेला आहे. (होशेय १४:४)*

जे सर्व देवाच्या नगरात प्रवेश करतात ते त्या सरळ मार्गातून येतील—आणि अत्यंत क्लेशदायक प्रयत्नांनी; “तिच्यात कोणत्याही निषिद्‌ध गोष्टी आणि अमंगळपणा व असत्य आचरणारा इसम ह्यांचा प्रवेश होणारच नाही.” प्रगटीकरण २१:२७. पण ज्यांचे पतन झाले आहे त्यांना आशा सोडून देण्याची गरज नाही. वृद्‌ध लोक, देवाने एकदा त्यांचा सन्मान केल्यावर, त्यांचे जीवात्मे अशुद्‌ध करतील, वासनेच्या वेदीवर स्वतःचे मूल्य कुर्बान करतील; पण जर त्यांनी पश्चाताप केला, पापाला सोडून दिले, आणि देवाकडे वळले, अजूनही त्यांच्यासाठी आशा असते.

जो घोषणा देतो, “मरेपर्यंत तू विश्वासू राहा, म्हणजे मी तुला जीवनाचा मुकुट देईन,” तो ही देखील घोषणा देतो, “दुर्जन आपला मार्ग सोडो, अधर्मी आपल्या कल्पनांचा त्याग करो आणि परमेश्वराकडे वळो म्हणजे तो त्याच्यावर दया करील; तो आमच्या देवाकडे वळो, कारण तो त्याला भरपूर क्षमा करील.” प्रगटीकरण २:१०; यशया ५५:७. देवाला

पापाचा तिटकारा आहे, पण पापी व्यक्तीवर त्याचे प्रेम आहे. "मी त्यांचे सर्व पतन झालेले मार्ग बरे करीन," तो घोषणा देतो; "मी मुक्तपणे त्यांच्यावर प्रेम करतो." होशेय १४:४.

**(१०) देवाने कोणत्या कारणासाठी त्याची मुबलक अशी दया आपल्यावर आच्छादित केली आणि ख्रिस्ताच्या सोबत आपणास जिवंत केले?**

***तरी देव दयासंपन्न आहे म्हणून आपण आपल्या अपराधांमुळे मृत झालेले असताही त्याने आपल्यावरील स्वतःच्या अपरंपार प्रेमामुळे, ख्रिस्ताबरोबर आपल्याला जिवंत केले, (कृपेने तुमचे तारण झालेले आहे); (इफिसकरास पत्र २:४-५)***

देव हा केवळ दयाळू आहे इतकेच नाही; जे कोणी त्याचा धावा करतात त्यांच्यावर दया करण्यास तो तयार आहे, ते त्यास योग्य आहेत म्हणून नाही, पण ही देवाची चांगली इच्छा आहे की त्याने दया दाखवावी (तीताला पत्र ३:५; १ पेत्र १:३).

देवाचे प्रेम हे कळवळा ह्यापेक्षा अधिक जास्त आहे; ते फायदेशीर कृतीकडे वळते

आणि न बदलणारे आहे. देवाने “आपण पापी असतानाच आपल्यावर प्रेम केले”, आणि आपल्यावर प्रेम करण्याचे तो कदापि थांबवणार नाही. हेच ते प्रेम होते ज्यामुळे त्याच्या तारणाच्या कार्याला प्रेरणा मिळाली (योहान ३:१६). प्रेम हा त्याच्या चारित्र्याचा एक मुख्य गुणविशेष आहे (१ योहान ४:८), त्याच्या प्रदर्शनाचे सर्वात उच्च स्वरूप हे ख्रिस्ताच्या व्यक्तीमत्वात दिसते. आपण पापी आहोत म्हणून देवाची आपल्यावर दया आहे, आणि आपण त्याची निर्मिती आहोत म्हणून त्याचे आपल्यावर प्रेम आहे. मनुष्यासाठी त्याचे महान कार्य म्हणजे केवळ हितकर्ता म्हणून अथवा दानधर्माची एक कृती नसून; ती एक प्रेमळ, जिव्हाळ्याची कृती होती.

अशी तर देवाची कृपा आहे, अशाच प्रेमाने त्याने आपल्यावर प्रेम केले, अधर्म आणि पाप ह्यात आपण मरणप्राय अवस्थेत असताना देखील, दुष्ट कार्याचे शत्रू आपल्या मनात होते, विभिन्न प्रकारचे मोह आणि लुभावणार्या गोष्टी ह्यांची सेवा करत, हुक शमलेल्या आणि वेगळ्या आवेशाच्या लोकांसाठी, जे पाप आणि सैतानाचे सेवक होते. ख्रिस्तामध्ये कोणत्या प्रेमाची खोली व्यक्त होते, जेव्हा तो आपल्या पापांसाठी एक प्रायश्चित

बनतो. पवित्र आत्म्याच्या सेवाकार्याने, आत्म्यांनी त्यांची पापक्षमा ही शोधली पाहिजे.

**(११) जगासाठी देवाने त्याच्या प्रेमाचे चारित्र्य कोणाच्या द्वारे प्रगट केले?**

***येशूने त्याला म्हटले : “फिलिप्पा, मी इतका काळ तुमच्याजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर ‘आम्हांला पिता दाखवा’ असे तू कसे म्हणतोस? (योहान १४:९)***

पृथ्वी ही अंधारात होती कारण ती देवाच्या कैदेत नव्हती. अंधकारमय छाया ह्यांना जास्त प्रकाश मिळावा म्हणून, जेणेकरून विश्व पुन्हा देवाकडे येऊ सकेल, सैतानाचे हे फसवणारे सामर्थ्य तोडायची गरज होती. हे काही जबरदस्तीने करता येण्यासारखे नव्हते. जबरदस्ती करणे हे देवाच्या शासनाच्या तत्वांच्या विरुद्ध आहे; त्याला केवळ प्रेमाची सेवा पाहिजे असते; ते जोरजबरदस्ती अथवा अधिकाराने मिळवता येत नाही.  प्रेमाने केवळ हे प्रेम जागृत होते.

देवाला ओळखणे म्हणजे त्याच्यावर प्रेम करणे; सैतानाच्या चारित्र्याच्या विरुद्ध त्याचे चारित्र्य हे प्रदर्शित होणे आवश्यक असते. विश्वभरात केवळ एकच व्यक्ती हे करू शकतो. केवळ ज्या व्यक्तीला देवाच्या प्रेमाची उंची व खोली ठाऊक आहेत तोच हे सांगू शकतो. जगाच्या अंधकारमय रात्रीत नितीमत्वाच्या सूर्याचा सूर्योदय हा झाला पाहिजे, “त्याच्या पंखांच्या ठायी आरोग्य असेल.” मल. ४:२.

**(१२) देवाचे आपल्यावरील प्रेम अथवा देवाचे आपले तारण करणारे त्याचे प्रेम, कोणते पहिले आहे?**

***देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. (योहान ३:१६)***

पण हे महान अर्पण पित्याच्या हृदयात मनुष्यासाठी प्रेम उत्पन्न करण्यासाठी नव्हते, त्याला तारण करण्यासाठी कार्यक्षम बनण्यासाठी नव्हते. नाही, नाही! “देवाने जगावर एवढे प्रेम केले, की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला.”

योहान ३:१६. पित्याचे आपल्यावर प्रेम आहे, त्याच महान अशा प्रायश्चित्तामुळे नाही, पण त्याचे आपल्यावर प्रेम आहे म्हणून त्याने ते केले. ख्रिस्त ते माध्यम होता ज्याच्याद्वारे तो त्याचे अमर्याद प्रेम एका पतन पावलेल्या जगासाठी देऊ करू शकत होता. “देव ख्रिस्तामध्ये स्वत: बरोबर जगाचा समेट करत होता.” २ करिंथकरास पत्र ५:१९. देवाने त्याच्या पुत्राबरोबर दुखसहन केले. गेथसेमनी बागेच्या वेदनेत, काल्वरीच्या त्याच्या मृत्युनंतर, अमर्याद प्रेमाच्या हृदयाने आपल्या उद्धाराची ती किमत मोजली.

येशूने म्हंटले, “मी आपला प्राण परत घेण्याकरता देतो म्हणून पिता माझ्यावर प्रीती करतो.” योहान १०:१७. ते म्हणजे, “माझ्या पित्याने तुझ्यावर इतके प्रेम केले आणि तो माझ्यावर अधिक जास्त प्रेम करतो कारण तुमचा उद्धार करण्यासाठी त्याने माझा जीव निवडला. तुमची जागा घेण्यास व एक जामीन म्हणून बनण्यास, तुमचे सर्व अधर्म, जवाबदार्या ह्यांचा स्वीकार करून, मी माझ्या पित्याच्या अधिक जवळचा आणि लाडका असा झालो; कारण माझ्याच अर्पणाने, देव हा

न्यायी होऊ शकतो, आणि तरीही जोकोणी येशूवर विश्वास ठेवतो त्यांना देखील न्यायी ठरवू शकतो.”

**(१३) आपण जरी पापात मेलो होतो, देवाने त्याच्या महान डाय आणि प्रेमात कोणत्या दोन गोष्टी, ख्रिस्ताच्या द्वारे आपल्यासाठी केल्या?**

***ख्रिस्ताबरोबर आपल्याला जिवंत केले, (कृपेने तुमचे तारण झालेले आहे); आणि ख्रिस्त येशूच्या ठायी त्याच्याचबरोबर उठवले व त्याच्याचबरोबर स्वर्गात बसवले, (इफिसकरास पत्र २:५-६)***

जीवन आणि गौरवाचा प्रभू ह्याने त्याचे दैवत्व मानवतेच्या बरोबर परिधान केले मनुष्याला दाखवून देण्यासाठी की देव ख्रिस्ताच्या त्या वर्दानाच्या द्वारे आपल्याला त्याच्यासोबत जोडू शकतो. देवाशी संबंध असल्याशिवाय कोणीही आनंदी होऊ शकत नाही. पतन पावलेल्या मनुष्याने हे शिकावे की आपल्या स्वर्गीय पित्याला तृप्त करता येत नाही जोपर्यंत त्याचे प्रेम हे पश्चाताप

करणाऱ्या पापी व्यक्तीला आलिंगन देते, देवाच्या दोषविरहित कोकरयाच्या फायदद्यानी ह्याचे रुपांतर होते. स्वर्गीय सर्व बुद्धिमत्ता ह्याच दिशेप्रत आहेत. त्यांच्या सेनापतीच्या आज्ञेच्या अंतर्गत त्यांनी काम करावे जेणेकरून ज्यांच्या अधर्मांच्या मुळे स्वर्गीय पित्यापासून ते विभिक्त झाले आहेत. एक योजना आखण्यात आली आहे जेणेकरून ख्रिस्ताची ती अद्भुत कृपा आणि प्रेम हे संपूर्ण जगाच्या समोर प्रगट होईल. देवाच्या पुत्राने मनुष्याच्या उद्धारासाठी मोजलेल्या ह्या अमर्याद किमतीत, देवाचे प्रेम हे प्रगट होते. उद्धाराची ही गौरवी योजना व त्यातील तरतुदी ह्या संपूर्ण जगाच्या तारणासाठी पुष्कळ आहे. पापी आणि पतन पावलेला मनुष्य येशुमध्ये पापाची क्षमा होऊन आणि ख्रिस्ताच्या देऊ केलेल्या नितीम्त्वाच्यामुळे परिपूर्ण होऊ शकतो.

***ख्रिस्तामधील दैवत्वाच्या रहस्यामुळे मी आश्चर्यचकित होतो जे पृथ्वीवर मानवी देहस्वरूपाने पित्याचे प्रेम प्रगट करण्यास आणि आपला नाशापासून बचाव करण्यास आले आहे!***

गोल करा : होय अनिश्चित

देवाने इतक्या उदारहस्ते त्याच्या पुत्राचे जे वरदान दिले त्यासाठी सार्वकालिक अर्थाने मी त्याचे आभार मानतो की आता मला एक भविष्य आहे आणि त्याच्या सान्निध्यात एक आशा आहे जी वेदना, दुखसहन आणि मृत्यू ह्यांच्यापासून दूर आहे.

गोल करा : होय अनिश्चित

देव मला त्याच्या आत्म्याने भरून टाकेल ही माझी प्रार्थना आहे ज्यामुळे ह्या जगातील पापाचा अंधकार मला आवडत नाही आणि त्याच्या अद्‌भुत तेजस्वी प्रकाशाच्या प्रेमाच्या ऐवजी मी अंधकाराचा तो दोष निवडतो.

गोल करा : होय अनिश्चित

माझे पतन बरे करण्यास, माझ्यावर प्रेम करण्यास, आणि तुझा क्रोध माझ्यापासून

दूर करण्याच्या तुझ्या अभिवचनासाठी हे पित्य मी तुझे आभार मानतो.

गोल करा :  होय  अनिश्चित

दैवत्व हे पतन पावलेल्या मानवजातीसाठी कळवळा आणि दया ह्यांनी भरून गेले आणि स्वतःला ती योजना आणि उद्धाराचे कार्य पूर्ण करण्यात त्यांनी झोकून दिले ह्याचे मी कौतुक करतो.

गोल करा :  होय  अनिश्चित

ह्याच दिवशी मी माझे हृदय, मन आणि जीवात्मा प्रभूला देतो आणि प्रार्थना करतो की, त्याच्या कृपेने आणि आत्म्याने, मी माझे जीवन त्याच्या गौरवासाठी जगू शकतो. त्याच्या प्रेमासाठी आणि चांगुलपणासाठी  एक सामर्थ्यशाली साक्ष म्हणून बनण्याची माझी इच्छा आहे जे ख्रिस्ताच्या जीवनात, मृत्यूत  आणि दयेत चांगुलपणात प्रगट होते.

गोल करा :  होय  अनिश्चित



# धडा ६

# देवाचे प्रेम त्याचा न्याय आणि दया ह्यांनी प्रगट होते

**(१) ख्रिस्त ह्या जगात येऊन त्याने त्याचे जीवन काय सन्मानित, परिपूर्ण आणि उचलून धरण्यासाठी आला?**

***"नियमशास्त्र किंवा संदेष्ट्यांचे ग्रंथ रद्द करण्यास मी आलो आहे असे समजू नका; मी रद्द करण्यास नव्हे तर पूर्ण करण्यास आलो आहे. (मत्तय ५:१७)***

देवाचे अमर्याद प्रेम त्याच्या एकुलत्या एका पुत्राच्या द्वारे त्या वरदानाने पतन पावलेल्या मानवजातीच्या उद्धारासाठी व्यक्त होते. ख्रिस्त पृथ्वीवर लोकांना

त्याच्या पित्याचे चारित्र्य प्रगट करण्यासाठी आला, आणि त्याचे जीवन हे दैवी कोमलता आणि कळवळा ह्यांनी भरलेले होते. आणि तरीही ख्रिस्त स्वतः घोषित करतो, “आकाश व पृथ्वी ही नाहीशी होईपर्यंत सर्वकाही पूर्ण झाल्याशिवाय नियमशास्त्रातील एकही काना किंवा मात्रा रद्‌द होणार नाही.” मत्तय ५:१८.

येशूच्या द्‌वारे, देवाची दया ही लोकांना प्रदर्शित झाली; पण दया ही न्यायाला बाजूला ठेवत नाही. नियमशास्त्र देवाच्या चारित्र्याचे गुणविशेष प्रगट करते, आणि त्यातील एक देखील शीर्षक अथवा काहीही मनुष्याला त्याच्या पतन पावलेल्या स्थितीत भेट घेण्यसाठी बदलता येत नाही. देवाने त्याचे नियमशास्त्र बदलले नाही, पण त्याने स्वतःला ख्रिस्तामध्ये बलिदान म्हणून दिले, मनुष्याच्या उद्‌धारासाठी. “देव ख्रिस्तामध्ये स्वत: बरोबर जगाचा समेट करत होता.” २ कर. ५:१९.

नियमशास्त्राला नितीमत्वाची आवश्यकता असते,-- एक नीतिमान जीवन, एक परिपूर्ण चारित्र्य;आणि ह्या मनुष्याने ते देणे नाही. देवाच्या पवित्र नियमाचे

अधिकार तो काही भागवू शकत नाही. पण ख्रिस्त, पृथ्वीवर मानव म्हणून येऊन, एक पवित्र जीवन जगला, आणि त्याने एक परिपूर्ण चारित्र्य विकसित केले. हे सर्व तो एक स्वतंत्र वरदान म्हणून देतो आणि अशा लोकांसाठी जे सर्व त्याचा स्वीकार करतात. त्याचे जीवन मनुष्यांच्या जीवनासाठी उभे असते. म्हणूनच जी भूतकाळातील पापे आहेत त्यांच्यासाठी, देवाच्या ताब्याने त्यांची क्षमा झाली आहे. ह्यापेक्षा अधिक, ख्रिस्त मनुष्यांना देवाच्या चारित्र्यगुणांनी भरून टाकतो. दैवी चारित्र्याच्या नुसार, तो मानवी चारित्र्याची उभारणी करतो, ज्यामध्ये अध्यात्मिक शक्ती आणि सौंदर्य ह्यांची सुंदर जुळवणूक असते. म्हणूनच ख्रिस्तामध्ये  नियमशास्त्राचे नितीम्त्व हे प्रत्येक विश्वासणाऱ्यामध्ये परिपूर्ण होते. देव "आपण नीतिमान असावे आणि येशूवर विश्वास ठेवणाऱ्याला नीतिमान ठरवणारे असावे." रोम ३:२६.

**(२) "प्रभू कशाबद्दल चांगला आहे" आणि तो दयेसोबत काय परिपूर्ण समतोलात राखतो, आणि शेवटी कृसामध्ये ते प्रगट होते?**

*ह्यामुळे परमेश्वर तुमच्यावर प्रसन्न होण्यास विलंब लावील; तुमच्यावर करुणा करावी म्हणून उच्च स्थानी आरूढ होईल. परमेश्वर न्यायी देव आहे; जे त्याची वाट पाहतात ते सर्व धन्य. (यशया ३०:१८)*

देवाचे प्रेम हे त्याच्या दयेपेक्षा अधिक त्याच्या न्यायात प्रदर्शित होते. न्याय हे त्याच्या सिंहासनाचा आधार आहे, आणि त्याच्या प्रेमाचे फळ आहे. सत्य आणि न्याय ह्यांच्यापासून दयेचा घटस्फोट करणे हि सैतानाची योजना होती. त्याने हे सिद्ध करण्याचे योजिले की देवाच्या नियमशास्त्राचे नितीमत्व शांतीचा शत्रू बनते. पण ख्रिस्त दाखवतो की देवाच्या योजनेत ते अटल रीतीने जोडले गेले आहेत; एक दुसऱ्या पासून विभक्त करू शकत नाही. “दया व सत्य ही एकत्र झाली आहेत; नीती व शांती ह्यांनी एकमेकींचे चुंबन घेतले आहे.” स्तो. ८५:१०.

त्याचे जीवन आणि मृत्युच्या द्वारे, ख्रिस्ताने सिद्ध केले की देवाच्या न्यायाने त्याच्या दयेला नष्ट केले नाही, पण पापाची क्षमा होऊ शकते, आणि नियमशास्त्र हे नीतिमान आहे, आणि

त्याचे परिपूर्ण रीतीने पालन होऊ शकते. सैतानाचे आरोप उधळून लावण्यात आले. देवाने मनुष्याला त्याच्या प्रेमाचा अचूक पुरावा दिला होता. {डीए ७६२}

**(३) त्याचे महान प्रेम आणि दैवी सामर्थ्याने, देवाने आपल्याला कशाचे सहभागी होऊ दिले जे ख्रिस्ताचे फायदे आणि त्यात जीवन जगण्याद्वारे आपल्याला मिळते?**

*ज्याने तुम्हाआम्हांला आपल्या गौरवासाठी व सात्विकते-साठी पाचारण केले त्याच्या ओळखीच्या द्वारे, त्याच्या ईश्वरी सामर्थ्याने, जीवनास व सुभक्तीस आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी आपल्याला दिल्या आहेत; त्यांच्या योगे मोलवान व अति महान अशी वचने आपल्याला देण्यात आली आहेत, ह्यासाठी की, त्यांच्या द्वारे तुम्ही वासनेपासून उत्पन्न होणारी जगातील भ्रष्टता चुकवून ईश्वरी स्वभावाचे वाटेकरी व्हावे. (२ पेत्र १:३-४)*

मनुष्याच्या उद्धाराच्या कार्याला हाती घेऊन, पिता काहीही असेच देणार नाही, कितीही प्रिय असले तरीही, जे त्याच्या कार्याच्या पूर्णतेसाठी आवश्यक होते. तो

लोकांसाठी संधी उपलब्ध करून देत होता; त्याचे आशीर्वाद त्यांच्यासाठी देऊ करत होता; त्यांच्यावर कृपा अधिकच करत होता, वर्दानावर वरदान, जोपर्यंत तो ज्यांचे तारण करावयास आला त्यांच्यासाठी स्वर्गाचा संपूर्ण खजिना हा रिकामा झाला. सर्व विश्वाचे धन संचित करून, आणि त्याच्या दैवी स्वभावाचे सर्व स्रोत खुले करून, देवाने ते सर्वकाही माणसाच्या उपयोगासाठी दिले. ते सर्व त्याचे फुकट दिलेले वरदान होते. किती हे प्रेमाचे सरोवर सर्वत्र फिरत असताना दिसते, एका दैवी वातावरणासारखे, जे जगभर दिसते! हे कोणत्या प्रकारचे प्रेम आहे, की सनातन देवाने मानवी स्वभाव त्याच्या पुत्राच्या स्वरुपात दत्तक म्हणून घ्यावे, आणि तेच सर्वोच्च स्वर्गात देखील घेऊन जावे!

आपल्या उद्धारकाने त्याच्या फायद्यांच्या पलीकडे इतर काहीच निश्चित केले नाही की देवाचे प्रेम हे त्यावर विश्वास ठेवणाऱ्या जीवात्म्यात पुरेपूर वसतात. आपल्या जीवनाप्रमाणे, देवाच्या प्रेमाचे जीवंतपण म्हणजे आपल्या प्रत्येक स्वभावातून त्याला पसरवू देणे, की जसे ते ख्रिस्त येशुमध्ये वस्ती करते तसेच त्याने आपल्यामध्ये

देखील वस्ती करावी. जिवंत विश्वासाच्या द्वारे ख्रिस्ताच्या सोबत संघटीत होऊन, पिता आपल्यावर ख्रिस्ताच्या रहस्यमय शरीराचे सदस्य म्हणून प्रेम करतो, ज्यामध्ये ख्रिस्त हा गौरवी मस्तक आणि प्रमुख आहे.

**(४) आपल्या पतन पावलेल्या जीवात्म्यांसाठी दया आणि सहानुभूती ह्यांनी भरून जावून, कोणत्याही पापी व्यक्तीने करू नये अशी कोणती गोष्ट आहे जी दैवत्वाला वाटते?**

***कित्येक लोक ज्याला विलंब म्हणून म्हणतात तसा विलंब प्रभू आपल्या वचनाविषयी करत नाही, तर तो तुमचे धीराने सहन करतो; कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर सर्वांनी पश्चात्ताप करावा अशी आहे. (२ पेत्र ३:९)***

शुभवर्तमानाचे हे गौरव आहे जे पतन पावलेल्या मानवजातीसाठी दैवी प्रतिमा आणि हे उदार्तेच्या कार्याला पुनर्स्थापित करण्याच्या तत्वावर आधारित आहे. ह्या कार्याची सुरुवात स्वर्गीय दरबारात झाली. तिकडे देवाने मानवांना त्याच प्रेमाचा अचूक पुरावा दिला आणि त्या प्रेमाने त्यांना लेखले. “देवाने जगावर एवढी

प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे." योहान ३:१६.

दैवत्व हे त्या मानवजातीसाठी, दयेने भरून गेले, पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा स्वतः त्यांनी ह्या उद्धाराचे कार्य व्हावे म्हणून कार्य केले. हि योजन पूर्णपणे आचरणात आणण्यासाठी, असे ठरले की ख्रिस्त, देवाचा एकुलता एक पुत्र, ह्याने स्वतःला पापाचे एक अर्पण म्हणून द्यावे. ही योजना पूर्णपणे योजण्यास आणि आचरणात आणण्यास, असे ठरले की ख्रिस्त, एकमेव देवाचा पुत्र, ह्याने स्वतःला पापाचे अर्पण म्हणून द्यावे. कोणती रेष अथवा मत ह्या प्रेमाची खोली मोजू शकते? मनुष्याने म्हणावे की देवाने अजून केले असते असे म्हणणे शक्य केले असते. ख्रिस्ताच्या सोबत त्याने स्वर्गाचे सर्व स्रोत देऊ केले, की मनुष्याला वर उंचावण्याच्या योजनेत कशाचीच कमरता भासू नये. इकडे ते प्रेम आहे—ज्याच्या चिंतनाने जीवात्म्याला ह्याचा अबोल आणि व्यक्त न होणार्या कृतज्ञतेने भरून टाकतो ! ओह, काय हे प्रेम, काय हे

अतुलनीय प्रेम! ह्याचा प्रेमाचे चिंतन केल्याने आत्मा सर्व स्वार्थापासून शुद्‌ध होईल. त्यामुळे शिष्य स्वतःचा त्याग करेल, वधस्तंभ हाती घेईल, आणि उद्‌धारकर्त्याच्या मागे जाईल.

**(५) आपण पापी म्हणून जेव्हा तो न्याय, दया, आणि देवाचे प्रेम हे वधस्तंभाच्या दृष्टीने समजून घेतो, पौलासारखे आपल्या साक्षीचे ध्येय अथवा केंद्र काय असेल?**

***कारण येशू ख्रिस्त, म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला. (१ करिंथकरास पत्र २:२)***

येशूने वधस्तंभ हा स्वर्गाकडून येणाऱ्या प्रकाशात ठेवला, कारण त्या ठिकाणी लोकांची नजर त्यावर पडेल. वधस्तंभ हा दैवी रीतीने चेहऱ्यांवर चमकतो, जेणेकरून वधस्तंभ पाहण्याने मनुष्यांना देवाला ओळखावे आणि येशू ख्रिस्ताला देखील, ज्याला त्याने पाठवले आहे. देवाला जेव्हा आपण बघतो आपण ज्याने त्याचा आत्मा मृत्युपर्यंत आपल्यासाठी रिक्त केला त्याला पाहत असतो. वधस्तंभ

बघण्यात, हा दृष्टीकोन देवाच्या प्रती विस्तारित होतो, आणि पापाचा त्याचा द्वेष हा ओळखण्यात येतो. पण जेव्हा आपण वधस्तंभ व देव पापाचा कसा द्वेष करतो बघत असतो, आपल्याला देवाच्या पापी लोकांवरचे प्रेम देखील दिसते, जे मृत्यूपेक्षा बळवंत आहे. जगासाठी वधस्तंभ हा खंडन न करता येणारा वाद आहे की देव हा सत्य आणि प्रेम आणि प्रकाश आहे.

**(६) जरी पापाच्या द्वारे आपण अगदी न्यायीपणे देवापासून वेगळे झालो, येशूचा मृत्यू जे लोक स्वीकारतात त्यांच्यासाठी कोणते दयेचे कृत्य सिध्द होते?**

***कारण आपण शत्रू असता देवाबरोबर त्याच्या पुत्राच्या मृत्यूद्वारे आपला समेट झाला, तर आता समेट झाला असता त्याच्या जीवनाने आपण विशेषेकरून तारले जाणार आहोत; इतकेच केवळ नाही, तर ज्याच्या द्वारे समेट ही देणगी आपल्याला आता मिळाली आहे त्या आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या द्वारे आपण देवाच्या ठायी अभिमान बाळगतो. (रोमकरास पत्र ५:१०-११)***

मनुष्य पापाच्या द्वारे देवाच्या आयुष्यापासून विभक्त झाला आहे.

सैतानाच्या सर्व क्लुप्त्यांच्या द्वारे जीवात्मा हा पक्षघातकी होतो, जो पापाचा उत्पादक आहे. तो स्वतः पापाला ओळखण्यास अपात्र आहे, दैवी स्वभावाचा कौतुक करण्यास आणि त्याचे अवलंबन करण्यास अपात्र आहे. ते त्याच्या अखत्यारीत जर आणले असते तर, त्यामध्ये काहीच नाही ज्याची इच्छा मानवी हृदयाने करावी.

पण सैतान काही देवाला पराजित करू शकणार नाही. त्याने त्याच्या पुत्राला जगात पाठवले, की त्याचे मानवी स्वरूप आणि स्वभाव हे परिधान करून,मानवता आणि दैवत्व हे एकत्र त्याच्यात आले आणि हे मनुष्याला देवासोबत नैतिक मूल्यांमध्ये वाढवते.

देवाचे जगावरचे प्रेम हे त्याने त्याच्या पुत्राला पाठवले म्हणून प्रदर्शित झाले नाही, पण त्याने जगावर प्रेम केले म्हणून त्याने पुत्राला जगात पाठवले की मानवतेने दैवत्वाला स्पर्श करावे, आणि दैवत्व दैवत्वाला पकडून ठेवते. जरी पापाने मनुष्य आणि देवामध्ये एक दरी निर्माण केली, एक दैवी हितकर्ता ह्याने ती दरी मिटवण्यासाठी एक  योजना पुरवली. आणि त्याने कोणते साधन

वापरले? त्याच्या स्वतःचा एक भाग त्याने वापरले. पित्याच्या गौरवाचा प्रकाश संपूर्ण जगात आला आणि त्या शापाने तो भ्रष्ट झाला, आणि त्याच्या स्वतःच्या दैवी चारित्र्यात, त्याच्या स्वतःच्या दैवी शरीरात, ही दरी मिटवली जाते. स्वर्गाच्या खिडक्या उघडण्यात आल्या णी स्वर्गीय कृपेचा वर्षाव हा आपल्या उदासीन जगावर आरोग्याचे वर्षाव बनून आले.

**(७) जसे सनातनकाळाचे हे वर्ष सरून जातात आणि त्यासोबत देवाच्या प्रेमाचे, न्यायाचे आणि दयेचे एक अधिक खोलवर प्रगटीकरण मिळते, तेव्हा आपले स्तुतीचे गीते काय असतील?**

***आणि स्वर्गात, पृथ्वीवर, पृथ्वीच्या खाली व समुद्रावर जो प्रत्येक सृष्ट प्राणी आहे तो, आणि त्यांतील सर्व वस्तुजात ह्यांना मी असे म्हणताना ऐकले :"राजासनावर बसलेला ह्याला व कोकऱ्याला धन्यवाद, सन्मान, गौरव व पराक्रम हे युगानुयुग आहेत!" (प्रगटीकरण ५:१३)***

आणि जसे हे सनातन काळचे वर्ष लोटून जातात, देव आणि ख्रिस्त ह्याविषयी अधिक गौरवी प्रगटीकरण ते घेऊन

येतात. जसे ज्ञान हे वाढत जाते, तसे प्रेम, आदर, आणि आनंद देखील वाढेल. जितके अधिक लोक देवाविषयी शिकतील, तितकेच अधिक त्याच्या चारित्र्याला न्याहाळतील. येशू त्यांच्यासमोर ह्या उद्धारचे धन आणि सैतानाच्या सोबत असणाऱ्या वादात कसे यश मिळाले हे जसे खुले करतो, उद्धार पावलेल्या लोकांचे मन हे अधिक चिकाटीने पूर्ण चिंतन, मनन आणि अधिक असीम आनंदाने भरतात आणि सोन्याचे तंतुवाद्य ते वापरतात; आणि दहा हजार वेळा दहा हजार आणि हजारोनी हे सर्व आवाज एकत्र येऊन महान रीतीने स्तुतीगीते गातात.

हा महान वादविवाद आता संपतो. पाप नै पापी लोक आता ह्यापुढे दिसत नाहीत. संपूर्ण विश्व हे स्वच्छ आहे. सुसंगती आणि आनंद ह्यांची एक झलक संपूर्ण निर्मितीमधून धुमासताना दिसते. ज्याने सर्वकाही निर्माण केले, त्यामधून जीवन आणि आनंद आणि प्रकाश हे वाहतात, आणि काळाच्या सर्व क्षेत्रात हे दिसून येते. सर्वात छोटा असणारा अणू ते सर्वात मोठे जग, सर्व गोष्टी, सजीव आणि निर्जीव, त्यांच्या न झाकलेल्या सौंदर्यात आणि आनंदात, अशी घोषणा करा की देव प्रिती आहे.

**(८) पिता आपल्याला शुद्ध करून आपले सर्व पतन आणि मागे हटने हे झाकून टाकतो तेव्हा, आपली अधर्मे किती काळ दूर काढण्यात आली आहे?**

***पश्चिमेपासून पूर्व जितकी दूर आहे, तितके त्याने आमचे अपराध आमच्यापासून दूर केले आहेत. (स्तोत्रसहिता १०३:१२)***

पण अनेकांना वाटते त्यापेक्षा क्षमेचा अर्थ अखंड आहे. जेव्हा देव ते अभिवचन देतो की "तो विपुल रीतीने क्षमा करेल," तो अजून बोलतो, जणूकाही त्या वचनाचा अर्थ आपल्याला समजते ह्यापेक्षा अधिक आहे: "कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत." यशया ५५:७-९. देवाची क्षमा म्हणजे केवळ एक कायद्याची कृती नाही जेणेकरून तो आपल्याला त्या दोषातून मुक्त करतो. पापासाठी क्षमा व्हावी म्हणून नाही, तर पापापासून त्यानं परत ते सिद्ध करायचे असते. उद्धार देणाऱ्या ह्या प्रेमामुळे

हृदय परिवर्तीत होते. दाविदाला क्षमेची एक नवीन समज होती जेव्हा त्याने प्रार्थना केली, “हे देवा, माझ्या ठायी शुद्ध हृदय उत्पन्न कर; माझ्या ठायी स्थिर असा आत्मा पुन्हा घाल.” स्तोत्रसहिता ५१:१०.

**(९) जेव्हा आपण पापी म्हणून देवाच्या प्रेमाचे महत्व जे क्रुसावर प्रदर्शित झाले ते समजून घेतो, तेव्हा पौलासारखा, आपण देखील काय बोलू?**

***आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाही अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो; त्याच्या द्वारे जग मला वधस्तंभावर खिळलेले आहे व जगाला मी वधस्तंभावर खिळलेला आहे. (गलतीकरास पत्र ६:१४)***

ख्रिस्ताचा मृत्यू देवाच्या मनुष्यासाठी असणाऱ्या प्रेमाला सिद्ध करतो. ती आपल्या तारणाची शपथ आहे. ख्रिस्ती व्यक्तीपासून तो वधस्तंभ काढून टाकणे म्हणजे आकाशातून सूर्याला काढून टाकण्यासारखे आहे. वधस्तंभ आपल्याला देवाच्या अधिक कवळ आणतो, आणि त्याच्याशी समेट घडवून आणतो.

पित्याच्या प्रेमाच्या कळवळ्याने, यहोवाने त्याच्या पुत्राला हे दुखसहन करत असताना पहिले जेणेकरून त्याने संपूर्ण मानवजातीला सनातन मृत्युपासून बचावले, आणि प्रियजणांमध्ये तो आपल्याला स्वीकारतो.

वधस्तंभाच्या शिवाय, मनुष्याचा पित्याशी समेट झाला नसता. त्याच्यावर आपली प्रत्येक आशा अवलंबून आहे. त्यामधून तारनार्याच्या प्रेमाचा प्रकाश चमकतो, आणि वधस्तंभाच्या पायथ्याशी पापी व्यक्ती त्याकडे पाहते ज्याचा मृत्यू त्याचे तारण करण्यासाठी झाला, त्याने आनंदाच्या परिपूर्णतेत आनंद मानावा, कारण त्यांच्या पापांची क्षमा झाली आहे. वधस्तंभाच्या जवळ विश्वासात गुढघे टेकून, त्याने ते सर्वात उच्च स्थान गाठले.

वधस्तंभाच्या द्वारे आपण शिकतो की स्वर्गीय पिता आपल्यावर अशा प्रेमाने प्रेम करतो जे अमर्याद आहे. पौलाने काय बोलून दाखवले ह्याची कल्पना आपण करू शकतो का, “आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाही अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो; त्याच्या

द्वारे जग मला वधस्तंभावर खिळलेले आहे व जगाला मी वधस्तंभावर खिळलेला आहे”? गलतीकरास पत्र ६:१४. वधस्तंभात गौरव करणे हे आपले देखील सौभाग्य आहे, आपल्या स्वतःला पूर्णतः त्याच्या स्वाधीन करणे ज्याने स्वतःला आपल्यासाठी देऊ केले. मग, काल्वरीतून जो प्रकाश चमकतो, आपण पुढे जाऊन तो प्रकाश जे अंधारात आहेत त्यांच्यासाठी प्रगट करावा.

***मला आता समजते की ख्रिस्त देवाच्या प्रेमाचे नियमशास्त्र खात्रीपूर्वक देण्यासाठी आला आणि ते बाजूला सारण्यासाठी नाही. ख्रिस्त आपल्याला तारण्यासाठी आला हि वास्तविकता आहे आणि त्याद्वारे त्याचे महत्व आणि सनातन अस्तित्व हे सिद्ध होते.***

***गोल करा :      होय        अनिश्चित***

***मी पाहतो की देवाचे प्रेम हे परिपूर्ण समतोल आहे न्याय आणि दया ह्यामध्ये आणि हे तर त्याचे सिंहासन आणि शासन ह्यांचा पाया आहेत.***

गोल करा :      होय       अनिश्चित

मी इतका आभारी आहे की देवाची इच्छा नाही की कोणाचाही नाश व्हावा आणि मी येशूच्या वधस्तंभाकडे पाहतो आणि माझ्या पापांना त्याच्या अनमोल रक्ताने झाकून टाकावे ह्याकडे पाहतो.

गोल करा :      होय       अनिश्चित

ख्रिस्ताची निवड करून आणि त्याच्या आत्म्याला मला भरून जाण्याची निवड करण्याने मी आश्चर्यचकित होतो की, त्याचा दैवी स्वभाव माझ्यामध्ये राहावा आणि जगू द्यावा ह्याचे सौभाग्य माझ्याकडे आहे. मी देवाला त्या सौभाग्याची मागणी आता करतो.

गोल करा :      होय       अनिश्चित

________________________________

________________________________

________________________________

________________________________



# धडा ७
# दैविपणाचे रहस्य

**(१) जिवंत शब्द ख्रिस्त ह्याने काय केले आणि ती सर्वात उत्तम गोष्ट बनली जी आतापर्यंत घडली?**

***शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली, आणि आम्ही त्याचा गौरव पाहिला. तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचा गौरव असावा असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता. (योहान १:१४)***

जेव्हा अभ्यास करण्यासाठी आपल्याला एक खोलवर स्थित समस्या पाहिजे असती, स्वर्ग अथवा पृथ्वीवर जी सर्वात

उत्तम अशी गोष्ट घडली त्याकडे आपण आपले लक्ष वळवणार आहोत- देवाच्या पुत्राचा अवतार. देवाने त्याचा पुत्र पापी मनुष्यांच्या साठी मरण पत्करण्यास दिला ज्याने अपमानित आणि लज्जास्पद असा मृत्यू सहन केला. जो स्वर्गीय दरबारात सेनापती म्हणून होता त्याने आपला राजेशाही झगा आणि मुकुट बाजूला ठेवले, आणि मानवतेला त्याच्या दैवत्वाचे आभूषण घालून, ह्या जगात संपूर्ण मानवजातीचा प्रमुख म्हणून आला आणि त्याची पद्धत हि एक आदर्श बनली.  ह्या जमातीसोबत दुखसहन करण्यासाठी त्याने स्वतःला विनम्र केले, आणि सर्व यातना मुकाट्याने सहन केल्या.

संपूर्ण जग त्याचे होते, पण त्याने स्वतःला इतके जास्त रिक्त केले की त्याच्या सेवेच्या दरम्यान त्याने घोषणा केली, “खोकडांना बिळे व आकाशातील पाखरांना कोटी आहेत, परंतु मनुष्याच्या पुत्राला डोके टेकण्यास ठिकाण नाही.” [इब्री. २:१४-१८]

**(२) “इम्मान्यूएल” ह्या शब्दाचा अर्थ जसा ख्रिस्ताशी आणि त्याचे जे आपल्यासोबत न ग्रहण करता येणारे**

**नाते आहे त्यांच्याशी त्याचा काय अर्थ आहे?**

**“पाहा, कुमारी गर्भवती होईल व तिला पुत्र होईल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील.” ह्या नावाचा अर्थ, “आमच्याबरोबर देव.” (मत्तय १:२३)**

मानवजातीत ख्रिस्त कशा रीतीने अवतरीला हे जाणून घेण्यात, आपण अशा समजता न येणाऱ्या रहस्याच्या समोर गोंधळलेल्या अवस्थेत उभे राहतो, जे मानवी मनाला समजत नाही.जितके अधिक आपण त्यावर मनन करतो, तितकेच अद्‌भुत आपणास ते दिसते. ख्रिस्ताचे दैवत्व आणि असहाय्य बेथलेहेम च्या गव्हाणी मधील बालक ह्यांच्यातील विरोधाभास किती मोठा आणि अखंड आहे! महान देव आणि एक असहाय्य लेकरू ह्यांच्यातील अंतर आपल्याला कसे समजू शकते? आणि तरीही जगाचा निर्माणकर्ता, ज्याच्यामध्ये दैवत्वाचे स्वरूप दैहिक रीतीने उतरले, ते गव्हाणी मध्ये त्या असहाय्य बालकात दिसले. कोणत्याही इतर देवदूतांच्यापेक्षा वर आणि उच्च, सन्मान आणि गौरव ह्यांच्यात पित्यासमान होऊन, आणि तरीही मानवतेचे रूप तो झगा त्याने

परिधान केला! दैवत्व आणि मानवता हे रहस्यमय रीतीने एकत्रित जोडण्यात आले, आणि देव आणि मानव हे एक बनले. ह्याच ऐक्यात आपल्याला आपल्या पतन पावलेल्या मानवजातीची आशा दिसते. मानवतेत ख्रिस्ताकडे बघत असताना, आपण देवाकडे पाहतो, आणि त्याच्यात ते गौरवाची चमक पाहतो, त्याच्या व्यक्तिमत्वाची ती प्रतिमा व्यक्त होते.

**(३) पित्याने पाठवलेला, ख्रिस्ताच्या प्रेमाचे सेवाकार्य काय होते की जेणेकरून आपल्याला देवाची लेकरे म्हणून दत्तक घेण्यात येते?**

***परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता. ह्यात उद्देश हा होता की, जे नियमशास्त्राधीन होते त्यांना त्याने खंडणी भरून सोडवावे, आणि आपल्याला पुत्राचा हक्क मिळावा. (गलतीकरास पत्र ४:४-५)***

पापी व्यक्ती तारणार्याला काल्वरीवर मरत असताना जेव्हा बघते, आणि जेव्हा तील जाणीव होते की सहन करणारा हा

दैवी आहे, तो विचारतो की हे महान अर्पण का करण्यात आले, आणि वधस्तंभ देवाच्या पवित्र नियमशास्त्राकडे बोट दाखवतो ज्याचे उल्लंघन झाले आहे. ख्रिस्ताचा मृत्यू एक अनुत्तरीत असा वाद आहे जेव्हा नियमशास्त्राचा अटळ स्वभाव न बदलणारे स्वरूप आणि नितीम्त्व ह्यांचा संबंध येतो.

ख्रिस्ताच्या बद्‌दल भविष्यवाणी देताना यशया म्हणतो, “परमेश्वर आपल्या नियमशास्त्राची महती व थोरवी वाढवेल” (यश. ४२:२१). नियमशास्त्राकडे दुष्ट रीतीने वागणाऱ्या व्यक्तीसाठी काहीच क्षमा नाही. त्याचे कार्य म्हणजे त्यातील त्रुटी दाखवणे, जेणेकरून जो बचाव करण्यास महान आहे त्याची गरज त्यांना समजेल, ज्याची गार्ज त्याला पर्यायी व्यक्ती म्हणून त्याची जागा घेणार्यात दिसेल, त्याचे आश्वसन, त्याची धार्मिकता. येशू पापी व्यक्तीची गरज बघतो आणि त्याची भेट घेतो; कारण जो कोणी उल्लंघन करतो त्याची पापे त्याने स्वतःवर घेतलेली आहेत. “खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या

फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले.” (यश. ५३:५). प्रभू त्या पापी व्यक्तीला हटवून लावू शकला असता, आणि त्याचा समूळ नाश त्याला करता आला असता; पण ती महागडी योजना निवडण्यात आली. त्याच्या महान प्रेमात तो निराश लोकांसाठी ती आशा पुरवतो, त्याच्या एकुलत्या एका पुत्राला जगाची पापे वाहण्यास देतो. आणि त्याने संपूर्ण स्वर्ग त्याच एका वरदानात ओतण्यात आल्याने, मनुष्याने तारणाचा प्याला हाती घ्यावा व देवाच्या सोबत, ख्रिस्ताच्या सोबत सहवतनदार बनावे म्हणून तो कोणतेही सहाय्य त्याच्याकडून परावृत्त करणार नाही.

**(४) आत्म-त्यागाच्या स्वरूपातील ह्या प्रेमात, ख्रिस्त ह्या जगामध्ये आपल्याला कशापासून सोडवण्यास आला जेणेकरून आपणास ती पूर्ण पुनर्स्थापना मिळू शकते?**

*त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवले. त्या पुत्राच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती म्हणजे आपल्या पापांची क्षमा आपल्याला मिळाली आहे. (कलस्सेकरास पत्र १:१३-१४)*

आपल्या दोषामुळे, ख्रिस्त आपल्यापासून दूर गेला असता. पण आपल्यापासून दूर जाण्यापेक्षा, तो तर आपल्यामध्ये आला व त्याने वस्ती केली, दैवत्वाच्या सर्व पूर्णतेने तो भरून गेला, आपल्यासोबत एक होण्यास,की त्याच्या कृपेच्या द्वारे आपणास ते परिपूर्णत्व प्राप्त व्हावे. लज्जा आणि दुखसहन करत मृत्यू पत्करून त्याने माणसासाठी ती खंडणी दिली. काय हे स्वयं- त्यागमय प्रेम! त्याच्या सर्वोच्च उत्तम स्थानाहून तो आला, त्याचे दैवत्व मानवतेशी जोडण्यात आले, अपमान सहन करण्यासाठी ते अधिक खालच्या स्तराला गेले.कोणतीही रेष ह्या प्रेमाच्या खोलीला मोजू शकत नाही. ख्रिस्ताने आपल्याला दाखवले आहे की देव किती प्रेम करू शकतो आणि आपली पूर्ण पुनर्स्थापना होण्यासाठी आपल्या उद्धारकर्त्याने ते दुख सहन केले. त्याच्या लेकरांनी त्याचे चारित्र्य प्रगट करावे अशी त्याची इच्छा आहे, त्याचा प्रभाव व्यक्त करावा, जेणेकरून इतर मने त्याच्या मनाशी सुसंगतीत ओढ्वण्यात येतील.

**(५) पौल कोणती अद्भुत वास्तविकता दर्शवतो जे ख्रिस्ताच्या अवतार घेतलेल्या रुपात ती प्रेमाची कृती मनुष्यांना ग्रहण होत नाही?**

*तो सर्वांच्या पूर्वीचा आहे व त्याच्यामध्ये सर्वकाही अस्तित्वात आहे. (कलस्सेकरास पत्र १:१७)*

प्रेषिताने त्याच्या बंधूंसमोर ख्रिस्ताला उंचावले असे व्यक्त करून की तोच आहे ज्याच्याद्वारे देवाने सर्व गोष्टी निर्माण केल्या आणि ज्याच्याद्वारे त्याने हे उद्धाराचे कार्य संपन्न केले. त्याने घोषणा केली की जो हात जगाला राखून ठेवतो, आणि त्यातील सर्व सुसंगती आणि अथक कृतींमध्ये सर्व गोष्टी देवाच्या विश्वात सामावून घेतो, तोच हात आहे जो वधस्तंभावर खिळण्यात आला. “त्याच्याद्वारे सर्व गोष्टींची निर्मिती झाली,” पौल लिहितो, “जे स्वर्गात आहेत, आणि पृथ्वीवर दिसतात, दृश्य आणि अदृश्य, मग ते सत्ता, अथवा राज्ये, अधिकारी, अथवा सामर्थ्य असो; सर्व गोष्टी त्याने निर्माण केल्या, आणि त्याच्यासाठी त्या निर्माण झाल्या: आणि तो सर्व गोष्टींच्या पुढे आहे, आणि त्याच्याद्वारे सर्व गोष्टी अस्तित्वात आहेत.” “आणि तुम्ही, जे काही काल ह्यापासून वेगळे झाला आणि दुष्ट कार्यांनी शत्रू बनला, तरीही आता त्याने त्याच्या देहाच्या स्वरूपाने मृत्युच्या द्वारे सर्व गोष्टींचा समेट घडवला, जेणेकरून

तुम्हाला त्याच्या दृष्टीने निर्दोष आणि धिक्कार न करता येणाऱ्या रीतीने तो व्यक्त करू शकेल.”

**(६) प्रेषित पौल कोणत्या वाक्यांशाचा उपयोग करतो, जेव्हा त्याला कोणत्याही वादाच्या शिवाय ख्रिस्ताच्या अवतार घेतलेल्या स्वरूपाच्या द्‌वारे जी उल्लेखनीय प्रेमाची कृती व्यक्त होते ह्याचे वर्णन करायचे असते?**

***सुभक्तीचे रहस्य निर्विवाद मोठे आहे; तो1 देहाने प्रकट झाला, आत्म्याने नीतिमान ठरला, देवदूतांच्या दृष्टीस पडला, त्याची राष्ट्रांत घोषणा झाली, जगात त्याच्यावर विश्वास ठेवण्यात आला, तो गौरवात वर घेतला गेला. (१ तीमथी ३:१६)***

ख्रिस्ताचा अवतार हा सर्व रहस्यांचे महत्वाचे रहस्य आहे.ख्रिस्त हा पित्यासोबत एक होता, तरीही.... जो देवाच्या सोबत एक होता त्याच्याबरोबर ज्याला उंचावण्यात आले तिथपासून खाली येण्यास त्याची तयारी होती. {एनपी}पतन पावलेल्या मानवजातीसाठी प्रेमाचा हेतू त्याला सिद्‌ध करता यावा म्हणून, तो आपल्या हाडातील हाड आणि मांसातील मांस बनला.

ख्रिस्ताचे दैवत्व आणि असहाय्य बेथलेहेम च्या गव्हाणी मधील बालक ह्यांच्यातील विरोधाभास किती मोठा आणि अखंड आहे! महान देव आणि एक असहाय्य लेकरू ह्यांच्यातील अंतर आपल्याला कसे समजू शकते? आणि तरीही जगाचा निर्माणकर्ता, ज्याच्यामध्ये दैवत्वाचे स्वरूप दैहिक रीतीने उतरले, ते गव्हाणी मध्ये त्या असहाय्य बालकात दिसले. कोणत्याही इतर देवदूतांच्यापेक्षा वर आणि उच्च, सन्मान आणि गौरव ह्यांच्यात पित्यासमान होऊन, आणि तरीही मानवतेचे रूप तो झगा त्याने परिधान केला! दैवत्व आणि मानवता हे रहस्यमय रीतीने एकत्रित जोडण्यात आले, आणि देव आणि मानव हे एक बनले.

मनुष्याचा देहस्वभाव धारण करणे म्हणजे देवाच्या पुत्रासाठी हा अत्यंत घोर अपमान ठरला असता, अगदी जेव्हा आदाम त्या एदेन बागेत निष्पाप म्हणून उभा होता तेव्हा देखील. पण येशूने मानवतेचे स्वरूप धारण केले जेव्हा मानवजात चार हजार वर्ष पाप सहन करत दुर्बल बनली होती. आदामाच्या प्रत्येक लेकराप्रमाणे जे काही अनुवांशिक रीतीने पुढच्या पिढीत जाते त्याचे

परिणाम त्याने स्वीकारले. हे निकष काय होते हे पृथ्वीच्या इतिहासातील त्यांच्या वंशजात दिसून येते. तो अशा अनुवांशिकतेने आला ज्याद्वारे त्याने आपली दुख आणि मोह हे वाटून घेतले, आणि एक पापविरहित जीवनाचे त्याने उदाहरण दिले.

जे लोक सिद्ध करतात की ख्रिस्ताने पाप करणे हे शक्य नव्हते, त्यांना विश्वास होत नाही की त्याने स्वतः ते मानवी रूप धारण केले. पण ख्रिस्त तर खरच त्या मोहात पडला नाही का, केवळ सैतानाच्या द्वारे त्या अरण्यात नाही, लहानपणा पासून ते प्रौढत्व गाठेपर्यंत? {एनपी} आपल्या तारणार्याने मानवता धरण केली, आणि त्यासोबत त्याच्या सर्व जवाबदार्या देखील. त्याने मनुष्याचा देहस्वभाव परिधान केला, आणि मोहाला बळी पडण्याची ती शक्यता होती. त्याने सहन केले नाही असे आपल्या ठायी काहीच नाही . {एफएलबी ९१}

**(७) ख्रिस्ताच्या महान प्रेमामुळे, जसे त्याच्या “दैवत्वाच्या रहस्यात दिसून येते”, आपण त्याची मंडळी ह्या नात्याने पवित्र देवाच्या समोर कसे उभे राहू शकतो?**

***आणि गौरवयुक्त मंडळी अशी ती स्वतःला सादर करावी, म्हणजे तिला डाग, सुरकुती किंवा अशासारखे काही नसून ती पवित्र व निर्दोष असावी. (इफिसकरास पत्र ५:२७)***

अहो, अनमोल, प्रेमळ, दुख सहन करणारा येशू, माझी जीव किती तुझ्यावर प्रेम करतो! एक दीन, अपात्र, पापाने भ्रष्ट जीवात्मा जो पवित्र देवाच्या समोर उभा राहू शकतो, आपली जागा घेणारा आणि ज्याने आपला जमीन स्वीकारला तो ह्या नितीमत्वाशी तुलना कशी करू शकतो! आश्चर्य, हे स्वर्गभर, आणि हे पृथ्वी अचंबित हो, की पतन पावलेले मनुष्य त्याचे अमर्याद प्रेम आणि आनंद ह्याचे केंद्र आहे तो त्यांच्यावर स्वर्गीय स्थानाची गीते गाऊन आनंद व्यक्त करतो, आणि मनुष्य पापाने मलीन अशा अवस्थेत, ख्रिस्ताच्या नितीमत्वाने धुतला जाऊन, पित्यासमोर प्रत्येक कलंक आणि डाग ह्याने स्वच्छ होऊन प्रस्तुत होतो, “म्हणजे तिला डाग, सुरकुती किंवा अशासारखे काही नसून” (इफी. ५:२७). “देवाच्या निवडलेल्या लोकांवर दोषारोप कोण ठेवील? देवच नीतिमान ठरवणारा आहे.” (रोम. ८:३३).

**(८) “ह्या रहस्याच्या गौरवाचे धन” काय आहे की देवाची इच्छा आहे आपण समजून घ्यावे आणि अनुभव घ्यावा जेणेकरून त्याच्यामध्ये आपण पूर्ण व्हावे?**

***ह्या रहस्याच्या गौरवाची संपत्ती परराष्ट्रीयांमध्ये काय आहे हे आपल्या पवित्र जनांना कळवणे देवाला बरे वाटले; गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे तो ते रहस्य आहे. (कलस्सेकरास पत्र १:२७)***

देवाच्या लेकराचे सौभाग्य, आशीर्वाद हे पुढील भाषेत प्रेषिताच्या द्वारे प्रस्तुत होतात: “ह्या रहस्याच्या गौरवाची संपत्ती परराष्ट्रीयांमध्ये काय आहे हे आपल्या पवित्र जनांना कळवणे देवाला बरे वाटले; गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे तो ते रहस्य आहे.” (कलस्सेकरास पत्र १:२७). जेव्हा आपल्याला समजते की आपल्या गौरवाची आशा हि ख्रिस्त आहे, की आपण त्याच्यात परिपूर्ण आहोत, आपण न व्यक्त करता येणारा आनंद आणि गौरव ह्यांनी आनंद करू.

**(९) प्रेमाने आपण आपली सार्वकालिकता हे समजून घेण्याच्या प्रयत्नात घालवू, की देवाचा पुत्र ख्रिस्त हा ह्या अंधकारमय ग्रहावर काय सहन करण्यासाठी आपल्यासाठी आला?**

***खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले. (यशया ५३:५)***

देवाचा पुत्र पतन पावलेल्या लोकांना उचलण्यासाठी खाली वाकला, ह्यासाठी त्याने वरील पापरहित विश्व सोडले, ज्या नव्याण्णव लोकांचे त्याच्यावर प्रेम होते, आणि ह्या पृथ्वीवर तो “आपल्या अधर्मांसाठी घायाळ झाला” आणि “आपल्या पापांसाठी ठेचला गेला.” यशया ५३:५. तो सर्व गोष्टीत त्याच्या बंधूजणांसारखा बनला. त्याने देहरूप धारण केले, जसे आपण आहोत. त्याला उपाशी असणे तहानले असणे आणि थकलेले असणे काय आहे हे ठाऊक होते. अन्नपाण्याने त्याला जिवंत ठेवले आणि झोपेने त्याला ताजेतवाने केले. पृथ्वीवर तो एक अनोळखा आणि एक परागंदा

झाला–जगमाधेय होता, पण जगाचा नाही; ज्या रीतीने आजचे स्त्री पुरूढ हे मोहात पडतात आणि त्यांची परीक्षा होते, त्यासारखे, तरीही पापरहित असे जीवन तो जग्ला. कोमल, दयनीय, नेहमी इतरांची काळजी वाहत, त्याने देवाचे चारित्र्य व्यक्त केले. “शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली......असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता.” योहान १:१४. {एए ४७२}

***ख्रिस्त जो निर्माणकर्ता स्वतःला विनम्र करेल आणि बेथलेहेम ह्या ठिकाणी गव्हाणीत असहाय्य रूप धारण करेल. ख्रिस्ताचा अवतार होणे हि निश्चितच सर्व रहस्यांमध्ये सर्वात गहन असे रहस्य आहे.***

***गोल करा : होय अनिश्चित***

***सर्व विश्वाच्या सोबत ख्रिस्ताने माझ्यावर प्रेम केले ह्या वास्तविकतेला पाहून मी आश्चर्यचकित होतो त्याने स्वतःचा राजकीय झगा आणि राजाचा मुकुट हे बाजूला ठेवले आणि आपल्यात वस्ती करण्यास तो देहरुपी झाला आणि शेवटी***

त्याने माझे तारण करण्यास आपला जीव दिला.

गोल करा : होय अनिश्चित

ख्रिस्त देवाचे प्रेम - व त्यावर आधारित नियमशास्त्र तसेच सोडून देण्यास काही आला नाही ह्याची मला जाणीव आहे- तर त्यांना उचलून धरण्यास आणि परिपूर्ण करण्यास तो आला. ही जर बाबा नसती तर माझ्या पापांसाठी त्याला मृत्यू सहन करावा लागला नसता.

गोल करा : होय अनिश्चित

मी पापकबुली देतो आणि माझ्या पापांची क्षमा मागतो आणि ते अभिवचन सिद्ध करतो की, त्याच्या प्रेमाच्या अद्भुत कृतीमुळे, पित्यासमोर मी कोणत्याही प्रकारे दोष अथवा बट्टा घेतल्याशिवाय उभा राहू शकतो.

गोल करा : होय अनिश्चित

*जशी ही सनातन काळची वर्षे लोटून जातात मी येशूच्या चरणांशी बसण्याची वाट पाहतो आणि त्याने ज्या अद्‌भुत गोष्टी केल्या ह्या जाणून घेतो आणि सदैव त्याच्या पवित्र नावाची मी स्तुती करतो.*

*गोल करा : होय अनिश्चित*

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________



# धडा ८
# देवाचे त्याच्याकडे खेचून आणणारे प्रेम

**(१) कोणत्या वैचारिक पद्धतीनी प्रभू आपल्या सर्व जिव्हाळ्याना विनवणी करतो आणि त्याद्वारे आपल्याला स्वतःकडे प्रेमाने आकर्षित करतो?**

***मानवी बंधनांनी, प्रेमरज्जूंनी, मी त्यांना ओढले; बैलाच्या गळ्यातले जोते सैल करणाऱ्यासारखा मी त्यांना झालो; त्यांना मी ममतेने खाऊ घातले. (होशेय ११:४)***

एक महत्वाचे प्रदर्शन,हे दर्शवतात की लोक जंगली पशूंना कबज्यात घेण्यासाठी

ज्या पद्धती वापरतात त्यापेक्षा ह्या खूपच वेगळ्या आहेत. खालील स्तरावरील पशूंनी काही वेळा उपयुक्त कष्टासाठी काही प्रमाणात हिंसा करण्यास त्यांना तोडले जाते; पण देव अशा रीतीने लोकांना पाचारण करत नाही. तो कडक दोर अथवा लोखंडी काठ्या देखील वापरत नाही, तर आपणास वैचारिक पद्धतीनी तो बोलावतो, आपल्या बुद्धीचा विचार करून आपल्या सर्व आवडींना ते प्रेरणा देतात (यश. १:१८ पहा ). देव आपल्या स्वभावाच्या अनुरूप स्वतः जवळ घेत नाहीत, ज्या प्रमाणे देवाच्या प्रतिमेत ते दिसते (उत्प. १:२६,२७). जीवात्म्यांसाठी काम करत असताना आपण ह्या प्रेमाची पद्धत अनुसरली पाहिजे (१ कर. ९:१९-२३; १ ठेस. २:७,८; ३:१२; इब्री ५:२). जेव्हा ख्रिस्त मनुष्य बनला तेव्हा मनुष्याच्या दोरांनी त्याने आपणास स्वतःकडे घेतले, आणि आपल्या हितासाठी तो जगला आणि त्याने अर्पण केले (योहान १२:३२; प्रेषित १०:३८ पहा). देवाचा पुत्र मनुष्य बनण्याचे एक कारण म्हणजे लोकांना स्वतःकडे दयेच्या भावनेने घेणे, त्यांच्यासोबत एक सामान्य स्वभाव हा धारण करण्यात येतो.

देवाचे प्रेम जगाला दाखवण्यासाठी ख्रिस्त जगात आला, स्वतःकडे त्याला असर्व लोकांची हृदये आकर्षित करायची होती.... तारणाच्या प्रती पाहिली पायरी म्हणजे ख्रिस्ताच्या प्रेमाकडे स्वताहून येणे..... लोकांना क्षमेचा आनंद हा समजून यावा, देवाची शांती, ख्रिस्त त्याच्या प्रेमाचे प्रदर्शन देऊन स्वतःकडे लोकांना आकर्षित करतो. जर लोकांनी ह्या आकर्षणाला प्रतिसाद दिला, त्यांची हृदये त्याच्या कृपेस शरण म्हणून दिली, तो प्रत्येक स्तराला त्यांना दिशा दाखवतो, स्वतःचे पूर्ण ज्ञान देण्यासाठी, आणि हे जीवन सार्वकालिक आहे.

**(२) ख्रिस्ताने कोणत्या वर्दानासाठी ती शिक्षा भोगली आणि तशी क्षमा देऊ केली आणि देव हे आपणास कृपेने देतो?**
***कारण पापाचे वेतन मरण आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे. (रोमकरास पत्र ६:२३)***

ती शिक्षा आणि किमत मोजण्यात आली आहे, आणि सर्वांनी देवाकडे येणे शक्य असते, आणि आज्ञापालन करून असे जीवन जागून त्यांना सनातन जीवनाचा लाभ द्यावा. मग किती दुखद अशी बाब

आहे की लोक अशा प्रकारे अमर्त्य वारसापासून दूर जातात, आणि स्वतः अशा प्रकारे गर्वाला अधिक फुंकर घालण्यासाठी, स्वार्थीपणा, आणि सैतानाच्या अधीन जाऊन, त्याद्वारे या आयुष्यात अथवा येणाऱ्या आयुष्यात ते आशीर्वाद गमावतात.  ते स्वर्गाच्या महालांमध्ये प्रवेश करू शकतात, आणि स्वातंत्र्य व ख्रिस्ताच्या व स्वर्गीय दूतांच्यासोबत, देवाच्या राजकुमारांच्या सोबत, असणारी समानता ह्याच्या अटींवर; आणि तरीही, कितीतरी उल्लेखनीय असे ते दिसले तरीही, ते स्वर्गीय आकर्षणापासून वळतात.  सर्व जगाचा निर्माता हा जे लोक त्याच्या एकलुत्या एका पुत्रावर त्यांचा वयक्तिक तारणारा म्हणून विश्वास ठेवतात, त्यांच्यावर तो पुत्राप्रमाणे प्रेम करतो. इकडे आणि आता देखील त्याची कृपाळू कृपामर्जी ही अशा प्रकारे अद्भुत रीतीने आपणास मिळते. लोकांना त्याने प्रकाशाचा वरदान आणि स्वर्गाचे वैभव दिले आहे, आणि त्याच्यासोबत त्याने सर्व स्वर्गाचे खजिने दिले आहेत. येणाऱ्या जीवनासाठी जितके त्याने अभिवचन दिले आहे, ह्या जीवनात तो देखील असे राजकीय वरदान देऊ करतो, आणि त्याच्या कृपेची पात्र म्हणून,  तो

आपणास सर्वकाही आनंदाने उपभोगण्यास संधी देतो जे आपल्या चारित्र्यांना उदात्त, उन्नत करून उंचावतात. वरील स्वर्गीय दरबारात आपणास बसवण्याची त्याची रचना आहे.

न्यायाची अपेक्षा असते की पापाची केवळ अशीच क्षमा केली जाऊ नये, पण मृत्यूची शिक्षा म्हणजे त्या व्यक्तीला मृत्यू देण्यातच आहे. देव, त्याच्या एकुलत्या एका पुत्राच्या वरदानाने, त्याने सर्व ह्या अटी पूर्ण केल्या. मनुष्याच्या ऐवजी मरण सहन करून, ख्रिस्ताने ती शिक्षा सहन केली आणि त्यामुळे आपणास क्षमा केली.

**(३) ख्रिस्त ह्या पृथ्वीवर जे सर्व लोक स्वीकार करतात त्यांच्यासाठी विपुल रीतीने काय देण्यासाठी येतो?**

***चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करायला येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे. (योहान १०:१०)***

हे जीवन म्हणजे आपल्याकडे काय असावे, आणि अधिक विपुल रीतीने

आपण ते जगावे. देव हे जीवन प्रत्येक जीवात्म्यात श्वास रूपाने घालेल जो स्वतःसाठी मरण पत्करून ख्रिस्तासाठी जगत असतो. पण त्यासाठी पूर्ण स्वयं-त्यागाची आवश्यकता असते. हे जोपर्यंत होत नाही, आपण आपल्यासोबत ती दुष्टाई घेतो ज्यामुळे आपला आनंद नष्ट होतो. पण जेव्हा स्वतःला क्रुसावर देण्यात येते, ख्रिस्त आपल्यात जगतो, आणि आत्म्याचे सामर्थ्य आपल्या सर्व परिश्रमांची दखल घेते.

देवाची जशी इच्छा आहे तसे आपण सर्वांनी व्हावे अशी माझी इच्छा आहे - प्रभूमध्ये सर्व प्रकाशित. एका उच्च दर्ज्यापर्यंत पोहोचण्याची आपल्याला गरज आहे, पण जोपर्यंत स्वतःला त्या वेदीवर बलिदान म्हणून देण्यात येत नाही तोपर्यंत हे आपण करू शकत नाही, जोपर्यंत आपण पवित्र आत्म्याला आपणावर नियंत्रण ठेऊ देत नाही, दैवी लोकांच्या नुसार तो आपणास बदलत व आकार देत नाही.

त्याने[विश्वास्नार्याने] मरण पत्करावे, जसे ख्रिस्त मरण पावला, पण तारणार्याचे जीवन हे त्याच्यात असते. त्याचे जीवन देवामध्ये ख्रिस्ताच्या सोबत

लपलेले आहे. “मी आलो की त्यांना जीवन प्राप्त व्हावे,” येशूने म्हंटले, “आणि अधिक विपुल रीतीने त्यांना ते प्राप्त व्हावे.” तो ती महान प्रक्रिया चालू ठेवतो ज्यामध्ये विश्वास्णारे त्याच्यासोबत एक असे केले जातात ह्या वर्तमान आयुष्यात, आणि सर्व युगासाठी सनातनकाळासाठी ते एकरूप असे होतात.

**(४) एका प्रेमळ मेंढपाळाप्रमाणे, प्रभू प्रत्येक जीवात्म्यासाठी काय करतो जणूकाही ते एकमेव होते ज्यांच्यासाठी तो मरण पावला?**

***कारण मनुष्याचा पुत्र ‘हरवलेले शोधण्यास व तारण्यास आला आहे.” (लूक १९:१०)***

प्रत्येक जीवात्मा येशूच्या प्रती पूर्ण जाणला जातो जणूकाही तो एकमेव असा होता ज्याच्यासाठी तारणारा मरण पावला. प्रत्येकाची व्याकुळता त्याच्या हृदयाला स्पर्श करून जाते. मदतीची ओरड त्याच्या कानावर पडते. तो सर्व लोकांना स्वतःकडे घेण्यासाठी आला. तो त्यांना बोलावतो, “माझ्यामागे या,” आणि त्याचा आत्मा त्यांच्या हृदयात कार्य

करतो जेणेकरून ते त्याच्याकडे आणण्यात येतात. अनेक लोक त्याच्याकडे येण्यास नकार देतात. येशूला ठाऊक आहे ते कोण आहेत. त्याचे पाचारण कोण आनंदाने ऐकतात हे देखील त्याला ठाऊक आहे, आणि त्याच्या पाळकीय संगोपनाच्या अधीन येण्यास तयार असतात. तो म्हणतो, “माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात, आणि मी त्यांना ओळखतो, आणि ते माझे अनुसरण करतात.” तो प्रत्येकाची अशी काळजी घेतो जणूकाही त्यांच्या व्यतिरिक्त ह्या पृथ्वीवर दुसरे कोणीही नाही.

“तो त्याच्या स्वतःच्या मेंढरांना नावाने हाक मारतो, आणि त्यांना पुढे घेऊन जातो.... आणि मेंढरे त्याच्यामागे जातात: कारण त्यांना त्याची वाणी ठाऊक असते.” पूर्वेकडील मेंढपाळ त्याच्या मेंढरांना कधीही हाकलून लावत नाही. जोर जबरदस्ती अथवा भय ह्यावर तो अवलंबून राहत नाही; पण पुढे जाऊन, तो त्यांना बोलावतो. त्यांना त्याची वाणी ठाऊक असते, आणि त्याचे आज्ञापालन ते करतात. तसेच तारणारा- मेंढपाळ त्याच्या मेंढरांच्या सोबत करतो. शास्त्रवचन म्हणते, “मोशे आणि अह्रोन

ह्यांच्या हाताने तू तुझ्या लोकांना एका कळपप्रमाणे चालवले.” संदेष्ट्याच्या द्वारे, येशू घोषित करतो, “मी तुझ्यावर सनातन काळच्या प्रेमाने प्रेम केले आहे : म्हणून प्रेमळ- दयेने मी तुला बोलावले आहे.” कोणालाही त्याचे अनुसरण करण्याची तो जबरदस्ती करत नाही. “मानवी बंधनांनी, प्रेमरज्जूंनी, मी त्यांना ओढले.” स्तोत्रसहिता ७७:२०; यिर्मया ३१:३; होशेय ११:४.

**(५) जेव्हा, ख्रिस्ताच्या जीवनात, आपण दया, कोमलता, कळवळा, आणि प्रेम हे पाहतो, त्याद्वारे कोणाचे चारित्र्य आणि गुणधर्म पाहत असतो?**

***येशूने त्याला म्हटले : “फिलिप्पा, मी इतका काळ तुमच्याजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर ‘आम्हांला पिता दाखवा’ असे तू कसे म्हणतोस? (योहान १४:९)***

विश्वाच्या देवाचे पावित्र्य आणि गौरव बघत असताना, आपण घाबरून जातो, कारण आपणास ठाऊक आहे की त्याचा न्याय दोषी लोकांना तसेच सोडून देणार नाही. पण आपण अशा आतंकात

राहण्याची गरज नाही; कारण ख्रिस्त जगात देवाचे चारित्र्य प्रगट करण्यासाठी आला, त्याच्या दत्तक घेण्यात आलेल्या लोकांसाठी त्याचे पित्याचे प्रेम त्याला दर्शवायचे होते. केवळ निसर्गाच्या बलाढ्य अशा कामांनी देवाच्या चारित्र्याचा आपण अंदाज मांडू नये, पण येशूच्या सोप्या, साध्या जीवनाच्या द्वारे, ज्यामध्ये यहोवा हा अधिक दयाळू, अधिक कनवाळू आणि आपल्या पृथ्वीवरील आई वडिलांच्या पेक्षा अधिक कोमल असा प्रस्तुत होतो.

येशूने पित्याचे असे प्रदर्शन केले की त्याच्यावर आपण आत्मविश्वास व्यक्त करू शकतो आणि आपल्या सर्व गरजा मांडू शकतो. जेव्हा देवाचा आतंक आपल्या मनात असतो, आणि त्याचे गौरव व वैभव ह्याच्या विचाराने आपण उत्साही होतो, पिता ख्रिस्ताकडे त्याचा प्रतिनिधी म्हणून बोट दाखवतो. येशुमध्ये जे प्रगट झालेले आपण पाहतो, कोमलता, कळवळा, आणि प्रेम, हे तर पित्याचे गुणधर्म आहेत. काल्वरीचा वधस्तंभ मनुष्याला देवाचे प्रेम प्रगट करतो. ख्रिस्त विश्वाच्या सार्वभौम देवाला प्रीतीचा देव म्हणून प्रस्तुत करतो. संदेष्ट्याच्या मुखाने तो म्हणाला, “परमेश्वराने दुरून

येऊन मला दर्शन दिले; तो म्हणाला, मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो म्हणून मी तुला वात्सल्याने जवळ केले आहे.” (यिर. ३१:३).

**(६) आपण जर ते प्राप्त करून घेण्याची निवड केली, तर आपल्याला काय मिळेल, ख्रिस्ताच्या संपत्तीच्या कृपेने आणि त्याच्या रक्त सांडण्याने आपल्याला काय मिळेल?**

***त्याच्या कृपेच्या समृद्धीप्रमाणे त्या प्रियकराच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून मिळवलेली मुक्ती, म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा, आपल्याला मिळाली आहे. (इफिसकरास पत्र १:७)***

जीवनाचा आणि गौरवाचा प्रभू ह्याने त्याचे दैवत्व मानवतेत परिधान केले मनुष्याला हे दाखवण्यास की देवाने ख्रिस्ताच्या वर्दानाच्या द्वारे आपल्याला त्याच्याशी जोडले आहे. देवाशी तो संबंध जोडल्या गेल्या शिवाय कोणीही आनंदी होऊ शकत नाही. पतन पावलेल्या मनुष्याने हे शिकले पाहिजे की स्वर्गीय पिता तृप्त होऊ शकत नाही जोपर्यंत त्याचे प्रेम हे पश्चाताप करणाऱ्या पापी

व्यक्तीला आलिंगन देत नाही, देवाच्या दोषरहित कोक्र्याच्या फायद्यांनी तो बदलला जातो.

सर्व स्वर्गीय बुद्धिमत्तेचे कार्य ह्याच दिशेला नेते. त्यांच्या सरदाराच्या आज्ञेच्या अंतर्गत त्यांनी अशा लोकांसाठी कार्य करायचे आहे ज्यांनी अधर्म करून स्वतःला त्यांच्या स्वर्गीय पित्यापासून दूर केले आहे. एक योजना आखण्यात आली ज्याद्वारे ख्रिस्ताची अद्भुत कृपा आणि प्रेम हे जगासमोर प्रगट करण्यात येईल. देवाच्या पुत्राने मनुष्यास एक खंडणी म्हणून देण्यासाठी जी अमर्याद किमत मोजली, त्यामध्ये देवाचे प्रेम प्रगट होते. उद्धाराची हि गौरवी योजना संपूर्ण जगाचे तारण करण्यासाठी पुरेशी आहे. पापी आणि पतन पावलेले लोक हे येशुमध्ये पापाची क्षमा होण्याच्या द्वारे आणि ख्रिस्ताच्या नितीम्त्वाच्या द्वारे परिपूर्ण केले जातात.

**(७) आपल्या अधर्मांसाठी जर त्याच्या जखमा आपण स्वीकारल्या, आपल्या पापांसाठी त्याचे वर्ण जर कबूल केले, आणि आपल्याला शांती मिळावी म्हणून**

**त्याचे ताडन जर स्वीकारले, त्याच्या दुखसहनाचे फटके आपल्या जीवात्म्यासाठी काय घेऊन येतील?**

***खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले. (यशया ५३:५)***

शक्य झाले तर, ख्रिस्ताच्या दुखसहनाचा स्वभाव आणि त्याची तीव्रता ह्यांची कल्पना करा. मानवते मधील हे दुखसहन म्हणजे ज्या लोकांसाठी ख्रिस्त मरण पावला त्यांच्यावर देवाचा क्रोध उतरून येऊ नये ह्याच्यापासून परावृत्त करण्यासाठी होता.  तरीही, मंडळीसाठी हे महान अर्पण संपूर्ण सनातन काळासाठी प्रभावी होतात. तिच्या अधर्माची तीव्रता आपण संख्येत मोजू शकतो का? अशक्य. मग जेव्हा ख्रिस्त त्याच्या मंडळीसाठी खात्री म्हणून उभा राहिला तेव्हा त्याने जे काही सहन केले त्याविषयी कोण समजून घेऊ शकतात....? [तो एकमेव होता] जो पापी व्यक्तीच्या वतीने ते प्रहार सहन करू शकत होता आणि त्याच्या ह्या निष्पाप

वृत्तीमुळे भस्म झालो नाही. देवाच्या एकुलत्या एका पुत्राच्या अर्पनात दैवी न्यायाचे अद्भुत गौरव आणि पावित्र्य हे दिसून येतात.

त्याच्या स्वतःच्या जीवनाची शपथ वाहून ख्रिस्ताने पृथ्वीवरील प्रत्येक स्त्री आणि पुरुषाची जवाबदारी स्वतःवर घेतली आहे. देवाच्या सान्निध्यात उभा राहून तो म्हणतो, “पित्या, त्या जीवात्म्याचा दोष मी स्वतःवर घेतो. त्याचा अर्थ जर त्याला मृत्यू सहन करावा लागला तर ते देखील सिद्ध होते. त्याने जर पश्चाताप केला तर त्याची क्षमा करण्यात येईल. माझे रक्त त्याला सर्व पापांपासून शुद्ध करेल. जगाच्या पापांसाठी मी माझे जीवन देऊन टाकले.”

**(८) सर्व अनितीपासून शुद्ध होऊन त्याच्या झग्याने आच्छादिले जाण्यासाठी आपली भूमिका काय आहे?**

***जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील. (१ योहान १:९)***

तुम्ही पापी असून स्वतः काहीच करू शकत नाही असे दिसेल; पण हे तर खरे आहे की तुम्हाला एका तारणारयाची गरज आहे. जर तुम्हाला पापांची कबुली द्यायची असेल, तर वेळ घालवू नका. हे क्षण सुवर्ण असतात. “जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील” (१ योहान १:९). ज लोक नितीमत्वाच्या मागे तहानले आणि भुकेले असतात ते तृप्त होतील; कारण येशूने तसे अभिवचन दिले आहे. अनमोल तारणारा! त्याचे हात आपला स्वीकार करण्यास खुले आहेत, आणि त्याचे प्रेम करणारे महान हृदय आपणास आशीर्वाद देण्यास वाट पाहत आहे.

मनुष्यांच्या संतानाप्रती तारणार्याने किती हे शब्दात व्यक्त न करता येणारे प्रेम दर्शवले आहे! तो केवळ पापाचा दोष काढून टाकतो इतकेच नाही, तर जीवात्म्याला शुद्ध करून स्वच्छ करतो, त्याच्या स्वतःच्या नितीमत्वाच्या झग्यात त्याला झाकून टाकतो, जे स्वर्गाच्या सुटत विणले गेले आहे आणि

त्यावर कोणताच डाग नाही. पापी माणसाच्या जीवनातून तो शाप काढून टाकतो इतकेच नाही, तर त्याला स्वतःमध्ये एकरूप करतो, त्याच्या नितीमत्वाचे महान किरण त्याद्वारे बाहेर पडू देतो. स्वर्गीय विश्व त्याचे स्वागत करते, देवाच्या प्रिय पुत्रामध्ये त्याला स्वीकारण्यात येते. पतन पावलेला मनुष्य, त्याचा विश्वास आणि पश्चाताप ह्याद्वारे देवाला कितीतरी अधिक गौरव देऊ शकतात!

**(९) ख्रिस्त त्याच्या प्रत्येक "मेंढरांना" कसे पाचारण करतो जे त्याचे अलौकिक प्रेम आणि जिव्हाळा आपल्यासाठी प्रगट करतात?**

***त्याच्यासाठी द्वारपाळ दार उघडतो; मेंढरे त्याची वाणी ऐकतात आणि तो आपल्या मेंढरांना ज्याच्या-त्याच्या नावाने हाक मारतो व त्यांना बाहेर नेतो. (योहान १०:३)***

प्रत्येक जीवात्मा येशूच्या प्रती पूर्ण जाणला जातो जणूकाही तो एकमेव असा होता ज्याच्यासाठी तारणारा मरण पावला. प्रत्येकाची व्याकुळता त्याच्या हृदयाला स्पर्श करून जाते. मदतीची

ओरड त्याच्या कानावर पडते. तो सर्व लोकांना स्वतःकडे घेण्यासाठी आला. तो त्यांना बोलावतो, “माझ्यामागे या,” आणि त्याचा आत्मा त्यांच्या हृदयात कार्य करतो जेणेकरून ते त्याच्याकडे आणण्यात येतात. अनेक लोक त्याच्याकडे येण्यास नकार देतात. येशूला ठाऊक आहे ते कोण आहेत. त्याचे पाचारण कोण आनंदाने ऐकतात हे देखील त्याला ठाऊक आहे, आणि त्याच्या पाळकीय संगोपनाच्या अधीन येण्यास तयार असतात. तो म्हणतो, “माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात, आणि मी त्यांना ओळखतो, आणि ते माझे अनुसरण करतात.” तो प्रत्येकाची अशी काळजी घेतो जणूकाही त्यांच्या व्यतिरिक्त ह्या पृथ्वीवर दुसरे कोणीही नाही.

“तो त्याच्या स्वतःच्या मेंढरांना नावाने हाक मारतो, आणि त्यांना पुढे घेऊन जातो.... आणि मेंढरे त्याच्यामागे जातात: कारण त्यांना त्याची वाणी ठाऊक असते.” पूर्वेकडील मेंढपाळ त्याच्या मेंढरांना कधीही हाकलून लावत नाही. जोर जबरदस्ती अथवा भय ह्यावर तो अवलंबून राहत नाही; पण पुढे जाऊन, तो त्यांना बोलावतो. त्यांना त्याची वाणी

ठाऊक असते, आणि त्याचे आज्ञापालन ते करतात. तसेच तारणारा- मेंढपाळ त्याच्या मेंढरांच्या सोबत करतो. शास्त्रवचन म्हणते, “मोशे आणि अह्रोन ह्यांच्या हाताने तू तुझ्या लोकांना एका कळपप्रमाणे चालवले.” संदेष्ट्याच्या द्वारे, येशू घोषित करतो, “मी तुझ्यावर सनातन काळच्या प्रेमाने प्रेम केले आहे : म्हणून प्रेमळ- दयेने मी तुला बोलावले आहे.” कोणालाही त्याचे अनुसरण करण्याची तो जबरदस्ती करत नाही. “मानवी बंधनांनी, प्रेमरज्जूंनी, मी त्यांना ओढले.” स्तोत्रसहिता ७७:२०; यिर्मया ३१:३; होशेय ११:४.

शिक्षेची भीती नसते, किंवा त्या सनातन प्रतिफळाची आशा नाही, जे ख्रिस्ताच्या शिष्यांना त्याचे अनुसरण करण्यास प्रेरित करतात. ते तारणार्याचे अतुलनीय प्रेम पाहतात, ह्या पृथ्वीवरील त्याच्या यात्रेतून प्रगट होते, बेथलेहेमाच्या त्या गोठ्यातून काल्वरीच्या कृसापर्यंत, आणि त्याचे ते दृश्य आकर्षित करते, जीवात्म्याला ते मृदू करून शरण जाण्यास भाग पाडते. जे पाहणारे असतात त्यांच्या हृदयात प्रेम जागृत होते. ते त्याची वाणी ऐकतात, आणि ते लोक त्याच्यामागे येतात.

मी आभारी आहे की देव मला त्याच्याकडे एका प्रेमळ, संयमी, दयाळू वृत्तीने आणि खोलवर विचार करून स्वतःकडे बोलावतो आणि सैतानाची जबरदस्ती करण्याची पद्धत तो वापरत नाही.

गोल करा :    होय    अनिश्चित

मी इतका आभारी आहे की, देवाचे ख्रिस्ताच्या रूपातील वरदान जे आहे त्याद्वारे, माझा बचाव करण्यासाठी ती खंडणी भरण्यात आली आहे. मी हे अद्भुत अमर असे वतन स्वीकारतो जेणेकरून तो हे जे कोणी त्याचा स्वीकार करतील त्यांना अत्यंत कृपाळू रीतीने देतो.

गोल करा :    होय    अनिश्चित

देवाच्या दयेने, मी निवड करतो, गर्व स्वार्थीपणा ह्यापासून वळतो आणि तो ह्या जीवनात आणि येणाऱ्या जीवनात जे

आशीर्वाद आणि राजकीय वरदाने देऊ करतो त्यांचा स्वीकार करतो.

गोल करा : होय अनिश्चित

व्यक्तीशः ख्रिस्त मला जे त्याच्याकडे येण्याचे पाचारण करतो ते मी ऐकतो आणि त्याद्वारे स्वयं- त्यागाच्या वेदीवर माझे जीवन अर्पण करण्याची निवड करतो. माझ्या जीवनाच्या द्वारे त्याची इच्छा विपुल रीतीन्न जगली जावी म्हणून मी तसे मागतो आणि तशी परवानगी देतो.

गोल करा : होय अनिश्चित

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________



# धडा ९
# वधस्तंभाकडे पाहणे

**(१) येशूचे आपल्यावरील जे महान प्रेम आहे त्यामुळे त्याला जी वर्तणूक सहन करावी लागली त्याचे वर्णन शास्त्रवचन कसे करते?**

***त्याचे हालहाल केले तरी ते त्याने सोसले, आपले तोंडसुद्‌धा उघडले नाही; वधण्यास नेत असलेल्या कोकराप्रमाणे, लोकर कातरणाऱ्यांपुढे गप्प राहणाऱ्या मेंढराप्रमाणे, तो गप्प राहिला; त्याने आपले तोंड उघडले नाही. (यशया ५३:७)***

ख्रिस्ताकडे बघण्यात, आपल्याला दिसते की त्याच्या प्रेमाची दुसरी काहीच तोड नाही, त्याने दोषी पापी व्यक्तीची जागा घेतली, आणि त्याने त्याच्यावर ते दोषरहित नितीमत्व प्रदान केले आहे.

जेव्हा पापी व्यक्ती त्याच्या ऐवजी त्याच्या तारणार्याला वधस्तंभावर मरण सहन करत असताना त्या पापाच्या शापाच्या अधीन पाहते, त्याचे ते क्षमा करणारे प्रेम बघून, त्याच्या हृदयात ते प्रेम जागृत होते. पापी व्यक्ती ख्रिस्तावर प्रेम करते, कारण ख्रिस्ताने प्रथम त्याच्यावर प्रेम केले, आणि प्रेम हे नियमशास्त्राची पूर्तता आहे. पश्चाताप करणाऱ्या जीवात्म्याला जाणीव होते की देव "हा विश्वासू आहे आणि आपल्या पापांची क्षमा करण्यास न्यायी आहे, आणि त्याद्वारे आपले सर्व अनितीमत्व तो शुद्ध करतो." देवाचा आत्मा विश्वासनार्याच्या जीवात्म्यात कार्य करतो, त्याला एका आज्ञापालन करणाऱ्या स्तरापासून दुसऱ्या स्तरापर्यंत नेते, एका शक्तीपासून दुसऱ्या शक्तीपर्यंत जाण्यापर्यंत, येशू ख्रिस्तामध्ये कृपेतून कृपेमध्ये ते जाते. {१ एसएम ३७४}

माझा पिता तुमच्यावर अशा प्रेमाने प्रेम करतो व ते प्रेम बांधलेले नाही आणि माझ्यावर अधिक करतो कारण मी माझे जीवन तुमचा उद्धार करण्यास दिले. त्याचे तुमच्यावर प्रेम आहे, आणि मी तुमच्यावर प्रेम करतो म्हणून त्याचे

माझ्यावर जास्त प्रेम आहे, आणि माझे जीवन मी तुम्हाला देतो. . . . शिष्यांना हे चांगले समजले ते प्रेम कारण त्यांनी तारणार्याला ती लज्जा, धिक्कार, शंका, आणि त्याग हे सहन करताना पाहिले, त्या बागेत त्यांनी त्याची वेदना पाहिली, आणि त्याचा मृत्यू काल्वरीच्या क्रुसावर पाहिला. हेच ते प्रेम आहे ज्याची खोली कोणीही समजून घेऊ शकत नाही. ज्या प्रमाणे शिष्यांना ते समजले, त्यांची जी समाज आहे त्यात देवाचा कळवळा व्यक्त झाला, त्यांना जाणीव झाली की अशी एक भावना आहे ज्यामध्ये पुत्राचे दुखसहन हे पित्याचे द्केहील दुखसहन होते. {टीएमके ६९}

**(२) जीवनाच्या यातनांवर जर आपण वस्ती केली नाही आणि त्या ऐवजी जर येशू आपला तारणारा म्हणून बघितले, उदाहरणार्थ, आणि उत्तम चारित्र्याचा नमुना म्हणून, आपल्यामध्ये तो कशाची उत्पत्ती करून त्याची समाप्ती करेल?**

***आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहत असावे; जो आनंद त्याच्यापुढे होता त्याकरता त्याने लज्जा तुच्छ मानून वधस्तंभ सहन केला, आणि तो***

*देवाच्या राजासनाच्या उजवीकडे बसला आहे. (इब्री १२:२)*

देवाची लेकरे म्हणून, वर पाहणे हे आपले सौभाग्य आहे, आपल्या विश्वासाचे नेत्र ख्रिस्तावर केंद्रित केले पाहिजेत. त्याचा चेहरा सतत आपण डोळ्यापुढे ठेवतो म्हणून, त्याच्या सान्निध्याचा सूर्यप्रकाश मनाला तुडुंब भरून टाकतो. ख्रिस्ताचा प्रकाश जो जीवात्म्यात - त्या मंदिरात दिसतो तो शांती घेऊन येतो. जिवात्मा देवावर केंद्रित आहे. सर्व यातना आणि क्लेश हे येशूला समर्पित होतात. आपण त्याला बघण्याचे जसे थांबवत नाही, त्याची प्रतिमा आपल्या हृदयावर कोरली जाते, आणि रोजच्या जीवनात ती प्रगट होते.

कोणत्याही मनुष्याची आपण नकल करू नये. असा कोणताही मनुष्य तितका सुज्ञ नाही ज्याला आपण तो वर्ग किंवा ती अट म्हणून ठेवू शकतो. ख्रिस्त येशू ह्याकडे आपण बघितले पाहिजे, जो नितीमत्व आणि पावित्र्य ह्याच्या परिपूर्णतेत पूर्ण आहे. तो आपल्या विश्वासाचा उत्पादक आणि पूर्णकर्ता आहे. तोच ती पद्धत आणि नमुना देतो.आपल्याला जो अनुभव मिळवायचा

आहे तो त्याचाच अनुभव आहे. त्याचे चारित्र्य आपला नमुना आहे. आपले मन, मग त्याच्या या यातना आणि जीवनाचे संघर्ष ह्यावरून काढून टाकू, आणि त्याच्याकडे पाहू, की त्याच्याकडे पाहत राहण्याने आपण त्याच्या प्रतीरुपात बदलून जावे. चांगल्या हेतूसाठी आपण ख्रिस्ताकडे बघत राहावे. आपण सुरक्षित रीतीने त्याच्याकडे बघत राहावे; कारण तो सर्वज्ञ आहे. गौरवाची आशा, म्हणून तो आपल्यात रचला जाईल.

**(३) कोकर्याच्या रक्ताद्वारे आणि त्याच्या कृपेचे धन आणि समृद्धी ह्याद्वारे आपल्याला काय मिळते आणि आपली मने त्यावर मनन करू शकतील असे सर्वोच्च गमक काय आहे?**

***हे इस्राएला, परमेश्वराची आशा धर, कारण परमेश्वराच्या ठायी दया आहे; त्याच्याजवळ उद्धार विपुल आहे. (स्तोत्रसहिता १३०:७)***

तारणाची योजना, देवाचा न्याय आणि प्रेम हे व्यक्त करत, एक सनातन सुरक्षास्थान देतात ह्या पतन पावलेल्या जगातील त्रुटींच्या विरोधात, आणि त्यांच्या विरुद्ध देखील ज्यांचा उद्धार

कोकर्याच्या रक्ताच्या द्वारे झाला आहे. आपली एकमेव आशा म्हणजे त्याच्या रक्तात पूर्ण विश्वास ठेवणे आणि जे सर्व देवाकडे ह्याद्वारे येतात त्यांच्यासाठी हे लागू पडते. काल्वरीच्या वधस्तंभावर ख्रिस्ताचा मृत्यू आपली ह्या जगामधील एकमेव आशा आहे, आणि येणाऱ्या विश्वासाठी ते आपले गमक असेल. आपल्याला त्या खंडणीचा अंदाज आणि मूल्य हे समजत नाही ! आपण जर तसे केले, त्याविषयी आपण अधिक बोलू शकतो. त्याच्या प्रिय पुत्राच्या द्वारे देवाचे वरदान हेच अग्रहनीय प्रेमाचे प्रदर्शन आहे. ते सर्वात उच्चतर होते की देव त्याच्या नियमशास्त्राचा सन्मान जतन करेल, आणि तरीही उल्लंघन करणाऱ्याचा बचाव करेल. मनुष्याने उद्धाराचे हे गमक त्याचा अभ्यास का करू नये? मानवी मनाला व्यस्त ठेवणारा तो सर्वाधिक विषय आहे. मनुष्यांना जर ख्रिस्ताचे प्रेम समजले असते, जे क्रुसावर दिसते, त्यांचा विश्वास दृढ झाला असता त्याच्या सांडलेल्या रक्ताच्या अनुरूप, आणि ते शुद्ध होऊन सर्व पापांपासून शुद्ध होऊ शकतील.

**(४) प्रेमाचे कोणते चार पायाभूत असणारे गुणधर्म वधस्तंभावर ख्रिस्ताने**

**व्यक्त केले जेव्हा त्याने आपला दैवी पर्याय म्हणून क्रुसावर निस्वार्थीपणे आणि स्वेच्छेने जीवन अर्पिले?**

***नीती व न्याय ही तुझ्या राजासनाचा पाया आहेत; दया व सत्य तुझे सेवक आहेत. (स्तोत्रसहिता ८९:१४)***

स्वेच्छेने आपल्या दैवी पर्याय म्हणून ज्याने जागा घेतली त्याने आपला जीव त्या न्यायाच्या तलवारीप्रत दिली, जेणेकरून आपला नाश होऊ नये तर आपणास सनातन जीवन प्राप्त व्हावे. ख्रिस्ताने म्हंटले, “मी आपला प्राण परत घेण्याकरता देतो म्हणून पिता माझ्यावर प्रीती करतो. कोणी तो माझ्यापासून घेत नाही, तर मी होऊनच तो देतो. मला तो देण्याचा अधिकार आहे व तो परत घेण्याचाही अधिकार आहे. ही आज्ञा मला माझ्या पित्यापासून प्राप्त झाली आहे.” (योहान १०:१७,१८). पृथ्वीवरील कोणताही मनुष्य अथवा स्वर्गाचा देवदूत हे पापासाठी शिक्षा घेऊ शकत नाही. येशू हा एकमेव होता जो बंडखोर मनुष्याचा बचाव करू शकत होता. त्याच्यामध्ये दैवत्व आणि मानवता हे एकत्र जोडले गेले, आणि ह्यानेच काल्वरीच्या कृसासाठीते अर्पण म्हणून दिले. क्रुसावर

दया आणि सत्य एकत्र भेटले, नितीमत्व आणि शांती ह्यांनी एकमेकांचे चुंबन घेतले आहे.

निस्वार्थी प्रेमाचे प्रदर्शन जसे येशूचे स्वतःचे स्वेछेचे अर्पण जे त्याने मनुष्याचा उद्धार करण्यासाठी दिले हे पित्याच्या प्रेमाचे कारण बनले. पृथ्वीच्या निर्मितीपूर्वी तारणाची योजना हि मांडण्यात आली होती (प्रग. १३:८). क्रुसावर जाणे ह्यासारखे येशूचे पुनरुत्थान देखील त्या सनातन योजनेचा भाग होते. येशू त्या मृत्युच्या सत्तेच्या अंतर्गत थोड्या काळासाठी आला (स्तो. १६:१०; सीएफ. प्रेषित २:३१,३२) आणि मग गौरवी होऊन जीवन आणि पुनरुत्थान बनण्यास पुढे आला (योहान ११:२५) आणि माणसाचा मध्यस्थ होण्यास (इब्री. ७:२५). ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले (फिल. २:९).

**(५) उद्धार आणि वधस्तंभ ह्यांच्या योजनेला जर आपण समजून घेण्याचा प्रयत्न केला तर, योहानासारखे, जगाला ह्याची घोषणा करण्यास आपल्याला कशात आनंद होईल?**

*दुसऱ्या दिवशी येशूला आपणाकडे येताना पाहून तो म्हणाला, "हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा! (योहान १:२९)*

जेव्हा ख्रिस्ताच्या क्रुसावर आपले लक्ष केंद्रित होते, संपूर्ण अस्तित्व हे उदात्त होते. तारणार्याचे प्रेम व त्याचे ज्ञान जीवाला शरण येण्यास प्रवृत्त करते, आणि वेळ व भावना ह्यांवर मनाला उंच करते. क्रुसाच्या मधून जो प्रकाश चमकतो त्यामधून सर्व तात्पुरत्या गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. अपमानित होण्याच्या खोली आपण समजून घेतल्या पाहिजे ज्याप्रत आपला तारणारा आला आणि त्याने मनुष्याला सर्व सनातन धनाचा सहभागी बनवले. आपण उद्धाराच्या योजनेचा जसा अभ्यास करतो, हृदयात त्या तारणार्याच्या प्रेमाची जाणीव होते, आणि चारित्र्याचे सर्व गुण त्याला लुभावणारे वाटतात.

ख्रिस्ताचे प्रेम आपल्यासाठी तो स्वर्ग बनते. पण जेव्हा त्याच प्रेमाबद्दल आपण सांगतो, भाषा अपुरी पडते. पृथ्वीवरील त्याच्या जीवनाचा जेव्हा आपण विचार करतो, त्याचे आपल्यासाठी

जे बलिदान होते; आपण स्वर्गातील त्याच्या कार्याचा विचार करतो जो आपला वकील बनला, जे त्यावर प्रेम करतात त्यांच्यासाठी जे महाल तो तयार करत आहे; आणि आपण हे उद्‌गार काढू शकतो, "ख्रिस्ताच्या प्रेमाची उंची आणि खोली कितीतरी अधिक आहे!" क्रुसाच्या खाली जसे आपण भटकतो, देवाच्या प्रेमाची पुसटशी कल्पना आपल्याला येते, आणि आपण म्हणतो, "ह्या ठिकाणी प्रेम आहे, आपण देवावर प्रेम केले असे नाही, पण त्याने आपल्यावर प्रेम केले, आणि आपल्या पापांचे प्रायश्चित म्हणून त्याच्या पुत्राला पाठवले." पण आपल्या ख्रिस्ताला समजून घेण्याच्या प्रयत्नात, आपण अशा प्रेमाच्या भोवती घुटमळत राहतो ज्याची सीमा मर्यादित नाही. त्याचे प्रेम म्हणजे एक महान समुद्र आहे, त्याचा कोन्ताची तळ किंवा किनार नाही.

सर्व खऱ्या शिष्यांमध्ये हे प्रेम, एका पवित्र अग्नीप्रमाणे, हृदयाच्या वेदीवर तेवत राहते. पृथ्वीवर येशूच्या द्‌वारे देवाचे प्रेम हे प्रगट झाले. ह्याच पृथ्वीवर अशा निर्दोष जीवनाच्या द्‌वारे त्याच्या लेकरांनी हे प्रेम व्यक्त करायचे आहे. म्हणूनच पापी लोक अशा प्रकारे

वधस्तंभाकडे घेण्यात येतील, आणि देवाच्या कोकर्याला पाहतील.

**(६) ख्रिस्ताकडे बघून त्याचे गौरव न्याहाळल्यावर काय होईल, त्याचे पवित्र चारित्र्य, आणि त्याच्या अतुलनीय प्रेमाचे सर्व पैलू?**

***परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडत आहोत; आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत. (२ करिंथकरास पत्र ३:१८)***

ख्रिस्ताकडे पहा, त्याच्या चारित्र्याचे आकर्षक प्रेम हे व्यक्त होते, आणि असे पाहण्यानेतुम्ही त्याच्या रुपात बदलून जाल. ख्रिस्त आणि जीवात्म्याच्या मध्ये जे दव मध्यस्थ म्हणून काम करते ते परत काढून टाकण्यात येईल जर आपण विश्वासाने सैतानाच्या नरकाच्या छायेखाली लपतात आणि त्याच्या नियमशास्त्रात आपण देवाचे गौरव पाहू, आणि त्यातच त्याचे नितीमत्व देखील पाहण्याची संधी आपल्याला मिळेल.

सैतान येशूला आपल्या दृष्टीसमोरून काढून टाकण्याचा प्रयत्न करत आहे, त्याचा प्रकाश एक ग्रहण म्हणून यावा; कारण जेव्हा त्याच्या गौरवाची एक झलक पाहण्यास आपल्याला मिळते, आपण त्याच्याकडे आकर्षित होतो. पाप येशूच्या ह्या अतुलनीय लौकिकाला लपवते; गर्व, विनाकारण नावड, स्वार्थीपणा, स्वयं- धार्मिकता, आणि आवेश हे आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधतात, जेणेकरून आपण आपल्या तारणार्याला ओळखत नाही. जर आपण विश्वासाने ख्रिस्ताच्या जवळ गेलो तर, तो आपल्याला त्याचे गौरव दाखवेल, जे त्याचे चारित्र्य आहे, आणि देवाची स्तुती ही मानवी हृदयातून बाहेर पडते आणि मानवी वाणीने ऐकण्यात येते. मग सदैव आपण सैतानाला गौरव देण्याचे थांबवू देवाच्या विरुद्ध पाप करण्याने आणि नेहमी अविश्वास आणि शंका ह्याविषयी बोलत. आपण ह्यापुढे आता अडखळू नये, तक्रार करत रडत बसू नये, आणि देवाच्या वेदीला अश्रूंना भरून टाकतो.

**(७) पौलासारखे, आपल्या ओठांनी कोणत्या मोठ्या गमकाविषयी बोलावे आणि आपल्या मनाने सदैव मनन करावे?**

***कारण येशू ख्रिस्त, म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला. (१ करिंथकरास पत्र २:२)***

मनन करण्यासाठी काय हे गमक आहे की पापी लोकांसाठी येशूने जे अर्पण दिले! "खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले." {यशया ५३:५}.

आपल्यापर्यंत जे आशीर्वाद येतात त्याचा अंदाज आपण कसा व्यक्त करू शकतो? येशूने अधिक दुखसहन केले असते का? अधिक धनवान आशीर्वाद प्राप्त करून घेण्यासाठी त्याने आपल्याला विकत घेतले असते का? हे ऐकून सर्वात कठीण हृदय वितळनार नाही का जेव्हा आपल्याला लक्षात राहते की त्याने स्वर्गातील आनंद आणि सुख हे सोडून आपल्यासाठी लज्जा आणि दारिद्र्य, यातना आणि भयंकर मृत्यू  सहन केले? त्याने त्याच्या मृत्यू आणि पुनरुत्थानाने आपल्यासाठी ते आशेचे द्वार खुले केले

नसते का, पण आपल्याला अंधकाराचे भयंकर रूप आणि निराशा ह्याविषयी अधिक काहीच माहिती नसती. आपल्या वर्तमान अवस्थेत, आपण जसे आशीर्वादित आणि मर्जी संपादन केलेले आहोत, कोणत्या खोलीतून आपली सुटिका झाली ह्याची जाणीव आपणास नाही.आपल्या यातना किती खोलवर असू शकता हे आपण मोजू शकत नाही, आपले दुख कितीही मोठे असतील, जर येशूने त्याच्या दयेच्या आणि प्रेमाच्या हाताने आपणास वर उंचावले नसते तर काय झाले असते.

**(८) पौलासारखे, जे लोक तारणाचा स्वीकार ख्रिस्तामध्ये करतात ते कोणत्या गमकावर उत्साहाने फुशारकी मारू शकतात?**

*आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाही अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो; त्याच्या द्वारे जग मला वधस्तंभावर खिळलेले आहे व जगाला मी वधस्तंभावर खिळलेला आहे. (गलतीकरास पत्र ६:१४)*

अनेक लोक जे ख्रिस्ती म्हणवण्याचे स्वतःला भासवतात हे जगिक कामात उत्साही होतात, आणि नवीन व उत्साही विनोदांच्या प्रती त्यांचे स्वारस्य जागृत होते, आणि जेव्हा ते थंड पडतात, आणि देवाच्या कार्याच्या बद्दल ते एकदम गोठून गेले असे दिसतात. इकडे एक गमक आहे, दीन व्यक्ती जी औपचारिक रीतीने वागते, जे तुम्हाला उत्साही करण्यास पुरेसे आहे. ह्याच ठिकाणी सनातन स्वारस्य महत्वाचे असते. ह्या गमकावर पापाला शांत व सुप्त करण्याची गरज आहे. काल्वरीचे देखावे हे सर्वात गंभीर भावना उत्पन्न करतात. ह्याच विषयावर जर तुम्ही उत्साह दाखवला तर ती एक सबब बनते. ख्रिस्त, इतका उत्कृष्ट, इतका निष्पाप, ह्याने एक वेदनामय मृत्यू सहन करावा, संपूर्ण जगाचे पाप स्वतःवर सहन करावे, आपल्याला विचार आणि कल्पना ह्यांनी देखील ग्रहण होणार नाही. अशा अद्भुत प्रेमाची उंची, खोली, लांबी रुंदी कोणीही समजून घेऊ शकत नाही. तारणार्याच्या प्रेमाच्या अशा अतुलनीय खोली कोणत्याही मनाला ग्रहण होत नाहीत, जीवात्म्याला स्पर्श करून वितळवू शकत नाहीत, यातना सुधारून त्यांना शुद्ध करू शकत नाही, आणि अशा रीतीने पूर्ण

जीवाला बदलून टाकतात. प्रेषिताची भाषा ही अशी असते: “तुमच्यामध्ये इतर काहीही जाणून न घेण्याचा मी निश्चित करतो, केवळ येशू ख्रिस्त आणि त्याचा वधस्तंभ वगळता.” काल्वरीकडे आपण बघून बोलू शकतो: “मी गौरव करावे असे देवाच्या कृपेने होऊ नये, केवळ प्रभू येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभात गौरव करतो, ज्याच्या द्वारे माझ्यासाठी हे जग क्रुसावर देण्यात आले आहे, आणि मी जगाच्या प्रती क्रुसावर गेलो आहे.’’

**(९) सर्व संतगणांच्या सोबत, आपण सनातन काळ समजून घेऊन, कोठे तो घालवू?**

***तिची रुंदी, लांबी, उंची व खोली किती, हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घेण्यास व बुद्धीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती ओळखून घेण्यास शक्तिमान व्हावे; असे की तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे. (इफिसकरास पत्र ३:१८-१९)***

ख्रिस्ताचे हेच ते प्रेम आहे जे आपला स्वर्ग बनवतात. पण ह्याच प्रेमाविषयी जेव्हा आपण इतरांना सांगण्याचा प्रयत्न करतो,भाषा अपुरी पडते. पृथ्वीवरील

त्याच्या आयुष्याचा विचार करा, त्याने जे अर्पण आपल्यासाठी दिले; स्वर्गातील त्याचे जे काय आहे आपला वकील म्हणून त्याच्याकडे आपण बघतो, ज्यांचे त्याच्यावर प्रेम आहे त्या महालाच्या विषयी विचार करता; आणि त्याविषयी आपण उच्चारतो, "ख्रिस्ताच्या प्रेमाची काय ही उंची आणि खोली काय आहे!" वधस्तंभाच्या खाली जसे आपण फिरतो, देवाच्या प्रेमाची पुसटशी कल्पना आपणास मिळते, आणि आपण म्हणतो, "ह्या ठिकाणी हे प्रेम आहे, आपण देवावर प्रेम केले असे नाही, पण त्याने आपल्यावर प्रेम केले, आणि त्याच्या पुत्राला आपल्यासाठी प्रायश्चित म्हणून पाठवले." पण आपण ख्रिस्ताला जसे समजून घेतो, अमर्याद आणि न मोजता येऊ शकणार्या प्रेमाभोवती आपण घुटमळत आहोत. त्याचे प्रेम हे त्या महान समुद्रासारखे आहे, ज्याचे पाया किंवा तळ नाही.

सर्व खर्‍या शिष्यांमध्ये, हे प्रेम, एका पवित्र अग्नीप्रमाणे, हृदयाच्या वेदीवर चमकत राहते. पृथ्वीवर देवाचे प्रेम हे येशूच्या द्वारे प्रगट होते. पृथ्वीवर असताना त्याच्या लेकरांनी हेच प्रेम अशा प्रकारे निर्दोष जीवने ह्यांच्याद्वारे व्यक्त

होते. म्हणूनच पापी लोक वधस्तंभाकडे नेण्यात येतात, आणि त्याद्वारे देवाच्या कोक्र्याकडे त्यांना  बघावे लागते. {आरएच, ५/६/१९०२}

**(१०) संपूर्ण सनातनकाळात काय ते शब्द असतील जे विश्वातील प्रत्येक निर्मितीच्या मधून बाहेर पडतील जसे ते ह्या वधस्तंभाचे पूर्ण महत्व समजून घेण्याचा प्रयत्न करतील?**

***"हे प्रभो, आमच्या देवा, गौरव, सन्मान व सामर्थ्य ह्यांचा स्वीकार करण्यास तू योग्य आहेस; कारण तू सर्वकाही निर्माण केलेस, तुझ्या इच्छेने ते झाले व अस्तित्वात आले." (प्रगटीकरण ४:११)***

ह्या जीवनात आपल्याला केवळ उद्धाराची हि महान योजना समजू शकते त्याची सुरुवात केवळ होऊ शकते. आपल्या मर्यादित समजशक्तीने आपण ती लज्जा आणि गौरव, जीवन आणि मृत्यू, न्याय आणि दया जे कृसात एकत्र येतात हे समजून घेऊ शकतो; तरीही आपली बुद्धी आपण कितीही ताणली तरीही मर्यादित ज्ञानाने आपल्याला त्याची खोली आणि महत्व मात्र काही समजत नाही. उद्धार देणाऱ्या प्रेमाची

लांबी, उंची, खोली, रुंदी ह्या पुसटशा अर्थाने समजल्या जातात. उद्धाराची योजना हि पूर्णतः समजली जात नाही, अगदी जेव्हा उद्धार पावलेले लोक स्वतःकडे बघतात आणि तसे ओळखले जातात; पण सर्व सनातन युगांपासून, नवीन सत्य हे आश्चर्य करणाऱ्या मनाला व उल्लासित मनाला आनंदी करत राहतील. जरी पृथ्वीवरील सर्व दुख, वेदना आणि मोह हे निघतात, देवाच्या लोकांना त्यांच्या तारणाची किमत काय आहे त्याविषयी सुन्यान मिळेल. {एजी ९८}

**(११) ते चोवीस वडीलजन आणि सर्व उद्धार पावलेले लोक देवाच्या सिंहासनाच्या समोर व्यक्त करतील जेव्हा ते स्तुतीगीते देवावर सादर करतील?**

***तेव्हा तेव्हा ते चोवीस वडील 'राजासनावर जो बसलेला' त्याच्या पाया पडतात; जो 'युगानुयुग जिवंत' त्याला नमन करतात; आणि आपले मुकुट राजासनापुढे ठेवून म्हणतात: (प्रगटीकरण ४:१०)***

ख्रिस्ताचा वधस्तंभ हा संपूर्ण सनातनकाळासाठी सर्व उद्धार पावलेल्या

लोकांसाठी ते विज्ञान आणि संगीत होईल. गौरवलेल्या ख्रिस्तामध्ये त्यांना वधस्तंभी गेलेला ख्रिस्त दिसतो. ह्याचा कदापि विसर पडणार नाही की ज्याच्या सामर्थ्याने हे अगणित विश्व ह्या क्षेत्रात निर्माण केले--- देवाचा प्रिय, स्वर्गाचे वैभव, ज्याचे कौतुक आणि प्रेम हे करूब आणि सराफिम करतात–पतन पावलेल्या मनुष्याला पाहण्यास त्याने स्वतःला विनम्र केले; त्याने पापाचा दोष आणि लज्जा हे सहन केले, आणि त्याच्या पित्याचा चेहरा हा लपवण्यात येतो,ह्या पतन पावलेल्या जगाची ओरड ह्याने त्याचे हृदय भग्न केले, आणि काल्वरीच्या क्रुसावर त्याला चिरडून टाकले. सर्व विश्वाचा घडवणारा, सर्व भवितव्यांचा रचनाकार, त्याने त्याचे गौरव बाजूला ठेवावे आणि मनुष्यावर प्रेम हे विश्वाचे कौतुक आणि प्रेम ह्याला उत्साहित करतात. तारणप्राप्त राष्ट्रे हे त्याच्या उद्धारक देवाकडे पाहतात आणि सनातन देवाच्या चेहऱ्यावरून जो प्रकाश  चमकत राहतो; जसे ते त्याचे सिंहासन बघतात; जे सनातानकाळापासून सनातन काळापर्यंत असते, आणि हे जाणून घ्यावे की त्याच्या राज्याला कोणताच अंत नाही, आणि हे उद्धार पावलेले गीत ते गातात: “ते मोठ्याने

म्हणत होते :“वधलेला कोकरा सामर्थ्य, धन, ज्ञान, बल, सन्मान गौरव व धन्यवाद हे घेण्यास योग्य आहे!” {एजी ९८}

***माझ्यासाठी ख्रिस्ताने शारीरिक आणि मानसिक दृष्टीने जी वर्तणूक सहन केली ह्याच्या ज्ञानात जसा मी वाढतो मी पाहतो त्याच्या प्रेमाची काहीच तुलना नाही कारण दोषी पापी म्हणून त्याने माझी जागा घेतली.***

***गोल करा : होय अनिश्चित***

***मी नेहमी ख्रिस्ताकडे बघण्याची निवड करतो माझ्या विश्वासाची नजर त्याच्यावर केंद्रित करतो आणि माझ्या जीवनाचा त्याने उत्पादक व निर्माणकर्ता व्हावे असा त्याच्यावर विश्वास ठेवतो .***

***गोल करा : होय अनिश्चित***

***मला आश्चर्य वाटते की उद्धाराची हि योजना इतक्या स्पष्टपणे कशी देवाचा न्याय आणि त्याची दया हे व्यक्त***

करतात. माझ्यासारख्या आशाहीन अशा पापी व्यक्तीसाठी उद्धार म्हणून देव त्याच्या पुत्राला पाठवले इतकी मोठी किमत मोजून हे तर अग्रहनीय अशा प्रेमाचे एक खरे प्रदर्शन आहे. काल्वरीमध्ये मी नितीमत्व, न्याय आणि दया ह्यांचा परिपूर्ण समतोल बघतो.

गोल करा : होय अनिश्चित

पौलासारखे, वधस्तंभी गेलेल्या ख्रिस्ताच्या अलौकिक गमकावर मी लक्ष केंद्रित करतो आणि त्यांच्यासाठी जे सुंदर प्रेम आहे ह्याविषयी जगाला सांगतात.

गोल करा : होय अनिश्चित

येशूच्या चरणी सनातन काळ घालवून सदैव देवाचे ते प्रेम शोधण्यास आणि त्याविषयी अधिक शिकण्याच्या प्रयत्नाकडे मी पाहत आहे.

गोल करा :      होय      अनिश्चित

येशूच्या ठायी त्याच्या प्रेमाच्या आश्चर्यात माझा मुकुट ठेवण्याच्या दिवसाची मी वाट पाहत आहे.

गोल करा :      होय      अनिश्चित

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________



# धडा १०
# ख्रिस्ताचे प्रेमाचे वरदान

**(१) शास्त्रवचनात आपण सत्याचा शोध जसा करतो आणि ख्रिस्ताच्या उद्धार देणाऱ्या प्रेमाविषयी शिकतो, जसे अम्मौस नावाच्या रस्त्यावर असलेले शिष्य असतात, तर त्याचा परिणाम काय होतो?**

*तेव्हा ते एकमेकांना म्हणाले, "तो वाटेने आपल्याबरोबर बोलत होता व शास्त्राचा उलगडा करत होता तेव्हा आपल्या अंतःकरणाला आतल्या आत उकळी येत नव्हती काय?" (लूक २४:३२)*

ख्रिस्तामध्ये आणि ख्रिस्ताच्या द्वारे सत्य हे मोजता येत नाही. शास्त्रवचनाचा विद्यार्थी त्याकडे बघतो जणूकाही,ते एक फवारा आहे जो खोलवर असून त्याच्या रुंदीत विस्तारत जाते. ह्या आयुष्यात देवाच्या प्रेमाचे राहस्य आपल्याला समजणार नाही जे त्याने त्याच्या पुत्राला आपल्या पापांसाठी प्रायश्चित म्हणून दिले.  ह्या पृथ्वीवर उद्धारकाचे कार्य ह्या विषयावर विचार करता करता आपल्याला विचारशक्ती ताणावी लागते. हे रहस्य समजून घेण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आपली मानसिकता ताणू शकते, पण त्याचे मन हे थकून फिके पडते. अधिक नीतिमान रीतीने जी व्यक्ती ह्याचा शोध घेते त्या हा अमर्यादित समुद्र दिसतो.

येशुमध्ये जसे हे सत्य आहे त्याचा अनुभव घेता येतो, पण त्याचे स्पष्टीकरण करता येत नाही. त्याची उंची आणि खोली आणि रुंदी आपल्या ज्ञानाच्या पलीकडे आहे. आपल्या कल्पनेच्या पलीकडेजरी आपण ताणले तरीही, आणि मग अशा प्रेमाची केवळ आपल्याला झलक दिसते ज्याचे वर्णन करता येत नाही, जे स्वर्गाच्या इतके मोठे आहे, पण देवाची प्रतिमा संपूर्ण

मानव जातीवर एक छाप म्हणून पडण्यास ते खाली वाकते.

तरीही ह्या दैवी करुणेला सहन करू शकता येणाऱ्या प्रत्येक गोष्टी पाहणे आपणास शक्य आहे. हे विनम्र,भग्न जीवात्म्याच्या समोर उघडकीस येते. देवाचे आपल्यासाठी जे अर्पण आहे त्याच मापात आपल्याला देवाची करून समजते व त्याचे कौतुक आपण करू शकतो. हृदयाच्या संपूर्ण विनम्रतेने जसे देवाचे वचन आपण शोधतो, अधिक विचार आणि संशोधन करण्यासाठी उद्धाराचा गमक आपल्यासाठी खुले होते. आपण त्याकडे प्बघ्त राहतो तसा त्याचा प्रकाश वाढत राहतो, आणि ते समजून घेण्याचा जसा आपण प्रयत्न करतो, त्याची उंची आणि खोली ह्या वाढत जातात.

**(२) जेव्हा सर्व आशा हरपून जाते, ख्रिस्ताने कोणती अद्भुत गोष्ट केली ज्यामुळे त्याचे आणि पित्याचे महान प्रेम आपल्यासाठी प्रगट झाले?**

***“मी आपला प्राण परत घेण्याकरता देतो म्हणून पिता माझ्यावर प्रीती करतो.” (योहान १०:१७)***

पाप आणि अधर्म ह्यांचे परिणाम म्हणून जेव्हा आदाम आणि हवा ह्यांच्याकडून सर्व आशा ही हरपली, जेव्हा न्यायाने एका पापी व्यक्तीचा मृत्यू होण्याची मागणी केली, ख्रिस्ताने जगाच्या पापासाठी एक अर्पण म्हणून स्वतःला दिले. संपूर्ण जग हे एका दोषाखाली होते. ख्रिस्ताने मनुष्याची पर्यायी जागा घेतली.

देवाचा पुत्र वगळता दुसरे कोणीही आपला उद्धार सिद्ध करू शकत नव्हते; कारण केवळ जो पित्याच्या उराशी होता तोच त्याची घोषणा करू शकत होता. केवळ ज्याला देवाच्या प्रेमाची उंची आणि खोली माहित होती तेच ती व्यक्त करू शकत होते. पतन पावलेल्या मनुष्यासाठी वतीने ख्रिस्ताने जे अमर्याद अर्पण दिले ते पित्याचे पेम पतन पावलेल्या मानवजातीसाठी देऊ शकत होते.

“देवाने जगावर इतके प्रेम केले की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला.”
लोकांच्या आमध्ये त्याने वस्ती करावी म्हणून त्याने त्याला दिले एवढेच नाही, त्यांची पापे वाहण्यास, आणि त्यांच्यावतीने मृत्यू सहन करून अर्पण होण्यास दिले एवढेच नाही. त्याने येशूला ह्या पतन पावलेल्या मानवजातीसाठी दिले. मानवतेच्या सर्व गरजा व हेतू

ह्याच्याशी ख्रिस्ताने स्वतःची ओळख दिली. जो कोणी देवाशी एकरूप झाला त्याने मनुष्यांच्या पुत्रांशी स्वतःला जोडले अशा बंधनाने जे कधीच तोडता येत नाहीत. येशू त्यांना "बंधुजन म्हणवून घेण्यास लाजत नाही" (इब्री २:११); तो आपले अर्पण आहे, आपला वकील, आपला बंधू, पित्याच्या सिंहासनाच्या समोर आपले मानवी रूप धारण करणारा, आणि सर्व युगांमध्ये त्याने उद्धारलेल्या विश्वाशी तो एकरूप झाला आहे– मनुष्याचा पुत्र. पापाची ढलती आणि विनाश ह्यापासून मनुष्याला उंचावण्यात यावे म्हणून जेणेकरून त्याने देवाचे प्रेम प्रगट करावे आणि पावित्र्याचा आनंद वाटून घ्यावा.

**(३) निसर्गातील स्वामी प्रभू जो कलाकार आहे त्याची वरदाने समजून आणि आपल्या प्रत्येकाची जी वयक्तिक काळजी तो घेतो घेण्याचा जसा आपण प्रयत्न करतो, दावीद राजाप्रमाणे, आपला प्रतिसाद काय असेल?**

***हे ज्ञान माझ्या कल्पनेपलीकडचे आहे; हे अगम्य आहे, हे माझ्या आवाक्याबाहेरचे आहे. (स्तोत्रसहिता १३९:६)***

येणाऱ्या जगात जीवनाच्या नदीच्या जवळ ख्रिस्त सर्वांचा ज्यांचा उद्धार झाला आहे त्यांचे पुढारीपण करेल आणि सत्याचे चांगले व अद्भुत धडे शिकवेल. निसर्गाचे सर्व गुपित देखील तो त्यांच्यासमोर उघड करेल. ते पाहतील की एक प्रभुत्व करणारा हात संपूर्ण जगाला आहे त्या स्थितीत ठेवतो. शेतातील सुंदर फुलांना रंग देण्यात त्या महान कलाकाराचे जसे कौशल्य दिसते, आणि दयाळू पित्याची तत्वे ते शिकतात, ज्याच्यातून प्रत्येक प्रकाशाचा किरण बाहेर पडतो, आणि पवित्र दूतांच्या सोबत उद्धार पावलेले लोक हे समजून घेऊन देवाचे संपूर्ण कृतघ्न मानवतेसाठी असणाऱ्या अलौकिक प्रेमाच्या बद्दल स्तुतीगीते गातात. मग असे समजेल की “देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.”

**(४) पृथ्वीवरील प्रत्येक देवाच्या लेकराच्या हृदयाची तयारी करण्यासाठी ख्रिस्त काय करतो जेणेकरून तो जे तारणाचे अद्भुत वरदान देतो ते प्राप्त करू शकतील?**

*“आणि मला पृथ्वीपासून उंच केले तर मी सर्वांना माझ्याकडे आकर्षून घेईन.” (योहान १२:३२)*

ख्रिस्त देवाचे प्रेम जगाला दाखवण्यासाठी आला, सगळ्या लोकांची हृदये त्याच्याकडे वळवून घेण्यासाठी आला. तो म्हणाला, “आणि मला पृथ्वीपासून उंच केले तर मी सर्वांना माझ्याकडे आकर्षून घेईन.” (योहान १२:३२). तारणाच्या प्रती प्रतिसाद देण्याची ही पहिली पायरी आहे की त्याच्या प्रेमाकडे आपण वळणे. {१ एसएम ३२३}

**(५) ख्रिस्ताच्या द्वारे देव आपल्याला कोणते वरदान देतो, की आपण जर स्वीकारले तर, त्याची दया आणि क्षमा हि आपल्या जीवनात देण्यास त्याला परवानगी देतात आणि त्याद्वारे तो आपल्या आयुष्याला दिशा दाखवतो?**

*त्याने इस्राएलाला पश्चात्ताप व पापांची क्षमा ही देणगी द्यावी म्हणून देवाने त्याला आपल्या उजव्या हाताशी अधिपती व तारणारा असे उच्चपद दिले. (प्रेषित ५:३१)*

देव लोकांसाठी संदेशामागून संदेश देतो, त्यांना पश्चाताप करण्यास प्रवृत्त करतो,

जेणेकरून त्याने क्षमा करावी, आणि त्यांच्या नावाच्या पुढे हि क्षमा व्यक्त करावी. ह्या ठिकाणी पश्चाताप होणार नाही का? त्याच्या विनंतीकडे लक्ष देणार नाही का ? त्याच्या दयेच्या योजनांकडे दुर्लक्ष होईल का, आणि त्याचे प्रेम हे नाकारले जाईल? ओह, मग मनुष्य स्वतःला त्या माध्यमापासून छाटून देईल जेणेकरून त्याला सनातन जीवन प्राप्त होऊ शकते; कारण देव केवळ पश्चाताप करणाऱ्या व्यक्तीचीच क्षमा करतो!

त्याच्या प्रेमाच्या प्रदर्शनाने, त्याच्या आत्म्याच्या विनवनीने, तो मनुष्यांना पश्चाताप करण्यास प्रवृत्त करतो, आणि ज्यांची तो क्षमा करतो त्यांना तो प्रथम पश्चातापी बनवतो. मनुष्याने देवाच्या नियमशास्त्राचे उल्लंघन केले म्हणून तो प्रामाणिकपणे पश्चाताप करतो आणि ह्याचा गोड आनंद ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवल्याने मिळतो कारण तो उद्धारक आणि पापी व्यक्तीचा वकील बनतो.

मनुष्यांना क्षमेचा हा आनंद समजून घेता यावा म्हणून, देवाची शांती, जी ख्रिस्त त्याच्या प्रेमाचे प्रतिक म्हणून लोकांना त्यांच्याकडे ओढवून व्यक्त करतो. जर त्याच्या पाचार्नाकडे त्यांनी प्रतिसाद दिला

तर, आपली हृदये त्याच्या कृपेच्या अधीन करून, तो त्यांना प्रत्येक पावलांवर दिशा दाखवेल, स्वतःबद्‌दलचे ज्ञान देईल, आणि हे तर सनातन जीवन आहे.

**(६) ख्रिस्ताकडून येणाऱ्या कोणत्या पहिल्या कृपाळू आमंत्रणाच्या प्रती आपण प्रतिसाद द्‌यावा आणि खरा पश्चाताप ह्याचा अनुभव घेण्यापूर्वी हे आपण करावे?**

***अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. (मत्तय ११:२८)***

खऱ्या रीतीने पश्चाताप करण्याची इच्छा कोणाला आहे? त्याने मग काय करावे? - त्याने येशूकडे यावे, आहे तसे, कोणत्याही प्रकारे विलंब न करता. ख्रिस्ताचे वचन हे सत्य आहे ह्यावर त्याने विश्वास ठेवावा, आणि ह्या अभिवचनावर विश्वास ठेऊन, मागावे की त्याला प्राप्त होईल.

जेव्हा प्रामाणिक इच्छा लोकांना प्रार्थना करण्यास प्रेरित करते, ते व्यर्थ रीतीने प्रार्थना करणार नाही. प्रभू त्याचे वचन

परिपूर्ण करेल, आणि पवित्र आत्मा त्यांना देवाच्या प्रती पश्चाताप करण्यास आणि प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करेल. तो प्रार्थना करेल,आपली पापे सोडून देईल, देवाच्या आज्ञांचे पालन करण्यासाठी प्रत्येक प्रयत्न प्रामाणिकपणे करेल. प्रार्थनेला तो विश्वासाची जोड देईल, आणि केवळ विश्वास नाही तर नियमशास्त्राचे आज्ञापालन करेल. तो स्वतःला त्या प्रश्नात ख्रिस्ताच्या बाजूला असलेले पाहेल. तो सर्व सवयी सोडून देईल जेणेकरून देवाच्या हृदयाकडे ते अधिक जाऊ शकतात.

**(७) जरी अनेकातील एक असले तरीही, पतन पावलेला मनुष्य जो पापाच्या दास्याच्या अंतर्गत दुखसहन करत आहे त्याच्याप्रती ख्रिस्ताच्या प्रेमाचे प्रदर्शन म्हणून काय त्याचे वरदान आहे?**

***आणि ख्रिस्ताने तुमच्यावर प्रीती केली आणि देवाला सुवास मिळावा म्हणून स्वत:ला आपल्याकरता अर्पण व यज्ञ म्हणून दिले, त्याप्रमाणे तुम्हीही प्रीतीने चाला. (इफिसकरास पत्र ५:२)***

मनुष्याच्या पतनाने संपूर्ण स्वर्गात दुख पसरले. जे जग देवाने बनवले होते

त्याला पापाचा शाप लागला आणि जे लोक दैन्येत आणि मृत्यूला सामोरे जातील अशांनी भरून गेले. ज्या लोकांनी नियमशास्त्राचे उल्लंघन केले त्यांच्यासाठी कोणतीच सुटका नव्हती. देवदूतांनी त्यांची स्तुतीगीते थांबवली. पापामुळे जी काही हानी झाली होती ती पाहून संपूर्ण स्वर्ग हे आक्रंदन करत होते.

देवाचा पुत्र, स्वर्गाचा गौरवी सेनापती, ह्याच्या मनात पतन पावलेल्या जमातीसाठी ती दया आणि सहानुभूती उत्पन्न झाली. त्याचे हृदय त्या अमर्यादित करुणेने भरून गेले कारण हरवलेल्या जगाचे रडणे त्याच्यासमोर मांडण्यात आले. पण दैवी प्रेमाने एक योजना आखली जेणेकरून मानवजातीचा उद्धार झाला. देवाच्या मोडलेल्या नियमाने पापी व्यक्तीचे आयुष्य मागितले. संपूर्ण विश्वात एकमेव असा होता, जो मनुष्याच्या वतीने, हे मत सिद्ध करू शकत होता. दैवी नियमशास्त्र देवासारखेच पवित्र असल्याने ,जो देवाच्या समान होता तोच त्याच्या उल्लंघन झाल्यामुळे पश्चाताप करू शकत होता. दुसरे कोणी नाही तर केवळ ख्रिस्त पतन पावलेल्या मनुष्याला

नियमशास्त्राच्या त्या शापापासून मुक्त करू शकत होता आणि पुन्हा त्याला स्वर्गाशी सुसंगत करू शकत होता. ख्रिस्त स्वतःवर पापाचा दोष आणि लज्जा हे घेऊ शकत होते–अशा पवित्र देवासाठी इतका लज्जास्पद की पिता आणि त्याच्या पुत्राने वेगळे झाले पाहिजे. ख्रिस्त ह्या नष्ट झालेल्या जमातीसाठी तिला मुक्त करण्यासाठी त्या दैन्यावस्थेत उतरला.

**(८) जो कोणता अपात्र पश्चाताप करणारा पापी असतो त्यांना येशूने काय अभिवचन दिले आहे?**

***पिता जे मला देतो ते सर्व माझ्याकडे येईल आणि जो माझ्याकडे येतो त्याला मी मुळीच घालवून देणार नाही. (योहान ६:३७)***

पण अनेकांना वाटते की त्यांच्यात विश्वासाचा अभाव दिसतो, आणि म्हणून ते ख्रिस्तापासून दूर राहतात. ह्या जीवात्म्यांनी, त्यांच्या असहाय्य अपात्रतेत, ह्यांनी त्यांच्या दयाळू तारणार्याच्या हाती स्वतःला दिले पाहिजे. ख्रिस्ताकडे पहा, स्वतःकडे पाहू नका. ज्याने आजारी लोकांना बरे केले आणि

जेव्हा तो लोकांमध्ये चालला तेव्हा भुते काढली हाच तो महान उद्धारक आहे. मग त्याची अभिवचने त्या जीवनी झाडाच्या पापांसारखे स्वीकारा: “पिता जे मला देतो ते सर्व माझ्याकडे येईल आणि जो माझ्याकडे येतो त्याला मी मुळीच घालवून देणार नाही.” योहान ६:३७. तुम्ही त्याच्याकडे येत तेव्हा, तो तुमचा स्वीकार करतो ह्यावर विश्वास ठेवा, कारण त्याने तसे अभिवचन दिले आहे. हे करत असताना तुमचा नाश होणार नाही—कधीच नाही.

जेव्हा पश्चाताप करणारा पापी ख्रिस्ताकडे येतो, आणि त्याला त्याचा दोष आणि अपात्र स्वभावाची जाणीव होते, तो शिक्षेस पात्र आहे हे जाणून घेऊन, ख्रिस्ताच्या दयेवर आणि प्रेमावर अवलंबून राहून, त्याला कधीच परत पाठवले जाणार नाही. देवाचे क्षमा करणारे प्रेम हे लागू होते, आणि त्याच्या हृदयात आनंदाने कृतज्ञता तारणारा आणि दयाळू देव ह्याच्याप्रती व्यक्त होते.  ही तरतूद त्याच्यासाठी स्वर्गाच्या दरबारात केली गेली आणि हे जगाच्या स्थापनेपूर्वी झाले, की ख्रिस्ताने स्वतःवर मनुष्याच्या अधर्माची शिक्षा घ्यावी आणि त्याला त्याचे नितीमत्व प्रदान

करावे, आणि हि कल्पना त्याच्यात ते आश्चर्य उत्पन्न करते.

**(९) कोमल अशा दयेच्या कोणत्या कृत्याने ख्रिस्ताने आपल्यासाठी त्याचे अबोल, व्यक्त न होणारे, अतुलनीय प्रेम प्रगट केले?**

***ख्रिस्ताने आपल्याकरता स्वतःचा प्राण अर्पण केला ह्यावरून आपल्याला देवाच्या प्रीतीची जाणीव झाली आहे; तेव्हा आपणही आपल्या बंधूकरता स्वतःचा प्राण अर्पण केला पाहिजे. (१ योहान ३:१६)***

जेव्हा मन काल्वरीच्या कृसाकडे ओढले जाते, ख्रिस्त हा अपरिपूर्ण अशा दृष्टीने त्या लज्जास्पद वधस्तंभावर खिळलेला दिसतो. त्याने मृत्यू का सहन केला? पापाचा परिणाम म्हणून त्याने हे केले. पाप काय आहे? नियमशास्त्राचे ते उल्लंघन आहे. मग नेत्र हे पापाचे स्वरुप पाहण्यास उघडे होतात. नियमशास्त्र हे मोडण्यात येते पण त्यामुळे उल्लंघन करणाऱ्याची क्षमा मात्र होत नाही. आपला तो शिक्षक असतो, जो शिक्षा देण्याचा दोष लावतो. ह्याचा उपाय कोठे आहे? नियमशास्त्र आपल्याला ख्रिस्ताकडे

घेऊन येते, ज्याला वधस्तंभावर खीळण्यात आले जेणेकरून तो त्याचे नितीमत्व पतन पावलेल्या, पापी मनुष्याला देऊ शकतो आणि त्याद्वारे त्याच्या नीतिमान चारित्र्यात लोकांना पित्याच्या समोर प्रस्तुत केले जाते.

ख्रिस्ताचे चारित्र्य रात्रंदिवस अभ्यास करा. त्याची ती कोमल करुणा होती, तुमच्या जीवात्म्यासाठी त्याचे अवर्णनीय, अतुलनीय प्रेम व्यक्त करणे, ज्यामुळे त्याने सर्व लज्जा सहन केली, सर्व यातना, दोष, आणि पृथ्वीचे हाल होते. त्याच्याजवळ या, त्याचे जखमी हात पाय पहा, जे आपली पापे आणि अधर्मे ह्यांच्यासाठी घायाळ आणि जखमी झाले. “आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले.”

काही वेळ घालवू नका, दुसरा दिवस अशा प्रकारे सनातनतेत जाऊ देऊ नका, पण जसे तुम्ही आहात, तुमची काहीही दुर्बलता असो, तुमची अपात्रता असो, तुमचे दुर्लक्ष असो, आता येण्याची दिरंगाई करू नका.... येशूचे त्याच्याकडे येण्याचे पाचारण, असा गौरवी मुकुट

देण्यास जो कधीही सरत नाही, ज्या सनातन जीवनाचे मोजमापन देवाच्या आयुष्याशी होते, ते तुम्हाला पूर्णपणे त्याची सेवा करण्यास पुरेसे नाहीत का.

**(१०) पापाचा बलाढ्य, त्रासदायक शाप ख्रिस्ताने कोणासाठी सहन केला?**

***आणि तोच आपल्या पापांबद्दल प्रायश्चित्त आहे; केवळ आपल्याच पापांबद्दल नव्हे तर सर्व जगाच्याही पापांबद्दल आहे. (१ योहान २:२)***

मनुष्याला काही पाप स्वतःवर घेणारा असे बनवले नाही, आणि तारणार्याने ज्या पापाचा शाप बाळगला ते त्याला कधीच समजणार नाही. कोणतेही दुख हे ज्यावर मनुष्याचा क्रोध उतरला त्याचे जे दुख आहे त्याच्याशी तुलना होऊ शकत नाही. मानवी स्वभाव एक मर्यादित प्रमाणात परीक्षा आणि संघर्ष सहन करू शकतात. मर्यादित स्वभाव हा त्याच रीतीला सहन करू शकतो, आणि मानवी स्वभाव त्याला शरण जातो; पण ख्रिस्ताच्या स्वभावाला ते दुख सहन करण्याची जास्त क्षमता होती; कारण मानव हा त्या दैवी स्वभावात अस्तित्वात होता, आणि त्यामुळे दुख सहन करण्याची क्षमता

त्यांच्यात निर्माण झाली जी ह्या पतन पावलेल्या जगामुळे निष्पन्न झाली.

जी यातना ख्रिस्ताने सहन केली, वाढत जाते, खोलवर रुजते, आणि पापाचे जे चारित्र्य असते त्याची एक अखंड समज देते, आणि जे लोक पापात अडकून राहतील त्यांच्यावर देव जो पश्चाताप करण्याची वृत्ती आणतो. पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे वरदान म्हणजे येशू ख्रिस्ताच्या द्वारे ते सनातन जीवन आहे जे प्रत्येक पश्चाताप करणाऱ्या, विश्वासणाऱ्या पापी व्यक्तीसाठी उपलब्ध असते.

आपला प्रभू म्हणतो, पापाची जाणीव जी होते त्याच्या अंतर्गत, लक्षात ठेवा की तुमच्यासाठी मरण पावलो. माझ्यासाठी आणि शुभवर्तमानासाठी जेव्हा तुमचा छळ होतो आणि नाश होऊन तुम्हाला माझ्यासाठी यातना सहन कराव्या लागतील, माझ्या प्रेमाचे स्मरण कर, जे इतके महान आहे ज्यामुळे मी माझे आयुष्य तुमच्यासाठी दिले. जेव्हा तुमची कर्तव्ये कडक आणि कठोर दिसतात, आणि तुमची ओझी वाहण्यास खूप जड वाटतात, लक्षात ठेवा की तुमच्यासाठी मी वधस्तंभ सहन केला, आणि त्याची सर्व

लज्जा स्वीकारली. जेव्हा तुमचे हृदय त्या परीक्षेत पडणाऱ्या परिस्थितीतून बाहेर पडते, लक्षात ठेवा की तुमचा उद्धारक तुमच्यासाठी मध्यस्थी करण्यास जिवंत आहे.

**(११) जेव्हा आपण कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीत असतो तेव्हा त्याची पत्र नसलेले कृपेचे वरदान आपल्यासाठी देण्यासाठी कशाची तयारी करतो?**

***परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला.***
***(रोमकरास पत्र ५:८)***

आपण प्रथम त्यावर प्रेम केले म्हणून ख्रिस्ताने आपल्यावर प्रेम केले नाही; पण “आपण जेव्हा अजूनही पापी होतो” तो आपल्यासाठी मरण पावला. आपल्या अरण्याप्रमाणे तो आपणास वागवत नाही. जरी आपल्या पापांचा परिणाम म्हणजे दोष स्वीकारणे, तरीही तो आपल्यावर ते दोष लावत नाही. वर्षा मागे वर्ष त्याने आपली दुर्बलता आणि अज्ञान हे सहन केले, आणि त्यासोबर आपली कृतघ्नता आणि भटकंती देखील. आपल्या भटकंतीचा विचार न करता, आपल्या

हृदयाची कठीणता, त्याच्या पवित्र वचनाकडे दुर्लक्ष करणे, त्याचा हट हा आपल्याप्रत लांब करण्यात आला आहे.

पात्रता नसलेल्या लोकांसाठी कृपा हे देवाचे गुणविशेष आहे. आपण त्याचा शोध केला नाही, पण आपल्या शोधात ती पाठवण्यात आली. देव त्याची कृपा आपल्यावर दाखवण्यास आनंद मानतो, आपण पात्र आहोत म्हणून नाही, पण आपली अजिबात पात्रता नाही म्हणून तसे करतो. आपण त्याची दया प्राप्त करून घेऊ शकतो कारण त्याची आपल्याला नितांत गरज असते.

**(१२) जेव्हा शुभवर्तमानातील वधस्तंभाच्या वरदानाचा अद्भुत संदेश हा गाजवण्यात येतो, कोणाचे लक्ष ते वेधून घेते?**

*त्यांना असे प्रकट करण्यात आले होते की, स्वर्गातून पाठवलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे तुम्हांला सुवार्ता सांगणाऱ्यांनी त्या गोष्टी तुम्हांला आता सांगितल्या आहेत- गोष्टी न्याहाळून पाहण्याची उत्कंठा देवदूतांना आहे. (१ पेत्र १:१२)*

उद्धारची योजना, ज्याद्वारे दया करणाऱ्या दैवी- मानवी उद्धारकाने मनुष्याला त्या पापाच्या खाचेतून बाहेर काढले, हे लोकांच्या किंवा देवदूतांच्या समजबुद्धीच्या पलीकडे आहे. हे खरेच ते रहस्य आहे जे कोणालाही समजत नाही, इतके भव्य, इतके पवित्र, की पूर्णपणे ते समजून घेण्याची आशा आपण करू शकत नाही.

पतन पावलेल्या लोकांसाठी ख्रिस्ताच्या अर्पणाची काहीच तुलना नाही. ती सर्वात उंच आहे, पवित्र गमक ज्यावर आपण मनन करू शकतो. देवाच्या कृपेने जे प्रत्येक हृदय प्रज्वलित होते त्याने अवर्णनीय कृतज्ञता व्यक्त करून ह्या उद्धारक देवाच्या अमर्यादित अर्पणासाठी नमन करावे आणि झुकावे.

***मी आभारी आहे की ख्रिस्त, ज्या एकमेव व्यक्तीला देवाच्या प्रेमाची उंची आणि खोली हे ठाऊक होते, आपल्यापैकी एक बनला कारण त्याला देवाचे प्रेम आपणास प्रगट करायचे होते.***

***गोल करा :      होय      अनिश्चित***

मी आभारी आहे, की ख्रिस्त, देवाचा पुत्र, ह्याच्या मनात माझ्यासाठी प्रेम आणि दया हे उत्पन्न झाले, आणि त्याला मोडलेल्या नियमशास्त्राची किमत मोजण्याची तयारी होती आणि माझा दोष आणि लज्जा हे त्याने स्वतःवर घेतले आणि मला ह्या दयनीय परिस्थितीतून उद्धार करायचे त्याने ठरवले.

गोल करा : होय अनिश्चित

ख्रिस्ताच्या प्रेमाच्या ह्या झर्याच्या स्वरूपातील प्रेम बघून ती वाढत जाते आणि खोलवर होत जाते. मला ह्या गोष्टीची जाणीव होते की त्याच्या प्रेमाच्या महान समुद्राला त्याचे अमर्यादित स्वरूप समजून घेणे कठीण आहे. दावीद राजाप्रमाणे मी म्हणावे, “असे ज्ञान माझ्यासाठी खूप अद्भुत आहे, ते उच्च आहे, मी ते ग्रहण करू शकत नाही.”

गोल करा : होय अनिश्चित

पश्चातापाच्या अद्भुत वर्दानासाठी मी खूप आभारी आहे ज्यामुळे वधस्तंभी जसे ख्रिस्ताचे प्रेम व्यक्त होते ते स्वीकारणे माझ्यासाठी शक्य होते.

गोल करा : होय अनिश्चित

ख्रिस्तामधील विश्वासाच्या द्वारे आणि जे वरदान तो देऊ करतो त्याद्वारे मी त्याचे वरदान स्वीकारण्याची निवड करतो आणि माझ्या जीवनात त्याचे मार्गदर्शन अनुसरन्यास मी माझी संपूर्ण इच्छा त्याला समर्पित करते.

गोल करा : होय अनिश्चित

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________



# धडा ११
# ख्रिस्ताचे शांतीचे अभिवचन

**(१) त्याच्या आपल्यावरील महान प्रेमामुळे, सर्व युगांमधून ख्रिस्ताने त्याच्या अनुयायांना कोणते अद्‌भुत आशेचे अभिवचन दिले?**

***आणि मी जाऊन तुमच्यासाठी जागा तयार केली म्हणजे पुन्हा येऊन तुम्हांला आपल्याजवळ घेईन; ह्यासाठी की, जेथे मी आहे तेथे तुम्हीही असावे. (योहान १४:३)***

ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्याचे अभिवचन सदैव त्याच्या शिष्यांच्या मनात ताजे तवाने ठेवणे गरजेचे होते. तोच येशू ज्याला त्यांनी स्वर्गात वर जाताना

पाहिले, तो परत येऊन, जे लोक स्वतःला त्याच्या सेवेसाठी देतात त्यांना घेऊन जाईल. त्याच वाणीने जी त्यांना म्हणाली होती, "पहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी तुम्हासोबत आहे," स्वर्गीय राज्यात त्याच्या सान्निध्यात येण्यासाठी त्यांचे स्वागत तो करताना दिसतो.

ज्या लोकांनी त्याच्यावर प्रेम केले आणि त्याची वाट बघितली, तो त्यांना मुकुटमंडित करून गौरव सन्मान आणि अमरत्व ह्यांनी आभूषित करेल. नीतिमान लोक ज्यांचा मृत्यू झाला ते त्यांच्या कबरेतून य्ठ्तील, आणि जे लोक जिवंत आहेत ते प्रभूची भेट घेण्यासाठी पुन्हा त्याच्यासोबत वर घेण्यात येतील. त्यांना येशूचा आवाज ऐकू येईल जो कोणत्याही इतर संगीतापेक्षा मधुर असा आहे जो मर्त्य कानाने ऐकू आला, त्यांना म्हणत,तुमचे युद्ध हे संपुष्टात आले. "तेव्हा राजा आपल्या उजवीकडच्यांना म्हणेल, 'अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादितहो, या; जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुमच्याकरता सिद्ध केले आहे ते वतन घ्या." मत्तय २५; ३४.

**(२) आपले सांत्वन होण्यास आणि सातत्याने आपल्यात त्याचे पुनरागमन**

**होईपर्यंत वस्ती करण्यास कोणाला पाठवण्याचे अभिवचन ख्रिस्ताने दिले आहे?**

***मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हांला दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल; अशासाठी की, त्याने तुमच्याबरोबर सदासर्वदा राहावे– (योहान १४:१६)***

ज्या सांत्वनदात्याला पाठवण्याचे अभिवचन ख्रिस्ताने त्याच्या नावने केले आहे तो आपल्यासोबत वस्ती करतो. जो मार्ग देवाच्या शहराकडे घेऊन जातो असे कोणतेही त्रास किंवा संघर्ष नाहीत जे त्याचावर भरवसा ठेवणारे लोक विनय मिळवू शकणार नाहीत. असे काहीच धोके नाहीत ज्यांच्यापासून ते पळ काढू शकतील. असे कोणतेही दुख, वेदना, मानवी दुर्बलता नाही, ज्यासाठी त्याने एक उपचार आधीच देऊन ठेवला आहे.

कोणीही ह्या निराशेत व हताश अवस्थेत स्वतहाल सोपवून देऊ नये. सैतान कदाचित तुमच्याकडे अशी क्रूर सूचना घेऊन येईल, “तुमची बाब आशाहीन आहे. तुमचा उद्धार होऊच शकत नाही.” पण ख्रिस्तामध्ये तुमच्यासाठी आशा आहे. देव

आपल्याला स्वतःच्या बलाने विजय संपादन करू देत नाही. तो आपणास त्याच्या जवळ येण्यास सांगतो. कोणत्याही त्रासाच्या खाली आपण असलो तरीही, जे शरीर आणि आत्मा ह्यांना खाली खेचतात, तो आपणास स्वतंत्र करण्यास तयार आहे.

**(३) सांत्वनदाता (पवित्र आत्मा) हा पूर्णपणे कोणास देण्यात येईल?**

***ह्या गोष्टींविषयी आम्ही साक्षी आहोत आणि देवाने आपल्या आज्ञा पाळणाऱ्यांना जो पवित्र आत्मा दिला आहे तोही साक्षी आहे." (प्रेषित ५:३२)***

ख्रिस्ताने त्याच्या मंडळीला पवित्र आत्म्याचे वरदान देण्याचे अभिवचन दिले आहे, आणि हे अभिवचन जसे पहिल्या शिष्यांना लागू होते तसेच आपणास देखील आहे. पण इतर कोणत्याही अभिवचनासारखे, ते अटींवर देण्यात येते. अनेक लोक आहेत जे देवाच्या अभिवचनांवर विश्वास ठेऊन ते हस्तगत करतात ; ख्रिस्त आणि पवित्र आत्मा ह्याविषयी बोलतात, तरीही त्यांना काहच फायदा होत नाही. ह्या दैवी माध्यमांनी त्यांना मार्गदर्शन करावे

व नियंत्रण ठेवावे म्हणून ते स्वतःच्या जीवात्म्याचे अर्पण करत नाहीत. आपण पवित्र आत्म्याचा उपयोग करू शकत नाही. आत्म्याने आपला उपयोग करायचा आहे. आत्म्याच्या द्वारे देव त्याच्या लोकांमध्ये कार्य करतो “कारण इच्छा करणे व कृती करणे ह्यासाठी तो हे करतो.” फिल. २:१३. पण अनेक लोक ह्यास शरण जाणार नाहीत. त्यांना स्वतःलाच सांभाळायचे असते. म्हणूनच त्यांना ते स्वर्गीय वरदान प्राप्त होत नाही. केवळ जे लोक देवावर नम्रपणे भरवसा ठेऊन त्याची वाट पाहतात, जे त्याचे मार्गदर्शन आणि कृपा ह्यांची वाट पाहतात, त्यांनाच आत्मा देण्यात येतो. देवाचे सामर्थ्य त्यांची मागणी आणि स्वीकृती ह्यांची वाट पाहते. हे वचनरुपी आशीर्वाद, विश्वासाने हस्तगत करून, त्यासोबत सर्व इतर आशीर्वाद घेऊन येतात.ख्रिस्ताच्या कृपेच्या अनुसार ते देण्यात येतात, आणि प्रत्येक जीवात्म्याची ग्रहण करण्याची जितकी क्षमता असते त्याच्या विश्वासाच्या परिमाणानुसार त्याला ते प्राप्त होते. ज्याने स्वतःला बाजूला ठेवले, आणि पवित्र आत्म्याच्या कार्याला त्याच्या हृदयात स्थान दिले त्याच्या उपयुक्तपणाला काहीच मर्यादा नाही

आणि जो देवासाठी पूर्णपणे पवित्र असे जीवन जगतो.

**(४) ख्रिस्त कोणते अनमोल वरदान आपणास देण्याचे अभिवचन देतो जर आपण आपल्या जीवनात त्याचे येऊन टिकाव धारणा पाहुणा म्हणून स्वागत करतो?**

***मी तुम्हांला शांती देऊन ठेवतो; मी आपली शांती तुम्हांला देतो; जसे जग देते तसे मी तुम्हांला देत नाही. तुमचे अंत:करण अस्वस्थ अथवा भयभीत होऊ नये. (योहान १४:२७)***

जेव्हा ख्रिस्ताला येऊन वस्ती करणारा पाहुणा म्हणून आपण आपल्या जीवात्म्यात स्वीकार करतो, देवाची शांती, जी सर्व समजबुद्धीच्या पलीकडे आहे, ती येशू ख्रिस्ताच्या द्वारे आपली हृदये आणि मने स्थिर ठेवेल. पृथ्वीवर तारणार्याचे जीवन, जरी भांडण आणि तंटा ह्यामध्ये जगले गेले, ते एक शांतीचे जीवन होते. क्रोधीत शत्रू त्याचा पाठलाग करत असताना, तो म्हणाला, “ज्याने मला पाठवले तो माझ्याबरोबर आहे; त्याने मला एकटे सोडले नाही, कारण जे त्याला आवडते ते मी सर्वदा

करतो.” योहान ८:२९. मानवी अथवा सैतानी क्रोधाचे कोणतेही वादळ हे देवाच्या सोबत असलेली ती दैवी सह्भागीता मोडू शकत नाही. आणि तो आपल्याला म्हणतो, “मी तुम्हांला शांती देऊन ठेवतो; मी आपली शांती तुम्हांला देतो.” “मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे ‘तुमच्या जिवांना विसावा मिळेल.” योहान १४:२७; मत्तय ११:२९. सेवेचे जू माझ्यासोबत देवाच्या गौरवासाठी व मानवतेला उंचावण्यासाठी वहा, आणि तुम्हाला ते जू सोपे आणि ओझे हलके वाटेल.

**(५) ह्या वचनात ख्रिस्ताच्या उदाहरणाचे अनुसरण करून, आपण स्वतःबद्दल काय लक्षात ठेवावे जेणेकरून त्यामुळे पाली शांती ढळून जाणार नाही?**

*मला स्वत: होऊन काही करता येत नाही; जसे मी ऐकतो तसा न्यायनिवाडा करतो; आणि माझा निवाडा यथार्थ आहे; कारण मी स्वतःच्या इच्छेप्रमाणे नव्हे तर ज्याने मला पाठवले त्याच्या इच्छेप्रमाणे करायला पाहतो. (योहान ५:३०)*

स्वतःवरचे ते प्रेम असते ज्यामुळे आपली शांती भग्न होते. स्वतः संपूर्णपणे जिवंत असताना, आपण त्याला दैहत्वापासून आणि अपमान होण्यापासून रक्षण्यास सतत तयार असतो; पण जेव्हा आपला मृत्यू होतो, आणि देवामध्ये ख्रिस्ताच्या सोबत जेव्हा आपले जीवन हे दाखवले जाते, आपण हृदयाकडे दुर्लक्ष करत नाही. अपमान आणि लज्जा ह्यांच्याप्रती आपण कानाडोळा करू आणि प्रत्येक प्रकारच्या धिक्काराकडे दुर्लक्ष करू. “प्रीती सहनशील आहे, परोपकारी आहे; प्रीती हेवा करत नाही; प्रीती बढाई मारत नाही, फुगत नाही; ती गैरशिस्त वागत नाही, स्वार्थ पाहत नाही, चिडत नाही, अपकार स्मरत नाही; ती अनीतीत आनंद मानत नाही, तर सत्यासंबंधी आनंद मानते; ती सर्वकाही सहन करते, सर्वकाही खरे मानण्यास सिद्ध असते, सर्वांची आशा धरते, सर्वांसंबंधाने धीर धरते. प्रीती कधी अंतर देत नाही; संदेश असले तरी ते संपतील. भाषा असल्या तरी त्या समाप्त होतील; आणि विद्या असली तरी ती संपेल.” १ करिंथकरास पत्र १३:४-८, आर.वी.

पृथ्वीवरील स्रोतांमधून जो आनंद मिळतो तो बदलणाऱ्या परिस्थितीनुसार निश्चित

बदलतो; पण ख्रिस्ताची शांती हि सातत्यपूर्ण आणि साडीव टिकणारी आहे. जीवनातील कोणत्याही परीस्थितींवर ती काही आधारित नसते, जगिक वस्तू अथवा पृथ्वीवर किती आपले मित्र आहेत त्यावर देखील ती अवलंबून नसते. ख्रिस्त हा जिवंत पाण्याचा झरा आहे, आणि त्याच्याकडून येणारा जो आनंद आणि जो घेतला जातो तो कदापि कमी होत नाही.

**(६) प्रभू कोणाला संपूर्ण शांतीमध्ये ठेवण्याचे अभिवचन देतो?**

***ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्याला तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुझ्यावर असतो. (यशया २६:३)***

स्त्री आणि पुरुष जे धर्माचा आस्वाद घेतात (नातेसंबंध) प्रभू येशू ख्रिस्तासोबत ते अस्वस्थ, व्याकूळ, असमाधानी, बदलणारे असे होणार नाहीत; हृदयातील ख्रिस्ताची शांती त्यांचे चारित्र्य अधिक भक्कम आणि मजबूत करते.

तुमच्या जीवात्म्यातून कदापि शांती, विश्राम अथवा तुमचा तर आताच स्वीकार झाला हि खात्री कोणीही काढून

घेऊ नये. प्रत्येक खात्रीचे अवलंबन करा; ते सर्व तुमचेच आहेत जर तुम्ही प्रभुने दिलेल्या अटींशी कायम राहिलात. तुमच्या सर्व मार्गांचे संपूर्ण समर्पण, जे इतके सुज्ञ असे दिसते, आणि ख्रिस्ताचे मार्ग अवलंबन करणे, हेच त्याच्या प्रेमात विसंबून राहण्याचे परिपूर्ण रहस्य आहे. ख्रिस्ताच्या प्रती जो जीवात्मा शुद्ध होतो त्याच्यात एक शांती असते जी जग काढून घेऊन शकत नाही किंवा देऊ देखील शकत नाही.

**(७) जर आपण स्वर्गीय गोष्टींवर मनन केले आणि आपल्या हृदयात विश्वासाच्या द्वारे जर ख्रिस्ताला वस्ती करण्यास परवानगी दिली तर त्याचा परिणाम काय होईल?**

***ख्रिस्ताने तुमच्या अंतःकरणामध्ये तुमच्या विश्वासाच्या द्वारे वस्ती करावी; ह्यासाठी की, तुम्ही प्रीतीत मुळावलेले व पाया घातलेले असे असून, (इफिसकरास पत्र ३:१७)***

लक्षात ठेवा, दैवत्वाचे संपूर्णत्व हे शारीरिक स्वरूपाने त्याच्यात वस्ती करत होते. जर विश्वासाच्या द्वारे ख्रिस्त आपल्या हृदयात वस्ती करत असेल, तर

आपण त्याचे जीवन पाहून,त्याच्यासारखे बनण्याचा प्रयत्न करू–शुद्ध, शांती देणारे, आणि शुद्ध. आपल्या चारित्र्याच्या द्वारे आपण ख्रिस्ताला प्रगट करू. आपण केवळ तो प्रकाश स्वीकारून केवळ तो शोषून घेऊ इतकेच नाही तर आपल्यामधून तो बाहेर देखील पडेल. येशू आपल्यासाठी कोण व काय आहे ह्याचे अधिक स्पष्ट मत आपल्याकडे असेल. ती पद्धत, प्रेमळ स्वभाव, आणि जो हितकर्ता म्हणून वृत्ती येशू ख्रिस्तामध्ये होते ते आपल्या जीवनात देखील चमकत राहतील.

...जेव्हा येशू हृदयात विश्वासाच्या द्वारे वस्ती करतो, जे धडे ख्रिस्त आपणास देतो ते आचरणात आणले जातील. येशू ख्रिस्ताच्या बद्दल आपली मते इतकी उच्च आहेत की स्वतःला आपण त्याच्यासमोर नगण्य करू. आपले सर्व प्रेम आणि जिव्हाळा हे येशूच्या भोवती केंद्रित होतील, आपले विचार हे अत्यंत कडक रीतीने स्वर्गाच्या द्वाराशी पोहोचतील. ख्रिस्ताची वाढ होईल, आणि माझा ऱ्हास होईल.

मनाला स्वर्गीय गोष्टींवर वस्ती करण्याचे प्रशिक्षण हे दिले गेले पाहिजे. येशू

ख्रिस्ताचा प्रेमळ स्वभाव ओळखण्याने ही विनम्रता आपल्यात येईल. ख्रिस्ताच्या चारित्र्याच्या उत्कृष्ट गोष्टी आणि स्वभाव बघून, पापाचा बंड करणारा स्वभाव आपल्याला दिसेल आणि आपण विश्वासाच्या द्वारे येशू ख्रिस्ताची धार्मिकता आपण ग्रहण करून घेऊ. येशुमध्ये जी गुणधर्म वस्ती करतात तेच आपण आत्मसात करू, जेणेकरून इतरांच्या समोर त्याच्या चारित्र्याचे एक प्रदर्शन आपल्याकडून होईल. जेव्हा काल्वरीच्या कृसाकडे आपण पाहतो, आपण स्वतःला उंच करणार नाही, पण सतत आपली अपात्रता लक्षात ठेवू आणि आपल्या तारणाची किती मोठी किमत स्वर्गाला मोजावी लागली हे आपल्या ध्यानात येईल; आपल्याला ख्रिस्ताची अतुलनीय प्रिती हि ओळखता येईल.

**(८) आपण, जर पवित्र आत्म्याच्या जाणीवेने, हे न समजता येणारे पैलू जर आपण ग्रहण करण्याचा प्रयत्न केला आणि त्याद्वारे ख्रिस्ताचे प्रेम समजून घेतले, आपण कशाने भरून जाऊ?**

***तिची रुंदी, लांबी, उंची व खोली किती, हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घेण्यास व बुद्धीस अगम्य अशी***

***ख्रिस्ताची प्रीती ओळखून घेण्यास शक्तिमान व्हावे; असे की तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे. (इफिसकरास पत्र ३:१८-१९)***

मानवी हृदयाच्या प्रवाहातून जे सर्व पित्याचे प्रेम पिढ्यानपिढ्या आपल्यापर्यंत आले, सर्व कोमलतेचे झरे जे लोकांच्या जीवात्म्यासाठी खुले झाले, हे तर था अथांग सागरासाठी एक व्होटे स्वरूप आहे जेव्हा त्याची तुलना देवाच्या अमर्यादित, न संपणाऱ्या प्रेमाशी करण्यात येते. कोणतीही जीभ ते बोलू शकत नाही; कोणतीही शाही ते लिहून काढू शकत नाही. तुमच्या जीवनाच्या रोजच्या दिवशी त्यावर तुम्ही मनन करू शकता; ते समजून घेण्यासाठी तुम्ही अत्यंत नीतिमान रीतीने शास्त्रवचनांचा शोध करू शकता; देवाने जी प्रत्येक शक्ती आणि क्षमता तुम्हाला दिली त्यास तुम्ही बोलवू शकता, स्वर्गीय पित्याचे प्रेम आणि कळवळा हे जाणून घेण्यासाठी; आणि तरीही त्यापलीकडे एक अमर्याद असलेली सीमा आहे. त्या प्रेमाचा अभ्यास तुम्ही अनेक युगात करू शकता; तरीही देवाच्या प्रेमाची त्याच्या पुत्राला देण्यामधील उंची, खोली, रुंदी

आणि लांबी हि तुम्हाला समजणार नाही. सनातनता ह्याला कधीच पूर्णतः प्रगट करू शकणार नाही. तरीही जसा आपण पवित्र शास्त्राचा अभ्यास करून ख्रिस्ताच्या जीवनावर आणि उद्धाराच्या योजनेवर मनन करू, हे महान गमक आपल्यासमोर अधिक गोष्टी खुल्या करत जातील.

**(९) आपण जर त्याचा शोध घेतला तर ख्रिस्त कशाचे अभिवचन आपणास देतो– जीवनाची भाकर आणि जिवंत पाणी?**

***येशू त्यांना म्हणाला, "मीच जीवनाची भाकर आहे; जो माझ्याकडे येतो त्याला कधीही भूक लागणार नाही आणि जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याला कधीही तहान लागणार नाही. (योहान ६:३५)***

जीवात्म्याची तहान आणि भूक तृप्त करणे हे कोणत्याही मानवी माध्यमाला शक्य नाही.पण येशू म्हणतो, "पाहा, मी दाराशी उभा आहे व दार ठोकत आहे; जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आत जाईन व त्याच्याबरोबर जेवीन, आणि तो माझ्याबरोबर जेवील." "येशू त्यांना म्हणाला, "मीच जीवनाची भाकर आहे;

जो माझ्याकडे येतो त्याला कधीही भूक लागणार नाही आणि जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याला कधीही तहान लागणार नाही.” प्रगटीकरण ३:२०; योहान ६:३५.

आपली शारीरिक शक्ती जपून ठेवण्यासाठी जशी आपल्याला अन्नाची गरज आहे, तशीच आपणास ख्रिस्ताची गरज आहे, स्वर्गातून येणारी भाकर, अध्यात्मिक जीवन राखून ठेवण्यास आणि देवाची कार्ये हे अधिक मजबूत करण्यास त्याचा उप्रोग होतो. ज्याप्रमाणे शरीराला पोषण पाहिजे असते जे जीवन आणि जोम व उत्साह ह्याला जतन करून ठेवते, तसेच जीवात्म्याने देखील ख्रिस्तासोबत संधान साधले पाहिजे, त्याला शरण जाऊन त्याच्यावर पूर्णपणे विसंबून राहिले पाहिजे.

जसा थकलेला प्रवासी अरण्यात एका ओहोळाचा शोध घेत असतो, त्याची ज्वलंत तहान भागवण्यासाठी, आणि जीवनाचे शुद्ध जल हे स्वीकारण्यासाठी, ज्यामध्ये ख्रिस्त हाच तो झरा आहे. {एमबी १८-१९}

**(१०) जे थकलेले व जड ओझ्याने लादलेले आहेत ते जर त्याच्याकडे आले**

**तर ख्रिस्त त्यांना कोणते अभिवचन देतो?**

***अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. (मत्तय ११:२८)***

येशू आदामाचे थकलेले पुत्र आणि कन्या ह्यांना त्याच्याकडे येण्याचे आमंत्रण देतो, आणि त्यांनी त्याच्यावर आपले जड ओझे सोपवावे अशी त्याची इच्छा असते. पण अनेक लोक जे हे आमंत्रण ऐकतात, विश्रामाची ओरड धेऊन, तरीही त्या खडबडीत मार्गावर वाट पाहतात, त्यांची ओझी त्याच्या हृदयाच्या समीप जाऊन ठेवतात. येशूचे त्यांच्यावर प्रेम आहे, आणि त्यांची ओझी वाहण्याची त्याची तरी असते आणि स्वतःला देखील त्याच्या मिठीत ठेवतात. ज्या चिंता आणि काळज्या मनुष्यामधून त्यांची शांती आणि विश्राम ह्या काढून टाकतात; पण पहिल्यांदा त्यांनी त्याच्याकडे आले पाहिजे, आणि आपल्या हृदयातील समस्या त्यांना सांगितल्या पाहिजेत. लोकांचे जे त्याच्यावर प्रेम आहे त्याचा पुरावा म्हणून तो त्या लोकांचा आत्मविश्वास मागून घेतात. विनम्र, विश्वास ठेवणाऱ्या हृदयाचे वरदान हे

त्याच्यासाठी अधिक अनमोल आहे आणि जगाचे धन देऊ शकते त्यापेक्षा अधिक धन ते देतात. जर ते लोक त्याच्याकडे जसे एखादे बालक आपल्या आई वडिलांकडे साध्या आणि सोप्या रीतीने येतात, त्याच साध्यापणाने जर हे लोक आले, त्याच्या हाताचा दैवी स्पर्श त्यांच्या सर्व ओझ्यापासून मुक्त करेल.

येशू, आपला कनवाळू तारणारा, हा मार्ग, सत्य आणि जीवन आहे. आपण त्याच्या दयेचे कृपाळू आमंत्रण का स्वीकारणार नाही, त्याच्या अभिवचनाच्या शब्दावर का विश्वास ठेवणार नाही, आणि जीवनाचा मार्ग इतका कठोर का करणार नाही? … ख्रिस्ताचे मार्ग हे आनंददायी आहेत, आणि त्याचे सर्व मार्ग हे शांतीमय आहेत. जर आपण आपल्या पावलांसाठी कडक आणि कठोर मार्ग सिद्ध केले तर, आणि पृथ्वीवर असताना स्वतःसाठी धनसंचय करण्यात काळजी करत बसलो तर, आपण आता बदलावे आणि मग ख्रिस्ताचा मार्ग तो अनुसरावा.

**(११) जे लोक आपले जीवात्मे त्याच्या शरणार्थ देतात त्यांना ख्रिस्त काय अभिवचन देतो?**

***ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्याला तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुझ्यावर असतो. परमेश्वरावर सर्वकाळ भाव ठेवा, कारण प्रभू परमेश हा सनातन आश्रयदुर्ग आहे. (यशया २६:३-४)***

ह्या पृथ्वीवर स्वर्गाची सुरुवात झाली पाहिजे. {एन पी} जे लोक ख्रिस्ताला त्याच्या शब्दावर घेतात आणि स्वीकारतात, आणि त्यांचे जीवात्मे त्याच्या रक्षण करण्यास शरण करून देतात, त्यांची जीवने त्याने सुसंगत करावे म्हणून, त्यांना शांती आणि स्थैर्य स्तब्धता मिळते. जेव्हा येशू त्यांना त्याच्या सान्निध्याने आनंदित करतो तर त्यांना ह्या जगातील काहीच दुखी करू शकणार नाही. परिपूर्ण मूकसंमती मध्ये पूर्ण विसावा आहे. प्रभू म्हणतो, “ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्याला तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुझ्यावर असतो.” यशया २६:३. आपली जीवने त्या गुंत्यात अडकलेली दिसतील; पण जसे आपण स्वतःला आपल्या सुज्ञ स्वामी आणि प्रभूच्या हाती स्वाधीन करतो, तो अशा प्रकारच्या जीवनाची पाध्दत आणि चारित्र्य व्यक्त करतो जे त्याच्या गौरवार्थ सिद्‌ध होते. आणि जे

चारित्र्य त्याचे गौरव व्यक्त करते- ख्रिस्ताचे चारित्र्य त्यांचा देवाच्या स्वर्गात प्रवेश होईल. पुनर्जीवित मानवजात ही त्याच्यासोबत पांढरे वस्त्र परिधान करतील, कारण ते पात्र आहेत.

जसे येशूच्या द्वारे आपण त्या विश्रामात प्रवेश करतो, स्वर्गाची सुरुवात तिकडे होते. आपण त्याच्या आमंत्रणाला प्रतिसाद देतो, या आणि माझ्याकडून हे शिका, आणि अशा प्राक्रे येण्याने आपण सनातन जीवनाची सुरुवात करतो. ख्रिस्ताच्या द्वारे देवाकडे न थांबता जाने म्हणजे स्वर्ग आहे. जितके अधिक आणि लाब काळ, आपण अशा स्वर्गाच्या आनंदात राहू, अधिकाधिक देवाचे गौरव आपल्यासाठी खुले होते; आणि जितकी अधिक आपल्याला देवाची माहिती मिळते, तितकाच अधिक आपला आनंद वाढत जाईल.

***मी त्या अभिवचनासाठी ख्रिस्ताचे आभार मानतो की एक दिव लवकरच येईल ज्यामुळे त्या राज्याचे वतन होण्यासाठी आपल्याला आमंत्रण देण्यात येईल, आणि ते राज्य तो अशा लोकांसाठी तयार करेल ज्याने तसे निवडले आहे.***

गोल करा :      होय      अनिश्चित

मी इतकी कृतज्ञ आहे की ख्रिस्ताने माझ्यामध्ये वस्ती करून मला देवाच्या शहराकडे घेऊन जाण्यासाठी त्या सांत्वनदात्याला पाठवले. ख्रिस्ताच्या कृपेने, मी प्रार्थना करतो, की मी विश्वासू राहावे की एके दिवशी माझा त्यात प्रवेश होईल.

गोल करा :      होय      अनिश्चित

हा अभिवचनरुपी आशीर्वाद स्वीकारणे माझा निश्चय आहे ज्यामुळे सर्व इतर आशीर्वाद त्याच्या कवेत येतात आणि माझे जीवन पूर्णपणे देवासाठी पवित्र असे जगण्याचा माझा निर्धार आहे.

गोल करा :      होय      अनिश्चित

ख्रिस्ताचे जे अभिवचन आहे जी शांती देऊ करण्याचे तो अभिवचन देतो त्याची इच्छा मी बाळगतो आणि त्यामध्ये मी

*स्वतःला शरण म्हणून देण्याची निवड करतो- सर्व शांतीला नष्ट करणारा आणि माझ्या स्वतःला ख्रिस्ताच्या सेवेने पवित्र होऊन जे शांती देतात जे जग काढून घेऊ शकत नाही.*

*गोल करा :      होय      अनिश्चित*

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________



# धडा १२
# ख्रिस्तामध्ये आपले मोल

**(१) ख्रिस्ताने आपल्याला इतक्या प्रेमाने अधिक मोल देऊन प्रेमाने विकत घेतले म्हणून, त्याच्यासाठी गौरव देण्यास आपण कसली इच्छा बाळगली पाहिजे?**

***कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहात; म्हणून तुम्ही आपले शरीर [व आत्मा] जी देवाची आहेत त्याद्वारे देवाचा गौरव करा. (१ करिंथकरास पत्र ६:२०)***

आज मनुष्य देखील इथेच उभा आहे. ख्रिस्ताने आपल्याला त्याचे जीवन देऊन

विकत घेतले आहे, आणि आपण त्याच्याच मालकीचे आहोत. आपले सर्व सामर्थ्य, शारीरिक, मानसिक, आणि आधात्मिक, हे त्याच्याच मालकीचे आहेत; आणि त्याच्या मालकीचे जे आहे ते त्यापासून परावृत्त करून घेणे ही त्याची चोरी आहे.

त्याच अंदाजाच्या नुसार प्रभुणे आपल्या जीवात्म्यांचे मोल केले असेल–आणि जितके आपल्याला ते समजते–जे ख्रिस्ताने त्यांच्यावर ठेवले आहे.... येशूचा मृत्यू झाला की मनुष्याला त्याने ह्या सनातन नाशापासून उद्धरावे. मग जी मालमत्ता विकत घेण्यात येते तसेच आपण स्वतःला राखून ठेवले पाहिजे. “तुमचे शरीर, तुमच्यामध्ये वसणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हांला मिळाला आहे त्याचे मंदिर आहे हे तुम्हांला ठाऊक नाही काय? आणि तुम्ही स्वतःचे मालक नाही; कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहात; म्हणून तुम्ही आपले शरीर [व आत्मा] जी देवाची आहेत त्याद्वारे देवाचा गौरव करा.” (१ कर. ६:१९,२०). आपल्या मनाच्या जीवाच्या आणि शरीराच्या सर्व शक्ती प्रभूच्याच आहेत. आपला वेळ देखील त्याचाच आहे. त्याची सेवा

करण्यास उत्तम परिस्थितीत स्वतःला आपण ठेवले पाहिजे, सातत्याने ख्रिस्ताच्या संपर्कात ठेवल्याने, आणि रोज त्याने जे महागडे अर्पण आपल्यासाठी केले आपण त्याच्यामध्ये देवाची धार्मिकता हे बनले पाहिजे.

**(२) प्रभूचे प्रेम आणि त्याचे त्याच्या अनुयायांशी असलेल्या कोणत्या दोन चिन्हात्मक गोष्टींचे वर्णन ह्या वचनात करण्यात आले आहे.**

***कारण तरुण जसा कुमारीशी विवाह करतो, तशी तुझी मुले तुझ्याशी विवाह करतील, नवरा जसा नवरी पाहून हर्षतो तसा तुझा देव तुला पाहून हर्षेल. (यशया ६२:५)***

पवित्र शास्त्रात ख्रिस्त आणि त्याची मंडळी ह्यांच्यातील नात्याचा जो टिकणारा आणि पवित्र स्वभाव दिसतो त्याचे प्रतिनिधित्व विवाहाच्या विधीत एक झालेले दिसते. प्रभुने त्याच्या लोकांना एका सार्वभौम कराराने जोडलेले आहे, तो त्यांचा देव होण्याचे अभिवचन देऊन, आणि ते स्वतः त्याचेच असण्याची शपथ वाहतात. तो घोषणा करतो: "मी तुला सर्वकाळासाठी आपली

वाग्दत्त असे करीन, नीतीने व न्यायाने, व ममतेने व दयेने मी तुला आपली वाग्दत्त असे करीन.” होशेय २:१९. आणि परत: “कारण मी लग्नाचा नवरा आहे.” यिर्मया ३:१४. आणि नवीन करारात तो हेच दृश्य आणि प्रतिमा उपयोगात आणतो जेव्हा तो म्हणतो: “कारण तुमच्याविषयीची माझी आस्था ईश्वरप्रेरित आस्था आहे; मी एका पतीबरोबर तुमचे वाग्दान केले आहे, अशा हेतूने की, तुम्हांला शुद्‌ध कुमारी असे ख्रिस्ताला सादर करावे.” २ करिंथकरास पत्र ११:२.

**(३) प्रभू येशूला जर आपण आपल्या जीवनाचा प्रभू होण्याची परवानगी दिली तर, “ज्याने आपल्यावर प्रेम केले” त्याच्याद्‌वारे आपण काय बनणार असे अभिवचन शास्त्रवचन आपणास देते?**

***उलटपक्षी, ज्याने आपल्यावर प्रीती केली त्याच्या योगे ह्या सर्व गोष्टींत आपण महाविजयी ठरतो. (रोमकरास पत्र ८:३७)***

आपल्या तारणार्याने आपणासाठी ती किमत मोजली आहे. सैतान कोणालाही गुलाम म्हणून ठेऊ शकत नाही. ख्रिस्त आपल्यासमोर सर्वकाळसाठी आपला

सहाय्यक म्हणून उभा राहतो. “म्हणून त्याला सर्व प्रकारे ‘आपल्या बंधूंसारखे’ होणे अगत्याचे होते, ह्यासाठी की, लोकांच्या पापांबद्‌दल प्रायश्चित्त करण्याकरता त्याने स्वत: देवासंबंधीच्या गोष्टींविषयी दयाळू व विश्वसनीय प्रमुख याजक व्हावे. कारण ज्या अर्थी त्याने स्वत: परीक्षा होत असता दु:ख भोगले त्या अर्थी ज्यांची परीक्षा होत आहे त्यांना साहाय्य करण्यास तो समर्थ आहे.” (इब्री. २:१७,१८).

देवाच्या पुत्राच्या कुटुंबात जे कोणी दत्तक घेतले जातात ते त्याच्याच आत्म्याने बदलले जातात. स्वतःमध्ये -व्यस्त होणे आणि स्वतःवर उच्च कोटीचे प्रेम असणे हे देवासाठी असणारा आत्म-त्याग आणि प्रेम ह्याची जगात घेतात. कोणताही मनुष्य पावित्र्य एक जन्मसिद्‌ध हक्क म्हणून वतन म्हणून उपभोगत नाही, आणि तसे असूच शकत नाही, त्याने रचलेल्या इयर कोणत्याच पद्‌धतीने देवाच्या प्रती प्रामाणिक बनू शकत नाही. “माझ्यापासून” ख्रिस्त म्हणतो “वेगळे असल्यास तुम्हांला काही करता येत नाही.” (योहान १५:५). मानवी नितीमत्व हे “घाणेरड्या चिंदीप्रमाणे” आहे. पण देवासोबत सर्व काही शक्य

आहे. उद्धारकाच्या सामर्थ्यात, दुर्बल, चुकणारा मनुष्य हा त्याच्याठायी जी दुष्टाई आहे त्यामध्ये एका विजेत्यापेक्षा अधिक बनू शकतो.

**(४) जे अध्यात्मिक “इस्राएल” आहे त्यांच्यासाठी खऱ्या अर्थाने अब्राहामाचे वंशज कोण बनू शकतात?**

***आणि तुम्ही जर ख्रिस्ताचे आहात तर अब्राहामाचे संतान आणि अभिवचनानुसार वारस आहात. (गलतीकरास पत्र ३:२९)***

ज्या प्रमाणे अब्राहामाने देखील “देवावर विश्वास ठेवला, आणि त्याच्या ठायी ते नितीमत्व असे गणण्यात आले.” म्हणून जे जाणून घ्या की जे केवळ विश्वासाने परिपूर्ण आहेत तेच देवाचे पुत्र आहेत. आणि शास्त्रवचन, ह्याचा अंदाज व्यक्त करून की देव परराष्ट्रीय लोकांना विश्वासाच्या द्वारे नीतिमान ठरवेल ह्या आशेने, त्यांनी आधीच अब्राहामाला ते शुभवर्तमान घोषित केले, “तुझ्याकडून सर्व राष्ट्रांना आशीर्वाद मिळेल.” म्हणून जे विश्वासात आहेत ते विश्वास ठेवणाऱ्या अब्राहामाच्या

द्वारे आशीर्वादित ठरवले जातात. गलतीकरास पत्र ३:६-९.

यहुदी लोक अब्राहामाचे वंशज असल्याचे सिद्ध करतात, पण अब्राहामचे कार्ये करण्यात अपयशी ठरल्यामुळे, ते त्याचे खरे संतान नव्हते हे त्यांनी सिद्ध केले. केवळ जे लोक त्याच्यासोबत अध्यात्मिक रीतीने सुसंगतीत आहेत ह्यांना त्यांचे खरे वंशज म्हणून पाचारण करण्यात येते.

**(५) जे लोक अध्यात्मिक इस्राएल होण्याची निवड करतात त्यांच्यासाठी कोणत्या प्रकारे तीन भात विभागता येणारा हक्क हा प्रभुणे निवडला आहे?**

***तरी आता हे याकोबा, तुझा उत्पन्नकर्ता, आणि हे इस्राएला, तुझा निर्माणकर्ता परमेश्वर, असे म्हणतो, "भिऊ नको; कारण मी तुला सोडवले आहे; मी तुला तुझ्या नावाने हाक मारली आहे; तू माझा आहेस. (यशया ४३:१)***

ख्रिस्ताचे त्याच्या लोकांशी असलेल्या नात्यांमध्ये, इस्राएल लोकांना जे नियमशास्त्र देण्यात आले, त्यात एक

सुंदर उदाहरण आहे. जेव्हा दारिद्र्यामुळे, एका इब्री व्यक्तीला त्याच्या ह्या वडिलोपार्जित हक्कापासून वंचित राहावे लागत होते, आणि स्वतःला एक गुलाम म्हणून विकत देणे भाग होते, त्याचा उद्धार करून त्याचे वतन हे त्याच्या सर्वात जी जवळची व्यक्ती होती त्याला देणे भाग होते. लेव. २५:२५, ४७-४९; रुथ २:२० पहा. तुझा कोणी भाऊबंद कंगाल झाला आणि त्याने आपल्या वतनाचा काही भाग विकला, तर त्याच्या सगळ्यात जवळच्या आप्ताने पुढे येऊन आपल्या भाऊबंदाने विकलेला भाग सोडवून घ्यावा. तर त्याची विक्री झाल्यावरही त्याला सोडवून घेता येईल; त्याच्या भाऊबंदांपैकी कोणालाही त्याला सोडवता येईल. त्याचा चुलता, त्याचा चुलत भाऊ अथवा त्याच्या कुळापैकी कोणी जवळचा आप्त ह्यांना त्याला सोडवता येईल; अथवा तो स्वतःच धनवान झाला तर त्याला स्वतःची सुटका करवून घेता. ““भिऊ नको; कारण मी तुला सोडवले आहे; मी तुला तुझ्या नावाने हाक मारली आहे; तू माझा आहेस. तू माझ्या दृष्टीने अमोल आहेस; तू मोठ्या योग्यतेचा आहेस व मी तुझ्यावर प्रेम करतो, म्हणून तुझ्याबद्दल माणसे व तुझ्या

जिवाबद्दल राष्ट्रे मी देईन.” यशया ४३:१,४.

जे स्वर्गीय जन त्याच्या सिंहासनाच्या भोवती असतात ख्रिस्ताचे त्यांच्यावर प्रेम असते; पण ज्या महान प्रेमाने त्याने आमच्यावर प्रेम केले त्याचे काय? आपल्याला ते समजत नाही, पण आपल्या स्वतःच्या अनुभवातून ते खरे आहे हे आपणास समजते. आणि जर आपण त्याच्याशी भाऊबंदकीचे नाते ठेवले, तर मग आपल्या प्रभूचे जे बंधू आणि भगिनी आहेत त्यांच्याशी आपण कितीतरी कोमलतेने वागले पाहिजे! आपल्या दैवी नात्याचे सर्व हक्क समजून घेण्यात आपण मग घाई करू नये का? देवाच्या कुटुंबात दत्तक म्हणून स्वीकारले गेल्यावर, आपला स्वर्गीय पिता आणि त्याचे राज्य ह्यांचा आपण सन्मान करू नये का?

**(६) आपण, जर खऱ्या पश्चातापाने, आपल्या पापांची कबुली दिली, तर मग ख्रिस्त काय करणार ह्याविषयी आपण आत्मविश्वास बाळगू शकतो?**

***जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे***

***म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील. (१ योहान १:९)***

अनेक लोक स्वतःला त्यांची जी अपात्रता आहे त्यावर मनन करू देण्याची परवानगी देतात जणूकाही हा तर एक गुणधर्म आहे. विश्वासाच्या पूर्ण भावाने त्यांनी येशूकडे आहे तसे येणे हे खरे अडखळण आहे. त्यांनी स्वतःची अपात्रता समजून घ्यावी, आणि ह्यामुळे—त्यांच्या पापी स्वभावामुळे—तारणार्याकडे येण्याची गरज त्यांनी जाणून घ्यावी, जो त्यांची पात्रता आहे व त्यांची धार्मिकता होईल जर त्यांनी पश्चाताप करून स्वतःला नम्र केले तर. त्यांची अपात्रता हि स्वतःमध्ये एक प्रदर्शित होणारी वास्तविकता आहे. येशू ख्रिस्ताची पात्रता एक निश्चित गोष्ट आहे. मग प्रत्येक शंका घेणाऱ्या जीवात्म्याने आशा धरून आत्मविश्वास बाळगावा, कारण जो पात्र आहे तोच त्यांचा तारणारा आहे. त्याची तारणाची एकमेव आशा म्हणजे विश्वासाने ती पात्रता धारण करून राहणे जी त्याने तर केली नाही पण येशू ख्रिस्त आपली धार्मिकता ही त्याला पुरवणार.

**(७) आपण जेव्हा पापी मनुष्य म्हणून हे जाणून घेतो की आपल्या गौरवाची आशा**

**ही ख्रिस्तात आहे आणि स्वतः मरण स्वीकारतो, प्रेषित पौलाच्या प्रमाणे, आपण कशाची घोषणा करणार?**

***मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत:ला माझ्याकरता दिले. (गलतीकरास पत्र २:२०)***

ख्रिस्त, अनमोल तारणारा, ह्याने ख्रिस्ती व्यक्तीचे सर्वेसर्वा बनले पाहिजे. प्रत्येक पवित्र विचार, प्रत्येक शुद्‌ध इच्छा, प्रत्येक देवभीरु उद्‌देश, हा त्याकडून आहे जो सत्य, मार्ग, आणि प्रकाश आहे. ख्रिस्ताने त्याच्या प्रतिनिधीमध्ये ह्याच सत्याच्या आत्म्याने जिवंत राहिले पाहिजे.... पौल म्हणतो, " मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत:ला माझ्याकरता दिले."

(गलतीकरास पत्र २:२०).... त्याच्या प्रेमाच्या महान ओतण्याने विश्वात त्याने आपली जागा घेतली आणि सर्व गीष्टींच्या अधिकाऱ्याला तो स्वतः ह्या मानवी कुटुंबाचा एक प्रतिनिधी आहे असे त्याला लेखण्याची परवानगी दिली. त्याने स्वतःला आपल्या आवडीनुसार ओळखले, मृत्यूचा घाला आपल्या छातीवर सहन केला, मनुष्याच्या दोष सहन करून त्याची शिक्षा वाहिली, आणि मनुष्याच्या वतीने देवाला पूर्ण अर्पण वाहिले. ह्या खंडणीच्या वतीने मनुष्याला परिपूर्ण नितीमता आणि पूर्ण तारण देऊ करण्याचे सामर्थ्य त्याला प्राप्त झाले. जोकोणी त्याच्यावर वयक्तिक तारणारा म्हणून विश्वास ठेवेल त्याचा नाश होणार नाही तर त्याला सनातन जीवन प्राप्त होईल.

**(८) देवाचे प्रेम आपल्यात परिपूर्ण होत आहे हे कशातून प्रगट होते?**

***जो कोणी त्याच्या वचनाप्रमाणे चालतो, त्याच्यामध्ये देवाची प्रीती खरोखर पूर्णत्व पावली आहे. ह्यावरून आपल्याला कळून येते की, आपण त्याच्या ठायी आहोत. (१ योहान २:५)***

जोकोणी ख्रिस्तामध्ये वस्ती करतो तो देवाच्या प्रेमात परिपूर्ण होत जातो, त्याचे हेतू, विचार, शब्द, आणि कृती ह्या देवाच्या नियमशास्त्रात ज्या आज्ञा मांडण्यात आल्या आहेत त्याच्याशी सुसंगतीत राहतो. जी व्यक्ती ख्रिस्तामध्ये वस्ती करते तिच्या ह्रदयात असे काहीच नाही जे देवाच्या नियमशास्त्राच्या विरुद्ध लढाई करेल. जिकडे ख्रिस्ताचा आत्मा ह्रदयात आहे, ख्रिस्ताचे चारित्र्य प्रगट होते, आणि चिथावणी जिकडे आहे त्याच्या अधीन सौम्यता प्रगट होते, आणि परीक्षेच्या काळात संयम दाखवला जातो ."लहान मुलांनो, कोणत्याही मनुष्याने तुम्हास फसवू नये: जो कोणी धार्मिक कृत्ये करतो तो धार्मिक आहेच, जसा तो देखील नीतिमान असतो." देवाच्या महान नैतिक मुलांच्या द्वारेच धार्मिकतेची व्याख्या दिली जाते, ते म्हणजे दहा आज्ञा. चारित्र्याची मोजमापणी करण्यास दुसरा कोणताही इतर नियम नाही.

**(९) स्वयं- त्याग, स्वयं- अर्पणाच्या ख्रिस्ताच्या चारित्र्यामुळे, आणि उद्धार देणाऱ्या प्रेमामुळे, आपला सनातन**

**उद्धार प्राप्त करून घेण्यासाठी त्याने काय केले?**

***आणि बकरे व वासरे ह्यांचे नव्हे, तर स्वत:चे रक्त अर्पण करून एकदाच परमपवित्रस्थानात गेला, आणि त्याने सार्वकालिक मुक्ती मिळवली. (इब्री ९:१२)***

आपले लहान विश्व हे विश्वासाठी एक धडा घेणारे पुस्तक ठरते. देवाचा कृपेचा अद्भुत उद्देश, उद्धार देणाऱ्या प्रेमाचे रहस्य, हेच ते गमक आहे ज्याच्यात “देवदूतांना बघण्याची इच्छा असते”, आणि सर्व अथक अशा युगांमध्ये तोच त्यांचा अभ्यास ठरणार. उद्धार पावलेले आणि पतन न झालेले लोक ह्यांना ख्रिस्ताच्या वधस्तंभात ते शास्त्र आणि त्यांचे गीत गवसेल. असे दिसेल की येशूच्या चेहऱ्यावरून जे गौरव चमकत होते हे त्याच्या स्वयं- त्यागमय प्रेमाचे गौरव होते. काल्वरीच्या मधून येणाऱ्या प्रकाशात असे दिसेल की स्वयं- त्यागाच्या प्रेमाचे नियमशास्त्र हे स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांच्यासाठी जीवनाचे नियमशास्त्र नाही; जे प्रेम “स्वतःचा शोध घेत नाही ” तिचा उगम हा देवाच्या हृदयात असतो.

**(१०) जेव्हा तारण स्वीकारण्याचे ख्रिस्ताचे अद्‌भुत आमंत्रण आपण स्वीकारतो, आपले कशाने तारण होत नाही आणि कशाच्या द्‌वारे तारण होते?**

***तेव्हा आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आत्म्याने केलेले नवीकरण ह्यांच्या द्‌वारे त्याने आपल्या दयेनुसार आपल्याला तारले, (तीत ३:५)***

देव आपल्याला त्याच्यावर विश्वास ठेवण्याची इच्छा बाळगतो जो सर्व अनीती करणाऱ्यांना नीतिमान ठरवतो. त्याचे प्रतिफळ आपल्या पात्रतेणे देण्यात येत नाही तर त्याच्या स्वतःच्या हेतूने दिले जाते, "जो युगादिकालाचा संकल्प त्याने ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये सिद्‌धीस नेला आहे." इफिस. ३:११. "तेव्हा आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आत्म्याने केलेले नवीकरण ह्यांच्या द्‌वारे त्याने आपल्या दयेनुसार आपल्याला तारले." तीताला पत्र ३:५. आणि जे लोक त्याच्यावर विश्वास ठेवतात तो "जास्तीत जास्त, अर्थात आपल्या मागण्या किंवा कल्पना ह्यांपलीकडे." इफिस. ३:२०.

केलेल्या कष्टाचे प्रमाण किंवा त्याचे दृश्य परिणाम नव्हे तर ज्या आत्म्यात ते कार्य केले जाते ते देवासमोर त्याचे मोल ठरवते. जे कोणी द्राक्षमळ्यात शेवटल्या क्षणाला आले त्यांना मिळालेल्या कामाच्या संधीसाठी देवाचे आभार मानत होते. ज्याने त्यांचा स्वीकार केला त्याच्याप्रती त्यांची हृदये कृतज्ञतेने भरलेली होती; आणि दिवसाच्या समाप्तीस घरमालकाने त्यांना पूर्ण दिवसाचा जेव्हा मोबदला दिला, त्यांना खूप आश्चर्य वाटले. त्यांना ठाऊक होते की असे वेतन त्यांनी मिळवलेले नव्हते. त्यांच्या मालकाच्या चेहऱ्यावर दिसून येणारी दया आणि चांगुलपण ह्यांनी त्यांना आनंदाने भरून टाकले. मालकाचे चांगुलपण अथवा त्यांना जो उदारहस्ते मोबदला दिला गेला ते कधीही विसरणार नाही. तसेच पापी व्यक्तीच्या सोबत होते, ज्याला त्याची अपात्रता ठाऊक असते, व शेवटल्या क्षणाला त्याने मालकाच्या द्राक्ष मळ्यात पाऊल ठेवलेले असते. त्याच्या सेवेचा काल किती अल्प वाटतो, त्याला वाटते की प्रतिफळ मिळण्यास त्याची पात्रता नाही; पण देवाने त्याचा स्वीकार केला हे ऐकून तो आनंदाने भरून जातो. तो एका विनम्र, विश्वास ठेवणाऱ्या आत्म्याने कार्य करतो,

ख्रिस्ताच्या सोबत सहकारी म्हणून काम करण्यास मिळालेल्या संधीबाबत तो त्याचे आभार मानतो. ह्याच आत्म्याचा सन्मान करण्याची इच्छा आणि आनंद देव मानतो.

आपल्याला प्रतिफळ काय मिळेल ह्यावर प्रश्न न विचारता त्याच्यात आपण विसावा घ्यावा अशी प्रभूची इच्छा असते. जेव्हा ख्रिस्त जीवात्म्यात वस्ती करतो, प्रतिफळाचा विचार हा सर्वोच्च नसतो. हा तो उद्‌देश नसतो ज्यामुळे आपण सेवा करण्यास उत्तेजित होतो. हे खरे आहे की आपण अधीन होण्याच्या भावनेने प्रतिफळ काय मिळेल ह्याची अपेक्षा बाळगली पाहिजे. देवाचे जे वचनदत्तरुपी आशीर्वाद आहेत त्याचे कौतुक आपण करावे अशी देवाची इच्छा असते. पण प्रतिफळ प्राप्त करून घेण्यासाठी आपण तितके उत्साही असावे अशी त्याची इच्छा नाही आणि केलेल्या प्रत्येक कर्तव्यासाठी आपणास प्रतिफळ मिळेल अशी देखील अपेक्षा ठेऊ नये. सर्व फायदे तोटे वगळता केवळ प्रतिफळ मिळणार ह्या कल्पनेने आपण ते मिळवण्यास खूप व्याकूळ होऊ नये. देवाच्या प्रती आणि आपल्या सहकार्यांच्या प्रती प्रेम व्यक्त करणे हा उद्‌देश आपण बाळगला पाहिजे.

मी आभारी आहे, की त्याचे रक्त आणि विश्वासाच्या द्वारे असणाऱ्या त्याच्या धार्मिक्तेत, मला अब्राहामाचे अध्यात्मिक वंशज आणि बीज असे लेखण्यात येते, आणि विजेता आणि महाविजेता मी त्याद्वारे बनू शकतो.

गोल करा : होय अनिश्चित

प्रभू येशूचे माझ्यावर जे महान प्रेम आहे त्यासाठी मी त्याचे आभार मानून त्याची स्तुती करतो जे इतके महान आहे आणि त्याने शेवटली अंतिम किमत मोजली आहे. माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातून त्याला गौरव प्राप्त व्हावे अशीच माझी इच्छा आहे.

गोल करा : होय अनिश्चित

माझे हृदय ख्रिस्ताच्या प्रती प्रेमाने भरून जाते कारण त्याने माझे मोल इतके ठरवले की देवाच्या कुटुंबात माझा प्रवेश होण्यासाठी त्याने माझा उद्धार केला.

*गोल करा : होय अनिश्चित*

*माझे मोल ह्यावर वस्ती न करण्यास व शंका न घेण्याची मी निवड करतो तर देवाची जी पात्रता आहे त्यावर वस्ती करून माझा उद्धारक आणि तारणारा येशू ख्रिस्त जी पात्रता देतो त्याचा विश्वासाने स्वीकार करण्याची निवड मी करतो.*

*गोल करा : होय अनिश्चित*

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________



# धडा १३
# देवाच्या प्रीतीत वस्ती करणे

**(१) जेव्हा देवाच्या कृपेने, आपण प्रितीत वस्ती करण्याची निवड करतो, त्याचा परिणाम काय होतो?**

***देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे. देव प्रीती आहे; जो प्रीतीमध्ये राहतो तो देवामध्ये राहतो व देव त्याच्यामध्ये राहतो. (१ योहान ४:१६)***

जेव्हा आपण स्वतःला प्रेमळ अशा वातावरणात वावरू देतो, त्याचा अर्थ असतो की देवाच्या सान्निध्यात आपणस

स्वतःला जतन करून ठेवण्याची सोय करतो. आपण प्रीतीत वस्ती करतो, आपण देवात वस्ती करतो, जो प्रिती आहे (व.८). देव आणि मनुष्यांच्या कार्यक्षेत्रात सातत्याने वस्ती करण्यासाठी, अगदी विरोधी प्रभावांच्या मध्ये देखील, त्यात अध्यात्मिक जोमाची मागणी केली जाते जी केवळ प्रभूसोबत सातत्याने सहभागीता घेतल्याने राखली जाऊ शकते.

ज्या सर्व लोकांनी अशाच प्रेमाच्या देवामध्ये वस्ती करण्याचा पारस्परिक आनंद उपभोगला आहे त्यांना ठाऊक असते की त्याचे प्रतिफळ हे केलेल्या प्रयत्नांचे चीज झाल्यासारखे असते. सैतानाला देखील हे ठाऊक आहे, आणि त्याचे मोल थेट नाकारण्याच्या प्रयत्नात तो काही करत नाही. त्या ऐवजी, चमकणाऱ्या रंगांमध्ये तो कमी वस्तू रेखाटतो आणि आपणास ते विचार त्याच्यावर केंद्रित करण्याची प्रेरणा देतो, मग ते अल्पशा काळासाठी असले तरीही घडते. एकदा देवापासून आपले लक्ष विचलित करण्याच्या प्रयत्नात तो यशस्वी झाला की, स्वतः व इतरांच्या बद्दल हानिकारक विचार करण्यास मनाला तो प्रवृत्त करतो. आपणास हे समजण्यापूर्वी अथवा त्याचे धोके

जाणण्यापूर्वी, आपण असे संतप्त होण्याचे विचार एकमेकांमध्ये बाळगतो, ह्याचा परिणाम म्हणजे देव आणि प्रिती दोन्हीही आपल्या हृदयातून नष्ट होतात. ही तर जुनी अशी पद्धत आहे, पण अजूनही ती यशस्वी ठरते!

आपली उत्तम बाजू सावरणे म्हणजे जाणूनबुजून आणि सातत्याने मनाला देवाच्या हातून निघणार्या आशीर्वादांवर केंद्रित केल्याने सफल होते (स्तोत्रसहिता ६३:६; १३९:१७,१८). देवाने आपल्यासाठी काय केले ह्याची आठवण, त्याच्यासोबत घेतलेल्या सहभागीतेचा अर्थ, हा इतरांना जेव्हा आपले सुख सांगतो त्याद्वारे देखील बळकट होतात. अशा साक्षींच्या द्वारे आपले बंधुजन उत्तेजित होतात आणि आपल्यात व स्वर्गात जे नाते आहे ते अधिक दृढ करण्याचा निश्चय त्याद्वारे अधिक बळावला जातो (मलाखी ३:१६).

**(२) आपण जे प्रेम इतरांना दाखवतो त्याद्वारे देवासोबत असणारे आपले नाते कसे प्रगट होते?**

***प्रियजनहो, आपण एकमेकांवर प्रीती करावी, कारण प्रीती देवापासून आहे; जो कोणी प्रीती करतो तो देवापासून***

*जन्मलेला आहे व देवाला ओळखतो. (१ योहान ४:७)*

ज्या व्यक्तीच्या जीवनात ख्रिस्ताची वस्ती आहे, त्यातून व्यावहारिक देवभिरूपण व्यक्त होत असते. चारित्र्य अधिक शुद्ध, उंचावले जाते, उद्दात होऊन गौरविण्यात येते. शुद्ध सिद्धांत हा नितीमत्वांच्या कार्याशी मिसळला जातो; स्वर्गीय नियमशास्त्र हे पवित्र पद्धतींशी जुळवण्यात येतात.

आपल्या सहकार्यांच्या सोबत असणाऱ्या प्रेमाचा हा सुवास असतो ज्याद्वारे देवाचे प्रेम हे प्रगट होते. सेवेमध्ये संयमी असल्याने जीवाला विश्राम प्राप्त होतो. विनम्र, मेहनती, विश्वासू परिश्रमांनी इस्राएल आणि इतरांचे हित) ह्याला बढती मिळते. जो कोणी ख्रिस्ताच्या ह्या मार्गाचे अनुसरण करण्यास तयार आहे त्याला उंचावून बळकट करण्यास देव तयार आहे.

एखाद्या मनुष्याचा विश्वास हा त्याला सनातन जीवनापर्यंत नेईल, आणि तो देखील त्याच्या मध्ये आपल्या बंधूजणांच्या प्रती ख्रिस्तासारखी प्रिती नसली तरीही, असे गृहीत धरणे ही

सर्वात मोठी आणि घातक अशी फसवणूक आहे. ज्या कोणाचे देवावर आणि शेजाऱ्यावर प्रेम आहे तो प्रकाश आणि प्रिती ह्यांनी भरून जातो. देव त्याच्यामध्ये आणि त्याच्याभोवती सर्वत्र असतो. ख्रिस्ती लोक त्यांच्याभोवती असणाऱ्या लोकांवर असे अनमोल जीवात्मे म्हणून प्रेम करतात ज्यांच्यासाठी ख्रिस्त मरण पावला होता. एक प्रेमविरहित असा ख्रिस्ती कदापि आढळून येत नाही; कारण "देव प्रिती आहे," आणि "ह्याद्वारे आपणास ठाऊक आहे कारण आपण त्याला जाणतो, जर त्याच्या आज्ञांचे पालन आपण केले. जोकोणी म्हणतो, मी त्याला ओळखतो, आणि त्याच्या आज्ञांचे पालन करत नाही, तो तर लबाड आहे, आणि त्यामध्ये सत्य वस्ती करत नाही."

**(३) दया, न मोजता येणारे प्रेम आणि सनातन जीवन ह्याविषयी खोल विचार आणि मंथन करण्यासाठी आपण कोणाकडे सातत्याने बघितले पाहिजे असे हे वचन आपणास सल्ला देते?**

***सार्वकालिक जीवनासाठी आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या दयेची वाट पाहा,***

***आणि आपणांस देवाच्या प्रीतीमध्ये राखा. (यहूदा १:२१)***

ख्रिस्ताविषयी खोल विचारमंथन करत असताना आपण एका प्रेमाच्या अथांग सागरावर लक्ष केंद्रित करतो जो मोजता येण्यासारखा नसतो. ह्या प्रेमाविषयी सांगण्याचा आपला प्रयत्न असतो, आणि भाषा अपुरी पडते. त्याच्या पृथ्वीवरील जीवनाचा आपण विचार करतो, त्याचे आपल्यासाठी केलेले अर्पण, स्वर्गात आपला वकील म्हणून तो करत असणारे काम, आणि ज्यांचे त्याच्यावर प्रेम आहे त्यांच्यासाठी जे महाल तो तयार करत आहे, आणि आपण तर केवळ उत्साहाने हे बोलू शकतो की , प्रीती म्हणावी तर हीच; आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुमच्याआमच्यावर प्रीती केली आणि तुमच्याआमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठवले. " आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच. ह्यामुळे जग आपल्याला ओळखत नाही, कारण त्याने त्याला ओळखले नाही."१ योहान ४:१०; ३:१.

प्रत्येक खऱ्या शिष्यात हे प्रेम, पवित्र अग्नीप्रमाणे, हृदयाच्या वेदीवर तेवत असते. पृथ्वीवर देवाचे प्रेम ख्रिस्ताच्या द्‌वारे प्रगट झाले.पृथ्वीवर राहून त्याच्या लेकरांनी हेच प्रेम निर्दोष जीवने जागून इतरांच्या पर्यंत प्रदर्शित करायचे आहे. त्याद्‌वारे देवाचा कोकरा पाहण्यासाठी पापी लोकांना त्या वधस्तंभाकडे नेण्यात येते.

**(४) प्रभूसोबत टिकणाऱ्या अशा नात्यातील आपली दोन टप्प्यांची भूमिका काय आहे जेणेकरून त्याच्या प्रेमात आपण परिपूर्ण असे उभे राहू शकतो?**

***म्हणून देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुमच्यापासून पळून जाईल. (याकोब ४:७)***

उद्‌धाराची संपूर्ण योजना ही ह्या अनमोल शब्दात व्यक्त केली जाते: “कारण देवाने जगावर इतकी प्रिती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, की जोकोणी त्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.”

ख्रिस्ताने जगाच्या सर्व पापांची खरेतर शिक्षा भोगली, जेणेकरून त्याची धार्मिकता पापी लोकांना देण्यात यावी, आणि पश्चाताप व विश्वास ह्यांनी चारित्र्यात त्यांनी परिपूर्ण आणि पवित्र होत जावे. तो म्हणतो, “त्या माणसाच्या पापांचा दोष माझ्यावर आहे. मला ती शिक्षा घेऊ द्या आणि पश्चाताप करणारा पापी तुझ्यापुढे निर्दोष असा उभा राहू दे.” ज्या क्षणी पापी व्यक्ती ख्रिस्तावर विश्वास ठेवते, ती देवाच्या दृष्टीसमोर निर्दोष अशी उभी राहते; कारण ख्रिस्ताचे नितीमत्व हे त्याचे असते; ख्रिस्ताचे परिपूर्ण आज्ञापालन त्यास देण्यात येते. पण त्याने ह्या दैवी शक्तीबरोबर सहकार्य केले पाहिजे, आणि त्याचा मानवी प्रयत्न पापाला खाली टाकण्यास, आणि ख्रिस्तात परिपूर्ण उभे राहण्यास हा निश्चय घेतला पाहिजे. {एफई ४२९}

**(५) तीन अशाच पद्धती सांगाज्या याकोब बोलतो, ज्या प्रभूच्या कृपेने पूर्ण केल्यावर, त्या आपणास त्याच्यासोबर टिकणाऱ्या नात्यात जोडून ठेवण्यास सहाय्यक ठरतात?**

***देवाजवळ या म्हणजे तो तुमच्याजवळ येईल. अहो पापी जनहो, हात निर्मळ***

*करा; अहो द्विबुद्धीच्या लोकांनो, आपली अंतःकरणे शुद्ध करा. (याकोब ४:८)*

**(६) देवाचे गौरव जर आपण सतत न्याहाळले [त्याचे प्रेमाचे चारित्र्य], प्रभूच्या आत्म्याने, आपले रुपांतर कशामध्ये होईल?**

***परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडत आहोत; आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत. (२ करिंथकरास पत्र ३:१८)***

देवाच्या प्रेमाचे, त्याची दया आणि चांगुलपणाचे प्रदर्शन, आणि पवित्र आत्म्याचे हृदयावरील प्रज्वलित आणि पुनर्जीवित करण्याचे कार्य, विश्वासाच्या द्वारे आपणास ख्रिस्ताच्या इतक्या जिवल ठेवतात की, त्याच्या चारित्र्याचा स्पष्ट समज बाळगून, सैतानाचे चाणाक्ष डावपेच आपण समजून घेऊ शकतो. येशूकडे पाहत राहून त्याच्या सर्व फायद्यांवर भरवसा ठेवून आपण प्रकाशाचे ते सर्व आशीर्वाद रास्त म्हणून

स्वीकारतो, त्यात शांती आणि पवित्र आत्म्यामध्ये आनंद ह्याचे आशीर्वाद देखील समाविष्ट असतात. आणि ख्रिस्ताने आपल्यासाठी ज्या सर्व महान गोष्टी केल्या, आपण असे बोलून दाखवण्यास तयार असतो: “पहा, कशा प्रकारचे प्रेम पित्याने आमच्यावर व्यक्त केले, की आपल्याला त्याने देवाचे पुत्र म्हणवून घेण्याचा अधिकार दिला आहे.”

बंधुनो आणि भगिनींनो, हे पाहण्याने आपल्यात तो बदल होणार. देवाच्या प्रेमावर आणि आपल्या तारणार्यावर मनन करून, दैवी चरित्रावर खोल विचारमंथन करून आणि विश्वासाच्या द्वारे ख्रिस्ताचे नितीमत्व हे आपले आहे हे सिद्ध करून, त्यात पर्तीरूपाचे होण्यास आपल्यासाठी आवश्यक आहे. मग आपण सर्व हे असंतोषविणारे चित्र एकत्र मिळवू नये—अधर्म आणि भ्रष्टाचार आणि निराशा, सैतानाच्या शक्तीचे पुरावे—आपल्या स्मरणात आणि आठवणीत ते रेंगाळत ठेऊ नये, ह्याविषयी बोलत राहून आपल्या जीवात्म्यात ती निराशा सर्वत्र पसरू देणे. एक निराश जीवात्मा म्हणजे अंधकारमय शरीर असते, स्वतः देवाचा

प्रकाश मिळवून घेत नाही, आणि तसेच इतरांच्या पासून देखील तो दूर ठेवतात. सैतानाला त्याच्या विजयाचे परिणाम व चित्र पाहण्यास आवडते, तसे करण्याने मानवांना विश्वासहीन आणि निराश असे बनवतो.

**(७) जेव्हा देवावर आपण तेवढे प्रेम करून भरवसा ठेवतो की पूर्णतः त्याच्या इच्छेस आपण शरण जाऊ शकतो, तेव्हा त्याचा परिणाम काय होतो?**

***आणि जग व त्याची वासना ही नाहीशी होत आहेत; पण देवाच्या इच्छेप्रमाणे करणारा सर्वकाळ राहतो. (१ योहान २:१७)***

शुद्ध धर्म म्हणजे इछेची ही बाब आहे. इच्छा म्हणजे मनुष्याच्या स्वभावात अधिकार करणारे हे सामर्थ्य आहे, आणि त्याद्वारे सर्व क्षेत्र आणि गोष्टी त्याच्या अखत्यारीत आणल्या जातात. इच्छा म्हणजे ती चव अथवा कल नाही, पण ती निर्णयात्मक शक्ती आहे, जी लोकांमध्ये देवाची अवज्ञा करण्यासाठी कार्यरत असते, किंवा अवज्ञेच्या प्रती ती व्यक्त होते.

तुम्ही आपल्या भावना, इच्छा अथवा जाणीवा ह्यावर नियंत्रण ठेऊ शकत नाही, तुम्हाला हवे तसे, पण तुमच्या इच्छाशक्तीवर नियंत्रण ठेऊ शकता, आणि त्याद्वारे तुमचे संपूर्ण जीवन बदलून टाकू शकता. तुमची इच्छाशक्ती ख्रिस्ताच्या इच्छाशक्तीस सोपवून, देवामध्ये ख्रिस्ताच्या सोबत तुम्ही शरण जाता, आणि त्या सामर्थ्याच्या अधीन जाता जे सर्व सत्ता आणि अधिकार ह्याच्याशी जोडलेले असते. देवाकडून तुम्हास शक्ती मिळेल जी तुम्हाला त्याच्याशी जोडून ठेवेल; आणि एक नवीन प्रकाश, जो जिवंत विश्वासाचा प्रकाश आहे,  हे तुमच्यासाठी शक्य होतील. पण तुमच्या इच्छाशक्तीने देवाच्या इच्छाशक्तीच्या सोबत सहकार्य केले पाहिजे.

इच्छाशक्तीस अढळ रीतीने सातत्याने प्रभूच्या बाजूस ठेवल्याने, तुम्ही प्रत्येक भावना.... येशूच्या इच्छाशक्तीच्या अधीन सोपवणार. मग तुमची पावले त्या खंबीर अशा खडकावर अढळ असे दिसतील. काही वेळा, तुमच्या मध्ये असणारी प्रत्येक इच्छाशक्ती ते घेतील, पण देव तुमच्यासाठी कार्यरत असतो, आणि ह्या आकार देणाऱ्या प्रक्रियेतून

तुम्ही त्यासाठी सन्माननीय असणारे पात्र म्हणून बाहेर पडाल. {आरसी २९४}

**(८) आपल्यामध्ये काय माहित असावे, प्रेम करावे आणि टिकणारे असे असावे, जेणेकरून पिता आणि त्याचा पुत्र येशू ह्यामध्ये आपण वस्ती करू शकतो?**

***तुम्हांला सत्य कळत नाही म्हणून मी तुम्हांला लिहिले आहे असे नाही; तुम्हांला ते कळते म्हणून आणि कोणतीही लबाडी सत्यापासून नाही, म्हणून लिहिले आहे. (१ योहान २:२१)***

***तुमच्याविषयी म्हणायचे तर, जे तुम्ही प्रारंभापासून ऐकले ते तुमच्यामध्ये राहो. जे तुम्ही प्रारंभापासून ऐकले ते जर तुमच्यामध्ये राहिले तर तुम्हीही पुत्रामध्ये व पित्यामध्ये राहाल. (१ योहान २:२४)***

पाहिजे तितका अभ्यास पवित्र शास्त्राचा करण्यात आलेला नाही; त्याला जीवनाचा नियम म्हणून बनवले गेलेले नाही. ज्या ठिकाणी त्यातील नियम जाणूनबुजून अनुसरले जातात, तिकडे चारित्र्याचा आधार म्हणून ते बनतात, तिकडे हेतू आणि उद्देशाचे अढळ स्वरूप दिसते

ज्यामध्ये कोणताही इतर व्यवसायाचे अंदाज अथवा जगिक धाव ह्या प्रभावित करू शकत नाहीत. अशा प्रकारे घडवण्यात आलेले चारित्र्य, आणि देवाच्या वचनाने त्याला दिलेली जोड, ती परिक्षेचा दिवस, त्रास आणि धोके ह्यांना पार करून अढळ राहणार. विवेकबुद्धी प्रकाशित झाली पाहिजे, आणि जे जीवन सत्याच्या प्रेमाने शुद्ध करण्यात येते जे हृदयात स्वीकारले जाते, आणि जगावर ह्याचा प्रभाव तारण देणारा म्हणून पडेल ह्यापूर्वी हे घडते.

त्या समयासाठी, अढळ, निश्चित भक्कम असे कृतीशील लोक असण्याची आवश्यकता आहे, तत्वज्ञानात जे खडकासारखे भक्कम असतात, आणि कोणत्याही प्रकारे आपत्कालीन परिस्थितीस सामोर जाण्यास त्यांची तयारी असते. आपण इतके दुर्बल का आहोत, आपल्यामध्ये इतके बेजवाबदार लोक का आहेत, ह्याचे कारण म्हणजे देवाशी ते जोडले जात नाहीत; त्यांच्यामध्ये वस्ती करणारा तारणारा नसतो, आणि ख्रिस्ताचे प्रेम त्यांना ताजेतवाने आणि नवीन असे भासत नाही.... ह्या प्रेमाच्या सारखे बलवान असे कोणतेही पृथ्वीवरील नातेसंबंध नाही.

कशाचीही तुलना त्याच्यासोबत करता येत नाही. {आरएच, ऑगस्ट २८, १८७९}

**(९) जेव्हा आपण देवाच्या प्रेमात खऱ्या अर्थाने वस्ती करतो, तेव्हा आपले प्रेम कसे प्रदर्शित होते?**

***मग जवळ संसाराची साधने असून व आपला बंधू गरजवंत आहे हे पाहून जो स्वत:ला त्याचा कळवळा येऊ देत नाही त्याच्या ठायी देवाची प्रीती कशी राहणार? मुलांनो, आपल्या शब्दांनी किंवा जिभेने नव्हे, तर कृतीने व सत्याने आपण प्रीती करावी. (१ योहान ३:१७-१८)***

प्रत्येक व्यक्ती, स्वतःच्या कृतीने, ख्रिस्ताला स्वतःमधून दूर लोटते त्याच्या आत्म्याला गोंजारण्यात नकार देतात आणि त्याद्वारे त्याचे अनुसरण करणे, किंवा स्वतःचा त्याग केल्याने, विश्वास आणि आज्ञापालन केल्याने तो ख्रिस्ताच्या सोबत एका वयक्तिक ऐक्यात प्रवेश करतो. आपण प्रत्येकाने स्वतःसाठी, ख्रिस्ताची निवड केली पाहिजे, कारण पहिल्यांदा त्याने आपणास निवडले आहे. ख्रिस्तासोबत हे ऐक्य अशा लोकांचे झाले पाहिजे जे नैसर्गिक रीतीने त्याच्याशी शत्रुत्व

स्वीकारतात. हे तर पूर्ण अवलंबून राहण्याचे नाते होते, ज्यामध्ये एका गर्विष्ठ हृदयाने प्रवेश केला पाहिजे. हे जवळचे कार्य आहे, आणि जे अनेक लोक स्वतःला ख्रिस्ताचे अनुयायी म्हणून घेतात त्यांना त्याविषयी काहीच माहिती नसते. नावापुरता ते तारणार्याचा स्वीकार करतात, पण त्यांच्या हृदयाचा एकमेव अधिकारी म्हणून नाही.

**(१०) त्याचे आपल्यावरील महान प्रेमामुळे, देवाने आपल्याला काय दिले आहे जेणेकरून आपण हृदयात “लपवून ठेऊ शकतो” आणि पापावर विजय संपादन करण्यासाठी आपणास ते प्रेरित करून सज्ज करतात?**

***मी तुझ्याविरुद्ध पाप करू नये म्हणून मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेवले आहे. (स्तोत्रसहिता ११९:११)***

देवाचे वचन जे हृदयात दिसते ते वधस्तंभाच्या सरदाराला विश्वासाची चांगली लढाई लढण्यास प्रेरणा देऊन सुसज्ज करतात (इफिस. ६:१७ पहा). ते तर मनुष्याची पतन पावलेली अवस्था दर्शवते, सैतानाचा दुष्टपणा आणि क्रूरता, पवित्र आत्म्याच्या द्वारे ख्रिस्ताचे जे

तारणदायी सामर्थ्य व्यक्त होते, उच्च स्तरातील लोकांनी त्याच्याप्रती समर्पक वृत्ती ठेऊन ते गाठले पाहिजे, आणि विजय संपादन करणाऱ्या व्यक्तीचे ते गौरवी प्रतिफळ असते. तारणार्याने स्वतः हे लिखित वचन मोहात पाडणाऱ्या व्यक्तीशी लढाई करण्यात वापरून घेतले (मत्त. ४:१-११). मनुष्याची लढाई एक मनुष्य म्हणून लढण्यात, तारणार्याकडे दुसरे कोणतेही धूर्त शस्त्र नव्हते त्या शब्दांपेक्षा जे पवित्र आत्म्याने अशा काही प्रसंगासाठी प्रेरणा म्हणून ठेवले होते (मत्त ४:४,७,१०). केवळ ख्रिस्ती लोक जसे ख्रिस्ताचे उदाहरण बघून अनुसरण करतात, त्यांचे मन देवाच्या अनमोल वचनाने भरून टाकतात आणि त्यातील सल्ला बघतात, त्यामुळे त्यांना स्वतःवर आणि पापावर विजय मिळतो.

**(११) देवाची प्रिती आपल्यामध्ये कशी परिपूर्ण होते हे आणि आपण त्याच्यामध्ये कशी वस्ती करतो हे आपण कसे जाणून घेऊ शकतो?**

***जो कोणी त्याच्या वचनाप्रमाणे चालतो, त्याच्यामध्ये देवाची प्रीती खरोखर पूर्णत्व पावली आहे. ह्यावरून आपल्याला कळून येते की, आपण त्याच्या ठायी आहोत.***

*मी त्याच्या ठायी राहतो, असे म्हणणाऱ्याने तो जसा चालला तसे स्वतःही चालले पाहिजे. (१ योहान २:५-६)*

आपल्या आज्ञापालनाने आपण तारण कमवत नाही; कारण तारण हे देवाचे फुकट असणारे वरदान आहे, जे विश्वासाने प्राप्त होते. पण आज्ञापालन हे विश्वासाचे फळ आहे. “तुम्हांला माहीत आहे की, आपली पापे हरण करण्यासाठी तो प्रकट झाला; त्याच्या ठायी पाप नाही.

जो कोणी त्याच्या ठायी राहतो तो पाप करत नाही; जो कोणी पाप करतो त्याने त्याला पाहिले नाही व त्याला ओळखलेही नाही.” १ योहान ३:५,६. ह्या ठिकाणी ही खरी चाचणी आहे. जर आपण ख्रिस्तामध्ये वस्ती केली, देवाचे प्रेम जर आपल्यात वस्ती करत असेल, आपल्या भावना, विचार, हेतू आणि कृती, ह्या देवाच्या इच्छाशक्तीच्या सोबत सुसंगतीत असते जसे त्याच्या पवित्र नियमशास्त्रात प्रदर्शित देखील होते. “मुलांनो, कोणी तुम्हांला बहकवू नये; जसा तो नीतिमान आहे तसा नीतीने चालणाराही नीतिमान आहे.” १ योहान ३:७. देवाच्या पवित्र नियमशास्त्राने धार्मिकतेची व्याख्या

देण्यात येते, जसे सिनाय पर्वतावर देण्यात आलेल्या दहा आज्ञांमध्ये व्यक्त होते.

**(१२) प्रत्येक क्षणाला जसे आपण प्रभूच्या प्रेमात वस्ती करतो, आपण कोणते अभिवचन सिद्‌ध करून हस्तगत करू शकतो?**

***जो कोणी त्याच्या ठायी राहतो तो पाप करत नाही; जो कोणी पाप करतो त्याने त्याला पाहिले नाही व त्याला ओळखलेही नाही. (१ योहान ३:६)***

"ज्या कोणाचा जन्म देवापासून झाला आहे ती व्यक्ती पाप करत नाही." ख्रिस्ताच्या रक्ताने तो विकत घेण्यात आला आहे असे त्याला वाटते आणि सर्वात सार्वभौम अभिवचनांनी त्याच्या शरीरात आणि आत्म्यात देवाला गौरव देतात, जे देवाचे आहेत. प्रेमाची आवड आणि स्वतःची देखील हे त्याच्या अधीन होतात. तो रोज विचारतो: "प्रभूच्या सर्व आशीर्वादांसाठी मी त्याला काय देऊ शकतो?" "प्रभू, मी काय करावे अशी तुझी इच्छा आहे?" खरा ख्रिस्ती कदापि तक्रार करणार नाही की ख्रिस्ताचे जू हे मानेच्या भोवती आवळण्यात आले आहे.

येशूची सेवा हेच खरे स्वातंत्र्य असल्याची हमी तो भरतो. देवाच्या नियमशास्त्रात त्याला आनंद आहे. ते दैवी नियमशास्त्र खाली खेचण्याच्या ऐवजी, त्याच्या सर्व कमतरता समजून घेऊन, त्यांच्या परिपूर्णतेच्या स्तरापर्यंत पोहोचण्याचे सातत्याने तो प्रयत्न करत आहे.

केवळ वयक्तिक विश्वासाच्या द्वारे हे अध्यात्मिक नातेसंबंध विकसित करण्यात येऊ शकते. ह्या विश्वासाने आपल्यासाठी उच्चस्तराचे निवड, परिपूर्ण विसंबून राहणे, आणि परिपूर्ण पवित्रीकरण ह्यांना व्यक्त करतात. आपली इच्छाशक्ती त्या दैवी इछेच्या अधीन, आपल्या भावना, इच्छा, हेतू, ह्यांच्या स्वाधीन झाले पाहिजे, आणि तोच सन्मान जो ख्रिस्ताच्या राज्याच्या समृद्धीशी ओळखण्यात येतो आणि त्याच्या कार्याचा सन्मान लेखण्याने, आपल्याला सतत त्याची कृपा मिळते, आणि ख्रिस्त आपल्याकडून त्या कृतज्ञतेची मागणी करतो.

**(१३) ख्रिस्ताच्या अधिक समीप जसे आपण येतो आणि आपण कमी पडतो हे जेव्हा आपणास समजते, आपल्याला कोणते अभिवचन देण्यात आले आहे जे आपण सिद्ध करू शकतो?**

***ज्याने तुमच्या ठायी चांगले काम आरंभले तो ते येशू ख्रिस्ताच्या दिवसापर्यंत सिद्धीस नेईल हा मला भरवसा आहे; (फिलिप्पेकरास पत्र १:६)***

असे लोक आहेत ज्यांना ख्रिस्ताचे क्षमा करणारे प्रेम माहित आहे आणि ज्यानन खरच देवाची लेकरे म्हणवून घेण्याची इच्छा असते, तरीही त्यांना समजते की त्यांचे चारित्र्य हे परिपूर्ण नाही, त्यांची जीवन चुकीचे आहे, आणि त्यांची हृदये पवित्र आत्म्याने नवीन करण्यात आली आहेत अथवा नाही ह्याची त्यांना शंका असते. अशा लोकांना मी तर म्हणतो, निराश होऊन परत फिरू नका. येशूच्या चरणांशी वाकून रडून आपल्याला अनेकदा चुका व त्रुटी ह्यासाठी झुकावे लागते, पण आपण निराश होता कामा नये. जरी शत्रूने आपल्यावर विजय मिळवला तरीही, आपल्याला टाकण्यात आलेले नाही, देवाने आपल्याला सोडून दिले नाही अथवा त्याने आपला नकार केला नाही. नाही; ख्रिस्त देवाच्या उजव्या हाताशी आहे, जो आपल्यासाठी मध्यस्थी देखील करतो. प्रिय योहान म्हणतो, “अहो माझ्या मुलांनो, तुम्ही पाप करू नये म्हणून हे मी तुम्हांला लिहितो. जर कोणी पाप केले, तर

नीतिसंपन्न असा जो येशू ख्रिस्त तो पित्याजवळ आपला कैवारी आहे.” १ योहान २:१. आणि ख्रिस्ताचे हे शब्द विसरू नका, “कारण पिता स्वतः तुमच्यावर प्रीती करतो.” योहान १६:२७. तुम्हाला स्वतःशी जोडून घेण्याची त्याची इच्छा आहे, तुमच्यामध्ये त्याला आपले पावित्र्य आणि पवित्रता बघायची आहे जशी तुमच्यात व्यक्त होते. आणि तुम्ही जर स्वतःला त्याच्या अधीन केले, ज्याने तुमच्यामध्ये अशा चांगल्या कार्याची सुरुवात केली तो येशू ख्रिस्ताच्या दिवसापर्यंत ते चालू ठेवणार. अधिक चिकाटीने प्रार्थना करा; अधिक जोमाने विश्वास ठेवा. आपण स्वतःच्या शक्तीवर जसा विश्वास ठेवत नाही, आपल्या उद्धारक देवाच्या सामर्थ्यावर आपण विश्वास ठेवावा, आणि जो आपल्या मुखाला प्रसन्न करतो आणि आरोग्य देतो त्याची आपण स्तुती करावी.

**(१४) ख्रिस्ताच्या प्रेमाचा जर आपण स्वीकार केला आणि त्याला आपल्या जीवनात येण्याची परवानगी दिली, हा शास्त्रभाग आपल्याला सनातन जीवनाच्या बद्दल काय आश्वसन देतो?**

***ज्याला तो पुत्र लाभला आहे त्याला जीवन लाभले आहे; ज्याला देवाचा पुत्र***

*लाभला नाही त्याला जीवन लाभले नाही. देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांला सार्वकालिक जीवन लाभले आहे हे तुम्हांला कळावे म्हणून मी हे तुम्हांला लिहिले आहे. (आणि तुम्ही देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवीत राहावे). (१ योहान ५:१२-१३)*

पुत्राला बाळगणे म्हणजे त्यावर असा विश्वास ठेवणे की तो आपल्यासाठी जसे त्याचे नाव आहे त्याप्रमाणे बनतो: एक तारणारा, एक प्रभू, आपला राजा बनण्यासाठी ज्याला अभिषेक करण्यात आला आहे (योहान १:१२; ५:२४ पहा). त्याचा अर्थ ख्रिस्ताला त्या हृदयात वस्ती करू देणे की तो सर्वोत्तम सन्मानित पाहुणा आहे (गल. २:२०; इफिस. ३:१७; प्रग. ३:२०).

*देवाच्या सान्निध्यात म्हणजेच त्या प्रेमाच्या वातावरणात वस्ती करणे ही माझी इच्छा आहे.*

*गोल करा : होय अनिश्चित*

*देवाने त्याचे प्रेम माझ्यामध्ये घालावे अशी माझी इच्छा आहे जेणेकरून इतरांवर मी खऱ्या व्यावहारिक पद्धतीने*

प्रेम करू शकतो. इतरांसाठी असणाऱ्या माझ्या विनम्र, सेवाभावी वृत्ती, आणि विश्वासू कळवळ्याने प्रेमाचा सुगंध दरवळत राहावा अशी मी इच्छा आहे.

गोल करा :      होय         अनिश्चित

ख्रिस्ताकडे मी सातत्याने त्याची दया, न मोजता येणारे प्रेम ह्यामध्ये विचार करण्याची मी निवड करतो आणि जे सनातन जीवन त्याने मला दिले त्या वर्दानासाठी मी त्याचे आभार मानतो.

गोल करा :      होय         अनिश्चित

माझी इच्छाशक्ती पूर्णपणे प्रभूच्या अधीन देण्याची निवड मी करतो जेणेकरून त्याने माझ्यात वस्ती करावी आणि इतरांवर व त्याच्यावर प्रेम करण्याचे नितीमत्व त्याने व्यक्त करावे.

गोल करा :      होय         अनिश्चित



# धडा १४
# देवाबद्दलचे आपले प्रेम

**(१) आपल्या तारणाच्या आनंदासाठी आणि आपले प्रेम जिंकण्यासाठी ख्रिस्ताने काय केले?**

*आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहत असावे; जो आनंद त्याच्यापुढे होता त्याकरता त्याने लज्जा तुच्छ मानून वधस्तंभ सहन केला, आणि तो देवाच्या राजासनाच्या उजवीकडे बसला आहे. (इब्री १२:२)*

काल्वरीचा वधस्तंभ आपल्यासमोर सामर्थ्यानिशी उभा आहे, आपण

तारणार्यावर प्रेम का करावे ह्याचे कारण दिले जाते, आणि त्याला प्रथम स्थान आणि आपण जे काही करतो त्यात सर्वोत्तम स्थान का द्यावे हे कळते. वधस्तंभाच्या चरणांशी आपण विनम्र होऊन जे स्थान आहे पश्चातापी हृदयाने ते स्वीकारले पाहिजे. इथे, जसे आपण आपल्या तारणार्याला ह्या वेदनेमध्ये पाहतो, देवाचा पुत्र जो मृत्यू सहन करत असताना दिसतो, अन्यायी लोकांसाठी न्यायी लोक, आपण नम्रतेचे धडे आणि लीन अंतःकरण हे शिकले पाहिजे. त्याच्याकडे पहा जो एकाच शब्दाने देवदूतांच्या सैन्याला त्याच्या सहाय्यास आलेले पाहतात, थट्टेचा व विनोदाचा एक विषय, शब्दांचा भडीमार आणि द्वेषाचा तो विषय बनतो. तो स्वतःला पापासाठी एक अर्पण म्हणून वाहून देतो. जेव्हा त्याच्यावर शब्दांचा प्रहार होतो, त्याचा काही धाक बसत नाही; जेव्हा खोटे आरोप लावले जातात, तेव्हा तो आपले तोंड उघडत नाही. क्रुसावर तो आपल्या सर्व खूनी लोकांसाठी प्रार्थना करतो. तो त्यांच्यासाठी मरण स्वीकारत आहे; त्यांच्यातील प्रत्येकासाठी तो एक अमर्याद अशी किमत मोजत आहे. कोणत्याही प्रकारे तक्रार अथवा कुरूकुर न करता तो मनुष्याच्या पापांची शिक्षा

भोगत आहे. आणि हा तक्रार न करणारा इसम जो ह्यास भक्ष झाला तो देवाचा पुत्र आहे. त्याचे सिंहासन सर्वकाळचे आहे, आणि त्याच्या राज्याचा अंत होणार नाही.

या, जे तुम्ही निषिद्ध आनंद आणि पापी गुंतवणुकीमध्ये स्वतःचा आनंद जे सोधता, जे ख्रिस्तापासून दूर विखुरले जाता, काल्वरीच्या कृसाकडे पहा; हा राजकीय बळी गेलेल्या इसमाला पहा, तुम्हाला आता सुज्ञ बनण्याची संधी आहे, जीवनाच्या झर्याकडे पहा आणि आनंद मिळवा. या, जे तुम्ही ह्या जीवनातील काही परिक्षा व थोड्या गैरसोयी पाहून तक्रार करून कुरकुर करता, येशूकडे पहा, जो तुमच्या विश्वासाचा निर्माणकर्ता व उत्पादक आहे. त्याने आपले राजकीय सिंहासन सोडले, त्याचे ते उच्चतर स्थान, त्याचे दैवत्व सोडून दिले, मानवतेचे स्वरूप त्याने परिधान केले. आपल्यासाठी त्याला नाकारण्यात व धिक्कारण्यात आले; तो गरीब झाला की आपण त्याच्या दारिद्र्याच्या द्वारे श्रीमंत बनावे. तुम्ही, विश्वासाच्या नेत्रांनी, ख्रिस्ताचे सर्व दुखसहन बघून,

आपल्या परिक्षा, व शोकाच्या गाथा सांगू शकता का?

**(२) योहान आपणास काय “पाहण्याची” ताकीद देतो आणि देवावर प्रेमात पडण्याची ती पहिली पायरी आहे?**

***आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच. ह्यामुळे जग आपल्याला ओळखत नाही, कारण त्याने त्याला ओळखले नाही. (१ योहान ३:१)***

देवाच्या प्रेमाचे वर्णन करण्यासाठी जेव्हा आपण त्या योग्य भाषेचा शोध घेतो, आपल्याला शब्द खूप मिळमिळीत, खूप दुर्बल, त्या गमकापासून अत्यंत दूर, दिसतात आणि मग आपण आपले पेन हातात घेऊन म्हणतो, “नाही, ह्याचे वर्णन केले जाऊ शकत नाही.” त्या प्रिय शिष्याने जसे केले, तसेच आपण करू शकतो आणि म्हणू शकतो, , “पहा, कशा प्रकारची प्रिती पित्याने आपल्यावर केली आहे, की आपणास देवाचे पुत्र असे म्हणवले गेले आहे.” ह्या प्रेमाचे वर्णन करण्याच्या कोणत्याही प्रयत्नात, आपल्याला वाटते की आपण तर बालक

आहोत आणि ह्या प्रेमाविषयी पहिल्यांदा ते बालकाप्रमाणे तोंडातून शब्द काढत आहोत. शांतपणे आपण ह्याकडे न्याहाळून बघू शकतो; कारण ह्या बाबतीत शांतता म्हणजे उत्तम वक्तृत्व आहे. हे प्रेम सर्व भाषेच्या पलीकडे वर्णन करण्यास रास्त आहे. देहातील देवाचे ते रहस्य आहे, ख्रिस्तामध्ये देव, आणि मानवतेत दैवत्व. ख्रिस्त कोणत्याही प्रकारे तुलना करता येणार नाही अशा रीतीने मानवरूप धारण करून झुकला, की त्याला देवाच्या सिंहासनाच्या पर्यंत उंचावण्यासाठी, जे त्याच्यावर विश्वास ठेवतात त्यांना देखील तो उंचावू शकतो, आणि त्याच्या सिंहासनावर त्यांना देखील स्वतःसोबत एक स्थान देऊ शकतो. जे सर्व येशुकडे विश्वासाने पाहतात की ज्या जखमा आणि वरण ह्या पापाने केल्या आहेत ह्या त्याच्यात बऱ्या होतील, आणि परिपूर्ण करण्यात येतील.

**(३) आपल्यासाठी असणाऱ्या देवाच्या प्रेमाला ओळखण्यातील दुसरी आणि तिसरी पायरी काय आहे जेणेकरून त्याच्या प्रेमात आपण पडू शकतो?**

***देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे व आपण***

*तिच्यावर विश्वास ठेवला आहे. देव प्रीती आहे; जो प्रीतीमध्ये राहतो तो देवामध्ये राहतो व देव त्याच्यामध्ये राहतो.*
*(१ योहान ४:१६)*

देवाच्या क्षमा करणाऱ्या प्रेमाला स्वीकारून इतरांच्या पर्यंत ते पोह्चवण्यात एकमेव आवश्यक गोष्ट म्हणजे त्याचे आपल्याप्रती जे प्रेम आहे ते जाणून घेणे आणि त्यावर विश्वास ठेवणे. १ योहान ४:१६. सैतान आज्ञा करू शकतो अशा प्रत्येक फसवणुकीने कार्य करत आहे, जेणेकरून आपल्याला ते प्रेम ओळखता येऊ नये. तो आपल्याला असा विचार करण्यात भाग पाडेल की आपण जे अधर्म आणि पातके केली आहेत ती इतकी घोर आणि भयंकर आहेत की प्रभू आपल्या प्रार्थनांचा सन्मान करणार नाही आणि आपल्याला आशीर्वाद देणार नाही व तारण देखील करणार नाही.

आपल्याला स्वतःमध्ये काहीही नाही तर केवळ हि दुर्बलता दिसते, इतर काहीही आपली देवाकडे शिफारस करत नाही, आणि सैतान आपणास सांगतो की ह्याचा काहीच फायदा नाही; आपल्या चारित्र्याच्या दोषांवर काहीच उपाय दिसत नाही. जेव्हा देवाकडे येण्याचा आपण

प्रयत्न करतो, शत्रू कानात कुजबुजतो, प्रार्थना करण्याचा काहीच फायदा नाही; तू हे दुष्ट कृत्य नाही का केले? देवाच्या विरुद्ध् तू पाप नाही का केले आणि स्वतःच्या विवेकाचे उल्लंघन केले? पण आपण शत्रूला सांगू शकतो की "येशू ख्रिस्त ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध् करते." १ योहान १:७.

जेव्हा आपल्याला वाटते की आपण पाप केले आणि प्रार्थना करू शकत नाही, मग प्रार्थना करण्याचा तो समय असतो. लज्जास्पद होऊन आपण अतिशय विनम्र होतो, पण प्रार्थना करून आपण विश्वास ठेवला पाहिजे. "ख्रिस्त येशू पापी लोकांना तारण्यास जगात आला, हे वचन विश्वसनीय व पूर्णपणे स्वीकारण्यास योग्य आहे; त्या पापी लोकांपैकी मी मुख्य आहे." १ तिमथी १:१५. क्षमा, देवासोबत समेट, हे आपल्यासाठी, आपल्या कृत्यांचे प्रतिफळ म्हणून येत नाही, पापी लोकांच्या चांगल्या कामाचे प्रतिफळ म्हणून नसते, तर ते आपल्यासाठी दिलेले वरदान असते, ख्रिस्ताच्या डागरहित नितीम्त्वासाठी तो पाया पुन्हा नव्याने रचला जातो.

**(४) आपण जर त्याला परवानगी दिली, आपल्या पाषाणमय थंड हृदयामध्ये ख्रिस्ताने काय करण्याचे अभिवचन दिले जेणेकरून त्याच्यावर आणि इतरांवर प्रेम करण्याची क्षमता आपणास मिळते?**

***मी तुम्हांला नवे हृदय देईन, तुमच्या ठायी नवा आत्मा घालीन; तुमच्या देहातून पाषाणमय हृदय काढून टाकीन व तुम्हांला मांसमय हृदय देईन. (यहज्केल ३६:२६)***

येशू ख्रिस्ताची कृपाच केवळ पाषाणमय हृदय मांसमय हृदयात बदलू शकते, आणि देवासाठी ते जिवंत करू शकते. जगाच्या दृष्टीने लोक महान कार्य करू शकतात; त्यांचे यश देखील अधिक असते आणि लोकांच्या दृष्टीने उच्च कोटीचे असते, पण सर्व कलागुण, सर्व कौशल्य, जगाची सर्व क्षमता ही पापी माणसाच्या ढळलेल्या चारित्र्याला देवाचे संतान, व स्वर्गाचे वारसा बनवू शकत नाही. मनुष्यांना जीवात्म्याचे समर्थन करण्याचे, हृद्य शुद्ध करण्याचे सामर्थ्य नसते. नैतिक आजार हे त्या महान वैद्याच्या आरोग्यदायी शक्तीच्या शिवाय बरे होऊ शकत नाही.

स्वर्गाचे सर्वोच्च वरदान, पित्याचा एकुलता एक पुत्र देखील, कृपा आणि सत्याने युक्त, हा एकमेव पतन पावलेल्या लोकांचा उद्धार करू शकतो. आपण देवाच्या प्रेमावर खोलवर चिंतन करत असताना काय ही कृतज्ञता, काय हे प्रेम, ज्याने आपली हृदये भरून टाकावी! मनुष्याची पुनर्स्थापन व्हावी व त्याला उंचावण्यात यावे यासाठी येशूने जो धोका पत्करला ते पाहून त्यावर मनन करता आपले हृदय हे मवाळ बनून त्याच्या अधीन झाले पाहिजे. जगाच्या उद्धारकाने पतन पावलेल्या विश्वाच्या ज्या सर्व यातना होत्या त्या स्वतः सहन केल्या. काल्वरीच्या क्रूसावरील खिस्र्ताचे दुखसहन हा एक विचार आहे जो पापाच्या सर्व व्यापून टाकणाऱ्या सामर्थ्याला दूर ठेवतो; आणि पापी व्यक्तीच्या हृदयात जेव्हा पापाची भावना असते, आणि पापाचे ओझे त्यास असहाय्य होते, येशू त्याला स्वतःकडे पाहण्याचे आमंत्रण देऊन जगण्यास सांगतो. जीवात्म्याला शुद्ध करण्याचे सामर्थ्य ख्रिस्तामध्ये आहे. “परमेश्वर म्हणतो, चला, या, आपण

बुद्धिवाद करू; तुमची पातके लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी पांढरी होतील; ती किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरीसारखी निघतील.”

**(५) आपण जर अत्यंत कष्टाने मेहनतीने देवाचा शोध घेतला तर कोणते अभिवचन आपण हस्तगत करू शकतो?**

***माझ्यावर जे प्रीती करतात त्यांच्यावर मी प्रीती करते; जे मला परिश्रमाने शोधतात त्यांना मी सापडते. (नीतीसुत्रे ८:१७)***

लवकरच माझा शोध घ्या. ह्याचा अर्थ अशा प्रामाणिकपणे व मेहनतीने त्याचा शोध घेणे जशी एखादी व्यक्ती हरवलेल्या व्यक्तीला शोधण्यास सकाळीच बाहेर पडते. जगिक कार्यांच्या लक्ष विचलित करण्याने, आणि मानवी हृदयाची लबाडी ह्यामुळे, चिकाटीपूर्ण मेहनतीची आवश्यकता आहे खरे सुज्ञान आणि देव ह्यांच्यासोबत खरे तारणदायी नातेसंबंध विकसित करण्यासाठी.

**(६) देवाच्या ठायी अर्पणे आणि दानार्पण ह्याच्यापेक्षा अधिक काय**

**आहे, आणि ते आपले सर्वोच्च पाचारण आणि सौभाग्य आहे?**

***आणि 'संपूर्ण मनाने, संपूर्ण बुद्धीने, संपूर्ण जिवाने व संपूर्ण शक्तीने त्याच्यावर प्रीती करणे' आणि 'जशी स्वतःवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करणे' हे सर्व 'होमार्पण व यज्ञ' ह्यांपेक्षा अधिक आहे." (मार्क १२:३३)***

ह्या ठिकाणी व्यक्त केलेल्या भावनेनुसार देवावर प्रेम करणे म्हणजे त्याच्या सेवेसाठी समर्पित होणे, पूर्ण भावनेने, सर्व प्रेम, आपुलकी, जीवन, शारीरिक शक्ती, आणि बौद्धिक गोष्टींनी त्याच्या शरण येणे. अशा प्रकारचे "प्रेम" म्हणजे "नियमशास्त्राची पूर्तता आहे" (रोम. १३:१०), ख्रिस्ताच्या कृपेने, त्याच्या आज्ञांचे पालन करणे (योहान १४:१४; १५:९,१०). कारण नियमशास्त्र देहस्वभावामुळे दुर्बळ झाल्याकारणाने जे त्याला असाध्य ते साधण्याकरता देवाने आपल्या स्वतःच्या पुत्राला पापमय देहासारख्या देहाने व पापाबद्दल पाठवून देहामध्ये पापाला दंडाज्ञा ठरवली; ह्यात उद्देश हा की,जे आपण देहस्वभावाप्रमाणे नव्हे तर आत्म्याप्रमाणे चालतो त्या आपल्यामध्ये नियमशास्त्राने लावून

दिलेले आचरण पूर्ण व्हावे.” (रोम. ८:३,४). जो खऱ्या अर्थाने देवाला “ओळखतो” तो “त्याच्या आज्ञांचे पालन करेल” कारण  “देवाचे प्रेम ” “त्याच्यात परिपूर्ण ” झाले आहे (१ योहान २:४-६)

त्याच्यावर प्रेम करणे, अमर्याद, सर्वज्ञानी परमेश्वर, संपूर्ण शक्ती आणि मनाने आणि हृदयाने, म्हणजे प्रत्येक शक्तीचा तो सर्वोच्च विकास आहे. त्याचा अर्थ संपूर्ण अस्तित्वात- शरीर, देह आणि जीवात्मा- देवाची प्रतिमा हि पुनर्स्थापित झाली पाहिजे.

**(७) ख्रिस्ताने आपल्यासाठी जे अद्‌भुत अर्पण केले त्याच्याप्रती आपले सर्वाधिक प्रेमाचे प्रदर्शन काय आहे?**

***ज्याच्याजवळ माझ्या आज्ञा आहेत व जो त्या पाळतो तोच माझ्यावर प्रीती करणारा आहे; आणि जो माझ्यावर प्रीती करतो त्याच्यावर माझा पिता प्रीती करील; मीही त्याच्यावर प्रीती करीन व स्वत: त्याला प्रकट होईन.” (योहान १४:२१)***

देवाच्या आज्ञांच्या प्रती त्याच्या लोकांनी पूर्ण आज्ञापालन करावे ह्यासाठी ख्रिस्त

त्याला खूप महत्व देतो. त्यांना त्याविषयी पूर्ण माहिती पाहिजे, आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात त्यांनी ते आत्मसात केले पाहिजे. मनुष्य ख्रिस्तामध्ये आणि ख्रिस्त त्याच्या मध्ये असल्याशिवाय, देवाच्या आज्ञा पाळू शकत नाही.  आणि त्याने ख्रिस्तामध्ये असणे शक्य नाही, त्याच्या अज्ञांवर प्रकाश पाडता, आणि त्याच वेळी त्यातील न्यून असलेल्या आज्ञांकडे दुर्लक्ष करावे. अढळ, आणि इच्छापुर्वक त्याच्या वचनांचे आज्ञापालन करून, देवाने ज्याला पाठवले त्याच्याप्रती ते प्रेमाचा पुरावा देतात.

देवाच्या आज्ञांचे पालन न करणे म्हणजे त्याच्यावर प्रेम न करणे. जो पित्याकडून जन्मलेला आहे त्याच्यावर जोपर्यंत लोक प्रेम करत नाहीत, ते देवाच्या नियमशास्त्राचे पालन करत नाहीत. आणि खचित; त्यांचे जर त्याच्यावर प्रेम असेल, त्याच्याप्रती आज्ञापालन करून त्या प्रेमाचे प्रदर्शन ते करतात. जे सर्व ख्रिस्तावर प्रेम करतात त्यांच्यावर पिता देखील प्रेम करतो, आणि तो स्वतःला त्यांच्यासमोर प्रगट करतो. त्यांच्या

सर्व तातडीकता आणि त्रास ह्यांच्यात येशू ख्रिस्तामध्ये त्यांना एक सहाय्यक असतो.

छोटी कर्तव्ये देखील पार पाडत असताना सोन्याच्या धाग्यांच्या प्रमाणे एक जिवंत विश्वास लोकांमधून वाहावा. मग रोजचे काम ख्रिस्ती वाढीला बढावा देतात. येशूकडे सातत्याने बघण्यात येते. जे काही हाती घेण्यात येते त्याच्याप्रती प्रेम हे एकमेव महत्वाचे बल असते. म्हणूनच आपल्या कलागुणांचा योग्य उपयोग करून आपण स्वतःला उच्चतर विश्वापर्यंत ह्याच एका सोन्याच्या साखळीने जोडून ठेऊ शकतो. हीच ती खरी शुद्धता आहे, कारण ह्यामध्ये देवाच्या इच्छाशक्तीच्या प्रती आज्ञापालन करणे म्हणजे रोजचे कर्तव्य आनंदाने पार पाडणे.

जेव्हा देवाचे आज्ञापालन करणे हे हृदयात असते, जेव्हा ह्याप्रती कष्ट घेतले जातात, येशू हा स्वभाव आणि प्रयत्न मनुष्याची उत्तम सेवा म्हणून स्वीकारतो, आणि त्याच्या स्वतःच्या दैवी योग्यतेने ही कमी तो भरून काढतो.

**(८) आपण स्वताहून, आज्ञापालन करून नैसर्गिक दृष्टीने अवज्ञा करण्यापसून स्वतःला रोखू शकत नाही, देव मग काय करेल, आपण जर विश्वास आणि प्रेमाने, स्वतःला त्याच्या ह्या परिवर्तनाच्या सामर्थ्याच्या अधीन केले तर?**

***कारण परमेश्वर म्हणतो, त्या दिवसांनंतर इस्राएलाच्या घराण्याशी जो करार मी करीन तो हा :मी आपले नियम त्यांच्या मनात घालीन, आणि ते त्यांच्या हृदयपटांवर लिहीन, आणि मी त्यांना देव असा होईन, आणि ते मला माझे लोक असे होतील. (इब्री ८:१०)***

देवाचे नियमशास्त्र सर्व स्वर्थीपण, हृदयाची गर्विष्ठता ह्यांना दोष देते, प्रत्येक अप्रामाणिकपणा, प्रत्येक रहस्य अथवा उघड अधर्म. नैसर्गिक हृदय हे त्यातील नियमशास्त्रावर प्रेम करण्यास आकलीत नाही, किंवा त्यातील आवश्यकतांचे देखील पालन होत नाही. “ते देवाच्या नियमशास्त्राच्या अधीन नाही, आणि होऊ देखील शकत नाही.” पण ख्रिस्तावरील खरा विश्वास हृदयाचे परिवर्तन करतो, नियमशास्त्राच्या प्रती असणाऱ्या प्रवृत्तीला बदलतो, जोपर्यंत ते देवाच्या नियमशास्त्रात आनंद करत

नाही. जो मनुष्य नियमशास्त्राच्या विरुद्ध शत्रुत्व दर्शवतो त्याने देवाच्या ह्या परिवर्तन करण्याच्या सामर्थ्याच्या अधीन स्वतःला केलेले नाही. आज्ञांचे पालन करणे ह्याद्वारे आपल्या प्रेमाच्या प्रदर्शनांचा प्रामाणिकपणा सिद्ध होतो. योहान म्हणतो, “देवावर प्रीती करणे म्हणजे त्याच्या आज्ञा पाळणे होय; आणि त्याच्या आज्ञा कठीण नाही.”

**(९) जेव्हा आपला “धर्म” हा प्रेमावर आधारित असतो आणि केवळ एक प्रथा नसते आणि मग, त्याच्या कृपेने, आपण त्याच्या आज्ञांचे पालन करतो, आपण कोठे वस्ती करत राहणार?**

***जसा मी आपल्या पित्याच्या आज्ञा पाळून त्याच्या प्रीतीत राहतो तसे तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर माझ्या प्रीतीत राहाल. (योहान १५:१०)***

खरा धर्म [नात्यावर आधारित] मनुष्याला देवाच्या नियमशास्त्रांशी सुसंगत करतात, शारीरिक, मानसिक, आणि नैतिक. ते आपणास आत्म-नियंत्रण, प्रसन्नता, संयम शिकवतात. धर्म मनाला उदात्त करतो, चवीला शुद्ध करतो, आणि न्यायाला शुद्ध करतो. जीवात्म्याला ते

स्वर्गाच्या शुद्धतेचा एक भागीदार बनवतो. देवाच्या प्रेमावर विश्वास आणि त्यावरील अधिकार करणारा पुरवठा सर्व ताणतणाव आणि काळजी ह्यांची ओझी हलकी करतो. हृदयाला ते आनंद आणि समाधान ह्यांनी भरून काढतात. धर्म थेट आरोग्य वाढवतो, आयुष्य वाढवतो, आणि सर्व आशीर्वाद उपभोगण्याची संधी देतो. जीवात्म्यासाठी कधीही न सरणारा आनंदाचा झरा तो खुला करतो.

ज्या सर्वांनी ख्रिस्ताची निवड केली नाही त्यांना जे ते स्वतःसाठी शोधत आहेत त्यापेक्षा ख्रिस्ताकडे त्यांना देण्यासाठी काहूप काही आहे ह्याची जाणीव केव्हातरी होईल का. मनुष्य स्वतःच्या जीवात्म्यासाठी सर्वात मोठी इजा आणि अन्याय हे करत आहे जेव्हा तो देवाच्या इछेच्या विरुद्ध कार्य व विचार करतो. ज्या मनुष्याला माहित आहे की उत्तम काय आहे पण जो तो मार्ग सोडून देतो त्यासाठी खरा आनंद सापडत नाही, आणि जो त्यःच्या निर्मितीसाठीचांगले योजून ठेवतो. अधर्माचा मार्ग अशाप्रकरे दैन्यावस्था आणि विनाश ह्याकडे घेऊन जातो; पण सुज्ञानाचे “मार्ग आनंदाचे आहेत; त्याच्या सर्व वाटा शांतिमय आहेत.” नीतीसुत्रे ३:१७.

**(१०) आपल्या स्वतःच्या कर्तुत्वामध्ये आपल्याकडे प्रेम करण्याची क्षमता नाही, देवाला जर आपण परवानगी दिली तर तो आपल्यासाठी कर करेल?**

***तुझा देव परमेश्वर तुझ्या ह्रदयाची व तुझ्या वंशजांच्या ह्रदयाची सुंता करील, आणि आपण जिवंत राहावे म्हणून तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने व संपूर्ण जिवाने प्रेम करशील. (अनुवाद ३०:६)***

ह्रदयाची सुंता म्हणजे एखाद्या व्यक्तीची अध्यात्मिक दृष्टी नवीन करून त्यांचा विवेक सौम्य करणे.

देव ह्रदयाची सुंता करतो. सुरुवातीपासून शेवटपर्यंत संपूर्ण कार्य हे प्रभूचे आहे. नाश पावणारा पापी म्हणू शकतो: “हे ऐकून येशू त्यांना म्हणाला, “निरोग्यांना वैद्याची गरज नसते, तर रोग्यांना असते; मी नीतिमानांना नव्हे तर पाप्यांना पश्चात्तापासाठी बोलावण्यास आलो आहे.” (मार्क २:१७). मी पापी आहे, आणि तो काल्वरीच्या क्रुसावर माझे तारण करण्यासाठी मरण पावला. मी आता ह्यानंतर क्षणभर देखील तारण न झालेल्या अवस्थेत राहू नये. तो मरण

पावला आणि पुन्हा माझे समर्थन करण्यासाठी उठला, आणि आता तो माझे तारण करणार. त्याने जी क्षमा माझ्यासाठी दिली आहे त्याचा स्वीकार मी करतो.”

**(११) देवासाठी प्रेमाचे स्वर्गीय तत्व जेव्हा आपले हृदय भरून काढते, आणि त्याच्या आत्म्याने आपण त्याच्या आज्ञांचे पालन करतो, आपण त्याच्या लेकरांना कसे वागवतो?**

***आपण देवावर प्रीती करतो व त्याच्या आज्ञा पाळतो तेव्हा त्यावरून आपल्याला कळून येते की, आपण देवाच्या मुलांवर प्रीती करतो. (१ योहान ५:२)***

जेव्हा सनातन प्रेमाचे स्वर्गीय तत्व आपल्या हृदयाला भरून टाकते, ते इतरांच्या पर्यंत वाहू लागते, त्यांच्याकडून काहीतरी कृपामर्जी संपादन होते म्हणून नाही, पण प्रेम कृती करण्यास प्रेरणा देते, चारित्र्याला सुधारते, त्यातील कल ह्यावर सत्ता गाजवते, सर्व इच्छांवर नियंत्रण ठेवते, शत्रुत्वाला खाली खेचते, आणि सर्व प्रकारे प्रेमाला उंचावते. ह्या प्रेमाची लागण होत नाही, आणि त्यात केवळ ह्याचा समावेश होतो असे नाही

“मी आणि माझे,” तर जगाच्या इतके ते अखंड असून स्वर्गाच्या इतके मोठे आहे. देवदूतांच्या कार्याशी ते सुसंगत आहे. हेच प्रेम, जीवात्म्यात ज्याला गोंजारले जाते, संपूर्ण जीवनात ते गोडी भरते, आणि जे सर्व भोवती आहेत त्यांच्यावर शुद्ध करणारा प्रभाव पाडते. ते धारण करून, आपण आनंदी होणारच, मग भाग्याने आपल्यावर स्मितहास्य देऊ अथवा नाही. आणि जर देवावर आपण संपूर्ण हृदयाने प्रेम केले तर, त्याच्या लेकरांवर देखील आपण प्रेम केले पाहिजे. हेच प्रेम देवाच्या आत्म्याचे आहे. हेच स्वर्गाची सुशोभित असणे आहे जे जीवात्म्यास खरी दांत आणि उदात्तपण देतात.

**(१२) जेव्हा आपण देवावर खरे प्रेम करतो आणि त्याच्या आज्ञांचे पालन करण्याने जो आनंद मिळतो ह्याचा जेव्हा अनुभव घेतो, कोणत्या तीन गोष्टी करण्याची आपल्यात इच्छा असते?**

***माझ्या आज्ञा पाळ म्हणजे तू वाचशील; माझी शिस्त तू आपल्या डोळ्यातल्या बाहुलीप्रमाणे सांभाळ. ती आपल्या बोटांना बांध; ती आपल्या हृत्पटलावर लिहून ठेव. (नीतीसुत्रे ७:२-३)***

जो मनुष्य केवळ जबरदस्ती आहे म्हणून देवाच्या आज्ञांचे पालन करण्याचा प्रयत्न करतो–कारण तसे करणे त्याला भाग आहे म्हणून–तो कदापि आज्ञापालन करण्याच्या आनंदात प्रवेश करणार नाही. तो आज्ञापालन करत नाही. जेव्हा देवाच्या आज्ञा एक ओझे वाटू लागतात कारण ते मानवी इच्छा व मन ह्यांना भेदून जातात, आपल्याला कळते की ते आयुष्य खरे ख्रिस्ती आयुष्य नसते. खरे आज्ञापालन म्हणजे अंतर्यामातील तत्वज्ञान हे व्यक्त होण्यात आहे. नितीमत्वाच्या प्रेमामुळे ते बाहेर पडते, जे देवाच्या नियमशास्त्राच्या बद्दलचे प्रेम असते.सर्व नितीमत्वाची आवश्यकता म्हणजे आपल्या उद्धारक देवाच्या प्रती असणारा प्रामाणिकपणा आहे. त्यामुळे आपल्याला ते जे काही योग्य आहे ते करण्यास भाग पाडते–कारण योग्य गोष्ट करणे देवाला संतोषविते.

कोणताही मनुष्य देवाच्या दिलेल्या विशिष्ट आवश्यकता वगळून आनंदी होऊ शकत नाही, आणि स्वतःचा एक दर्जा उभारू शकत नाही जो सुरक्षित रीतीने आज्ञापालन म्हणून तो करू शकतो. विभिन्न प्रकारच्या मनाला साजेसे होण्यासाठी विभिन्न प्रकारची स्तरे

असतात, आणि जे शासन देवाच्या हातून काढून घेतले गेले आहे आणि मानवी हात त्यावर कब्जा करतात. स्वयं-चा सिद्धांत अथवा नियमशास्त्र ताठ उभे असते, मनुष्याची इच्छाशक्ती उच्च केली जाते; जेव्हा देवाची इच्छा हि उच्च आणि पवित्र म्हणून आज्ञापालन करण्यास प्रस्तुत होते, त्याचा आदर व सन्मान केला जातो मानवी इच्छाशक्तीला स्वतःचा मार्ग हवा असतो..... त्याच्या स्वतःच्या प्रेरणा ऐकण्यात, आणि मानवी दूत व जे काही दैवी आहे त्यात एक विरोधाभास जन्मास येतो. {आरसी ५६}

**(१३) जेव्हा आपण, प्रेमाने आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने, त्याच्या आज्ञांचे पालन करतो, तेव्हा हा वचनदत्त आशीर्वाद काय असतो?**

***आपल्याला 'जीवनाच्या झाडावर' अधिकार मिळावा व वेशीतून नगरीत आपले जाणे व्हावे म्हणून जे आपले 'झगे धुतात' ते धन्य. (प्रगटीकरण २२:१४)***

जगाचा उद्धारक आपल्याशी बोलत आहे; तो काय बोलतो हे आपण ऐकावे:

“आपल्याला ‘जीवनाच्या झाडावर’ अधिकार मिळावा व वेशीतून नगरीत आपले जाणे व्हावे म्हणून जे आपले ‘झगे धुतात’ ते धन्य” (प्रग. २२:१४). मग जे लोक देवाच्या वचनाची सिद्धता त्याच्या वाचनात पाहतात आणि तरीही आज्ञापालन करत नाही, तर देवाच्या आज्ञांच्या प्रती त्यांचे दुर्लक्ष करणे एक सबब म्हणून देतात किंवा अवमान करतात, आज्ञापालनकेल्याच्या अटीवर त्यांना ही अभिवचने सिद्ध होतील असे नाही ह्याची साक्ष ते देतात. जीवनाच्या झाडाजवळ येण्याचा त्यांना अधिकार नाही, पण देवाच्या नियमशास्त्राचे जे स्वेच्छेने उल्लंघन करतात त्यांना येशू म्हणतो, “अहो,सर्व अन्याय करणाऱ्यांनो, तुम्ही माझ्यापासून दूर व्हा” (लूक १३:२७)

**(१४) आपला स्वर्गीय पिता आणि तारणारा येशू ख्रिस्त ह्याच्या प्रेमाची जेव्हा आपल्याला जाणीव होते आणि अनुभव येतो, दावीद राजाप्रमाणे, आपली साक्ष आणि गीत काय असेल?**

***परमेश्वराच्या न्यायपरायणतेमुळे मी त्याची स्तुती करीन;परात्पर परमेश्वराच्या नावाचे स्तोत्र गाईन. (स्तोत्रसहिता ७:१७)***

ख्रिस्तामध्ये एक कृतीशील, जीवनात विश्वास ठेऊन की तो जीवन देणारा आहे अशा भावनेने जगणे हे आपले सौभाग्य आहे. सर्व संतांच्या समवेत ह्या प्रेमाची लांबी, रुंदी, उंची, खोली जाणून घेणे हे सौभाग्य आहे, आणि तेच देवाचे प्रेम जे सर्व ज्ञानाच्या पलीकडे आहे, आणि त्याद्वारे देवाच्या पूर्णतेने भरून जाणे. आपण ख्रिस्ताचे असे चिंतन करू या की ज्याच्यात सर्व पूर्णता वस्ती करते. तो आपला वयक्तिक तारणारा आहे असे त्याच्याकडे बघता, त्याच्या तारण देणाऱ्या कृपेचे कौतुक मात्र आपण निश्चित करू शकतो. आपण करतो त्यापेक्षा अधिक येशूचा विचार आपण केला पाहिजे. आपल्या हृदयात त्याची स्तुती वसली पाहिजे. आपल्यासाठी जी विपुल प्रिती प्रदर्शित झाली त्याविषयी आपण बोलले पाहिजे. आपल्या हृदयाने आणि जीवात्म्याने व वाणीने देवाची स्तुती करण्याचे प्रत्येक कारण आपल्याकडे आहे, देवाने जी महान प्रिती माझ्यावर केली त्याच प्रेमाने मी त्याच्यावर प्रेम करतो.

त्याला उंच करा, काल्वरीचा वधस्तंभ, जेणेकरून जग त्याला पाहू शकेल. त्याच्या चांगुलपणाविषयी बोला, त्याचे

प्रेमाचे गीत गा, आणि तुमच्या हृदयाचे कृतज्ञपूर्वक आभार माना. {युएल ३७}

*मी इतका आनंदी आणि आशीर्वादित आहे की आपल्या तारणाच्या आनंदासाठी ख्रिस्ताने तो वधस्तंभ सहन केला. त्याने माझे प्रेम जिंकले आणि त्याला मी सर्व गोष्टींमध्ये प्रथम, शेवट आणि उत्तम बनवू इच्छितो.*

*गोल करा : होय अनिश्चित*

*मी प्रार्थना करतो की माझ्या नेत्रांनी पित्याने ज्या प्रकारचे प्रेम माझ्यावर केले ते "पाहावे" की मला त्याचे संतान म्हणून त्याने स्वीकारले आणि ही अद्भुत वास्तविकता आहे.*

*गोल करा : होय अनिश्चित*

*मी प्रार्थना करतो की खऱ्या अर्थाने मला त्याचे प्रेम समजावे आणि त्यावर मला विश्वास ठेवता यावा आणि हेच अद्भुत प्रेम इतरांच्या समोर व्यक्त करण्यासाठी त्याने मला शब्द पुरवावे.*

गोल करा :       होय          अनिश्चित

माझे पाषाणमय थंडगार असे हृदय काढून देवाने त्याची जागा प्रेमळ हृदयाने भरून काढावी जेणेकरून त्याच्यावर व इतरांवर मला प्रेम करण्याची क्षमता मिळेल असे अभिवचन मी सिद्ध करतो.

गोल करा :       होय          अनिश्चित

मी माझे हृदय त्याला एक वचन म्हणून देतो आणि त्याचा धावा संपूर्ण जीवाने, बलाने आणि मनाने करण्याची निवड करतो. माझे संपूर्णत्व देण्यास, जीवन, शारीरिक शक्ती, वात्सल्य, आणि बुद्धिमत्ता हे त्याच्या सेवेसाठी देण्याचे मी वचन देतो.

गोल करा :       होय          अनिश्चित

मी प्रार्थना करतो की देवाच्या कृपेने त्याच्याशी नातेसंबंध ठेवल्याने जो खरा धर्म निष्पन्न होतो त्याचा अनुभव मला घेता यावा ज्याचा परिणाम म्हणजे सातत्याने त्याचे सान्निध्य माझ्या जीवनात दिसून यावे.  देवाच्या नियमशास्त्रांच्या प्रती मला

सुसंगतीत जगायचे आहे जेणेकरून त्याच्या आज्ञांचे पालन करण्यात मला तो आनंद प्राप्त होईल.

गोल करा : होय अनिश्चित

त्या नगराच्या वेशी उघडून तो मला आणि जे सर्व विश्वासू आहेत त्यांना ह्या गौरवी राज्यात येण्याचे आमंत्रण देईल त्या दिवसाची मी आतुरतेने वाट पाहत आहे.

गोल करा : होय अनिश्चित

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________



# धडा १५
# देवाच्या प्रेमाचे सामर्थ्य प्राप्त करणे

**(१) देवाने आपल्यावर कोणते दैवी, सामर्थ्यशाली वरदान ओतले आहे, आणि जर आपण त्याला परवानगी दिली, ते आपले चारित्र्य बदलून टाकेल, आपल्या सर्व मतांवर अधिकार गाजवेल, आणि त्याच्यावर व इतरांवर प्रेम करण्यास सहाय्य करेल?**

*पहिल्याने त्याने आपल्यावर प्रीती केली, म्हणून आपण त्याच्यावर प्रीती करतो. (१ योहान ४:१९)*

देवासाठी अत्युच प्रेम आणि एकमेकांच्या प्रती  निस्वार्थी प्रेम– आपला स्वर्गीय पिता देऊ शकतो हे ते सर्वोत्तम वरदान आहे. हे प्रेम काही एकाएकी उदयास येणारी भावना नाही, तर एक दैवी तत्व आहे, एक कायमस्वरूपी सामर्थ्य आहे. शुद्ध नसणारे हृदय ते निर्माण करू शकत नाही किंवा जन्मास घालू शकत नाही. केवळ ज्या हृदयात येशू वस्ती करतो आणि अधिकार करतो त्याच ठिकाणी ते सापडते. “आपण त्याच्यावर प्रेम करतो, कारण त्याने प्रथम आपणावर प्रेम केले आहे.” दैवी कृपेने जे हृदय पुनरुजीवीत होते, कृती करण्यास प्रेम हे अधिकार करणारे तत्व आहे. ते चारित्र्याला बदलून टाकते, जाणीवांवर सत्ता गाजवते, आवडीवर नियंत्रण ठेवते, आणि सर्व जिव्हाळ्याना उदात्त करते. हेच प्रेम, ज्याला जीवात्म्यात गोंजारले जाते, जीवन मधुर बनवते आणि भोवताली असणाऱ्या सर्वांवर एक शुद्ध करणारा प्रभाव पाडते.

**(२) शुद्ध प्रेम, ज्याची जोड रक्त आणि आत्म्याशी आहे, एकत्रित काय करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे?**

*द्वेष कलह उत्पन्न करतो; प्रीती सर्व अपराधांवर झाकण घालते. (नीतीसुत्रे १०:१२)*

प्रेम एक सामर्थ्य आहे. ह्या तत्वात बौद्धिक आणि नैतिक सामर्थ्य समाविष्ट असतात, आणि त्यापासून विभित केले जाऊ शकत नाही. संपत्तीचे सामर्थ्य भ्रष्ट करून नष्ट करते; जबरदस्तीचे सामर्थ्य बलवान आहे व ते इजा पोहचवू शकते; पण शुद्ध प्रेमाचे अत्युच्च मोल हे चांगले करण्याच्या त्याच्या प्रभावीपणात आहे, आणि चांगल्याच्या व्यतिरिक्त इतर काहीही त्याला करायचे नसते. जे काही शुद्ध प्रेमाच्या भावनेने करण्यात येते, मग ते अल्प असो अथवा लोकांच्या दृष्टीने दोषकारक असो, ते पूर्णपणे फलदायी असते; कारण देव एखादी व्यक्ती किती प्रेमळ भावनेने कार्य करते ह्याकडे अधिक लक्ष देतो. प्रेम देवाकडून आहे. परिवर्तन न झालेले हृदय हे ह्या स्वर्गीय वाढीच्या झाडाला जन्मास घालू शकत नाही, जे केवळ जिथे ख्रिस्त राहतो आणि विपुल रीतीने वृद्धिंगत होतो तिकडे वसते.

ख्रिस्ताचे प्रेम हे खोलवर स्थित असून अत्यंत व्याकूळ असते, जे कोणी त्याचा स्वीकार करतात त्याच्यासाठी एका न थांबणाऱ्या झर्यासारखे ते वाहते. त्याच्या प्रेमात कोणत्याही प्रकारे स्वार्थीपणा नाही. जर हे स्वर्गात- जन्मास येणारे प्रेम हृदयात एक टिकाऊ तत्व आहे, ते स्वतःची ओळख करून देईल, केवळ ज्यांना आपण पवित्र नातेसंबंधात जवळ असे लेखतो केवळ त्यांनाच नव्हे, तर ज्या सर्वांशी आपण संपर्कात येतो त्यांच्यासोबत हे जवळून दिसून येते. ते आपल्याला लक्षपूर्वक काही थोड्या कृती करण्यास भाग पाडते, काही सवलती देण्यास, दयेची कृत्ये करण्यास, मवाळ,कोमल आणि खरे उत्तेजन देणारे शब्द बोलण्यास. ते आपल्याला ज्या हृदयांना सहानुभूतीची गरज आहे त्यांच्याशी तशी वर्तणूक करण्यास दिशा दाखवतात (एमएस १७, १८९९).

**(३) आपण ख्रिस्ताची प्रतिमा व्यक्त करून त्याचे चारित्र्य जगासमोर प्रगट करावे ह्यासाठी देव कोणत्या तीन गोष्टी आपणास देण्यास उत्सुक आहे?**

***कारण देवाने आपल्याला भित्रेपणाचा नव्हे, तर सामर्थ्याचा, प्रीतीचा व***

***संयमनाचा आत्मा दिला आहे. (२ तीमथी १:७)***

जेव्हा लोक तारणार्याचे आमंत्रण नाकारतात, ते स्वतःला सैतानाच्या स्वाधीन करतात. जीवनातील प्रत्येक विभागात असंख्य लोक, घरामध्ये, व्यापारात, आणि अगदी मंडळीत देखील, आज हे करत असताना दिसतात. ह्यामुळे गुन्हे आणि हिंसाचार सर्व पृथ्वीभर आज पसरलेले दिसून येतात, आणि मृत्यूचे जसे तांडव पसरताना दिसते तसे हा नैतिक अंधकार लोकांच्या वस्तीस्थानांच्या भोवती घुटमळत राहतो. सैतान त्याच्या भुलवणाऱ्या मोहांच्या द्वारे लोकांन्ना अधिकाधिक दुष्टाई करण्यास प्रेरित करतो, आणि ह्याचे परिणाम म्हणजे परावृत्त होणे आणि नाश पावणे हे परिणामी उद्भवतात. त्याच्या सामर्थ्याच्या विरोधातील एकमेव सुरक्षेचे स्थान म्हणजे येशूच्या सान्निध्यात दिसून येते. लोक आणि देवदूत ह्यांच्यापुढे सैतान हा मनुष्यांचा शत्रू व नाश करणारा असा प्रगट होतो; ख्रिस्त म्हणजे मनुष्यांचा मित्र आणि सुटका करणारा. त्याचा आत्मा मनुष्यांमध्ये त्या सर्व गोष्टींचा विकास करेल ज्या चारित्र्याला उदात्त करतील आणि

स्वभावाला गौरवतील. मनुष्याला शरीर आणि आत्मा आणि जीवात्मा ह्यात ते देवाचे गौरव करण्यासाठी उभारत जातात. “कारण देवाने आपल्याला भित्रेपणाचा नव्हे, तर सामर्थ्याचा, प्रीतीचा व संयमनाचा आत्मा दिला आहे.” २ तीमथी १:७. त्यात त्याने तुम्हांला आमच्या सुवार्तेच्या द्वारे आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा गौरव प्राप्त करून घेण्यासाठी पाचारण केले आहे;” “ त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे.” २ थेसलोनिकरास पत्र २:१४; रोमकरास पत्र ८:२९.

**(४) प्रेमाचे वरदान एकदा प्राप्त झाल्यावर आणि विश्वासाने आचरणात आणल्यावर, दुष्टाईचे शक्तिशाली पुराचे पाणी देखील त्याला काय करू शकणार नाहीत?**

*असले प्रेम महाजलांच्यानेही विझवणार नाही; महापुरांनाही ते बुडवून टाकता येणार नाही; मनुष्याने प्रेमासाठी आपल्या घरची सगळी संपत्ती दिली तरी ती त्यापुढे तुच्छ होय. (गीतरत्न ८:७)*

प्रेम कृतीशिवाय राहू शकत नाही, आणि प्रत्येक कृती त्याला वाढवते, स्थिरावते

आणि पसरवते. जेव्हा वादविवाद आणि अधिकार हे सामर्थ्र्यहीन ठरतात तेव्हा प्रेमाचा विजय होतो. प्रेम कोणताही फायदा अथवा प्रतिफळ ह्यासाठी काम करत नाही; तरीही देवाने हे नियोजित करून ठेवले आहे की प्रेमाच्या प्रत्येक कृतीचे फळ म्हणजे परिणामी महान फायदा हा होणारच. ते फैलावणारे आणि शांत असते, तरीही महान दुष्ट गोष्टींवर विजय संपादन करण्यासाठी त्यातील हेतूमध्ये बळकट आणि बलाढ्य असते. त्याच्या प्रभावात ते वितळवते आणि परिवर्तन घडवून आणते, पापी लोकांच्या जीवनाचा ताबा ते घेतात आणि त्यःच्या हृदयावर परिणाम पाडतात जेव्हा इतर सर्व मार्ग हे यशस्वी होत नाहीत.

जिथे कुठे बुद्धीचे सामर्थ्य, अथवा अधिकार, किंवा जबरदस्ती हे आचरणात येतात, आणि प्रेम हे व्यक्त होत नाही, ज्या लोकांपर्यंत पोहोचण्याची आपली इच्छा असते, त्यांच्या इच्छाशक्ती आणि ममता एक सौरक्षनीय, दूर लोटणारे स्थान संपादन करतात, आणि त्यांचे प्रतिकार करण्याचे बळ वाढते. येशू हा शांतीचा अधिपती होता. तो जगामध्ये प्रतिकार आणि अधिकार स्वतःच्या अधीन घेण्यासाठी आला. सुज्ञान आणि

बळ ह्यांना तो आज्ञा देऊ शकत होता, पण दुष्टाई वर विजय मिळवण्याच्या ज्या पद्धती त्याने वापरल्या त्या म्हणजे प्रेमाचे सुज्ञान आणि बळ. तुमच्या वर्तमान कार्यातील रुची विघटीत होऊ नये म्हणून कार्य करा जोपर्यंत देव तुम्हाला त्याच क्षेत्रात दुसरे कोणतेतरी काम देत नाही. आनंदाचा शोध करू नका, कारण त्याचा शोध केल्याने तो कोणालाच सापडत नाही. तुमचे कर्तव्य करत राहा. तुमच्या सर्व कार्तुत्वात विश्वासूपण असू द्या, आणि विनम्रतेने सुशोभित व्हा.

**(५) एकदा आपण ख्रिस्ताच्या प्रेमाचा आपल्यामध्ये अनुभव घेतला आणि अधिकाची जर अपेक्षा केली, प्रेम करण्याची किती अधिक आपली क्षमता तो वाढवू शकतो?**

***जास्तीत जास्त, अर्थात आपल्या मागण्या किंवा कल्पना ह्यांपलीकडे आपल्यामध्ये कार्य करणाऱ्या शक्तीप्रमाणे आधिक्याने कार्य करण्यास जो समर्थ आहे, (इफिसकरास पत्र ३:२०)***

“द्या म्हणजे तुम्हांला दिले जाईल” (लूक ६:३८); कारण देवाचे वचन हे

“भुईकमळांमध्ये चरणाऱ्या हरिणींच्या जुळ्या पाडसांप्रमाणे तुझे कुचद्वय आहे” (गीतरत्न ४:१५). ज्या हृदयाने एकेकाळी ख्रिस्ताच्या प्रेमाची चव घेतलेली आहे, अधिक खोलवर त्यात उडी टाकण्यासाठी सतत रडत असताना दिसते, आणि जसे तुम्ही ते अधिक प्रदान करणार तुम्हाला अधिक धनवान आणि विपुल रीतीने ते मिळत जाईल. जीवात्म्याला मिळणारे देवाचे प्रत्येक प्रगटीकरण ही अधिक जाणून घेण्याची आणि प्रेम करण्याची क्षमता वाढवतात. हृदयाची सातत्याची ओरड असते की, “तुझ्यापासून अधिक,” आणि आत्म्याचे उत्तर असते , “अधिक जास्त .” रोमकरास पत्र ५:९,१०. कारण आपला देव हा “जास्तीत जास्त, अर्थात आपल्या मागण्या किंवा कल्पना ह्यांपलीकडे आपल्यामध्ये कार्य करणाऱ्या शक्तीप्रमाणे आधिक्याने कार्य करण्यास जो समर्थ आहे.” इफिसकरास पत्र ३:२०. येशुसाठी, ज्याने पतन पावलेल्या मानवजातीसाठी स्वतःला रिक्त केले, पवित्र आत्मा हा कोणत्याही मोजमापनाशिवाय देण्यात आला होता. तसेच तो ख्रिस्ताच्या प्रत्येक अनुयायासाठी देण्यात येईल जेव्हा त्याच्या वस्ती करण्यासाठी संपूर्ण हृद्य समर्पित होते. आपल्या प्रभुने स्वतः ती

आज्ञा दिली आहे ,“आत्म्याने भरून जा” (इफिसकरास पत्र ५:१८), आणि ही आज्ञा त्याच्या पूर्ततेचे देखील अभिवचन आहे. पित्याच्या इच्छेचा व संतोषाचा हा भाग होता की ख्रिस्तामध्ये “संपूर्ण परिपूर्णतेने वस्ती करावी,” आणि “त्याच्यामध्ये आपण सर्व परिपूर्ण होतो.” कलस्सेकरास पत्र १:१९;२:१०

**(६) कोणते अभिवचन देव आपणास सिद्ध करावे म्हणून विश्व स्थेवतो जेव्हा प्रेम करण्याचे उद्धारदायी सामर्थ्य आपल्या हृदयांना भरून टाकते आणि आपल्या प्रत्येक हेतूवर राज्य करते?**

*त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ते ह्यावरून की, आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल; आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे. (१ योहान ५:१४-१५)*

योहानाने विश्वासनार्यांना हे उंचावलेले सौभाग्य समजून घेण्यास मार्गदर्शन केले

जे त्याच्याकडे प्रेमाच्या आत्म्याच्या आचारणात आणण्याच्या द्वारे येतील. हे उद्धार देणारे सामर्थ्य, जे ह्रदयाला भरून टाकते, इतर प्रत्येक हेतूवर नियंत्रण ठेवेल आणि ते धारण करणाऱ्यांना जगाच्या भ्रष्ट प्रभावांच्या वर उचलून ठेवेल. आणि ह्या प्रेमाला पूर्णतः स्वतंत्र होण्याची जशी परवानगी देण्यात आली आणि त्यांच्या जीवनात ध्येयाचे सामर्थ्य बनू दिले, देवामध्ये त्यांचा विश्वास आणि आत्मविश्वास आणि तो कशा प्रकारे त्यांच्याशी वागतो हे पूर्ण होते. मग ते विश्वासाच्या पूर्ण आत्मविश्वासात त्याच्याकडे येतील, हे जाणून घेऊन की त्यांना त्यांच्या वर्तमान आणि संतान चांगुलपणासाठी आवश्यक ते सर्वकाही तो पुरवणार. “ह्यामध्ये प्रेम परिपूर्ण केले जाते,” त्याने लिहिले, “न्यायाच्या दिवशी आपल्यामध्ये तो धीटपणा असावा: कारण जसा तो आहे, तसे आपण ह्या जगात असणार. प्रीतीत भय नाही; कारण परिपूर्ण प्रिती सर्व प्रकारचे भय काढून टाकते.” “आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे.”

**(७) पौलाप्रमाणे, आपली स्वतःबद्दल काय साक्ष असावी जेणेकरून आपल्या जीवनातून ख्रिस्ताचे प्रेम इतरांच्या पर्यंत वाहू शकेल?**

***मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वतःला माझ्याकरता दिले.***
***(गलतीकरास पत्र २:२०)***

हृदयात ख्रिस्ताचे प्रेम असण्याची आवश्यकता मात्र आहे. स्वतःला क्रुसावर देण्याची आवश्यकता आहे. जेव्हा स्वतःला ख्रिस्तामध्ये पूर्णपणे बुडून टाकले जाते, खरे प्रेम अचानक उद्भवते. ती काही एक भावना अथवा संवेदना नाही, तर एका शुद्ध इच्छाशक्तीचा तो निर्णय आहे. त्यात काही जाणीव अथवा भावना नसते, तर संपूर्ण हृदय, जीवात्मा, आणि चारित्र्य ह्यांचे रुपांतर त्यात असते, जे स्वतःसाठी मृत होऊन देवाच्याप्रती जिवंत असते. आपला प्रभू आणि तारणारा आपणास स्वतःला त्याच्या स्वाधीन देण्यास सांगतो.

स्वतःला देवाच्या स्वाधीन करणे ह्याची आवश्यकता असते, आपल्या स्वतःला त्याच्या स्वाधीन देणे आणि जसे त्याला वाटते तसे योग्य स्वरूप समर्पित करणे. आपण जोपर्यंत समर्पण करण्याच्या ह्या स्तरापर्यंत येत नाही, आपण आनंदाने, उपयुक्त रीतीने अथवा यशस्वी रीतीने काम करू शकणार नाही (पत्र ९७, १८९८).

खरे पवित्रीकरण विश्वासनार्यांना ख्रिस्ताशी आणि एकमेकांशी कोमल सहानुभूती ह्यामध्ये जोडते. हे संघटन सातत्याने हृदयामध्ये ख्रिस्ताच्या प्रेमासारखे प्रवाह उद्दत करते, जे पुन्हा एकमेकांच्या प्रती प्रेमळ रीतीने वाहू लागतात.

**(८) जेव्हा आपण स्वतःच्या प्रती मरण पत्करण्याची निवड करतो, मग आपल्या हृदयात कोण राहू शकते जेणेकरून खऱ्या अर्थाने आपण इतरांवर प्रेम करू शकतो?**

*मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी*

*जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत:ला माझ्याकरता दिले. (गलतीकरास पत्र २:२०)*

देवभीरुपणाचा आधार हा प्रेम आहे. व्यवसाय काहीही असो, कोणत्याही माणसाचे जोपर्यंत त्याच्या भावावर निस्वार्थ प्रेम नसते तोपर्यंत देवाच्याप्रती तो शुद्‌ध प्रेम दाखवू शकत नाही. पण इतरांवर प्रेम करण्याच्या प्रयत्नात आपण ही भावना विकसित करू शकत नाही. हृदयात ख्रिस्ताचे प्रेम असण्याची गरज आहे. जेव्हा स्वतः ख्रिस्तामध्ये मिसळून जातो, प्रेम स्वताहून अचानक उदयास येते. ख्रिस्ती चारित्र्याची पूर्णता ही अंतर्यामातून जेव्हा इतरांना मदत करण्याची आणि आशीर्वाद देण्याची भावना विकसित करण्यात येते तेव्हा उदयास येते -जेव्हा स्वर्गाचा सूर्यप्रकाश हृदयाला भरून टाकतो आणि चेहऱ्यावर तो प्रगट होतो.

**(९) आपण जर विश्वासाने आत्म्यात चालत राहतो तर, अनेक फळे आहेत**

**त्यामधून पहिले फळ कोणते आहे जे आपण नाश पावणाऱ्या जीवात्म्यांसाठी प्रदर्शित करू शकतो?**

***आत्म्याच्या द्‌वारे निष्पन्न होणारे फळ, प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन हे आहे, अशांविरुद्‌ध नियमशास्त्र नाही. (गलतीकरास पत्र ५:२२-२३)***

देव त्याच्या एका हाताने आपल्याला विश्वास देऊ करतो, त्याच्या महान बाहूचा आधार घ्या, आणि दुसऱ्या हाताने नाश पावणाऱ्या जीवात्म्यांपर्यंत पोहचा. ख्रिस्त हाच मार्ग, सत्य आणि जीवन आहे. त्याच्या मागे जा. देहाच्या मागे चालत राहू नका, तर आत्म्याच्या मागे जा. तो जसा चालला तसे चालत राहा. हीच देवाची इच्छा हे, तुमचे शुद्‌धीकरण व्हावे. तुम्हाला जे कार्य करायचे आहे ते म्हणजे त्याची इच्छा परिपूर्ण करणे जो तुमचे जीवन त्याच्या गौरवासाठी राखून ठेवतो. तुम्ही जर स्वतःसाठी कष्ट केले, तर त्याचा तुम्हाला काहीच फायदा होणार नाही. इतरांच्या हितासाठी कष्ट करणे, स्वतःची कमी काळजी घेणे आणि संपूर्णत्व अधिक देवाला सोपवणे, हे

त्याला मान्य होईल आणि त्याच्या कृपेने तुमची परतफेड केली जाईल.

**(१०) जेव्हा प्रेमाचा आत्मा आपणास देण्यात येतो, कोणत्या ख्रिस्ताच्या-सारख्या पद्धतींनी आपण लोकांच्या पर्यंत पोहोचण्यात यशस्वी होऊ शकतो?**

***शेवटी, तुम्ही सर्व एकचित्त, समसुखदु:खी, बंधुप्रेम करणारे, कनवाळू व नम्र मनाचे व्हा; (१ पेत्र ३:८)***

लोकांपर्यंत पोहोचण्यात ख्रिस्ताची पद्धत खरच सहाय्यक ठरेल. तारणारा लोकांसोबत इतका मिसळला जसे त्या ला त्याचे हित करायचे होते. त्यांना लोकांना सहानुभूती दाखवली, त्यांच्या गरजा भागवल्या, आणि त्यांचा आत्मविश्वास जिंकला. मग त्याने त्यांना आज्ञा केली, “माझ्यामागे या.”

वयक्तिक श्रम घेऊन लोकांच्या जवळ येण्याची गरज असते. जर उपदेश तयार करण्यात कमी वेळ दिला गेला, आणि वयक्तिक सेवेत अधिक समय जर देण्यात आला, तर अधिक जास्त ह्याचे परिणाम दिसून येतील. गरिबांची सुटका होणे, आजारी लोकांची काळजी वाहने,

दुख व शोक करणार्यांचे सांत्वन करणे, अज्ञानी लोकांना सूचना देणे आणि अनुभव नसणाऱ्या लोकांना सल्ला देणे. जे रडतात त्यांच्यासोबत आपणास रडायचे आहे, जे आनंद करतात त्यांच्यासोबत आपणास आनंद करायचा आहे. प्रवृत्त करण्याच्या सामर्थ्याने, प्रार्थनेच्या सामर्थ्याने, देवाच्या प्रेमाच्या सामर्थ्याने, हे काम, फळारहित असणार नाही.

**(११) कोणते महान आणि अनमोल अभिवचन आपण सिद्ध करू शकतो जेणेकरून ख्रिस्ताने केले तसे आपण देखील इतरांवर तशीच शुद्ध प्रिती करू शकतो?**

***त्यांच्या योगे मोलवान व अति महान अशी वचने आपल्याला देण्यात आली आहेत, ह्यासाठी की, त्यांच्या द्वारे तुम्ही वासनेपासून उत्पन्न होणारी जगातील भ्रष्टता चुकवून ईश्वरी स्वभावाचे वाटेकरी व्हावे. (२ पेत्र १:४)***

एकमेकांवर प्रिती करा....जर हे प्रेम जन्मास घातले, मर्यादित त्याच्यासारख्या मर्यादित गोष्टींसोबत मिसळेल, आणि सर्व अमर्यादित जे आहे त्यामध्ये केंद्रित

होईल. मानवता मानवतेच्या सोबत एकरूप होईल, आणि सर्व अमर्याद प्रेमाने जोडले जातील. एकमेकांच्या प्रती असणारी ही शुद्‌ध प्रिती पवित्र आहे. ह्या महान कार्यात एकमेकांसाठी असणारी ख्रिस्ती प्रिती–अधिक उच्च, अधिक सातत्यपूर्ण, अधिक निस्वार्थी, जी दिसून येते–ख्रिस्ती कोमलता, ख्रिस्ती हितकर्ता आणि सौम्यता ह्यांना जतन करते,आणि देवाच्या मिठीत मानवी बंधुत्वाला उघड करते, देवाने मनुष्याच्या अधिकारात जो सन्मान गुंतवला आहे त्याला स्वीकारते. हा सन्मान ख्रिस्ती लोकांनी देवाच्या सन्मानार्थ आणि गौरवार्थ नेहमी विकसित केला पाहिजे.

ख्रिस्ताने जसे प्रेम केले म्हणजे सर्व प्रसंगी आणि ठिकाणी निस्वार्थी भावना व्यक्त करणे, दयाळू शब्द आणि सुंदर दिसणे ह्यात ते व्यक्त होते. जे लोक त्यांना काहीच देत नाही ह्यांच्यासाठी कोणतीच किमत मोजली जात नाही, पण जीवात्म्याच्या भोवती दरवळणारा एक सुंगंध मात्र ते मागे ठेवून जातात. त्यांच्या परिणामाचा कधीच अंदाज बांधता येत नाही. स्वीकार करणाऱ्या व्यक्तीसाठी केवळ ते आशीर्वाद आहेत असे नाही, तर देणार्यासाठी देखील

असतात; कारण ते त्याला प्रतिसाद देतात. खरे प्रेम हा स्वर्गीय मूळ असणारा अनमोल गुणविशेष आहे, आणि तो इतरांना जसा देण्यात येतो तसा त्याचा सुगंध दरवळतो व त्याचे प्रमाण वाढत जाते.

ख्रिस्ताचे प्रेम हे खोल आणि उत्कट आहे, जे कोणी त्याचा स्वीकार करतात त्यांच्यासाठी न थांबणाऱ्या झर्यासारखे ते वाहते. त्याच्या प्रेमात कोणत्याही प्रकारे स्वार्थीपणा नाही.जर स्वर्गात -जन्मास येणारे हे प्रेमाचे तत्व हृदयात सदैव टिकून राहणारे असेल, ते स्वतःला सिद्ध करेल, केवळ त्यांनाच नाही ज्यांच्याशी आपले जवळचे आणि पवित्र नातेसंबंध असतात, तर प्रत्येकाशी ज्यांच्या संपर्कात आपण येतो. ते आपणास लक्ष वेधून घेणाऱ्या कृती करण्यास भाग पाडतात, सवलती देणे, दयेने कृत्ये करणे, कोमल, खरे आणि उत्तेजन देणारे शब्द बोलणे. ज्यांची हृदये सहानुभूतीसाठी भुकेली आहेत त्यांना सहानुभूतीने वागण्यास आपल्याला ते प्रेरित करतात.

***मला समजते की संपत्तीचे सामर्थ्य भ्रष्ट बनवू शकते; जोरजबरदस्ती करण्याचे***

सामर्थ्य इजा पोहचवू शकते, पण प्रेमाचे सामर्थ्य केवळ चांगले निष्पन्न करू शकते. माझ्या जीवनात ह्याच सामर्थ्याची मी इच्छा बाळगतो.

गोल करा : होय अनिश्चित

मला समजते की प्रेम म्हणजे एक तातडीची अशी भावना नाही, तर एक दैवी तत्व आहे जे येशू जिकडे राज्य करतो तिकडेच हजर असते. परिवर्तन न झालेले हृदय त्याला तयार करू शकत नाही अथवा त्याचा मूळ त्याच्यात नाही. माझ्या जीवनात ख्रिस्ताने अलौकिक रीतीने वर्चस्व करावे अशी माझी इच्छा आहे.

गोल करा : होय अनिश्चित

मला जाणीव आहे की ख्रिस्ताच्या प्रेमाने माझ्या हृदयात राज्य करण्यासाठी स्वतःला क्रुसावर देणे जरुरीचे आहे. मी अशा प्रकारे शुद्ध इच्छाशक्तीसाठी

प्रार्थना करतो जेणेकरून माझे जीवन ख्रिस्तामध्ये खोलवर बुडून जाईल आणि त्याद्वारे खरे प्रेम हे उदयास येईल.

गोल करा : होय अनिश्चित

दैनंदिन जाणीव आणि सुज्ञान ह्यांनी देवाच्या महान बाहुमध्ये माझा एक हात विश्वासाने घ्यावा अशी प्रार्थना करतो, आणि दुसऱ्या हाताने, नाश पावणाऱ्या जीवात्म्यांपर्यंत पोहोचण्यास मला सहाय्य करावे.

गोल करा : होय अनिश्चित

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________

_______________________________



# धडा १६

# प्रेम कसे करावे ह्याबद्‌दल ख्रिस्ताचे उदाहरण

**(१) इतरांवर प्रेम कसे करावे आणि त्याद्‌वारे ख्रिस्ताकडे कसे आकर्षित करावे ह्यासाठी आपण कोणाकडे बघितले पाहिजे?**

*कारण ह्याचकरता तुम्हांला पाचारण करण्यात आले आहे; कारण ख्रिस्तानेही तुमच्यासाठी दुःख भोगले आणि तेणेकरून तुम्ही त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून चालावे म्हणून त्याने तुमच्याकरता कित्ता घालून दिला आहे: (१ पेत्र २:२१)*

येशू, जो स्वामी आहे, तो आपल्याला सनातन संपत्ती मिळावी म्हणून गरीब बनला; आपल्याला जीवन, अमर जीवन मिळावे म्हणून तो मरण पावला. आपण त्याच्या उदाहरणाचे अनुसरण करण्यास तयार होऊ नये का, आणि जसे त्याने आपल्यासाठी केले तसे इतरांसाठी करू नये का? तसे करण्यात, आपल्या स्वतःचे चारित्र्य शिस्तबद्ध होऊन सुधारते, आपला विश्वास अधिक बलवान होतो, आपला आवेश अधिक अढळ आणि उत्साही बनतो, देवासाठी आपले प्रेम आणि ते सत्य आणि ज्या जीवात्म्यांसाठी ख्रिस्त मरण पावला हे वाढवले जातील, आणि आपल्या कष्टाचे फळ म्हणून अनमोल जीवत्मे तारिले जातील. ख्रिस्ताकडे जीवत्मे आकर्षित करण्याच्या पेक्षा दुसरे असे अधिक कोणते असे उदात्त करणारे कार्य आहे. वारंवार वेळोवेळी, सामान्य स्त्री आणि पुरुष ह्यांनी हे केले आहे,सर्वात शिक्षित, प्रभावी किंवा धनवान अशा लोकांच्या द्वारे नाही, पण खऱ्या आणि विश्वासू लोकांच्या द्वारे जे साधेपणाने आपले काम करतात. एका जीवात्म्याकडे पोहोचल्यावर, त्याचा परिणाम म्हणजे, ख्रिस्ताच्या सेवेत एक पूर्ण सैन्य येते. पण प्रत्येक कारभाऱ्याने संपूर्णतः आणि

सातत्यपूर्ण येशू ख्रिस्तावर त्याचे सुज्ञान आणि बळ मिळण्यासाठी अवलंबून राहिले पाहिजे. {आरएच, जून १०, १८८०}

**(२) इतरांच्या सोबत आपल्या वर्तणुकीच्या संबंधी ख्रिस्ताने कोणती सूचना त्याचे उदाहरण व नियमशास्त्र ह्यांच्याद्वारे दिली?**

***मी तुम्हांला नवी आज्ञा देतो की, तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी; जशी मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करावी. (योहान १३:३४)***

ख्रिस्ताने पहिल्या शिष्यांना जशी तो त्यांच्यावर प्रिती करतो तशी करण्यास सांगितले होते. म्हणून जगाला त्यांनी साक्ष द्यायची होती की त्यांच्यामध्ये गौरवाची आशा, म्हणजे ख्रिस्त हा जन्मास आला. "मी तुम्हांला नवी आज्ञा देतो की, तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी; जशी मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करावी." योहान १३:३४. ज्या वेळी हे शब्द बोलण्यात आले, शिष्यांना ते समजत नव्हते; पण ख्रिस्ताचे दुखसहन त्यांनी पाहिल्यावर आणि अनुभवल्यावर, त्याचे क्रूसावरील मरण आणि पुनरुत्थान ह्यानंतर, त्याचे

स्वर्गारोहण झाल्यावर, पन्नासाव्या दिवशी म्हणजेच पेन्तेकॉस्त च्या दिवशी जेव्हा पवित्र आत्मा त्यांच्यावर उतरून आला, देवाच्या प्रेमाची त्यांना स्पष्ट कल्पना आली आणि एकमेकांच्या प्रती त्या प्रेमाचे स्वरूप काय असावे हे त्यांना समजले.  मग योहान त्याच्या सहकारी शिष्यांना म्हणू शकला: “ह्याद्वारे आपणास देवाचे प्रेम दिसते, आकारण त्याने आपले आयुष्य आपल्यासाठी अर्पण म्हणून दिले: आणि तसेच आपण देखील आपल्या बंधुजनांसाठी आपले आयुष्य दिले पाहिजे.”

देव त्याचे कार्य पुढे जाण्यासाठी लोकांवर अवलंबून नाही. त्याने देवदूतांना त्याच्या ह्या सत्याचे राजदूत बनवले. त्याने त्याची इच्छा कळवली असती, जसे सिनाय पर्वतावरून त्याने स्वतःच्या वाणीने त्याची घोषणा केली. पण हित करण्याच आत्मा आपल्यात विकसित करण्यासाठी, हे कार्य करण्यास त्याने लोकांची निवड केली.

इतरांच्या हितासाठी करण्यात आलेली स्वयं- त्यागाची कृती ही देणार्याच्या हृदयात हितकर्त्याचा आत्मा बळकट करते, जगाच्या उद्धारकाकडे त्याला

अधिक जवळ घेऊन येते, जो श्रीमंत होता, तरीही आपल्यासाठी तो गरीब बनला, जेणेकरून त्याच्या दारिद्र्याच्या द्वारे आपण धनवान बनावे.” आणि आपल्या निर्मितीत जसा हा दैवी उद्देश आपण पूर्ण करतो की जीवन आपल्यासाठी एक आशीर्वाद बनते. देवाचे मनुष्यासाठी असणारे प्रत्येक वरदान हे शापच बनतील, जोपर्यंत तो त्याच्या सहकार्यासाठी आणि देवाचे कार्य पृथ्वीवर संपन्न करून घेण्यासाठी त्याचा उपयोग करून घेत नाही.

**(३) आपले ख्रिस्ताच्या सोबत असणाऱ्या नात्याचा सर्वाधिक पुरावा काय असेल असे ख्रिस्ताने सांगितले?**

***तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहात. (योहान १३:३५)***

महान शिक्षकांचे अनुयायी नेहमी त्यांच्या शिक्षकांचे गुणधर्म प्रगट करतात. येशूचा एक मुख्य गुणधर्म म्हणजे प्रेम होता. येशूचे जीवन म्हणजे कृतीत उतरलेले प्रेम ह्याचे उत्तम उदाहरण होते. येशूच्या शिष्यांनी अशाच प्रकारचे प्रेम प्रदर्शित करणे त्यांचे

त्यांच्या प्रभूसोबत असणारे नाते आणि त्याच्याशी असणारी जवळीक हे व्यक्त करतात. केवळ नावासाठी ते बाळगणे नसून प्रेम आहे जी ख्रिस्ती व्यक्तीची ओळख अथवा खूण आहे.

हे प्रेम त्यांच्या शिष्यत्वाचा एक पुरावा आहे. “ह्याद्वारे सर्व लोकांना समजेल की तुम्ही माझे शिष्य आहात,” येशूने म्हंटले, “जर तुम्ही एकमेकांच्या प्रती ते प्रेम व्यक्त केले.” जेव्हा लोक एकमेकांशी जोडले जातात, जबरदस्ती अथवा स्वार्थासाठी नाही, तर प्रेमाने, ते अशा प्रभावाला व्यक्त करतात जो प्रत्येक मानवी प्रभावापेक्षा मोठा असतो. जिकडे हे ऐक्य अस्तित्वात असते, देवाची प्रतिमा मानवततेत पुनर्स्थापित होते ह्याचा तो पुरावा बनतो, आणि जीवनाचे नवीन तत्व रुजवले जाते. दैवी स्वभावात दुष्टाचे वरपांगी माध्यम आणि प्रहार सहन करण्याचे सामर्थ्य आहे असे दिसते, आणि नैसर्गिक हृदयात जो स्वार्थीपणा रुजलेला आहे त्याला देवाच्या कृपेच्या अधीन केले जाते.

मंडळीचा प्रभाव इतर कोणतीच गोष्ट दुर्बल करू शकत नाही जितका प्रेमाचा

अभाव करते. जगिक लोक आपल्याकडे आपला विश्वास हा आपल्या जीवनासाठी आणि चारित्र्यासाठी काय कारत आहे ह्यासाठी बघत आहेत. आपल्या हृदयावर त्याचे शुद्ध करणारे परिणाम हित आहेत का हे ते बघतात,  त्याद्वारे आपण ख्रिस्ताच्या प्रतीरूपाचे बनत आहोत का हे ते पाहतात. आपल्या जीवनातील प्रत्येक त्रुटी उलगडण्यास, आपल्या कृतीतील प्रत्येक असमतोल पाहण्यास ते तयार आहेत. आपल्या विश्वासाचा धिक्कार करण्यासाठी आपण त्यांना दुसरा कोणताही प्रसंग देऊ नये. {टीएमके १५३}

**(४) आपल्यासाठी जेव्हा देवाच्या प्रेमाचा आपण खरेपणाने अनुभव घेतो, आपण जगासमोर काय प्रगट करतो?**

***त्याप्रमाणे तुमचा प्रकाश लोकांसमोर असा पडू द्या की त्यांनी तुमची सत्कर्मे पाहून तुमच्या स्वर्गातील पित्याचा गौरव करावा. (मत्तय ५:१६)***

देवाने जे प्रेम आणि कोमलता आपल्यावर इतक्या विपुल रीतीने केले आहेत, आपण आपला प्रकाश चमकू दिला अफिजे. देवाच्या प्रत्येक वरदानाचा

आपण उत्तम उपयोग करावा, आणि त्याद्वारे चांगले जे आहे ते निष्पन्न करावे. जे देवाचे नाही ते आपण त्याला देऊ शकत नाही, पण आपल्याभोवती ते दुखसहन करणारे लोक आहेत त्यांना मात्र आपण मदत करू शकतो. ह्या जीवनासाठी आवश्यक गोष्टींचा पुरवठा करून आपण त्यांची मदत करू शकतो, आणि त्याच वेळी देवाचे जे अद्भुत प्रेम आहे त्याविषयी बोलू शकतो.

जोकोनी देवामध्ये वस्ती करतो, तो प्रेमाने वस्ती करतो. जे सर्व प्रसिद्ध आणि प्रचलित झाले, प्रायोगिक अशा ज्ञानाने, आपल्या स्वर्गीय पित्याच्या प्रेमाने आणि कोमल दयेने ते जिथे कोठे असतील प्रकाश आणि आनंद सर्वांना देतील. त्यांचे सान्निध्य आणि प्रभाव हा त्यांच्या सहकाऱ्यांसाठी सुंदर सुवासिक फुलांप्रमाणे असतो, कारण स्वर्ग आणि देवाशी ते जोडलेले असतात, आणि स्वर्गाची शुद्धता आणि अत्युच्च प्रेमळ स्वभाव हे त्यांच्यापर्यंत जे सर्व त्या प्रभावाखाली असतात त्यांच्यापर्यंत पोहोचते. ह्याद्वारे जगाचा प्रकाश त्यांच्यासमोर असतो, आणि पृथ्वीचे मीठ देखील असते. खरोखर जीवनाला जीवनापर्यंत ते नेतात,

मृत्यूला मृत्युपर्यंत नाही. {एमवयपी ३६३}

**(५) ख्रिस्त त्याच्या प्रत्येक अनुयायांना काय होण्यासाठी पाचारण करतो, देवाच्या आत्म्याने लिखित, जेणेकरून जगाला त्याचे चांगुलपण आणि दया हे दाखवण्यात येऊ शकतात?**

***तुम्हीच आमचे पत्र, आमच्या अंत:करणांवर लिहिलेले, सर्व माणसांना कळलेले आणि त्यांनी वाचलेले असे आहात; शाईने नव्हे, तर सदाजीवी देवाच्या आत्म्याने कोरलेले, दगडी पाट्यांवर नव्हे तर 'मांसमय अंत:करणरूपी पाट्यांवर' 'कोरलेले', आमच्या सेवेच्या योगे तयार झालेले ख्रिस्ताचे पत्र, असे तुम्ही प्रसिद्ध आहात. (२ करिंथकरास पत्र ३:२-३)***

देवाच्या लेकरांना ख्रिस्ताचे प्रतिनिधी म्हणून पाचारण आहे, जे प्रभूची दया आणि चांगुलपण दर्शवतात. येशूने जसे पित्याचे खरे चारित्र्य दर्शवले, तसेच ख्रिस्ताला आपण जगापुढे न्यावे ज्यांना त्याची हि कोमल, मवाळ प्रिती ठाऊक नाही. "जसे तू मला जगात पाठवले," येशूने म्हंटले, "तसेच मी देखील त्यांना

जगात पाठवले आहे.” “मी त्यांच्यात, आणि तू माझ्यात; . . . की जगाला समजेल की तू मला पाठवले आहे.” योहान १७:१८,२३. प्रेषित पौल येशूच्या शिष्यांना म्हणतो, “आमच्या सेवेच्या योगे तयार झालेले ख्रिस्ताचे पत्र, असे तुम्ही प्रसिद्ध आहात,” “सर्व माणसांना कळलेले आणि त्यांनी वाचलेले असे आहात.” २ करिंथकरास पत्र ३:३,२.

त्याच्या प्रत्येक लेकरात, येशू जगाला एक पत्र पाठवतो. तुम्ही जर ख्रिस्ताचे अनुयायी असला तर, तुमच्यात तो कुटुंबासाठी एक पत्र पाठवतो, गावासाठी, रस्त्यावर, जिकडे तुम्ही राहता. येशू, तुमच्यात वस्ती करत असताना, ज्यांना तो परिचित नाही अशांशी बोलण्याची इच्छा बाळगतो. कदाचित ते पवित्र शास्त्र वाचत नाही,किंवा त्या पृष्ठांमधून जी वाणी बोलते ते ऐकत नाही; त्याच्या कृतींद्वारे देवाचे प्रेम ते बघत नाहीत. पण जर तुम्ही ख्रिस्ताचे एक खरे प्रतिनिधी असाल, तर तुमच्याद्वारे त्याचे चांगुलपण समजून घेण्यास आणि प्रेम केल्याने त्याची सेवा करण्यास ते शिकतील.

**(६) ज्या ख्रिस्ताच्या प्रेमाच्या कृती इतरांपर्यंत दर्शवण्यात येत नाही त्यांच्या विश्वासाची परिस्थिती कशी असते?**

***ह्याप्रमाणे विश्वासाबरोबर जर क्रिया नाहीत तर तो जात्या निर्जीव आहे. (याकोब २:१७)***

आपल्या बंधूजनाच्या प्रती ख्रिस्तासारखी प्रिती न बाळगता मनुष्यांना असे सनातन जीवनाप्रत विश्वास असू शकतो, असे गृहीत धरणे ही सर्वात मोठी आणि घातक फसवणूक आहे. ज्याचे देवावर आणि त्याच्या शेजार्यावर प्रेम आहे तो प्रकाश आणि प्रेमाने भरलेला आहे. देव त्याच्यात आणि त्याच्याभोवती आहे. ख्रिस्ती लोक त्यांच्याभोवती असणाऱ्या लोकांवर असे प्रेम करतात ज्या अनमोल जीवात्म्यांसाठी ख्रिस्त मरण पावला. प्रेमरहित ख्रिस्ती असे काहीच नसते; कारण “देव प्रिती आहे,” आणि “ह्याद्वारे आपणास ठाऊक आहे की आपण त्याला ओळखतो, जर आपण त्याच्या आज्ञांचे पालन केले तर. तो जो म्हणतो, मी त्याला ओळखतो, आणि त्याच्या आज्ञांचे पालन करत नाही, तो लबाड आहे, आणि सत्य त्याच्यात नसते.”

“ही माझी आज्ञा आहे, की तुम्ही एकमेकांवर प्रेम करा, जसे मी तुमच्यावर केले आहे.” हेच ते फळ आहे जे देवाला परत देणे आवश्यक आहे.

**(७) ज्या लोकांच्या जीवात्म्यात अढळ टिकणारे प्रेमाचे तत्व दिसते आणि त्याद्वारे ते ख्रिस्ताला प्रगट करतात अशांना पाहून कोणत्या दोन पद्धतींनी देव त्यांच्यावर आनंदित होईल?**

***परमेश्वर तुझा देव, साहाय्य करणाऱ्या वीरासारखा तुझ्या ठायी आहे; तो तुझ्याविषयी आनंदोत्सव करील; त्याचे प्रेम स्थिर राहील, तुझ्याविषयी त्याला उल्लास वाटून तो गाईल.” (सफन्या ३:१७)***

देव कोणालाही स्वर्गात तसेच घेऊन जात नाही, आधी ख्रिस्ताच्या कृपेने त्यांना ह्या जगात असताना संतगन बनवतो, ज्यांच्यात त्याला उंचावलेला ख्रिस्त आढळून येतो. जेव्हा ख्रिस्ताचे प्रेम जीवात्म्यात एक अढळ असे टिकणारे तत्व बनते, आपल्याला जाणीव होते की देवासोबत ख्रिस्तामध्ये आपल्याला शरण जाण्याचे स्थान आहे.

जे लोक, प्रार्थना, आणि जागरूकपणे प्रेमाने , ख्रिस्ताचे कार्य करत राहतात, ते आनंदाने गीते गाऊन उत्सव करू शकतात. जितक्या अधिक देव त्याच्या प्रिय पुत्राचे चारित्र्य त्याच्या लोकांमध्ये प्रगट झालेले बघतो,तितका अधिक त्यांना त्याच्यात समाधान आणि आनंद मिळतो. देव स्वतः आणि स्वर्गीय दूत त्यांच्यावर आनंदाने गीते गाऊन उत्सव करतात.

**(८) ह्या वचनाच्या शेवटी विचारण्यात आलेला कोणता प्रश्न खात्री आहे की मनुष्याला सनातन जीवन मिळणे हे गृहीत धरणे घातक आहे, आपल्या बंधूजणांच्या प्रती ख्रिस्तासारखी प्रिती न दाखवता?**

***मग जवळ संसाराची साधने असून व आपला बंधू गरजवंत आहे हे पाहून जो स्वत:ला त्याचा कळवळा येऊ देत नाही त्याच्या ठायी देवाची प्रीती कशी राहणार? (१ योहान ३:१७)***

खरे शुद्धीकरण विश्वासनार्यांना ख्रिस्ताशी आणि एकमेकांशी कोमल दयेच्या बंधात जोडते. हे ऐक्य सातत्याने हृदयात ख्रिस्तासारख्या प्रेमाचे प्रवाह

वाहवतात, जे एकमेकांच्या प्रती असणाऱ्या प्रेमाला व्यक्त करतात.

जे गुणधर्म सर्वांनी परिधान करणे आवश्यक आहे जे ख्रिस्ताच्या चारित्र्याची पूर्णता दर्शवतात- त्याचे प्रेम, त्याचा संयम, त्याचा निस्वार्थीपणा, आणि त्याचे चांगुलपण. हे सर्व गुणधर्म दयाळू अंतःकरणाने दयेच्या कृती केल्यावर संपन्न होतात.

**(९) ज्या लोकांनी अध्यात्मिक रित्या पतन पावलेल्या लोकांचे तारण करण्यासाठी परिश्रम घेतले त्यांच्यासाठी प्रेमळ स्वभावाने कोणते उदाहरण, सौभाग्य, आणि कामगिरी ख्रिस्ताने दिलेली आहे?**

*तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या; जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे." आमेन*
*(मत्तय २८:१९-२०)*

येशूने जगाकडे पतन पावलेल्या परिस्थितीत अशा प्रकारे अमर्याद अशा दयेने आणि सहानुभूतीने बघितले. त्याने स्वतः मानवता परिधान केली जेणेकरून तो मानवतेला स्पर्श करून तिला उंचावू शकतो. जे हरवलेले आहेत त्यांचा शोध घेण्यासाठी तो आला. मानवी दैन्यावस्थेच्या खोलीपर्यंत तो पोहोचला आणि मनुष्य ज्या स्थितीत होता तसे त्याला घेतले, असे अस्तित्व जे भ्रष्टाचाराने डागाळलेले आहे, दुष्टाईने ढळलेले आहे, पापाने परावृत्त झाले, आणि सैतानासोबत त्याच्या साम्राज्यात एकवटले, आणि त्याला उंचावून त्या सिंहासनावर बसवण्यास कारणीभूत ठरले. पण त्याच्याविषयी असे लिहण्यात आले की “तो निराश अथवा अपयशी होणार नाही,” आणि तो स्वयं- त्यागाच्या आणि स्वयं- अर्पणाच्या मार्गांवर गेला, आपल्यासाठी एक उदाहरण देत ज्याचे अनुसरण आपणास करायचे आहे.

आपण येशूने केले तसे काम केले पाहिजे, आपल्या स्वतःच्या आनंदापासून दूर जाऊन,सैतानाच्या सर्व लाचलुचपतीपासून मागे हटून, सहजतेचा द्‌वेष करून, स्वार्थीपणाचा राग करून, जे हरवलेले आहे त्याचा शोध घेत ते सापडून,

जीवात्म्यांना अंधकारातून प्रकाशात घेऊन येऊन,त्यांना देवाच्या सूर्यप्रकाशात घेऊन यायचे आहे. प्रत्येक निर्मितीपर्यंत देवाचे शुभवर्तमान जाऊन गाजवण्याची आज्ञा आपणास देण्यात आली आहे. हरवलेल्या लोकांपर्यंत ही सुवार्ता घेऊन जायची आहे की ख्रिस्त पापाची क्षमा करू शकतो, स्वभावाला पुनरुजीवीत करू शकतो, जीवात्म्याला त्याच्या धार्मिकतेच्या वस्त्रात परिधान करू शकतो, पापी व्यक्तीला त्याच्या थाऱ्यावर आणू शकतो, त्याला शिक्षण देऊन देवाबरोबर कारभारी म्हणून काम करण्याची त्याला प्रेरणा देऊ शकतो.

**(१०) जेव्हा आपण ख्रिस्तात वस्ती करतो, तो पवित्र आत्म्याच्या द्‌वारे काय करण्याचे सामर्थ्य देईल जेणेकरून आपण इतरांसाठी कष्ट करू शकतो?**

***मी त्याच्या ठायी राहतो, असे म्हणणाऱ्याने तो जसा चालला तसे स्वतःही चालले पाहिजे. (१ योहान २:६)***

ख्रिस्ती लोकांची वर्तणूक त्यांच्या प्रभूसारखी आहे. त्याने तो दर्जा लावून दिला, आणि आपण त्याच्याभोवती फिरणार अथवा नाही ही आपली बाब

आहे. आपला प्रभू आणि तारणारा ह्याने त्याची सतत सोडून दिली, त्याचे वैभव आणि गौरव सोडले, आणि आपला शोध घेतला, त्या दैन्यावस्थेतून बाहेर काढले आणि स्वतःसारखे बनवले. त्याने स्वतःला विनम्र केले आणि आपला स्वभाव परिधान केला जेणेकरून आपण त्याच्याकडून अधिक शिक्षण घेऊ शकतो, आणि स्वयं- त्याग आणि हितकर्ता म्हणून त्याच्या जीवनाचे अनुकरण करून,पावलोपावली स्वर्गात त्याच्यासोबत आपण प्रवेश करू शकतो. त्या प्रतीची नकल आहे तशी तुम्ही करू शकत नाही; पण त्यासारखे साम्य दर्शवू शकता आणि,तुमच्या क्षमतेनुसार तसे करू शकता. "तू आपला देव परमेश्वर ह्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जीवाने, संपूर्ण शक्तीने, आणि अंतःकरणाने प्रिती कर; आणि तशीच आपल्या शेजाऱ्यांवर देखील कर." असे प्रेम तुमच्या हृदयात आधी वसले पाहिजे, की तुम्ही ह्या जगाचे धन आणि सन्मान हे देण्यास तयार व्हाल आणि एका जीवात्म्याला ख्रिस्ताच्या सेवेत सहभागी होण्यास प्रभावित कराल.

***शास्त्रभाग मी वाचत असताना मला आश्चर्य वाटते की ख्रिस्त जो स्वामी आणि निर्माणकर्ता हा दरिद्री झाला***

कारण मला संतान संपत्ती मिळावी ह्यासाठी; मला जीवन मिळावे म्हणून तो मरण पावला; तो मला उत्कट आवेश, शिस्त, ह्यांचे सौभाग्य आणि उदाहरण देईल आणि त्याद्वारे त्याच्या राज्यासाठी अनमोल जीवात्मे जिंकण्याचे सौभाग्य प्रदान करेल.

गोल करा : होय अनिश्चित

ख्रिस्त जो महान शिक्षक आहे त्याच्या प्रेमाचे उदाहरण अनुसरण्याची मी निवड करतो, आणि त्याद्वारे त्याच्या लेकरांना हे दर्शवण्याचा प्रयत्न करतो की व्यावहारिक प्रत्यक्षात कृतीतील प्रेम कसे असते. मला त्याचे प्रेमपत्र बनायचे आहे जे जगाला त्याने लिहिले आणि पोहचवले.

गोल करा : होय अनिश्चित

मला जसे त्याच्या प्रेमाच्या सामर्थ्याची जाणीव होते आणि मी त्याचे उदाहरण

पाहतो, माझ्या हृदयाची ही इच्छा आहे की त्याने जसे माझ्यावर प्रेम केले तसे मी देखील इतरांवर करावे. देवाने मला हे सौभाग्य ह्यासाठी दिले नाही की मी त्याच्यावर त्याचे कार्य पुढे नेण्यासाठी अवलंबून आहे म्हणून, तर माझ्यामध्ये त्याने ही हितकर्ता वृत्ती विकसित करावी म्हणून दिले आहे.

गोल करा : होय अनिश्चित

रोज ख्रिस्तामध्ये मी वस्ती करण्याची निवड करतो जेणेकरून त्याच्या पवित्र आत्म्याने मी भरून जावे आणि ह्या पतन पावलेल्या जगासाठी शुभवर्तमान घेऊन जाण्यात त्याचे हात आणि पाय बनावे.

गोल करा : होय अनिश्चित

______________________________

______________________________

______________________________

______________________________



# धडा १७
# आचरणात दिसणारे प्रेम

**(१) ख्रिस्ताकडून येणारे कोणते वरदान देवाला त्याच्या अनुयायांमध्ये पहायचे आहे आणि त्याच्या दृष्टीने हा अनमोल खजिना आहे?**

***तर जो सौम्य व शांत आत्मा देवाच्या दृष्टीने बहुमूल्य आहे त्याची म्हणजे अंत:करणातील गुप्त मनुष्यपणाची, अविनाशी शोभा असावी. (१ पेत्र ३:४)***

सर्वात उत्तम पोशाख जो आपणास तो घालायला सांगतो तो म्हणजे

जीवात्म्यावर असतो. कोणत्याही प्रकारे बाह्यात्कारी सुशोभित दिसणे ह्याची तुलना “त्या दीन आणि विनम्र आत्म्याशी करता येत नाही” जे त्याच्या दृष्टीने “मोठ्या किमतीचे आहे.” १ पेत्र ३:४

ख्रिस्ताचे वरदान, एका नम्र आणि दीन आत्म्याचा दागिना, हा त्याने दिलेल्या अधिकाराने घोषित करून जे काहीच चूक करत नाही त्याला अनमोल व किमती असे बनवतात. आपण प्रत्येकाने देवाकडून ह्याचा शोध घेऊन स्वतःसाठी ते साधने आवश्यक आहे. आपल्याला लोक कसेही पाहतील व अंदाज बांधतील, आपण जर हा दागिना घातला, ख्रिस्ताच्या सोबत असणारे जे शिष्यत्व आहे त्याची ती खुण बनते. सर्वोच्च जो देव आहे त्याने आपली किमत केली आहे; कारण जी दागिना आपण घालतो त्याच्या दृष्टीने तो खूप मौल्यवान आहे. ह्याच अनमोल रत्नाचा शोध आपण केला पाहिजे.

**(२) जेव्हा इतरांवर प्रेम करण्याची बाब असते, तेव्हा प्रभूला आपल्या ओठांचे फळ नको असते, तेव्हा आपण इतरांवर कसे प्रेम करावे अशी त्याची इच्छा असते?**

***मुलांनो, आपल्या शब्दांनी किंवा जिभेने नव्हे, तर कृतीने व सत्याने आपण प्रीती करावी. (१ योहान ३:१८)***

“आपण केवळ शब्दात प्रेम करू नये,” प्रेषित पौल लिहितो, “तर कृती आणि सत्यात करावे.” ख्रिस्ती चारित्र्याची पूर्णता ही जेव्हा आपल्यामधून इतरांना मदत करण्यास आणि आशीर्वाद देण्याची प्रेरणा निष्पन्न होते त्यातून जन्मास येते. ह्याच प्रेमाचे ते वातावरण आहे जे विश्वासनार्याच्या जीवात्म्याच्या भोवती असते जे जीवनाला जीवन देते आणि देवाला त्याचे कार्य आशीर्वादित करण्याची संधी देते.

देवाच्याप्रती उच्च कोटीचे प्रेम आणि एकमेकांच्या प्रती निस्वार्थी प्रेम- हे सर्वोत्तम वरदान आहे जो आपला स्वर्गीय पिता देऊ शकतो. हे प्रेम काही उत्तेजक शक्ती नाही, तर एक दैवी तत्व आहे, एक कायमस्वरूपी सामर्थ्य आहे. अशुद्ध हृदय ते तयार करू शकत नाही अथवा ते त्याच्यात उदयास येत देखील नाही. केवळ ज्या हृदयात येशू राज्य करतो तिकडेच ते दिसते. “आपण त्याच्यावर प्रेम केले, कारण प्रथम त्याने आपणावर प्रेम केले.” दैवी कृपेने जे हृदय नव्याने

जन्मास येते त्याच्यात, कृती करण्यास प्रेम हे राज्य करणारे तत्व आहे. ते चारित्र्य बदलते, उत्तेजक शक्तींवर राज्य करते, आवडीवर नियंत्रण ठेवते, आणि सर्व ममतांना उदात्त करते. हेच प्रेम, जे जीवात्म्यात जोपासले जाते, जीवनाला मधुर करून सर्वत्र एक दरवळणारा सुगंध पसरवते.

**(३) जगापुढे ख्रिस्ताचे प्रेम करण्याचे कार्य आणि कामगिरी करण्याच्या आठ प्रत्यक्ष पद्धतींचे वर्णन संक्षिप्त स्वरुपात करा ज्या ह्या वचनात यादीच्या स्वरुपात आढळतात?**

***“दुष्टतेच्या बेड्या तोडाव्यात, जुवाच्या दोऱ्या सोडाव्यात, जाचलेल्यांना मुक्त करावे, सगळे जोखड मोडावे, हाच मला पसंत असा उपास नव्हे काय? तू आपले अन्न भुकेल्यांना वाटावे; तू लाचारांना व निराश्रितांना आपल्या घरी न्यावे; उघडा दृष्टीस पडल्यास त्याला वस्त्र द्यावे; तू आपल्या बांधवाला तोंड लपवू नये हाच तो उपास नव्हे काय? (यशया ५८:६-७)***

देवाची अपेक्षा असते की आपण सर्वांनी स्वयं- त्याग करणारे कारभारी व्हावे. सत्याच्या प्रत्येक भागाचे आपल्या

दैनंदिन जीवनात एक प्रत्येक्ष अवलंबन असते. जे लोक देवाचे वचन ऐकून ते पाळतात ते लोक धन्य आहेत. ऐकणे केवळ पुरेसे नाही; आपण कृती केली पाहिजे. आज्ञांचे पालन करून त्या आचरणात आणण्यात मोठे प्रतिफळ आहे. जे लोक त्यांच्या हित करण्याच्या वृत्तीचे प्रात्यक्षिक प्रदर्शन त्यांची सहानुभूती आणि गरीब, दुखसहन करणारे, कमनशिबी लोक ह्यांच्याप्रती कनवाळूपणे कृती करून दाखवतात, केवळ त्रास सहन करणाऱ्यांची सुटका करतात इतकेच नाही, तर स्वतःचा आनंद शोधून ज्जीवात्मा आणि शरीर ह्यांचे उत्तम स्वास्थ्य उपभोगतात. यशया म्हणूनच जे कार्य देव स्वीकारेल आणि त्याच्या लोकांना ते करण्यात आशीर्वाद देईल ह्याचे वर्णन सोप्या रीतीने करतो.

**(४) आपण जर ख्रिस्ताच्या प्रेमाने आणि आत्म्याने जर भरलो तर इतर विश्वास्नार्यांच्या बरोबर असणाऱ्या नात्यात कोणती प्रेमाची कृत्ये आणि गुणधर्म हे प्रदर्शित होतील?**

***तर तुम्ही समचित्त व्हा, म्हणजे एकमेकांवर सारखीच प्रीती करा आणि***

***एकजीव होऊन एकचित्त व्हा; अशा प्रकारे माझा आनंद पूर्ण करा. (फिलिप्पेकरास पत्र २:२)***

जी प्रत्येक व्यक्ती ख्रिस्ताचे अनुसरण करण्याचे सिद्ध करते त्याने स्वतःला कमी लेखावे व इतरांना जास्त लेखावे. एकत्र या, एकत्र या! ऐक्यात बळ आणि विजय आहे; मतऐक्यात आणि फुटीत दुर्बलता आणि पराजय आहे. हे शब्द स्वर्गातून माझ्याशी बोलण्यात आले आहेत. ...प्रत्येकाने ख्रिस्ताच्या प्रार्थनेचे उत्तर देण्याचा प्रयत्न करावा: “सर्वांनी एक असावे; जसे तू, पिता माझ्यामध्ये आहेस, आणि मी तुझ्यामध्ये आहे.” ओह, काय हे ऐक्य आहे! आणि ख्रिस्त म्हणतो: ह्याद्वारे सर्व लोकांना समजेल की तुम्ही माझे शिष्य आहात, जर तुम्ही एकमेकांवर प्रेम केले. ”

**(५) आपण जेव्हा ख्रिस्ताच्या प्रेमात वस्ती करतो आणि त्याचे प्रेम आपल्याद्वारे इतरांच्या पर्यंत वाहते, आपण इतरांना कसे वागवतो?**

***प्रीतीमध्ये ढोंग नसावे; वाइटाचा वीट माना; बऱ्याला चिकटून राहा; बंधुप्रेमाच्या बाबतीत एकमेकांना खरा***

*स्नेहभाव दाखवा; तुम्ही प्रत्येक जण दुसऱ्याला आदराने आपल्यापेक्षा थोर माना; (रोमकरास पत्र १२:९-१०)*

जे लोक मोहात पडलेले आहेत व चुकत आहेत त्यांची सेवा करण्यात तारणार्याचे उदाहारण हा आपला दर्जा असला पाहिजे. जसे त्याने आपल्याप्रती स्वारस्य घेतले, तीच कोमलता आणि मंद्क्रोध स्वभाव दाखवला, तसाच आपण इतरांना दाखवायचा आहे. “जसे मी तुमच्यावर प्रेम केले,” तो म्हणतो, “तुम्ही देखील एकेमांवर प्रेम करावे.” योहान १३:३४. जर ख्रिस्ताने आपल्यात वस्ती केली, आपण त्याचे  निस्वार्थी प्रेम सर्वांना दाखवू. आपण जसे स्त्री आणि पुरुष ह्यांना सहानुभूती घेताना सहाय्य घेताना पाहतो, आपण विचारू नये, , “त्यांची लायकी आहे का?” तर “मी त्यांचा फायदा कसा करवून देऊ शकतो?”

पृथ्वीवरील प्रत्येक आशीर्वाद हा आपल्या वतीने जी अमर्यादित किमत मोजण्यात आली आहे त्यामुळे आला आहे. जर मनुष्याचा उद्धार करण्यासाठी इतकी मोठी किमत मोजावी लागली, जेणेकरून त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सनातन जीवन प्राप्त व्हावे, आपण

कितीतरी अधिक स्वतःला भाग्यवान समजावे की ख्रिस्तासोबत सहकारी म्हणून काम करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे आणि अशा लोकांची सेवा आपण करतो ज्यांचे तारण करण्यासाठी त्याने आपला अनमोल प्राण दिला! प्रभू येशूचे त्यांच्यावर प्रेम आहे ज्यांच्यासाठी त्याने हे सर्वाधिक अर्पण केले. त्याने स्वतःचे अनमोल जीवन दिले जेन्करून जेकोनी विश्वास ठेवतात त्यांना ते अमरत्व आणि प्रकाश हे तो देऊ शकतो. “सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच खरा देव त्या तुला व ज्याला तू पाठवलेस त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे” {योहान १७:३}. जे ख्रिस्ताचा स्वीकार करतात त्यांची त्याच्यासोबत भागीदारी आहे, आणि त्यांच्या जीवनाचे काम करताना ते चुकणार नाही. पवित्र आत्मा त्यांना दिशा दाखवेल, आणि देवाच्या ज्या अपेक्षा आहेत त्याविषयी ते अधिक बुद्धिमान बनतील, आणि जी कृपा आणि प्रेम ख्रिसताच्या जीवनात प्रगट झाले ते जे लोक त्यांच्या संपर्कात आले त्यांना दाखवतील.

**(६) जसा ख्रिस्त पित्यासोबत एक आहे तसे आपण जेव्हा ख्रिस्तासोबत एक होतो, हे शिष्यत्व जगासमोर कसे प्रगट होते?**

*तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहात. (योहान १३:३५)*

ख्रिस्त आणि त्याच्या लोकांमधील ऐक्य हे जिवंत, खरे आणि कधीही न सरणारे असावे, आणि पिता व पुत्र ह्यांच्यातील जे ऐक्य आहे त्याचे दर्शक त्याने बनावे. हे ऐक्य पवित्र आत्म्याच्या वस्ती करण्याचे फळ आहे. देवाची सर्व खरी लेकरे जगाला ख्रिस्तासोबत आणि त्याच्या बंधूंच्या सोबत असणारे त्याचे ऐक्य प्रगट करतात. ज्या लोकांच्या हृदयात ख्रिस्त वस्ती करतो ते ह्या बंधुत्वाच्या प्रेमाचे फळ व्यक्त करतात. त्यांना जाणीव होते की देवाच्या कुटुंबातील सदस्य म्हणून ख्रिस्ती प्रेम आणि सहभागीता विकसित करण्यास, जिव्हाळा म्हणून लावण्यास, आणि वाढवण्यास, आत्म्यात , शब्दात आणि कृतीत करणे भाग आहे.

देवाची लेकरे होण्यासाठी, त्या राजकीय कुटुंबाचे सदस्य होण्यासाठी, म्हणजे लोक गृहीत धरतात त्यापेक्षा ती बाब अधिक असते. ज्यानन देवाने त्याची लेकरे म्हणून नियुक्त केले ते एकमेकांना ख्रिस्तासारखे प्रेम दर्शवतात. ते एकाच

वस्तूसाठी जगतील आणि कार्य करतील, --जगासमोर ख्रिस्ताचे योग्य प्रतिनिधित्व होणे आवश्यक असते. त्यांचे प्रेम आणि ऐक्य ह्याद्वारे ते जगाला दाखवतील की त्यांच्या ठायी दैवी पात्रता आहे. प्रेम आणि स्वयं- त्यागाच्या उदार कार्याने, ते त्यांच्याभोवती असणाऱ्या लोकांना ते ख्रिस्ताचे खरे अनुयायी आहेत हे दाखवून देतील. "ह्याद्वारे सर्वांना समजेल की तुम्ही माझे शिष्य आहात, जर तुम्ही एकमेकांवर प्रिती केली."

**(७) जेव्हा आपण ख्रिस्तासारखे प्रेम दर्शवून, दयेची कृत्ये करू आणि उत्तेजन देणारे शब्द इतरांशी बोलू तेव्हा त्याची तुलना कशाशी होऊ शकते?**

***रुपेरी करंड्यात सोन्याची फळे, तसे समयोचित भाषण होय. (नीतीसुत्रे २५:११)***

ख्रिस्तासारखे प्रेम करणे म्हणजे सर्व काळी आणि प्रसंगी निस्वार्थी वृत्ती दाखवणे, दयेचे शब्द आणि चांगल्या रूपाने. जे लोक ते देतात त्याची त्यांना काहीच किमत मोजावी लागत नाही, पण ते असा दरवळणारा सुगंध पसरवतात जो जीवात्म्याच्या भोवती असतो. त्यांच्या

परिणामाचा अंदाज मांडता येत नाही. ग्रहण करणाऱ्यासाठी केवळ ते आशीर्वाद नसतात, तर देणार्यासाठी असतात; कारण ते त्याला प्रतिसाद देतात. खरे प्रेम हे स्वर्गीय मूळ असणारे अनमोल गुणविशेष आहे, जो इतरांना ज्या प्रमाणात आपण देतो त्याच प्रमाणात वाढत जातो.

ख्रिस्ताचे प्रेम हे खोल आणि उत्कंठ आहे, जे एका न थांबवू शकणाऱ्या झऱ्याप्रमाणे जे त्याचा स्वीकार करतात त्यांच्यापर्यंत वाहते. त्याच्या प्रेमात काहीच स्वार्थीपणा नाही. जर स्वर्गात जन्मास येणारे हे प्रेम हृदयातील एक टिकणारे तत्व आहे, ते स्वतःची ओळख करून देईल, केवळ त्यांना नाही ज्यांना ह्या पवित्र नात्यात आपण खूप जवळचे असे लेखतो, पण ज्या सर्वांशी आपण संपर्कात येतो. ते आपणास लक्ष वेधून घेणाऱ्या छोट्या कृती करण्यास, सवलती देण्यास, दयेची कृत्ये करण्यास, कोमल, खरे आणि उत्तेजन देणारे शब्द बोलण्यास प्रेरित करतात. ज्या लोकांची हृदये सहानुभूती मिळवण्यास भुकेली आहेत त्यांना ती सहानुभूती दर्शवण्यास आपल्याला प्रेरणा देतात.

**(८) अगदी ठळकपणे प्रेमाच्या आणि देवाच्या १६ व्यावहारिक गुणधर्मांची यादी करा जे ह्या परिच्छेदात दिसून येतात?**

***प्रीती सहनशील आहे, परोपकारी आहे; प्रीती हेवा करत नाही; प्रीती बढाई मारत नाही, फुगत नाही; ती गैरशिस्त वागत नाही, स्वार्थ पाहत नाही, चिडत नाही, अपकार स्मरत नाही; ती अनीतीत आनंद मानत नाही, तर सत्यासंबंधी आनंद मानते; ती सर्वकाही सहन करते, सर्वकाही खरे मानण्यास सिद्ध असते, सर्वांची आशा धरते, सर्वांसंबंधाने धीर धरते. प्रीती कधी अंतर देत नाही; संदेश असले तरी ते संपतील. भाषा असल्या तरी त्या समाप्त होतील; आणि विद्या असली तरी ती संपेल. (१ करिंथकरास पत्र १३:४-८)***

मनुष्याने जर त्याच्या हाताची कसरत केली नाही, तर तो दुर्बल होतो आणि त्यातील स्नायू आपली शक्ती गमावतात. जोपर्यंत ख्रिस्ती व्यक्ती त्याचे अध्यात्मिक सामर्थ्य आणि शक्ती हे आचरणात आणत नाही, त्याचे चारित्र्य मजबूत होत नाही, त्याला काही नैतिक जोम प्राप्त होत नाही. प्रेम एक अनमोल असे रोप आहे जे वाढले तर अधिक

विकसित करणे जरुरीचे असते. ह्या प्रेमाच्या अनमोल रोपाला कोमल रीतीने वागवले पाहिजे (प्रत्यक्षात), आणि ते बलवान आणि अधिक जोमाने कार्य करून अधिक फलदायी बनेल, आणि संपूर्ण चारित्र्याला प्रदर्शन देईल. एक ख्रिस्तासारखा असणारा स्वभाव हा स्वार्थी नसतो, दया न करणारा नसतो, आणि जे सैतानाच्या मोहनशी लढत आहेत त्यांच्या जीवात्म्यांना इजा पोहचवत नाही. जे मोहात पडलेले आहेत त्यांच्या भावनांमध्ये ते प्रवेश करतील जेणेकरून त्या मोहाची आणि परीक्षांची अशी देखभाल होते जेणेकरून त्यातून ते शुद्ध कशीचे सोने बाहेर पडते. ही सवय देवाने सर्वांसाठी नियुक्त करून ठेवली आहे. ह्याच, ख्रिस्ताच्या शाळेत, सर्वच लोक रोज त्यांचे धडे शिकू शकतात, शिक्षक आणि विद्यार्थी देखील, आणि ते संयमी, विनम्र , उदार आणि उदात्त बनू शकतात. तुम्हाला सर्वांना देवाचा शोध व्याकूळ होऊन प्रार्थनेत करावा लागेल जो जिवंत विश्वासाशी मिसळलेला आहे, आणि देवाचा घडवणारा हात तुमच्या स्वतःच्या चारित्र्यात त्याची प्रतिमा उतरून काढेल.

आपणास देवाच्या श्रीमंत अशा कृपेची गरज प्रत्येक तासाला आहे, मग आपल्याला तो जड आणि व्यावहारिक अनुभव मिळतो, कारण देव प्रिती आहे. जो प्रेमात वस्ती करतो, देवात राहतो. ज्या लोकांना त्याची सर्वाधिक गरज आहे त्यांना ते प्रेम द्या. सर्वात कमनशिबी लोक ज्यांचे मत कधीही एक होत नाही त्यांना आपल्या प्रेमाची,आपली कोमलता, आपला कळवळा ह्यांची गरज असते. जे आपल्या संयमाची परीक्षा घेतात त्यानं तर आपल्या सर्वाधिक प्रेमाची गरज असते.

**(९) जेव्हा देवाचे ते दैवी प्रेम आपल्या हृदयात वस्ती करते, मग जे लोक गरजेत आहेत त्यांच्यापासून आपण कोणते ख्रिस्तासारखे- गुणविशेष परावृत्त करून ठेवणार नाही?**

***मग जवळ संसाराची साधने असून व आपला बंधू गरजवंत आहे हे पाहून जो स्वत:ला त्याचा कळवळा येऊ देत नाही त्याच्या ठायी देवाची प्रीती कशी राहणार? (१ योहान ३:१७)***

ख्रिस्ताचे जीवन म्हणजे देवाच्या प्रेमाचा दैवी संदेश घेऊन जाण्याचे होते, आणि

इतरांना हे प्रेम विपुल रीतीने देऊ करण्यास त्याची खूप तीव्र इच्छा होती. त्याच्या चेहऱ्यावरून कळवळा प्रगट झाला, आणि त्याच्या वर्तणुकीत कृपा, विनम्रता, सत्य आणि प्रेम होते. त्याच्या मंडळीतील प्रत्येक सदस्याने हीच गुणधर्म दर्शवली पाहिजे, जर त्याला विजयी मंडळीत सहभागी व्हायचे असेल तर. ख्रिस्ताचे प्रेम इतके विशाल, अखंड, गौरवाने युक्त आहे, की त्याच्याशी जर तुलना केली, तर प्रत्येक गोष्ट ज्याला लोक महान म्हणून लेखतात त्याचे महत्व कमी करत जाते. जेव्हा आपल्याला त्याची झलक मिळते, आपण उच्चारतो, ओ काय त्या देवाच्या प्रेमाची प्रचीती की त्याच्या एकुलत्या एका पुत्राच्या बलिदानाच्या द्वारे त्या प्रेमाची संपत्ती व ते धन त्याने लोकांवर आच्छादिले!

दैवी प्रेम हृदयाला सर्वात अधिक विनवणी करते जेव्हा ख्रिस्ताने जसा कोमल कनवाळूपणा दाखवला तो आपण देखील इतरांना दाखवायचा आहे. ज्या माणसाचे त्याच्या भावाप्रती असे निस्वार्थी प्रेम असते त्याला देवाच्या प्रती असे खरे प्रेम दिसून येते. खरा ख्रिस्ती जीवात्म्याला अशा नाशात पडू देणार नाही, आणि कोणीही त्याची काळजी न घेता, लक्ष न

देता असे ठेवणार नाही. जे चुकतात त्यांच्यापासून तो स्वतःला परावृत्त करणार नाही, त्यांना नाखूष होण्यात आणि निराश होण्यात सोडत नाही किंवा सैतानाच्या युद्धभूमीत लढाई करण्यास सोडत नाही.

**(१०) पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने, आपण कशाचे आज्ञापालन करावे जे जीवात्म्याला शुद्ध करते आणि आपल्याला एकमेकांना सतत प्रेम करण्यास प्रामाणिक मदत करते?**

***निर्दंभ बंधुप्रेमासाठी तुम्ही आपले जीव सत्याच्या पालनाने आत्म्याच्या द्वारे शुद्ध करून घेतले आहेत, म्हणून एकमेकांवर मनापासून निष्ठेने प्रीती करा, (१ पेत्र १:२२)***

हृदयात स्वीकार केल्यावर, सत्याची खमीर त्या इच्छांना नियंत्रित करतात, विचार शुद्ध करून त्या मताला मधुर बनवतात. मनाच्या भावना त्या प्रेरित करून जीवात्म्याच्या उर्जेला जागृत करतात. जाणीव होण्यास, प्रेम करण्यास त्या क्षमतेला ते विस्तारित करतात.

देवाचे वचन हे प्रत्येक मानवी कुटुंबातील सदस्याशी असलेल्या आपल्या नात्याला

शुद्ध करतात. सत्याची खमीर ही परस्पर स्पर्धेचा आत्मा निष्पन्न करत नाही, हेतू सिद्ध करण्याचे प्रेम आणि इच्छा हे पहिले असते. खरे, स्वर्गाकडून-जन्मास येणारे प्रेम हे स्वार्थी नसून बदलता येत नाही. ज्या व्यक्तीचे हृदय देवाची कृपा स्वीकारते त्यात देवाविषयीचे प्रेम जन्मास येते आणि ज्या सर्वांसाठी ख्रिस्त मरण पावला. स्वयं हा ओळख प्राप्त करून घेण्यासाठी संघर्ष करत नसतो. तो इतरांवर प्रेम ह्यासाठी करत नाही कारण ते त्याच्यावर प्रेम करून त्याला संतोशवितात, तर ते त्याच्या फायद्याचे कौतुक करतात, तर ते ख्रिस्ताचे विकत घेतलेले धन आणि मालमत्ता आहे म्हणून तसे होते. जर त्याचे हेतू, शब्द अथवा कृती ह्याविषयी गैरसमज होतो किंवा त्याचे चुकीचे प्रदर्शन होते, तो काही आरोप घेत नाही, तर त्याच्या मार्गाला सिद्ध करते. तो दयाळू आणि विचारवंत आहे, स्वतःच्या बद्द्ल असणाऱ्या मतात विनम्र आहे, तरीही आशेने युक्त, नेहमी देवाच्या दयेवर आणि प्रेमावर विश्वास ठेवतात.

चेहरा बदलून जातो. हृदयात ख्रिस्त जो वस्ती करतो तो लोकांच्या चेहऱ्यावर चमकतो जे त्याच्यावर प्रेम करून

त्याच्या आज्ञांचे पालन करतात. त्या ठिकाणी सत्य लिहून ठेवण्यात येते. स्वर्गाची मधुर शांती तिकडे प्रगट होते. एक नैसर्गिक सौम्यता, मानवी प्रेमापेक्षा अधिक असे त्या ठिकाणी व्यक्त होते.

**(११) जेव्हा आपण स्वतःपासून विचार दूर करतो आणि इतरांना हेच प्रत्यक्ष प्रेम दाखवण्याच्या प्रभूच्या कामगिरीचे अनुसरण करतो, आपल्यापर्यंत कोणता आशीर्वाद परत येतो?**

***तू आपले अन्न भुकेल्यांना वाटावे; तू लाचारांना व निराश्रितांना आपल्या घरी न्यावे; उघडा दृष्टीस पडल्यास त्याला वस्त्र द्यावे; तू आपल्या बांधवाला तोंड लपवू नये हाच तो उपास नव्हे काय? असे करशील तर तुझा प्रकाश प्रभातेप्रमाणे फाकेल, तुझी जखम लवकर भरेल, तुझी नीतिमत्ता तुझ्यापुढे चालेल व परमेश्वराचा गौरव तुझा पाठीराखा होईल. (यशया ५८:७-८)***

ज्या लोकांना वाटत नाही की मनाला आनंदी विषयांच्याप्रती शिस्त लावणे हे एक धार्मिक कर्तव्य आहे ते दोन्ही टोकांपैकी एकीकडे तरी दिसते: असेच उत्साही करमणुकीच्या द्वारे सातत्याने हे

आनंदी होतात, कठीण आणि पेचात टाकणाऱ्या संभाषणात ते पडतात, आनंदाने हस्त आणि जयघोष करत, किंवा ते निराश होतात, खूप मोठ्या परिक्षेत पडतात आणि मानसिक वादात अडकतात, जे त्यांना वाटते की खूप कमी लोकांना समजते अथवा त्याचा अनुभव त्यांना येतो. योग्य कष्ट, सर्व शक्तीच्या आरोग्यदायी सराव, ते स्वतःसाठी विचार प्रवृत्त करतात. हात आणि मन हे उपयुक्त कष्टात व्यापले गेले पाहिजे,इतरांचे ओझे हलके करण्यास, आणि जे लोक ह्यात पडतात ते स्वतःचा फायदा देखील करून घेतात ...मनाला स्वतःपासून दूर लोटले गेले पाहिजे; त्याचे सामर्थ्य इतरांना आनंदी आणि अधिक चांगले बनवण्यात वापरण्यात आले पाहिजे. "देवपित्याच्या दृष्टीने शुद्ध व निर्मळ धर्माचरण म्हणजे अनाथांचा व विधवांचा त्यांच्या संकटांत समाचार घेणे, व स्वतःला जगापासून निष्कलंक ठेवणे हे आहे" (याकोब १:२७).

***जसे मी ख्रिस्ताच्या जीवनाच्या बद्दल देवाचे वचन वाचतो, मला त्यांचे सौंदर्य आणि मूल्य हे एका "सौम्य आणि शांत***

आत्म्यात दिसते.” माझी प्रार्थना आहे की देवाच्या दृष्टीने हे जे गुणधर्म महत्वाचे आहेत ते माझ्या जीवनातून प्रगट व्हावे.

गोल करा :       होय          अनिश्चित

देवाच्या प्रती हे अत्युच प्रेमाचे वरदान आणि इतरांसाठी निस्वार्थी प्रेम मिळावे म्हणून मी इच्छा बाळगतो जे केवळ देव देऊ शकतो. त्याद्वारे माझे चारित्र्य बदलावे, माझ्या इच्छाशक्तींवर राज्य करतात, माझ्या आवडीवर नियंत्रण ठेवत्त, आणि त्याचे गौरव करण्यासाठी माझ्या जिव्हाळ्याला उदात्त करतात.

गोल करा :       होय          अनिश्चित

ही माझी प्रार्थना आहे की जगाने पाहावे की मी ख्रिस्ताचा अनुयायी आहे आणि हे सर्व माझ्या जीवनात देवाच्या प्रेम आणि कृपा ह्यांना व्यक्त होण्यासाठी परवानगी देतात.

गोल करा :       होय          अनिश्चित

*मी देवाला मागणी करतो की मला ही सत्याची खमीर त्याने माझ्या हृदयात द्यावी ज्याद्वारे माझ्या इच्छा नियंत्रित होतात, माझे विचार शुद्ध होतात, आणि माझी वागणूक मधुर बनवतात जेणेकरून मी जगापर्यंत ख्रिस्ताची कामगिरी घेऊन जाण्यासाठी त्याचे हट आणि पाय बनावे.*

*गोल करा :* *होय* *अनिश्चित*

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________



# धडा १८
# आपल्या शत्रूंवर प्रेम करणे

**(१) ख्रिस्ती ह्या नात्याने, आपणास शत्रूंना कसे वागवावे ह्याचे वर्णन करण्यासाठी कोणत्या तीन शब्दांचा उपयोग करण्यात आला आहे?**

***मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा आणि जे तुमचा छळ करतात व तुमच्या पाठीस लागतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा, (मत्तय ५:४४)***

ज्या लोकांना प्रेमाची नितांत गरज आहे त्यांना ते द्या. सर्वात दुर्भाग्यवश, ज्यांच्या सहमती होत नाहीत, अशा लोकांना सर्वाधिक आपल्या प्रेमाची,

आपली कोमलता आणि आपला कळवळा ह्यांची गरज असते. जे आपली परिक्षा घेतात त्यांना आपल्या प्रेमाची अधिक गरज असते. जगातून आपण एकदाच जातो; कोणतीही चांगली गोष्ट आपण करू शकतो;अत्यंत उत्कटपाने, प्रयत्नाने, न थकता, त्याच आत्म्याने कार्य करावे जसे ख्रिस्ताने केले आहे. तो कधीही आपणास सोडणार नाही अथवा निराश करणार नाही. सर्वात कडक, हट्टी, निराश असे मत असणाऱ्या लोकांना सर्वाधिक मदतीची गरज आहे. त्यांची मदत कशी करता येते? केवळ ज्या प्रेमाने त्यांच्याशी वागले पाहिजे जसे ख्रिस्ताने पतन पावलेल्या मनुष्यांशी वागताना दर्शवले आहे. तुम्हाला पाहिजे, तसे, त्यांची पात्रता आहे तसे त्यांना वागवा. ख्रिस्ताने आपणास जर तसे वागवले असते तर? त्याला, ज्याची पात्रता तशी नव्हती तसे वागवण्यात आले, जी पात्रता आपली आहे.

तरीही ख्रिस्त आपणास कृपा आणि प्रेमाने वागवतो आपली तशी लायकी नाही तरीही, त्याची जशी पात्रता आहे तसे तो आपणास वागवतो. त्यातील काही गुणांना तसे वागवा, तुम्हाला वाटते जशी त्यांची पात्रता आहे तसे, आणि

त्यांच्यापासून तुम्ही शेवटला आशेचा धागा कापून टाकाल, तुमचा प्रभाव खराब करून जीवात्म्याला इजा पोहचवू शकता. त्याची किमत मोजता येईल का? नाही, शंभर वेळा मी नाही म्हणतो. ह्या सर्व जीवात्म्यांना ज्यांना मदत पाहिजे त्यांना शक्य तितके एकत्र बांधून ठेवा आणि त्यांच्याशी एक प्रेमळ, सहानुभूती, दया दाखवणारे हृदय प्रस्तुत करा, ज्यामधून ख्रिस्तासारखे प्रेम बाहेर पडते, आणि एका जीवाला तुम्ही मृत्युपासून बचावता आणि त्याद्वारे पापांची राशी झाकून ठेवा. त्या ऐवजी आपण प्रेमाने ती परिस्थिती का हाताळू नये?

ह्या ठिकाणी जी तत्वे आपणास दिसतात त्याकडे बरेचदा दुर्लक्ष होत नाही का? त्यांचे अनुसरण करण्याने ज्या प्रकारची दुष्टाई टाळता येते त्याचे प्रमाण काही कमी नाही: कारण काही वेळा छळ करणाऱ्या लोकांचे हृदय हे त्या दैवी मतांच्या आहारी जाण्यास प्रवृत्त होतात, जसे प्रेषित पौलाचे परिवर्तन होण्यापूर्वी त्याचे हृदय होते. देवाने जसे नमूद केले तसे कायम देवाची पूर्ण इच्छा अवलंबिण्यास तसा प्रयत्न करणे चांगले आहे. परिणामांची काळजी तो घेईल.

**(२) ख्रिस्ताने आपणास आपल्या शत्रूंवर प्रेम करण्यास सांगितल्यावर, कोणत्या तीन विशिष्ट पद्धतींचे वर्णन त्याने केले?**

***मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा आणि जे तुमचा छळ करतात व तुमच्या पाठीस लागतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा, (मत्तय ५:४४)***

अशा प्रकारची मागणी करण्यापूर्वी, तारणारा त्याच्या शिष्यांना म्हणाला: “तुमच्या शत्रूंवर प्रेम करा, जे तुम्हाला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या.” जसे ख्रिस्ताने त्याच्या शत्रूंच्या प्रती प्रेम दाखवले त्याचे जीवन देऊन त्यांचे तारण केले तसेच प्रेम आपण आपल्या शत्रूंवर केले पाहिजे. अनेक लोक म्हणू शकतात, “ही आज्ञा खूप कठीण आहे; कारण शक्य तितके मला माझ्या शत्रूंपासून दूर राहायचे आहे.” पण तुमच्या स्वतःच्या मतप्रवाहानुसार कृती करण्यात तारणार्याने जी तत्वे दिली त्यांचे पालन करणे असे होत नाही. “चांगले करा,” तो म्हणतो, “जे लोक

तुमचा द्वेष करतात, आणि तुमचा विनाकारण उपयोग करून घेतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा, आणि छळ करतात; जेणेकरून स्वर्गातील जो पिता आहे त्याची लेकरे तुम्ही बनू शकता: कारण तो सूर्याला नीतिमान आणि चांगले दोन्ही लोकांवर उगवू देतो, न्यायी आणि अन्यायी लोकांवर तो पर्जन्य वृष्टी करतो." हे शास्त्रवचन ख्रिस्ती परिपूर्णतेच्या एका टप्प्याला प्रस्तुत करते. आपण देवाचे शत्रू असताना देखील, ख्रिस्ताने त्याचे आयुष्य आपणासाठी दिले. आपण त्याच्या उदाहरणाचे अनुसरण करायचे आहे.

ख्रिस्ताच्या महान प्रेमाचे प्रतिनिधित्व आपण रोज आपल्या शत्रूंवर प्रेम करून करावे जसे ख्रिस्ताने त्याच्या शत्रूंवर प्रेम केले. त्याद्वारे जर आपण ख्रिस्ताची कृपा प्रगट केली, द्वेषाच्या कडक भावना मोडल्या जातात आणि अनेक हृदयात खरे प्रेम वाहू लागेल. आता दिसतात त्यापेक्षा अधिक परिवर्तन तेव्हा दिसतील. {एमएम २५३-२५४}

**(३) जेव्हा आपण वाईटाची परतफेड चांगल्याने करतो आपल्या शत्रूंना अन्न आणि पाणी देऊन, त्यांच्या**

**सदसदविवेकबुद्धीवर त्याचा काय परिणाम होतो?**

***उलटपक्षी, "तुझा शत्रू भुकेला असल्यास त्याला खायला दे; तान्हेला असल्यास त्याला प्यायला दे; कारण असे केल्याने तू त्याच्या मस्तकावर निखाऱ्यांची रास करशील." (रोमकरास पत्र १२:२०)***

न्याय होईपर्यंत, एका दयाळू व्यक्तीचा प्रभाव, सातत्याने कृती न करणाऱ्या लोकांसाठी कार्यपद्धत, अविचारवंत आणि अपात्र असे लोक आपणास ठाऊक नसतील. त्याच्यावतीने झालेला अन्याय आणि उद्युक्त झाल्यानंतर, एक निष्पाप व्यक्तीसारखी जर तुम्ही त्यांना वर्तणूक दिली तर, दयेची विशेष कृत्ये दाखवण्यास श्रम घेतले, मग एका ख्रिस्ती व्यक्तीची भूमिका तुम्ही बजावलेली आहे; आणि ते आश्चर्यचकित व लज्जित होतात, आणि त्यांची कार्यपद्धती पाहतात आणि त्यांना तुम्ही दटावता तेव्हा कसा दुष्टपणा दाखवता त्यापेक्षा अधिक ते दिसते.

त्यांच्यासमोर तुम्ही जर त्यांची चुकीची कार्यपद्धती मांडली,ते हट्टीपणा आणि द्वेष भावनेने स्वतःला व्यापून टाकतात.

कोमलता आणि विचार करून त्यांना खोलवर त्यांची कार्यप्रणाली दिसून येते, आणि मग तुमच्या विरुद्ध ते करतात . मग . . . तुम्ही ती सोयीची भूमी वापरता; जेव्हा तुम्ही त्यांच्या जीवात्म्यांना ती कळकळ व्यक्त करता, त्यांना माहित असते की तुम्ही ढोंगी नाही, तर जो प्रत्येक शब्द बोलता त्याचा अर्थ तुम्हाला माहित असतो.

**(४) ज्या शत्रूंनी ख्रिस्ताला वाईट अशी वागणूक दिली त्यांच्याप्रती ख्रिस्ताने काय प्रतिक्रिया दिली?**

***त्याची निंदा होत असता त्याने उलट निंदा केली नाही; दुःख भोगत असता त्याने धमकावले नाही; तर यथार्थ न्याय करणाऱ्याकडे स्वतःला सोपवून दिले; (१ पेत्र २:२३)***

येशूचे पृथ्वीवरील संपूर्ण जीवन ह्या तत्वाचे साधे सोपे प्रदर्शन होते. त्याच्या शत्रुंसाठी ही जीवनाची भाकर देण्यासाठी त्याने आपले स्वर्गातील घर सोडले. जरी पाळण्यातून कब्रेपर्यंत त्याचा छळ करून चहाड्या त्याच्याविषयी केल्या गेल्या, त्याच्यातून केवळ क्षमा करणारे प्रेमाचे प्रदर्शन बाहेर पडले. यशया संदेष्ट्याच्या

द्वारे तो म्हणतो, "मी मारणाऱ्यांपुढे आपली पाठ केली, केस उपटणाऱ्यांपुढे मी आपले गाल केले; उपमर्द व छिथू ह्यांपासून मी आपले तोंड चुकवले नाही." "त्याचे हालहाल केले तरी ते त्याने सोसले, आपले तोंडसुद्धा उघडले नाही; वधण्यास नेत असलेल्या कोकराप्रमाणे, लोकर कातरणाऱ्यांपुढे गप्प राहणाऱ्या मेंढराप्रमाणे, तो गप्प राहिला; त्याने आपले तोंड उघडले नाही." यशया ५०:६.

**(५) देवाच्या लेकरांच्या द्वारे कोणती कृती पाहून स्वर्गाचे सन्मानचिन्ह जगाला पुरावा देतात की आपण देवाच्या कुटुंबाचा एक भाग आहोत?**

***तुम्ही तर आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, त्यांचे बरे करा, निराश न होता उसने द्या, म्हणजे तुमचे प्रतिफळ मोठे होईल आणि तुम्ही परात्पराचे पुत्र व्हाल; कारण तो कृतघ्न व दुर्जन ह्यांच्यावरही उपकार करणारा आहे. (लूक ६:३५)***

देवाची लेकरे म्हणजे जे त्याच्या स्वभावाला परिधान करतात. हा काही पृथ्वीवरील दर्जा, जन्म, राष्ट्रत्व, धार्मिक सौभाग्य नाही, जे आपण देवाच्या कुटुंबाचे सदस्य आहोत हे सिद्ध

करतात; ते प्रेम आहे, असे प्रेम जे संपूर्ण मानवजातीला आलिंगन देते. ज्या पापी लोकांची हृदये देखील देवाच्या आत्म्याप्रती बंद नाहीत ते अशा प्रकारच्या दयेला प्रतिसाद देतात; द्वेषासाठी द्वेष, आणि प्रेमाबद्दल प्रेम देखील देतात. तर केवळ देवाचा आत्माच द्वेषाच्या बदल्यात प्रेम देतो. कृतघ्न आणि दुष्ट लोकांच्या प्रती दयेने वागणे, कशाची आशा न बाळगता चांगले करत राहणे, ही स्वर्गाच्या राजकीयपणाची सन्मानचिन्हे आहेत, सर्वोच्च देवाची लेकरे त्यांचे उच्च स्थान व्यक्त करण्याची ही एक खात्री आहे.

**(६) जिकडे द्वेष, हेवा, स्वार्थीपणा आणि गर्व हे अस्तित्वात असतात तिकडे काय हजर असते आणि ते ख्रिस्ताच्या सोबत असणाऱ्या प्रेमाच्या आत्म्यात एकरूप होण्यामधील आपल्या क्षमतेच्या आड येतात?**

***कारण जेथे मत्सर व तट पाडण्याचा स्वभाव आहे तेथे अव्यवस्था व प्रत्येक कुकर्म आहे. (याकोब ३:१६)***

स्वार्थीपणा आणि गर्व त्या शुद्ध प्रेमात अडथळा असतात जे आपणास येशू

ख्रिस्तासोबत त्या आत्म्यात एकरूप करतात. हे प्रेम जर खऱ्या अर्थाने विकसित केले तर, मर्यादित तशाच मर्यादित गोष्टींशी मिसळून राहील,आणि ते एकत्र अमर्यादित गोष्टींवर लक्ष केंद्रित करेल. मानवता मानवतेशी एकवटून जाईल, आणि हे सर्व अमर्याद प्रेमाने जोडले जाईल. एकमेकांच्या प्रती असे शुद्ध प्रेम हे पवित्र असते. ह्या महान कार्यात एकमेकांच्या प्रती असणाऱ्या ख्रिस्ती प्रेमात–अधिक उच्च, अधिक सातत्यपूर्ण, अधिक निस्वार्थी, अधिक शालीन, जे आतापर्यंत पाहण्यात आले– ते ख्रिस्ती कोमलता जतन करतात, ख्रिस्ती भलेपणा, आणि सौम्यता, आणि देवाच्या मिठीत मानवी बंधुत्व उघडकीस आणतात, देवाने मनुष्याचे अधिकार कोणत्या भारदस्त रीतीने गुंतवणूक करून दिले हे कबूल करतात. देवाचा सन्मान आणि आदर करण्यासाठी ख्रिस्ती लोकांनी हा भारदस्तपणा विकसित केला पाहिजे.

**(७) इतरांवर प्रेम कसे करावे ह्यांचे संक्षिप्तात वर्णन ख्रिस्ताने साध्या, सोप्या पदांमध्ये कसे केले आहे?**

***ह्याकरता लोकांनी जसे तुमच्याशी वागावे म्हणून तुमची इच्छा आहे तसेच***

*तुम्हीही त्यांच्याशी वागा, कारण नियमशास्त्र व संदिष्टग्रंथ ह्यांचे सार हेच आहे. (मत्तय ७:१२)*

“लोकांनी जसे तुमच्याशी वागावे अशी तुमची इच्छा आहे, तसे तुम्ही देखील त्यांच्याशी वागा.” अशा वागणुकीचे फळ म्हणजे आशीर्वादित परिणाम दिसून येतात. “ज्या मापनाने तुम्ही मोजणी कराल, त्याच मापनाने तुमच्यासाठी मोजण्यात येईल.” ह्या ठिकाणी जबरदस्त हेतू आहेत, ज्यांनी आपल्याला एकमेकांवर शुद्ध अंतःकरण ठेऊन, चिकाटीने प्रेम करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. ख्रिस्त आपले उदाहरण आहे. तो चांगले करत राहिला. इतरांना आशीर्वाद देण्यासाठी तो जगला. त्याच्या सर्व कृतींना प्रेमाचे आवरण आणि उदात्तपणा होता. इतरांनी आपल्यासाठी काय करावे अशी इच्छा असते तसे आपण स्वतःसाठी न करण्याची आपणास आज्ञा आहे; तशाच परिस्थितीमध्ये त्यांनी आपल्याशी कसे वागावे अशी आपली इच्छा आहे तसे आपण त्यांच्याशी वागले पाहिजे. ज्या मोजमापनाने आपण मोजणार त्याच परिमाणाने आपल्यासाठी मोजण्यात येईल.

शुद्ध प्रेम त्याच्या आचरणात सोपे आहे, आणि इतर कोणत्याही कृतीच्या तत्वापेक्षा ठळक आहे. प्रभावाचे प्रेम आणि इतरांना उच्च लेखणे ह्याद्वारे एक सुसंगत आयुष्य तयार होते आणि अनेकदा निरोध संभाषण उदयास येते. स्वतःसाठी- सन्मान आपल्याला दुष्टाई टाळण्यास प्रवृत्त करते. स्वार्थी हृदय उदारहस्ते कृती करेल, वर्तमानातील सत्य कबूल करेल, आणि बाह्यस्वरूपाने विनम्रता आणि जिव्हाळा हे व्यक्त करेल, तरीही त्याचे हेतू हे फसवणारे आणि अशुद्ध असतात; अशा हृदयातून ज्या कृती वाहतात त्यामध्ये जीवनाची चव नसते आणि खऱ्या पावित्र्याची फळे देखील नसतात, शुद्ध प्रेमाची तत्वे देखील नसतात. प्रेमाला जोपासून ते अधिक विकसित केले गेले पाहिजे, कारण त्याचा प्रभाव हा दैवी असतो.

**(८) कृपेच्या वरदानाचे भागीदार आणि चांगले कारभारी ह्या नात्याने, केवळ शत्रुंसाठीच नाही तर सर्व देवाच्या लेकरांसाठी आपले सेवाकार्य काय आहे?**

***प्रत्येकाला जसे कृपादान मिळाले आहे तसे देवाच्या नानाविध कृपेच्या चांगल्या कारभाऱ्यांप्रमाणे ते***

*एकमेकांच्या कारणी लावा. (१ पेत्र ४:१०)*

उद्धाराची योजना एका वरदानाने सुरु होते व संपते म्हणून, तशीच ती पुढे नेण्यात येते. त्याच अर्पणाच्या आत्म्याने ज्याने आपल्यासाठी तारण विकत घेतले ते सर्वांच्या हृदयात वस्ती करेल जे ह्या स्वर्गीय वरदानाचे भागीदार होतील. प्रेषित पेत्र म्हणतो: "जसे प्रत्येक मनुष्याला ते वरदान मिळाले, तसेच एकमेकांना ते तुम्ही द्या, देवाच्या उदंड कृपेचे कारभारी ह्या नात्याने हे करा." येशूने त्याच्या शिष्यांना पुढे कामगिरीवर सोपवले तेव्हा असे म्हणत पाठवले: "तुम्हाला सहज प्राप्त झाले, तुम्ही तसेच सहज द्या." जी व्यक्ती ख्रिस्तासोबत संपूर्णपणे सहानुभूती दर्शवते इतर काहीच स्वार्थी अथवा उत्कृष्ट असू शकत नाही. जोकोणी त्या जिवंत पाण्यातून पितो त्याला दिसते की "त्यामध्ये ती एक जिवंत पाण्याची सनातन अशी विहीर बनली आहे." त्याच्यातील ख्रिस्ताचा आत्मा हा अरण्यात वाहणाऱ्या झऱ्यासारखा आहे, सर्वांना ताजेतवाने करत, आणि जे नाशाच्या काठावर उभे आहेत, त्यांना ज्या जिवंत पाण्याचे सेवन करण्यास प्रेरित करतात.

ख्रिस्ताच्या वधस्तंभाचे तत्व हे प्रत्येक विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तीला स्वतःचा त्याग करण्याची जबरदस्ती करतो, इतरांना तो प्रकाश देणे, आणि तो प्रकाश अधिक अखंड करण्यासाठी सोय करणे. जर त्यांचा स्वर्गाशी संबंध असेल ते त्या कामात देवदूतांच्या सोबत सुसंगतीत कार्य करत राहतील.

**(९) प्रेमाच्या देवाचे आणि त्याद्वारे त्याच्या लेकरांचे ५ गुणधर्म काय आहेत?**

***शेवटी, तुम्ही सर्व एकचित्त, समसुखदु:खी, बंधुप्रेम करणारे, कनवाळू व नम्र मनाचे व्हा; (१ पेत्र ३:८)***

देवाचे वचन त्याच्या प्रत्येक लेकरासाठी आहे: "शेवटी, तुम्ही सर्व एकचित्त, समसुखदु:खी, बंधुप्रेम करणारे, कनवाळू व नम्र मनाचे व्हा." १ पेत्र ३:८. आता जोपर्यंत दैवत्व संयमाला जोडण्यात येत नाही मनुष्य ती बंधुत्वाची दया दाखवणार नाही. आपल्या जगासाठी असणाऱ्या त्याच्या कामगिरीत, ख्रिस्ताने मनुष्याला देवाच्या आत्म्याच्या कृपेची फळे दाखवली आहे, ज्यांचा स्वीकार केल्यावर, मनुष्याला पूर्णतः आकार देऊन बदलतात, बाह्यस्वरुपाने तसेच अंतर्यामी

देखील, त्याचा गर्व शांत करून स्वतःला उच्च न लेखता देवाच्या दृष्टीने त्याचा बंधू अनमोल आहे म्हणून त्याला उच्च लेखण्यास कारण ख्रिस्ताने त्याच्या जीवात्म्यासाठी ती अमर्याद किमत मोजलेली आहे. जेव्हा मनुष्याला देवाची मालमत्ता म्हणून मोल दिले जाते मग आपण दयाळू, मैत्रिपुर्वक, आणि त्याच्याप्रती तो शिष्टाचार सोडणार नाही.

येशू ख्रिस्ताचा धर्म खऱ्या स्वर्गीय सौम्यतेची एक पद्धत आहे आणि व्यावहारिक रीतीने सवयीने ती कोमलता प्रदर्शित करते. ज्याच्या ठायी हा दैविपणा असतो, त्यामध्ये ह्या कृपेची भर पडते, त्या शिडीवर एक पायरी उंच चढण्यात येते. जितक अधिक उंच त्या शिडीवर तो जातो, तितकी अधिक देवाची कृपा त्याच्या जीवनात, भावनांमध्ये आणि तत्वांमध्ये प्रगट होते. तो शिकत आहे, आणि अधिक शिकत जात आहे देवाशी सुसंगत होऊन त्या गोष्टी स्वीकार करत आहे, आणि स्वर्गामध्ये वतन मिळण्याची एकमेव पद्धत म्हणजे ख्रिस्तासारखे चारित्र्य संपादन करणे. दयेची संपूर्ण योजना ही वागण्यात जे काही काठीर आहे त्याला मृदू करणे, आणि ह्या कार्यात जे काही खडबडीत

आहे त्याला शुद्ध करणे ह्यात आहे. अंतर्यामी बदल स्वतःला ह्या बाह्यात्कारी कृतींमध्ये व्यक्त करतो. देवाच्या आत्म्याची कृपा ह्या लपलेल्या सामर्थ्याने कार्यरत होऊन चारित्र्याचे परिवर्तन करतात. ख्रिस्ताचा धर्म कधीही एक कटू, कठीण आणि अशालीन कृती प्रगट करत नाही. शालीनता एक पवित्र शास्त्रीय गुणविशेष आहे. बंधू दयेचा कृपेचा हा गुणविशेष ह्यामध्ये ख्रिस्ताचे जीवन व्यक्त होते. ख्रिस्ताने प्रगट केली तशी शालीनता कधीही पृथ्वीवर प्रदर्शित झालेली नव्हती, आणि आपल्याला त्याचा अधिक अंदाज मांडता येत नाही.

**(१०) आपल्या स्वतःपेक्षा कोणाच्याप्रती आपण तो सन्मान व्यक्त करावा आणि कोणाचे हित करण्याची वाट पहावी?**

*तट पाडण्याच्या अथवा पोकळ डौल मिरवण्याच्या बुद्धीने काहीही करू नका, तर लीनतेने एकमेकांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ माना. तुम्ही कोणीही आपलेच हित पाहू नका, तर दुसऱ्यांचेही पाहा. (फिलिप्पेकरास पत्र २:३-४)*

स्वर्गाच्या वैभवाने त्याचे मानवावरील प्रेम दाखवण्यासाठी जर इतके केले, तर

मनुष्यांनी एकमेकांना त्या अंधकाराच्या आणि यातनेच्या खड्डयातून बाहेर काढण्यासाठी कितीतरी अधिक केले पाहिजे! ख्रिस्ताने म्हंटले, “एकेमकांवर प्रेम करा, जशी मी तुमच्यावर प्रिती केली आहे;” एका महान प्रीतीने नव्हे; कारण “कोणत्याही मनुष्याचे ह्यापेक्षा अधिक प्रेम नाही, की मनुष्याने आपले आयुष्य त्याच्या मित्रांसाठी देऊ करावे.” आपले प्रेम हे अनेकदा स्वार्थी वाटते, आकारण दिलेल्या मर्यादांच्या मध्ये आपण त्याला सीमित ठेवतो. ख्रिस्ताच्या सोबत जेव्हा आपले जवळचे नाते आणि सहभागीता असते, हित करण्याच्या प्रेम आणि सहानुभूतीच्या आपल्या कृती अधिक खोलवर जातात आणि अखंड होऊन जसे अधिक आचरणात येतील तशा दृढ होत जातात.

ख्रिस्ताच्या अनुयायांचे प्रेम आणि आणि रुची ही जगासारखी विस्तारित असणे जरुरीचे आहे. जे लोक केवळ “मी आणि माझ्यासाठी ” जगतात त्यांना स्वर्गात स्थान नाही. एक कुटुंब म्हणून एकत्र येऊन तुम्ही हे प्रेम विकसित करावे ह्यासाठी देव तुम्हास पाचारण करतो, स्वतःच्या प्रती कमी संवेदनशील बनता आणि इतरांचे दुख आणि परीक्षा

ह्यांच्याप्रती अधिक संवेदनशील असता. तुमच्या संपूर्ण आयुष्यभर जी स्वार्थी आत्मा तुम्ही विकसित केला त्याचे प्रतिनिधित्व अगदी अचूक रीतीने याजक आणि लेवीय ह्यांच्या द्वारे होते जे दुर्भाग्यवश दुसऱ्या बाजूने जाताना दिसतात. त्यांनी पाहिले की त्याला सहाय्य पाहिजे होते, पण तरीही जाणूनबुजून त्याला टाळले.

**(११) एका स्तरावर अथवा दुसरीकडे इतरांनी आशीर्वादित होण्यासाठी देवाने आपल्या सर्वांवर काय प्रदान केले आहे?**

***एकाला त्याने पाच हजार रुपये, एकाला दोन हजार व एकाला एक हजार असे ज्याच्या-त्याच्या योग्यतेप्रमाणे दिले; आणि तो परदेशी गेला. (मत्तय २५:१५)***

त्या सत्याच्या तारणदायी सामर्थ्याच्या प्रती अनेक जीवात्मे येणे आवश्यक आहे. उधळा पुत्र त्याच्या पित्याच्या घरापसुन खूपच दूर आहे, आणि भुकेने त्याचा नाश होत आहे. आपल्या कळवळ्याचे ते साधन आहे. तुम्ही असे विचारता का: “जे लोक त्यांच्या पापात नाश पावत आहेत त्यांना देव कसा लेखतो?” मी तुम्हाला काल्वरीकडे नेतो.

देवाने “त्याचा एकुलता एक पुत्र दिला, की जोकोनी त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.” योहान ३:१६. तारणार्याच्या अतुलनीय प्रेमाचा विचार करा. आपण अजूनही पापी असताना, सनातन मृत्युपासून आपला बचाव करण्यासाठी ख्रिस्त मरण पावला.

ख्रिस्ताने ज्या महान प्रेमाने तुमच्यावर प्रेम केले त्याच्या बदल्यात, तुम्ही त्याच्यापुढे तुमचे आभारप्रदर्शन सिद्ध करणारे अर्पण घेऊन आले पाहिजे. तुम्ही स्वतःचे एक कृतज्ञतेचे अर्पण करावे. तुमचा समय, तुमचे कलागुण, तुमच्या पद्धती–ह्या सर्व हरवलेल्या लोकांचे तारण करण्यासाठी त्या प्रेमळ दयेने वाहने जरुरीचे आहे. येशूने त्याचे प्रेम तुम्ही स्वीकारावे हे शक्य केले आणि त्याच्यासोबत आनंदी हृदयाने सहकार्य करून त्याच्या ह्या सुवासिक प्रभावाखाली कार्य करू दिले. निस्वार्थी सेवेत तुम्ही तुमच्या सर्व मालमत्ता वापराव्यात अशी त्याची इच्छा असते, जीवात्म्यांच्या तारणासाठी त्याची योजना ही सामर्थ्याने पुढे नेणे जरुरीचे आहे. त्याचे हे कार्य करण्यासाठी तुम्ही आपल्या अविघटीत उर्जा समर्पित करणे जरुरीचे आहे.

**(१२) कोणते अद्‌भुत शब्द लोक ऐकतील, जे त्यांच्या ख्रिस्तावरील प्रेमामुळे आपले कलागुण आणि पद्धती इतरांवर प्रेम करण्यास आणि त्यांन आशीर्वाद देण्यासाठी वापरतात?**

***त्याला त्याच्या धन्याने म्हटले, 'शाबास, भल्या व विश्वासू दासा, तू थोडक्या गोष्टीत विश्वासू राहिलास, मी तुझी पुष्कळांवर नेमणूक करीन; तू आपल्या धन्याच्या आनंदात सहभागी हो.' (मत्तय २५:२३)***

प्रभुने जे कलागुण आपणास दिले त्याचे आपण काय केले ह्याची चौकशी निश्चित तो करणार. त्याने स्वतःच्या रक्ताची किमत मोजली आहे आणि त्याचे स्वतःचे आत्म-त्याग आणि दुखसहन आणि अर्पण, प्रत्येक जीवात्मा देवासोबत कष्ट करणारी व्यक्ती म्हणून स्वेच्छेने त्याची सेवा वापरून घेतली आहे. जर केवळ प्रत्येकाला देवाच्या प्रती त्याने दिलेली दाने आणि कलागुण ह्यांचे काय केले ह्याचा हिशोब देणे महत्वाचे आहे ह्याची जाणीव झाली तर, मग येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवासाठी किती मोठा ऐवज देण्यात येईल! एक कलागुण वापर केल्याने वाढू शकतो आणि तो निश्चित

वाढेल. गृहीत असणारे सर्वात कमी वरदान, विनम्र सेवा, ही मनामध्ये पोहचून हृदयांना प्रभावित करेल की ज्यांच्याकडे मोठे कलागुण आहेत ते स्पर्श करू शकणार नाहीत.

आता काम करण्याचा आपला सर्वात प्रसादाचा समय आहे. वयक्तिक भेट ही मोठ्या मोलाची आहे. येशू ख्रिस्तावरील प्रेमामुळे आणि मानवी जीवात्म्यांवरील प्रेम म्हणून हे सत्य प्रत्येक कुटुंबात नेणे आवश्यक आहे, आणि तुम्ही पोहचवू शकता अशा प्रत्येक दूर स्थित ठिकाणी ते गेले पाहिजे.... हे लक्षात ठेवा की पवित्र आत्मा का कार्य करणारा आहे. मानवी मध्यम देवासाठी जे काम करत आहे ते एकटे नाही.

चिकाटीने कष्ट करा, कोमलता, कळवळा, प्रार्थना, आणि प्रेम हे उपदेशांच्या पेक्षा अधिक कार्य करतील. प्रभू येशू, जगाचे तारण पापाच्या शापापासून मुक्त करण्यास करण्यात त्याचे जीवन देण्यात, आपल्या डोळ्यांनी जे काही पाहिले आहे त्यापेक्षा हा अनुभव मोठा आहे. पवित्र आत्मा कार्य करण्यास माध्यमांची वाट पाहत आहे. सैतानाचा नेहमीच काही विजय होणार नाही.

देवाचा आत्मा मंडळीवर ओतण्यात येईल जेव्हा त्याची प्रजा त्याचा स्वीकार करण्यास तयार होईल.

*मला  आता जाणीव होते की ज्यांना अथक श्रमांनी आणि दयेने वागवले पाहिजे ते लोक म्हणजे जे सर्वात कमी पात्र असतात. ख्रिस्ताला मी त्याच्या सहानुभूतीच्या, दयेच्या, हृदयपूर्वक प्रेमाने भरण्याची विनंती करतो जेणेकरून ह्या व्यक्तींना आणि ज्या प्रत्येकाच्या संपर्कात मी येतो त्यांना मी दाखवू शकतो.*

*गोल करा :      होय          अनिश्चित*

*देवाच्या आत्म्याने माझ्यात वस्ती करावी जेव्हा माझा त्याच्या नावास्तव छळ होतो मी द्वेषासाठी प्रेम आणि वाईटासाठी चांगले ह्याची परतफेड करील. ख्रिस्ताने क्रुसावर जो आत्मा दाखवला तोच क्षमेचा आत्मा मी दाखवावा अशी प्रार्थना करतो.*

*गोल करा :      होय          अनिश्चित*

उद्धाराची योजना कशी सुरु होते आणि एका वरदानाने संपते हे मी पाहतो आणि इतरांच्या तारणासाठी ते पुढे नेण्याचे सौभाग्य माझे आहे हे मी पाहतो.
देवाच्या आत्म्याने मला सामर्थ्याने युक्त करावे जेणेकरून ह्या सौभाग्याचा मी विश्वासू कारभारी होऊ शकतो आणि इतरांना आशीर्वाद देण्यासाठी मी ते कलागुण आणि स्रोत वापरावे अशी प्रार्थना करतो.

गोल करा :      होय        अनिश्चित

पित्याच्या ओठातून बाहेर पडणारे ते आशीर्वादित शब्द ऐकावे अशी माझी प्रार्थना आहे, "शब्बास माझ्या भल्या आणि विश्वासू दासा, प्रभूच्या आनंदात तुझा प्रवेश होवो." आणि त्याची स्तुती परत करण्यामध्ये मी माझा मुकुट त्यःच्या चरणी अर्पण करेल!

गोल करा :      होय        अनिश्चित



# धडा १९

# प्रेमाचा परिणाम

**(१) “प्रकाशात टिकून राहण्याचा” अर्थ काय आहे, आणि आपल्या जीवनात जर ते लागू केले तर त्याचा परिणाम काय होईल?**

***आपल्या बंधूवर प्रीती करणारा प्रकाशात राहतो, आणि त्याच्या ठायी अडखळण नसते. (१ योहान २:१०)***

तो प्रकाश आहे. जो प्रकाश त्याच्या स्वतःमधून सर्वत्र पसरतो अशाने देव घेरलेला आहे. ख्रिस्ती लोक जी उत्तम गोष्ट करू शकतात ती म्हणजे त्या किरणांमध्ये चालत राहणे जे देवाच्या चेहऱ्यातून बाहेर पडतात. जसा एक प्रवासी त्या दिशा दाखवणाऱ्या व्यक्तीच्या मागे जातो आणि हे एका

अंधकारमय आणि अज्ञात रस्त्यावरून असते, देवाच्या लेकरांची अशी परिस्थिती आहे कारण पूर्वी ते अंधकार असे होते, पण आता प्रभूमध्ये प्रकाश असे आहात; प्रकाशाच्या प्रजेसारखे चाला. (२ कर ४:६; इफिस ५:८).

आपण जर प्रकाशात देवासोबत चाललो, ज्यामधून हा प्रकाश चमकतो, आणि केवळ त्याच्यासोबत सहभागीता घेतात असे नाही पण इतर सर्वांबरोबर जे प्रभूचे अनुसरण करतात. त्याच देवाची सेवा करत, त्याच सत्यांवर विश्वास ठेवत, जीवनाच्या मार्गांवर देवाचे अनुसरण करत, ऐक्यात चालण्यात आपण कधीही अपयशी होत नाही. आपण व आपले बंधुजन ह्यांच्यातील वाईट हेतूचे अल्पसे चिन्ह देखील आपल्याला स्वतःची वर्तणूक पाहण्यास प्रवृत्त करतील, ह्याची खात्री बाळगून की जीवनाच्या प्रकाशित मार्गापासून आपण दूर सरत नाही.

देव प्रिती आहे (अध्य. ४:८), देव प्रकाश आहे (अध्य. १:५), ज्या परिस्थितीमध्ये द्वेष उदभवतो तरीही जी व्यक्ती त्याच्या भावावर प्रेम करत राहते, ती निश्चित देवासोबत एक असे आयुष्य जगते, आणि त्याच्या प्रकाशात राहते.

जो द्वेष करतो.असा मनुष्य प्रेमळ माणसाच्या अगदी विरुद्ध आहे (व.१०). देवाच्या जीवन देणाऱ्या प्रकाशात वस्ती करण्याच्या ऐवजी, ती व्यक्ती अध्यात्मिक अंधकारात वस्ती करते.

**(२) लोकांनी आपल्याला कसेही वागवले तरीही त्यांना आपण जर इतरांवर चिकाटीने प्रेम केले, त्यांच्यासोबत असणाऱ्या प्रेमामुळे नात्यामुळे काय सिद्ध होईल?**

***मुख्यतः एकमेकांवर एकनिष्ठेने प्रीती करा; कारण 'प्रीती पापांची रास झाकून टाकते." (१ पेत्र ४:८)***

जे प्रेम मंदक्रोध आणि दयामय असते ते अशा प्रकारे क्षमा ना करणारे पातक जे आहे त्याला वाढवणार नाही, आणि इतरांचे ते गैरवर्तन आहे ह्याचे देखील भांडवल करणार नाही. शास्त्रवचने अगदी सोप्या रीतीने शिकवतात की चूक करणाऱ्या लोकांना शांतीने आणि संयमाने सहनशील वृत्तीने लेखणे जरुरीचे आहे. योग्य दिशेचे जर अवलंबन झाले तर, कठीण आणि हट्टी दिसणारे हृदय देखील पापांना झाकून टाकते. येशूचे प्रेम अशा प्रकारे अनेक पापांच्या राशीवर

पांघरून घालते. त्याची कृपा इतरांनी केलेल्या चुकांना देखील खुले अथवा उघड करत नाही जोपर्यंत त्याची आवश्यकता तशी असते.

**(३) जेव्हा प्रभूवर आपण संपूर्ण हृदयाने, जीवात्म्याने आणि शक्तीने प्रेम करतो, तेव्हा शेजार्याला आपण कसे वागवले पाहिजे?**

***दुसरी ही की, 'जशी स्वतःवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर.' ह्यांपेक्षा मोठी अशी दुसरी कोणतीही आज्ञा नाही." (मार्क १२:३१)***

मनुष्याला सार्वकालिक जीवनापर्यंत विश्वास असणे, आणि तो देखील त्याच्या बंधुजनांच्या प्रती ख्रिस्तासारखे प्रेम न बाळगता हि सर्वात घातक अशी फसवणूक आहे. ज्याचे देवावर आणि त्याच्या शेजार्यावर प्रेम आहे तो प्रकाश आणि प्रेम ह्याने भरलेला आहे. ख्रिस्ती लोक त्यांच्याभोवती असणाऱ्या लोकांवर असे प्रेम करतात की ते अनमोल जीवात्मे आहेत ज्यांच्यासाठी ख्रिस्त मरण पावला. प्रेम रहित ख्रिस्ती असा कोणीही नाही; कारण "देव प्रिती आहे," आणि "ह्याद्वारे आपणास ठाऊक आहे

की आपण त्याला ओळखतो, जर आपण त्याच्या आज्ञांचे पालन केले तर. जो म्हणतो, मी त्याला ओळखतो, आणि त्याच्या आज्ञांचे पालन करत नाही, तो तर एक लबाड आहे, आणि सत्य त्याच्या ठायी आढळत नाह.” … “हि माझी आज्ञा आहे, तुम्ही एकमेकांवर प्रेम करावे, जसे मी तुमच्यावर केले आहे.” हेच ते फळ आहे जे पुन्हा देवाला देण्यात यावे.

**(४) देवाच्या स्वातंत्र्य आणि प्रेमाच्या नियमशास्त्रांना पाहिल्यावर, ख्रिस्ती व्यक्तीने काय करावे ज्यामुळे आशीर्वाद आणि चारित्र्याची बढती होते?**

***परंतु जो स्वातंत्र्याच्या परिपूर्ण नियमांचे निरीक्षण करून ते तसेच करत राहतो, तो ऐकून विसरणारा न होता, कृती करणारा होतो व त्याला आपल्या कार्यात धन्यता मिळेल. (याकोब १:२५)***

मनुष्याने त्याच्या हाताचा सराव केला नाही, कसरत केली नाही, तर तो दुर्बल बनतो आणि स्नायूंची शक्ती कमी होते. जोपर्यंत एखादी ख्रिस्ती व्यक्ती तिच्या अध्यात्मिक शक्तींचा सराव करत नाही, त्याचे चारित्र्य दृढ होत नाही, आणि

नैतिक जोम देखील प्राप्त होत नाही. प्रेम हे एक अनमोल असे रोप आहे आणि जर ते विपुल रीतीने वाढत गेले तर त्याची लागवड झालीच पाहिजे. प्रेमाच्या ह्या अनमोल रोपट्याला कोमल रीतीने वागवले गेले पाहिजे, आणि ते बलवान आणि जोमाने परिपूर्ण व फलदायी बनते, संपूर्ण चारित्र्याचे प्रदर्शन त्याद्वारे बदलते. ख्रिस्तासारखा स्वभाव हा स्वार्थी, दयाहीन नाही, आणि जे जीवात्मे सैतानाच्या मोहनशी झगडत आहेत त्यांना इजा पोहचवत नाही. जे लोक मोहात पडतात त्यांच्या भावनात ते प्रवेश करतात जेणेकरून त्यांचे मोह आणि परिक्षा हाताळण्यात येतात ज्याद्वारे ते सोने बाहेर पडून बाकीचा कस मागे उरतो.

हि पद्धत देव सर्वांसाठी नियुक्त करतो. ह्यामध्ये, ख्रिस्ताची शाळा, सर्वच लोक रोज त्यांचे धडे घेऊ शकतात, शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही, आणि संयमी, विनम्र, उदार व उदात्त बनू शकतात. तुम्हाला सर्वांना व्याकूळ होऊन देवाचा शोध प्रार्थनापूर्वक करणे गरजेचे आहे आणि त्याला जिवंत विश्वासाची जोड पाहिजे, आणि देवाचा आकार देणारा हात तुमच्या चारित्र्यात त्याची स्वतःची प्रतिमा

निष्पन्न करेल. मोह येतील, पण तुम्ही त्यावर विजय मिळवणार नाही. पण कृपेच्या द्वारे जे हृद्य ख्रिस्ताचे ठोकणे आणि आवाज ह्याप्रती उघड होते,ख्रिस्ती चारित्र्य आणि अनुभव हे अधिकाधिक सुंदर आणि स्वर्गीय बनत आहेत.

आपण हे लक्षात ठेवावे की आपण अशा जीवात्म्यांना हाताळत आहोत जे ख्रिस्ताने स्वतःच्या प्राणाचे मोल देऊन अमर्याद किमत देऊन विकत घेतले आहे. चूक करणाऱ्या लोकांना सांगा, देव तुमच्यावर प्रेम करतो, देव तुमच्यासाठी मरण पावला. त्यांच्यासाठी रडा, आणि त्यांच्यासोबत प्रार्थना करा. त्यांच्यासाठी अश्रू ढाळा, पण त्यांच्यावर चिडू नका. ते ख्रिस्ताचे विकत घेण्यात आलेले अनमोल खजिना आहेत. प्रत्येकाने असे चारित्र्य संपन्न करावे जे त्यांच्या सर्व कृतीत केवळ प्रेम व्यक्त करेल. “माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या ह्या लहानांतील एकाला जो कोणी अडखळवील त्याच्या गळ्यात मोठ्या जात्याची तळी बांधून त्याला समुद्राच्या खोल पाण्यात बुडवावे ह्यात त्याचे हित आहे.” त्या प्रेमाच्या अपरोक्ष जगण्याशिवाय अस्तित्वात राहणे नको ज्यात ख्रिस्ताने त्याचे चारित्र्य प्रगट केले आणि त्याच्या लेकरांवर ते

व्यक्त केले. ख्रिस्त म्हणाला, “मी जसे प्रेम केले तसे तुम्ही एकमेकांवर करा.” आपण अशा कठोर, जाणीव न होणार्या, दया न करणाऱ्या जगात राहतो. सैतान आणि त्याचे दूत हे प्रत्येक जीवात्म्यांवर भुरळ टाकण्याचा प्रयत्न करतात ज्यांच्यासाठी ख्रिस्ताने त्याचे अनमोल जीवन दिले आहे. जोकोनी प्रामाणिकपणे आणि सत्याने देवावर प्रेम करतो, ज्या जीवात्म्यांसाठी ख्रिस्त मरण पावला त्यांच्यावर तो प्रेम करेल.

**(५) ख्रिस्तासारख्या प्रेमाने, जेव्हा आपण इतरांना ते दयेचे वरदान देतो, तेव्हा त्याचा परिणाम काय होतो?**

***द्या म्हणजे तुम्हांला दिले जाईल; चांगले माप दाबून, हलवून व शीग भरून तुमच्या पदरी घालतील; कारण ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला परत मापून देण्यात येईल.” (लूक ६:३८)***

आपण त्या प्रतिफळाचा विचार करू नये, तर सेवेचा विचार करावा; तरीही ह्या आत्म्यात जी दया दाखवली जाते ती कदापि ढळत नाही. “तुझा गुप्तदर्शी पिता हे सर्व पाहून तुला उघड रीतीने प्रतिफळ

देईल.” हे तर्र अगदी खरे आहे की स्वतः देव हेच ते महान प्रतिफळ आहे, जे प्रत्येक दुसऱ्याला कह्यात घेते, जीवात्मा त्याच्या चारित्र्यासारखा बनून केवळ त्याचा स्वीकार करून त्याचा आस्वाद घेतो. समान समानतेचे कौतुक करू शकते. मानवतेची सेवा करण्यासाठी जसे आपण स्वतः देवाच्या अधीन होतो की तो आपल्यासाठी स्वतःला देऊ करतो.

स्वतःमध्ये एक धनवान असे प्रतिफळ मिळाल्याशिवाय कोणीही स्वतःच्या ह्रदयात आणि जीवनात देवाच्या आशीर्वादाच्या झर्याला जागा देऊ शकत नाही. टेकड्या आणि सपाट भूमी ज्यातून एक प्रवाह बाहेर पडतो आणि पर्वतातून निघणारे छोटे ओहोळ ह्यांना समुद्राशी मिळवतो त्यांचा कदापि तोटा होत नाही. जे काही ते देतात त्याची शंभरपट भरपाई केली जाते. जे ओहोळ गीत गट आपल्या मार्गांवर जाते ते मागे ताजेपणा आणि फलदायीपणा मागे जरूर ठेवते. नदीकाठचे गवत हे ताजे आणि हिरवेगार असते, झाडांना अधिक ताजेपणा असतो, फुले अधिक विपुल असतात.

तप्त उन्हाळ्याच्या उष्णतेत जेव्हा पृथ्वी ओसाड आणि मातीच्या रंगाची दिसते,

नदीच्या प्रवाहात हा ताजेपणा दिसतो; आणि ज्या सपाट भूमीने आपले उर उघडून पर्वताचा खजिना समुद्राशी मिसळलेला स्वीकारला ते ताजेपणा आणि सौंदर्य ह्यांनी आभूषित आहे, देवाची कृपा जी भरपाई करते त्याचे साक्षीदार म्हणून, प्रत्येकासाठी जे स्वतःला जगासमोर ती ओसंडून वाहण्यासाठी एक प्रवाह बनवतात. {एमबी ८१-८२}

**(६) उद्धाराच्या वरदानाचे आशीर्वादित स्वीकृते म्हणून, इतरांसाठी ते करण्यामध्ये आपले सौभाग्य आणि उच्च प्रकारचे पाचारण काय आहे?**

***प्रत्येकाला जसे कृपादान मिळाले आहे तसे देवाच्या नानाविध कृपेच्या चांगल्या कारभाऱ्यांप्रमाणे ते एकमेकांच्या कारणी लावा. (१ पेत्र ४:१०)***

उद्धाराच्या योजनेची सुरुवात आणि शेवट एका वरदानाने होते म्हणून, ती तशी पुढे नेणे जरुरीचे आहे.त्याच अर्पणाच्या आत्म्याने ज्याने आपल्यासाठी तारण विकत घेतले ते स्वर्गीय वरदान प्राप्त करून घेणाऱ्या प्रत्येक हृदयात वस्ती करेल. प्रेषित पेत्र म्हणतो: “प्रत्येकाला जसे कृपादान

मिळाले आहे तसे देवाच्या नानाविध कृपेच्या चांगल्या कारभाऱ्यांप्रमाणे ते एकमेकांच्या कारणी लावा.” येशूने त्याच्या शिष्यांना पुढे पाठवले तेव्हा तो त्यांना म्हणाला: “तुम्हाला फुकट असे मिळाले, तसेच तुम्ही देखील मुक्तहस्ते द्या.”

जो ख्रिस्ताच्या सोबत पूर्ण सहानुभूतीत आहे इतर काहीही स्वार्थी अथवा ठळकपणे दिसून येत नाही. जो त्या जिवंत पाण्यामधून पितो त्याला दिसते की “ते जिवंत पाणी आहे ज्यामधून सार्वकालिक जीवन बाहेर पडते.” ख्रिस्ताचा आत्मा त्याच्यामध्ये एका अरण्यात वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे आहे, सर्वांना ताजेतवाने करण्यासाठी वाहत राहते, आणि ज्यांचा नाश होण्याची तयारी आहे, त्यांना जिवंत पाण्याचे जल पिण्यास उत्सुक करते. प्रेम आणि स्वयं-त्यागाचा तो आत्मा होता जो ख्रिस्ताच्या ठायी होता आणि ज्याने प्रेषित पौलाला त्याचे अथांग कष्ट करण्यास प्रेरित केले. “मी ऋणी आहे,” तो म्हणतो, “ग्रीक आणि हेल्लेणी लोकांचा; शहाणे आणि सुज्ञ नसणाऱ्या लोकांसाठी.” “माझ्यासाठी, जो सर्व संतगणांमध्ये सर्वात गौण आहे, हि कृपा देण्यात येते,

की मी परराष्ट्रीय लोकांमध्ये ख्रिस्ताचे न शोधून सापडणारे धन पाहून त्यावर उपदेश देईल.”

आपल्या प्रभूने त्याच्या मंडळीची रचना अशी केली की तिने जगाला त्याच्यामध्ये जी पूर्णता आणि आवश्यक पूर्तता व्यक्त करावी. आपल्याला देवाच्या विपुल भांडारातून सदैव काहीतरी मिळते, आणि तेच देण्याने जगाला ह्याच द्वारे ख्रिस्ताचे प्रेम आणि आशीर्वादित फायदे दाखवायचे असतात. संपूर्ण स्वर्गात हालचाल होत असताना, पृठीच्या सर्व भागांमध्ये उद्धाराचे कार्य पूर्ण करण्यासाठी ते दूत पाठवत, जिवंत देवाच्या मंडळीने देखील ख्रिस्ताच्या सोबत सहकारी बनणे अपेक्षित आहे. आपण त्याच्या रहस्यमय शरीराचे सदस्य आहोत. तो मस्तक आहे, जो सर्व शरीराच्या सदस्यांवर देखील नियंत्रण गाजवतो. येशू स्वतः, ह्या अमर्याद दयेत, मानवी हृदयात हेच कार्य करताना दिसतो, अध्यात्मिक बदल आणि रुपांतर घडवून आणताना दिसतो जे इतके अद्भुत असते की सर्व देवदूत आनंदाने आणि आश्चर्याने ते पाहत राहतात. स्वामी आणि प्रभूला दर्शवणारे हे अप्रामाणिक प्रेम त्याच्या खऱ्या

अनुयायांमधील चारित्र्य आणि जीवन ह्यात दिसतात. ह्या जगात असताना त्या दैवी स्वभावाचे भागीदार बनण्यासाठी ख्रिस्ताची अपेक्षा असते लोकांनी ह्या दैवी स्वभावाचे वाटेकरी व्हावे, देवाची स्तुती करण्यात केवळ त्याचे गौरव केवळ व्यक्त करते इतकेच नाही, तर जगाच्या अंधकाराला स्वर्गाच्या प्रकाशाने झाकून टाकतात. ह्याच द्वारे ख्रिस्ताचे सर्व शब्द पूर्ण होताना दिसतात: "तुम्ही जगाचा प्रकाश आहात."

**(७) जेव्हा, हृदयातून, सर्वात गौण असणाऱ्या लोकांच्या गरजा आपण ह्या प्रेमाचे आचरण करून व्यक्त करतो, स्वर्गाच्या दृष्टीने आपण कोणाची सेवा केलेली आहे?**

***तेव्हा राजा त्यांना उत्तर देईल, 'मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे.' (मत्तय २५:४०)***

प्रत्येक कृती, न्याय आणि दया व हित करण्याची कृती, हे स्वर्गात संगीताचे धून आणि गोडवे सुनावतात. पिता त्याच्या सिंहासनावरून त्याच्या सर्वात अनमोल

खजिन्याला पाहतो त्याची संख्या पाहतो. “सेनाधीश परमेश्वर म्हणतो, “मी नेमीन त्या दिवशी ते माझा खास निधी होतील.” दीन किंवा दुखसहन करणाऱ्या लोकांची दयाळू कृती ही अशी होते जणूकाही येशुसाठी करण्यात आलेली आहे. जोकोणी गरिबाला आश्रय देतो, किंवा छळ सहन करणाऱ्या आणि त्रास सहन करणाऱ्या लोकांशी सहानुभूतीने वागतात, आणि अनाथांची मदत करतात, ते स्वतः येशूच्या अधिक जवळच्या संबंधात नाते जोडतात.

**(८) आपल्या इतरांच्या प्रती दिसून येणाऱ्या अन्यायाच्या कृतींच्या ऐवजी, अंतःकरणपूर्वक प्रेमाच्या कोणत्या कृती असतात ज्याचा अंतिम न्यायाच्या संयत आपला न्याय होईल?**

***कारण मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खायला दिले, तान्हेला होतो तेव्हा मला प्यायला पाणी दिले, परका होतो तेव्हा मला घरात घेतले, उघडा होतो तेव्हा मला वस्त्र दिले, आजारी होतो तेव्हा माझ्या भेटीला आलात, बंदिशाळेत होतो तेव्हा तुम्ही माझ्याकडे आलात.’ (मत्तय २५:३५-३६)***

प्रार्थना, सद्बोध, आणि बोलणे हे स्वस्त अशी फळे आहेत, जे अनेकदा परिधान केली जातात, पण जी फळे ह्या चांगल्या कार्यात दिसून येतात, ज्यामध्ये गरजवंतांची काळजी घेतली जाते, पिताहीन आणि विधवा, हि खरी फळे आहेत, आणि नैसर्गिक रीतीने एका चांगल्या झाडावर वाढतात.... जेव्हा एखादे अंतःकरण दुसऱ्या अंतःकरणाशी जे निराशा आणि दुख ह्या ओझ्यांनी ग्रासलेले आहेत अशी सहानुभूती दर्शवतात, जेव्हा तो हात गरजू लोकांना मदत देऊ करतो, जेव्हा नग्नअवस्थेत असणाऱ्या लोकांना वस्त्रांनी परिधान केले जाते, जेव्हा एका अनोळख्या व्यक्तीला तुम्ही तुमच्या शेजारी त्या अग्निकडे बसवता आणि आपल्या हृदयात एक स्थान देता, देवदूत जवळ येतात, आणि स्वर्गात त्या उत्तर देणाऱ्या व्यक्तीला प्रतिसाद देता. प्रत्येक कृती, न्याय आणि दया आणि हित करण्याची प्रत्येक कृती, ह्या स्वर्गात संगीताचे मधुर धून गुणगुणतात.

आपला स्वर्गीय पिता आपल्या मार्गांवर असे दडलेले आशीर्वाद घेऊन येतो, जे काही लोक स्पर्श देखील करू शकणार नाही कारण त्यांच्या आनंदापासून परावृत्त

होण्याची भीती त्यांच्यात असते. देवदूत हे पाहण्याची वाट बघतात आपल्या चांगल्या करण्याच्या क्षेत्रात- आपण इतरांना आशीर्वाद देतो अथवा नाही हे बघतात, की त्यांनी आपल्याला तो आशीर्वाद द्यावा. प्रभूने स्वतः आपल्याला वेगळे केले आहे- काही श्रीमंत, काही गरीब, काही त्रास सहन करत असणारे—जेणेकरून सर्वांना त्यांचे चारित्र्य विकसित करण्यासाठी ती संधी मिळेल. गरिबांना असे होण्यासाठी जाणूनबुजून देवाच्या हाती स्वाधीन केले जाते, त्यांची परिक्षा घेऊन त्यांना सिद्ध केले जाते, आणि त्याद्वारे आपल्या हृदयात जे आहे ते विकसित केले जाते.

**(९) त्या महान न्यायात, ती मोजमापनी करण्याची काठी कोणती असेल जी आपण देवावर खरे प्रेम करतो अथवा नाही आणि स्वर्गासाठी रास्त आहोत अथवा नाही हे प्रगट करतात?**

***जशी मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी अशी माझी आज्ञा आहे. (योहान १५:१२)***

मनुष्यांच्या प्रती प्रेम असणे हे देवाच्या प्रती असणाऱ्या पृथ्वीवरील प्रदर्शन आहे.

हेच प्रेम पेरण्यासाठी, त्या एका कुटुंबाचे संतान बनवण्यासाठी, गौरवी राजा आपल्यासोबत एक झाला. आणि जेव्हा त्याचे प्रस्थान करण्याच्या वेळचे शब्द परिपूर्ण होतात, “एकमेकांवर प्रेम करा, जसे मी तुमच्यावर प्रेम केले आहे” (योहान १५:१२); आणि जेव्हा आपण तो जसे जगावर प्रेम करतो तसे करतो, मग आपल्यासाठी त्याची कामगिरी सिद्‌ध होते. आपण स्वर्गासाठी अगदी योग्य असे आहोत; कारण आपल्या हृदयात स्वर्ग आहे. {डीए ६४१}

प्रभू चांगला आहे. तो दयाळू आणि मंद्क्रोध आहे. त्याच्या प्रत्येक लेकराची त्याला ओळख आहे. आपल्यातील प्रत्येकजण काय करत आहे हे त्याला अगदी नेमके ठाऊक आहे. प्रत्येकाला किती श्रेय द्यावे हे त्याला अगदी अचूक ठाऊक आहे. तुम्ही तुमची श्रेयाची आणि दोषाची यादी तशीच ठेवणार नाही का, आणि देवाला त्याचे स्वतःचे कार्य करू देण्यास त्यावर सोपवाल? तुम्ही जर देवाने जे कार्य दिले आहे ते जर

कराल तर तुम्हाला तो गौरवी मुकुट देण्यात येईल.

**(१०) न्यायाच्या महान दिवशी, ज्यांनी जगामध्ये असताना ख्रिस्ताने जसे प्रेम केले तसेच इतरांवर ज्यांनी केले आहे ते कोणते आशीर्वादित शब्द ऐकतील?**

***तेव्हा राजा आपल्या उजवीकडच्यांना म्हणेल, ‘अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादितहो, या; जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुमच्याकरता सिद्ध केले आहे ते वतन घ्या: (मत्तय २५:३४)***

न्यायाच्या दिवशी, जे लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात विश्वासू होते, जे त्यांचे कार्य पाहून करण्यास जलद असतात, स्तुती किंवा फायदा ह्यांचा विचार न करता, “अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादितहो, या; जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुमच्याकरता सिद्ध केले आहे ते वतन घ्या.” त्यांनी जे वक्तृत्व आणि भाषण केले ह्याचे कौतुक ख्रिस्त करत नाही, जी बुद्धिमत्ता त्यांनी दाखवली, किंवा त्यांनी ज्या उदार देण्या दिल्या. अशा छोट्या गोष्टी करण्यात खूप दुर्लक्ष करण्यात येते जितके लक्ष दिले जाते. “मी भुकेला होता, आणि

तुम्ही मला खाण्यास मांस दिले,” तो म्हणतो. “मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे.”

जेव्हा सर्वांच्या बाबी देवासमोर मागोवा घेण्यासाठी येतात, तोच प्रश्न, त्यांच्याठायी काय होते? हे कधीच विचारले जात नाही, पण त्यांनी काय केले आहे? त्यांनी वचनाचे पालन केले नाही का? ते स्वतःसाठी जगले का? किंवा हित करण्याच्या कृतीत ते दिसून येते, दयेची, प्रेमळ कृत्ये, इतरांच्यापेक्षा स्वतःचा जास्त विचार करत, आणि स्वतःचा तुच्छ लेखात जेणेकरून त्यांनी इतरांना आशीर्वादित करावे? जर आपल्याला सर्व नोंदीमध्ये दिसते की त्यांचे जीवन असे होते, त्यांचे चारित्र्य हे कोमलता, स्वयं- त्याग, आणि हित करण्यात ठळक दिसतात, त्यांना ख्रिस्ताकडून ते आशीर्वादित आश्वासन प्राप्त करून घेतील, “शब्बास,” “अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादितहो, या; जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुमच्याकरता सिद्ध केले आहे ते वतन घ्या.”

देवामधून निघणारे जी प्रकाशाची किरणे आहेत त्याच्यात चालणे हि माझ्या हृदयाची इच्छा आहे जे एका अंधाऱ्या आणि अज्ञात रस्त्यावर चालणार्या प्रवासी सारखे आहे.

गोल करा : होय अनिश्चित

मला समजते की हा प्रकाश म्हणजे हे प्रेम आहे आणि देवाच्या प्रेमाने माझ्यामधून प्रकाशाचा एक प्रवाह म्हणून इतरांपर्यंत वाहावा जेणेकरून स्वर्गाच्या राज्यासाठी मी ख्रिस्ताचा सहकारी असे व्हावे.

गोल करा : होय अनिश्चित

मला जाणीव होते की प्रेम केवळ एक संवेदना नसून एक कृती आहे. माझी इच्छा आहे की प्रेमाच्या ह्या अध्यात्मिक शक्तीला मी आचरणात आणावे जेणेकरून माझ्या जीवनात ते एक महान

सामर्थ्य बनावे आणि इतरांपर्यंत वाहणारा महान झरा बनावा.

गोल करा : होय अनिश्चित

इतरांवर प्रेम करण्याची सवय हि केवळ अरण्यात वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे नाही तर देणाऱ्या व्यक्तीकडे परत ती वाहते आणि त्यांची अध्यात्मिक उन्नती करते. ह्या आयुष्यात मी हि इच्छा बाळगते.

गोल करा : होय अनिश्चित

पित्याकडून ते आशीर्वादित शब्द ऐकण्याची माझी हि इच्छा आहे, “शब्बास माझ्या भल्या आणि विश्वासू दासा माझ्या प्रभूच्या आनंदात प्रवेश करा.”

गोल करा : होय अनिश्चित